मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक यांनी कापडाचा प्रकार कंपनी, रंग इत्यादी निश्चित करुन फेर कोटेशन मागविण्यात यावेत, असे ठरले होते. त्यानुसार इकडील पत्र क्र.११४१७ दि.०९.०९.२००९ अन्वये एकुण आठ पुरवठाधारकांकडून दि.२५.०९.२००९ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यापैकी ४ पुरवठाधारकांचे कोटेशन प्राप्त झालेले आहे. ते खालीलप्रमाणे-

०१. मे.सारडा इंटेरिअर, अहमदनगर (प्राप्त दि.०३.१०.२००९)
०२. मे.बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे (प्राप्त दि.३०.०९.२००९)
०३. मे.बिन्नी शोरुम, अहमदनगर (प्राप्त दि.३०.०९.२००९)
०४. मे.मोता गारमेंट, बारामती (प्राप्त दि.२४.०९.२००९)

उपरोक्त ४ बंद कोटेशन्स दि.२३.१०.२००९ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे समक्ष उघडण्यात आले असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता करण्यात येऊन तो मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक १०.०१.२०१० चे सभेपूढे चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेसाठी सादर करण्यात आला होता. परंतू सदरहू सभेत कोणीही पूरवठाधारक उपस्थित न राहील्याने निम्नतम दराचे कोटेशन्सधारकांस समितीचे सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे असे ठरले होते. त्यानुसार निम्नतम दर असलेले कोटेशन्सधारक मे.बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे यांनी खालीलप्रमाणे निम्नतम दर देऊ केलेले होते.

| अ.नं. | तपशिल | कापडाची कंपनी | दर प्र.नग रुपये (शिलाईसह) | मागणी (नग) | एकुण किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | फूल ॲप्रन | मफतलाल | २१८.४० | २५२ | ५५,०३६.८० |
| ०२ | हाफ ॲप्रन | मफतलाल | १८७.२० | ५०६ | ९४,७२३.२० |
| ०३ | फूल व पॅन्ट | मफतलाल | ३८४.८० | १८ | ६,९२६.४० |
| ०४ | हाफ शर्ट व पॅन्ट | मफतलाल | ३६९.२० | ११० | ४०,६१२.०० |
| ०५ | सलवार/कूडता | मफतलाल | २३५.०४ | ३६४ | ८५,५५४.५६ |
| | | | | एकूण | २,८२,८५२.९६ |

मे.बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे यांना आजचे सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी सभेपूढे चर्चा/वाटाघाटीनंतर सूट दिलेली नाही.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे यांचेकडून मफतलाल कंपनीच्या कापडाचे उपरोक्तप्रमाणे दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस आहे.

तसेच तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.०३ साडी, पेटी कोट ब्लाऊज पीस ४० नग (अंदाजे किमत रुपये १६,०००/-) याकरीता बिन्नी शो रुम पूणे यांचे एकमेव कोटेशन्स प्राप्त झाले होते. सदर कोटेशन्सधारक हे दोन्हीही सभेपूढे समक्ष बोलावून देखील चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित नव्हते. त्यामूळे सदर साड्या ह्या मा.विश्वस्त श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व वैद्यकीय संचालक यांनी अहमदनगर येथील सारडा इंटेरिअर यांचेकडे जाऊन खरेदी करण्यात याव्यात. तसेच दोन्ही रुग्णालयाचे अधिक्षक, लिपिक, मदतनीस,शिपाई व वॉर्डबॉय यांचे गणवेश खरेदी संस्थानचे इतर विभागातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच खरेदी करण्यात आलेल्या मान्य दराने मे.बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे यांचेकडून खरेदी करण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१४) गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे.**

ब) फेब्रुवारी,२०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | आंध्र बँक, शिर्डी ( NPAY ) | २७/०२/२०१० | १३,०६,०५०.०० |
| २ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे फेब्रुवारी २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ७,००,००,०००.०० |
| | | एकूण रक्कम - | ७,१३,०६,०५०.०० |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ७.१३ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बॅंकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बॅंकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बॅंकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बॅंकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

०१. युनियन बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
०२. सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
०३. आंध्र बॅंक, शिर्डी
०४. स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
०५. बॅंक ऑफ बरोडा, कोपरगांव
०६ बॅंक ऑफ बरोडा, नासिक
०७ बॅंक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
०८. विजया बॅंक, शिर्डी
०९.युनायटेड बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी

आंध्र बॅंक,शिर्डी (NPAY)च्या बचत खात्यातील आणखी रक्कम टाकून अ.नं.१ मधील रक्कम योजनेनुसार प्रचलित दराने गुंतविण्यात यावी तसेच जसजशी गुंतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे वरील १ ते ९ या बॅंकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बॅंकेकडे अल्पमुदतीसाठी उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.७.१३ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस आहे.

ब) तसेच माहे **मार्च,२०१०** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बॅंक ऑफ बरोडा, नासिक | ०७/०३/२०१० | ५,२७,७२,२२०.०० |
| ०२ | बॅंक ऑफ बरोडा, कोपरगांव | १९/०३/२०१० | ६,५३,२७,६६९.०० |
| ०३ | बॅंक ऑफ इंडीया, कोपरगांव | २४/०३/२०१० | ३४,०८,८४८.०० |
| ०४ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी | ३१/०३/२०१० | ४,०६,४५,४९१.०० |
| ०५ | आंध्र बॅंक, शिर्डी | २६/०२/२०१० | ५,५२,७७,२६०.०० |
| ०६ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे मार्च २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ७,००,००,०००.०० |
| | | | **२८,७४,३१,४८८.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. २८.७४ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बॅंकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बॅंकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बॅंकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बॅंकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

०१. युनियन बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
०२. सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
०३. आंध्र बॅंक, शिर्डी
०४. स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
०५. बॅंक ऑफ बरोडा, कोपरगांव
०६ बॅंक ऑफ बरोडा, नासिक
०७ बॅंक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
०८. विजया बॅंक, शिर्डी
०९.युनायटेड बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ९ या बॅंकांकडून जसजशी गुंतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे वरील १ ते ९ या बॅंकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बॅंकेकडे अल्पमुदतीसाठी उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. २८.७४ कोटी टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली . (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**१५) सोने-चांदी कस लावून तपासणेकामी मुल्यांकनकार सराफांची नेमणूक करणे बाबत**

(अ)संस्थानला दक्षिणापेटीव्दारे मिळणाऱ्या व लेखाशाखेत वेळोवेळी देणगी येणां-या सोने-चांदी वस्तु अलंकारांची कस लावून तपासणी करणे, बाजारभावा प्रमाणे किंमत लावणे याकामी, सराफ (Gold Valuer) म्हणुन श्री. रघुनाथ माधव नागरे, शिरडी यांची मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१५ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्र.८३९ अन्वये मानद तत्वावर दरमहा रुपये २,५००/- (रुपये दोन हजार पाचशे) मानधनावर दिनांक ०१ जानेवारी २००९ ते ३१ डिसेंबर, २०१० या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.

संस्थानला दक्षिणापेटीव्दारे प्राप्त होणाऱ्या सोनेचांदी वस्तुंच्या संख्येत तसेच लेखाशाखेत देणगीरुपाने प्राप्त होणा-या सोने-चांदीच्या वस्तुंमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. समाधीमंदिर व

परिसरातील दक्षिणापेटी मोजणीकामी श्री. नागरे स्वत: नियमित उपस्थित असतात. तसेच श्री साई भक्तांकडून दैनंदिन देणगी स्वरुपात येणारे सोने-चांदी अलंकारांची कस लावून मुल्य ठरविणे आणि सोनाराच्या मुल्यांकनानुसार तातडीने भक्तास सोने-चांदी अलंकाराची पावती देणेसाठी स्थानिक सोनाराची आवश्यकता भासते, त्याप्रमाणे श्री. नागरे नेहमीच उपलब्ध होत आहे.

तथापि, श्री नागरे यांचकडील दि. ०३.०२.२०१० रोजीचे अर्जान्वये त्यांनी अशी विनंती केलेली आहे की, वृद्धापकाळामुळे मला सदरचे काम करणे अवघड जाते. माझा नातू चि. गणेश दत्तात्रय नागरे यांचे देखील सुवर्णकला प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर येथे सोनार कामाचे प्रशिक्षण झालेले आहे. तो माझ्या बरोबर गेल्या पाच वर्षापासून संस्थानचे सोने-चांदी मौल्यवान वस्तूच्या मुल्यांकनाच्या कामात मदत करीत आहे. त्यास या कामाची चांगली माहिती असून अनुभवही आहे. तरी त्यास येथून पुढे संस्थानचे दक्षिणापेटीतील सोने-चांदी व दैनंदिन येणाऱ्या सोने-चांदी या व इतर मौल्यवान वस्तूंचे मुल्यांकनाचे काम करणेची संधी द्यावी.

यासंदर्भात श्री. नागरे यांचे नातू श्री. गणेश दत्तात्रय नागरे, रा शिर्डी यांनीही दि. ०३.०२.२०१० च्या विनंती अर्जानुसार मला संस्थानचे दक्षिणापेटीतील सोने-चांदी इ. मौल्यवान वस्तूंचे मुल्यांकनाचे काम करण्याची संधी द्यावी अशी विनंती केली आहे.

श्री. रघूनाथ माधवराव नागरे, रा शिर्डी यांचे वृद्धापकाळामुळे सदरचे काम करणे अवघड जात असल्याने त्यांचे नातू चि. गणेश दत्तात्रय नागरे, रा. शिर्डी यांना संस्थानचे दक्षिणापेटीतील सोने-चांदी इ. मौल्यवान वस्तूंचे मुल्यांकनाचे काम करण्याची संधी द्यावी असे मा.विश्वस्त डॉ. एकनाथराव भा. गोंदकर सो., यांनी दि. २१.१.२०१० चे पत्रानुसार कळविले आहे.

**(ब)** व्यवस्थापन समितीचे दिनांक ६.९.२००८ चे सभेतील निर्णय क्र. ६६१ अन्वये श्री कमलाकर खरोटे यांची दिनांक १ आक्टोबर २००८ ते ३० सप्टेंबर २०१० या कालावधीसाठी शासनमान्य मुल्यांकनकार म्हणून रुपये २,५००/- मासिक मानधनावर नेमणूक करण्यात आली आहे.

**(क)** व्यवस्थापन समितीचे दिनांक ६.९.२००८ चे सभेतील निर्णय क्र. ६६१ अन्वये अन्वये सोने-चांदी कस लावून तपासणेकामी आणखी दोन सराफांची (Gold Valuer) आवश्यकतेप्रमाणे नेमणूक करणेत यावी, असा निर्णय झाला आहे. वरील त्यानुसार (१) चिंतामण गंगाधर राजापूरकर, चेतन चिंतामण राजापूरकर, नाशिक (२) श्री सचिन अरुण मैड, नाशिक यांनी पाठविलेल्या पत्रानुसार संस्थानमध्ये मुल्यांकनकार म्हणून काम करण्याची विनंती केली आहे.

वर नमूद अ किंवा ब काही अपरिहार्य कारणास्तव उपलब्ध नसल्यास संस्थानची अडचण होऊ नये तसेच संस्थानचा कामकाजाचा वाढलेला व्याप, सोने-चांदी जाहीर लिलावाचे कामाचा विचार करता सध्या उपलब्ध असलेल्या सोने-चांदी मुल्यांकनकारांव्यतिरीक्त, दोन अतिरीक्त सराफांची आवश्यकता भासत आहे. त्यानुसार दोन उपरोक्त शासनमान्य मुल्यांकनकारांची प्रत्येकी रुपये २,५००/- मासिक मानधनावर दोन वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात यावी, असे नम्र मत आहे.

उपरोक्त अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे स्थानिक मुल्यांकनकार म्हणून चि. गणेश दत्तात्रय नागरे, शिर्डी यांना मानद तत्वावर दरमहा रुपये २,५००/- ( रुपये दोन हजार पाचशे मात्र) मानधनावर संस्थानचे दक्षिणापेटीतील सोने-चांदी इ. मौल्यवान वस्तूंचे मुल्यांकनाचे काम करण्याची संधी देणेबाबत आणि "क" मध्ये नमूद केल्यानुसार दोन शासनमान्य मुल्यांकनकारांना दोन वर्षासाठी प्रत्येकी मासिक रुपये २,५००/- (दोन हजार पाचशे मात्र) मानधनावर नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रघुनाथ माधव नागरे यांचे नातू चि.गणेश दत्तात्रय नागरे, शिर्डी यांना मानद तत्वावर दरमहा रुपये २,५००/- ( रुपये दोन हजार पाचशे मात्र) मानधनावर संस्थानचे दक्षिणापेटीतील सोने-चांदी इ. मौल्यवान वस्तूंचे मुल्यांकनाचे काम करण्याची संधी देण्यात यावी. त्यांनी सोने-चांदी मूल्यांकनासाठी शासन परवाना ३ महिन्यात सादर करावा. तसेच पूर्वीप्रमाणे सध्याच्या २ मूल्यांकनकारांना मुदत संपल्यानंतर पुढील २ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**१६) श्री साईनाथ रुग्णालयाच्या प्रयोगशाळेच्या नवीन रुमकरीता २ टन क्षमतेचा स्प्लीट वॉल माऊंटेड ए.सी. खरेदी करणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालय विभागातील नवीन प्रयोगशाळा रुमकरीता २ टन क्षमतेचा स्प्लीट वॉल माऊंटेड नवीन ए.सी. संस्थान विद्युत विभागास कळविणेत आले होते.

परंतू विद्युत विभागाकडे सध्या २ टन क्षमतेचे स्प्लीट वॉल माऊंटेड ए.सी. शिल्लक नसल्याने, त्यासाठी सदर रुम करीता ०१ ए.सी. नव्याने खरेदी करावा लागेल. त्याची बाजारात प्रती नग किंमत अंदाजे रक्कम रु.४०,०००.०० इतकी आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात प्रयोगशाळेच्या नव्याने तयार करणेत आलेल्या रुम्ससाठी उपरोक्त प्रमाणे ए.सी.ची आवश्यकता असून, सदर ए.सी. खरेदी विभागामार्फत खरेदी करता येईल.

तरी श्री साईनाथ रुग्णालयाच्या प्रयोगशाळेतील नवीन रुमसाठी २ टन क्षमतेचे स्प्लिट वॉल माऊंटेड नवीन ए.सी. खरेदी करणेस व याकामी कोटेशन मागविणेस तसेच येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४०,०००.०० मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१७) श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता मागील मंजूर दराने निरमा खरेदीबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता लागणारे साबण, निरमा व बॅटरी सेल खरेदीकामी दि. ०८/०२/२००९ चे मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्रमाक ८० अन्वये अंदाजे रु.८०,६४०/- चे खर्चास व खरेदीस मान्यता मिळालेली होती, सदरचे खरेदीकामी वार्षिक औषधे खरेदीमध्ये निविदेमध्ये दर प्राप्त न झाल्याने दि.०५/०५/२००९ रोजीचे टिप्पणीन्वये स्थानिक विक्रेत्यांकडून कोटेशन मागवून सदरचे खरेदीकामी विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस मान्यता मिळालेली होती, त्यानुसार स्थानिक विक्रेत्यांकडून कोटेशन मागवून दि.२२/०५/२००९ चे मंजूर टिप्पणीन्वये कोटेशन मधील मंजूर दराने मे. दत्तकृपा जनरल स्टोअर्स, बाभळेश्वर यांना इकडील पत्र क्र. ६७०० दि. ०२/०६/२००९ अन्वये निरमा पावडरचा खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| अ.नं. | तपशील | मागणी | दर | एकुण रु. |
|---|---|---|---|---|
| १ | निरमा पावडर १ किलो पॅक | १००० | २८.०० | २८०००.०० |
| | | | एकुण रक्कम रु. | २८०००.०० |

त्यानुसार मे. दत्तकृपा जनरल स्टोअर्स, बाभळेश्वर यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त पावडरचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या निरमा पावडर औषध भांडारात शिल्लक नसून ते दैनंदिन वापरासाठी अत्यंत आवश्यक असते.मे.दत्तकृपा जनरल स्टोअर्स,बाभळेश्वर यांनी दि.१०.०१.२०१० रोजीचे पत्रान्वये मागील दराने पुरवठा करण्यास तयार आहोत असे कळविले आहे.

सदर निरमा पावडर चा दरमहा खप साधारणतः १०० असून तुर्तास खालीलप्रमाणे साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | मागणी | दर | एकुण रु. |
|---|---|---|---|---|
| १ | निरमा पावडर १ किलो पॅक | ८०० | २८.०० | २२४००.०० |
| | | **एकुण रक्कम रु.** | | **२२४००.००** |

वरीलप्रमाणे मे. दत्तकृपा जनरल स्टोअर्स, बाभळेश्वर यांचे मागील मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.२२,४००/- इतका खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१८) सन २००९-१० या वार्षिक निविदेतील मंजूर दराने सर्जिकल (Plain Drape D ३०१) मटेरियल खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभागात शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणाऱ्या उपरोक्त सर्जीकल मटेरियल करीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने M/s.Mahesh Surgical, Pune यांना इकडील पत्र क्र. ५३८० दि. ०५/०५/२००९ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.वार्षीक औषधे खरेदीमध्ये त्यांनी खाली नमुद केल्याप्रमाणेच मागणी केली होती.

| Sr.No. | Description | Make | Qty. | Rate Per | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|
| १ | Plain Drape D ३०१ | SURGIWEAR | १००० | ५४.५६८८ | ५४५६८.८० |
| | | | | **Total -** | **५४५६८.८०** |

त्यानुसार M/s.Mahesh Surgical, Pune यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त सर्जीकल मटेरियलचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सदरचे सर्जीकल मटेरियलचा औषध भांडारात साठा शिल्लक नसून ते दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी अत्यंत आवश्यक असते.

ऑपरेशन थिएटर विभागातील रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे सदर सर्जीकल मटेरियलचा दरमहा खप वाढलेला आहे. त्यामुळे तुर्तास अंदाजे ६ महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Make | Qty. | Rate Per | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|
| १ | Plain Drape D ३०१ | SURGIWEAR | ६०० | ५४.५६८८ | ३२७४१.२८ |
| | | | | **Total -** | **३२७४१.२८** |

वरीलप्रमाणे M/s.Mahesh Surgical, Pune यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.३२,७४१/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त

मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

त्यानुसार सदरचे सर्जीकल मटेरियल खरेदी करण्यात आलेले असून सदरचे खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१९) श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरिता ॲटोक्लेव्हबल लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रूमेंट खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि.०५/१२/२००९ चे मागणी पत्रकान्वये ॲटोक्लेव्हबल लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली आहे. सदरचे इन्स्ट्रुमेंट हे लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असतात. सध्या त्यांचेकडे असलेल्या इन्स्ट्रुमेंट व्यतिरिक्त सदर इन्स्ट्रुमेंटची त्यांना आवश्यकता आहे. सदरचे इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी मागणी केलेल्या इन्स्ट्रुमेंट खरेदीचा व अंदाजे खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per Unit Rs. | Total Amt in Rs |
|---|---|---|---|---|
| १ | Knott Pusher | १ | ५३५.०० | ५३५.०० |
| २ | Reducer for Trocar १०mm & ५mm | २ | ८४३५.०० | १६८७०.०० |
| ३ | Laparoscopic Scissors | १ | ६००५.०० | ६००५.०० |
| ४ | १०mm suction Cannula | २ | ८४३५.०० | १६८७०.०० |
| ५ | Liver retractor -५ Fongs -५mm | १ | ३७२०.०० | ३७२०.०० |
| ६ | Bowel Grasper ३ ५mm | २ | ६२९०.०० | १२५८०.०० |
| ७ | Allies Forceps | १ | ७८००.०० | ७८००.०० |
| ८ | Mixter Right angle forceps ५mm | १ | ६००५.०० | ६००५.०० |
| ९ | Bipolar Cautery Forceps | १ | ५७२०.०० | ५७२०.०० |
| १० | Veress Needle | १ | १७१५.०० | १७१५.०० |
| ११ | Trocar Cannula १०mm | १ | ६००५.०० | ६००५.०० |
| १२ | Tracar Cannula ५mm | २ | ८३२०.०० | १६६४०.०० |
| १३ | Babcock Grasper | १ | ७८००.०० | ७८००.०० |
| १४ | Bipolar Forceps Clipanger type | १ | ९३६०.०० | ९३६०.०० |
| १५ | Ring Applicator | १ | ५७२०.०० | ५७२०.०० |
| १६ | Myoma Srew | १ | ६०००.०० | ६०००.०० |
| १७ | Stone Removal Forcep | १ | ४७२०.०० | ४७२०.०० |
| | | | **Total Amt in Rs** | **१३४०६५.००** |

उपरोक्तप्रमाणे लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी अंदाजे रु. १,३४,०६५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे जनरल ऑपरेशन थिएटर विभागासाठी ॲटोक्लेव्हबल लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंट विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,३४,०६५/- इतक्या खर्चास मान्यता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**२०) संगणक प्रिंटेड व प्रि-प्रिंटेड पेपर खरेदीबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील बिलींग विभागाने संगणक प्रिंटेड व प्रि - प्रिंटेड पेपर ८x६x२ साईजचे दोन लाख (२,००,०००) पावत्या छपाई करणेकामी डी.पी. नं. १५६९, दि. ०६.०२.२०१० अन्वये मागणी केलेली आहे.

सध्या बिलींग विभागात संगणक प्रिंटेड व प्रि - प्रिंटेड पेपर ८x६x२ साईजचे ३३,००० पावत्या शिल्लक असून, सदर पावत्या पेशंटच्या गर्दीनुसार साधारणतः एक ते दिड महिन्यांपर्यंत पुरु शकतील.

त्यामुळे संगणक प्रिंटेड व प्रि - प्रिंटेड पेपर ७० gsm पेपरवर ८x६x२ पार्ट साईजचे (दोन रंगात छपाई, मोनोग्राम व नंबरिंगसह) प्रमाणे २,००,००० पावत्या छपाई कराव्या लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे छपाई करणेकामी अंदाजे रु. ८०,००० /- (अक्षरी रु. ऐंशी हजार) पर्यंत खर्च अपेक्षीत असून सदर छपाई ही विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**२१) सन २००९-१० या वार्षिक औषधे खरेदीमधील इंजेक्शन व ETO Paper मंजूर दराने खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या खालील इंजेक्शन व ETO Paper करीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| S. N. | Name of Drugs / Medicines | Name of Supplier | P.O. No. & Date | Make | Brand Name | acking | Org. Tender Qty. | Rate Per IN Rs. | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Inj Atracuram ४mg / २ml | Anand Enterprises, Pune | ५३३४/ ०५.०५.२००९ | Gland Pharma | ACRIS | AMP | १००० | ५९.०००० | ५९०००.०० |
| २ | Inj Heparin २५००० Iu ५ml Vial | Anand Enterprises, Pune | ५३३४/ ०५.०५.२००९ | Gland Pharma | HEP-२५ | VIAL | २००० | १०४.४१०८ | २०८८२१.६० |
| ३ | Inj Amiodrone १५०mg / १ml | Chetna Enterprises, Ahmednagar | ५३४७/ ०५.०५.२००९ | Samarth | Duron | VIAL | १००० | १८.५४२७ | १८५४२.७० |
| ४ | Inj Hyaluronidase- १५०० I.U. Amp २ml | Karwa Agencies, Sangamner | ५३७२/ ०५.०५.२००९ | Shreya | Hynidase | १ VIAL | २०० | ४७.३२०० | ९४६४.०० |
| ५ | Inj.Ranitidine Amp | Keps Pharma, Mumbai | ५३७४/ ०५.०५.२००९ | Unichem | Ulcirid | २ML | ४०००० | १.६१०१ | ६४४०५.६० |
| ६ | Inj Midazolam ५mg/५ml | Raman & Weil, Mumbai | ५४०२/ ०५.०५.२००९ | Norris | Midaz ५ml | VIAL | १००० | १२.११२५ | १२११२.५० |
| ७ | INJ PAPAVARIN AMP | Yoga Enterprises, Pune | ५४४३/ ०५.०५.२००९ | Troikaa | | २ML | ५०० | ८.५३०० | ४२६५.०० |
| ८ | ETO Paper ५"X२००mtr. | Yoga Enterprises, Pune | ५४४३/ ०५.०५.२००९ | Rups | | | १० | ७८०.०० | ७८००.०० |
| ९ | ETO Paper ७.५"X२००mtr. | Yoga Enterprises, Pune | ५४४३/ ०५.०५.२००९ | Rups | | | १० | १०१९.२० | १०१९२.०० |
| १० | Inj Calcium Gluconate १०% Amp १००ml | Trimurti Agencies, Nashik | ५४३२/ ०५.०५.२००९ | T Walker | Twacal | १०ML | १००० | ८.२५५५ | ८२५५.५२ |
| | | | | | | | | **Total Amt.** | **४०२८५८.९२** |

त्यानुसार पुरवठाधारकांनी पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सदरचे इंजेक्शन व ETO Paper चा औषध भांडारात साठा शिल्लक नाही रुग्णालयात पेशंटच्या सततच्या वाढणाऱ्या संख्येमुळे उपरोक्त सर्व इंजेक्शनचा वापर देखील वाढलेला आहे तसेच कार्डीयाक ऑपरेशन थिएटर मधील ऑपरेशनच्या संख्येत वाढ झालेली आहे त्यामुळे ETO Paper चा वापर देखील वाढलेला आहे. त्यामुळे तुर्तास चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| S. N. | Name of Drugs / Medicines | Name of Supplier | P.O. No. & Date | Make | Brand Name | Packing | Add. Required Qty. | Rate Per IN Rs. | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Inj Atracuram ४mg / २ml | Anand Enterprises, Pune | ५३३४/ ०५.०५.२००९ | Gland Pharma | Acris | AMP | ५०० | ५९.०० | २९५००.०० |
| २ | Inj Heparin २५००० Iu ५ml Vial | Anand Enterprises, Pune | ५३३४/ ०५.०५.२००९ | Gland Pharma | Hep-२५ | VIAL | १२०० | १०४.४१ | १२५२९२.९६ |
| ३ | Inj Amiodrone १५०mg / १ml | Chetna Enterprises, Ahmednagar | ५३४७/ ०५.०५.२००९ | Samarth | Duron | VIAL | ४०० | १८.५४ | ७४१७.०८ |
| ४ | Inj Hyaluronidase- १५०० I.U. Amp २ml | Karwa Agencies, Sangamner | ५३७२/ ०५.०५.२००९ | Shreya | Hynidase | १ VIAL | २०० | ४७.३२ | ९४६४.०० |
| ५ | Inj.Ranitidine Amp | Keps Pharma, Mumbai | ५३७४/ ०५.०५.२००९ | Unichem | Ulcirid | २ML | १५००० | १.६१ | २४१५१.५० |
| ६ | Inj Midazolam ५mg / ५ml | Raman & Weil Pvt. Ltd., Mumbai | ५४०२/ ०५.०५.२००९ | Norris | Midaz ५ml | VIAL | ५०० | १२.११ | ६०५६.२५ |
| ७ | Inj Papavarin Amp | Yoga Enterprises, Pune | ५४४३/ ०५.०५.२००९ | Troikaa | | २ML | ३०० | ८.५३ | २५५९.०० |
| ८ | Eto Paper ५"X२००mtr. | Yoga Enterprises, | ५४४३/ ०५.०५.२०० | Rups | | | १० | ७८०.०० | ७८००.०० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Pune | ९ | | | | | | |
| ९ | Eto Paper ७.५"X२००mtr. | Yoga Enterprises, Pune | ५४४३/ ०५.०५.२००९ | Rups | | | १० | १०१९.२० | १०१९२.०० |
| १० | Inj Calcium Gluconate १०% Amp १००ml | Trimurti Agencies, Nashik | ५४३२/ ०५.०५.२००९ | T Walker | Twacal | १०ML | ८०० | ८.२६ | ६६०४.४० |
| | | | | | | | **Total Amt.** | | **२२९०३७.१९** |

वरीलप्रमाणे इंजेक्शन खरेदीकामी पुरवठाधारकांचे वार्षिक मंजुर दरानुसार रु.२,२९,०३७/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी वरीलप्रमाणे इंजेक्शन वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.२,२९,०३७/- चे खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**२२) श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी व ऑप्थॅल्मिक ऑपरेशन थिएटर विभागात ईपॉक्सी फ्लोअरिंगचे काम करणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयात जागेच्या अडचणीमुळे व रुग्णाचे गैरसोयीमुळे धर्मशाळा इमारत नं.२ व्यतिरिक्त अजून एक धर्मशाळा इमारत क्र.१ वापरण्यास देण्यात आलेली आहे.

त्यानुसार ई.एन.टी.शस्त्रक्रिया व ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया विभाग कार्यान्वीत करण्याची कार्यवाही चालू आहे. सदरचे दोन्ही ऑपरेशन थिएटर विभागात रुग्णांना जंतुसंसर्ग होऊ नये याकरीता ईपॉक्सी फ्लोअरींग करावे लागणार आहे. त्यानुसार बांधकाम विभागाकडून मोजमापे घेण्यात आलेले आहे. ती खालील प्रमाणे.-

०१) ई.एन.टी.शस्त्रक्रिया विभाग - ४.२५ मी x ८.५५ मी.= ३६.३४ चौ.मी.
०२) ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया विभाग - ४.२५ मी x ८.५५ मी.= ३६.३४ चौ.मी.
------------------------------------
एकुण - ७२.६८ चौ.मी.

दि.०७/११/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रमांक ८०३ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपेरशन थिएटर विभागात ईपॉक्सी फ्लोरींग कामासाठी मे. ॲपल एअरकॉन प्रा.लि.मुंबई यांचे दर प्रती चौ.मी रु.१४५०.०० याप्रमाणे कामास मान्यता मिळालेली आहे त्यानुसार त्याचेकडून काम करुन घेण्यात आलेले असून त्यांचे कामाचा दर्जा चांगला आहे. त्यांचेकडून त्याच मंजूर दराने ते काम करण्यास तयार आहे किंवा कसे? याबाबत त्यांना दूरध्वनीवरुन दि.१७/०२/२०१० रोजी विचारणा केली असता ते त्या मंजूर दराने काम करण्यास तयार आहेत असे त्यांनी कळविले आहे.

त्यानूसार ई.एन.टी. शस्त्रक्रिया व ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया विभागात ईपॉक्सी फ्लोअरींगचे काम मे. ॲपल एअरकॉन प्रा.लि.मुंबई यांचेकडून करुन घेता येईल. मे. ॲपल एअरकॉन प्रा.लि.मुंबई यांचे सदर मंजूर दरानुसार सदरचे ईपॉक्सी फ्लोरींग कामासाठी रु.१०५३८६/- इतका खर्च येईल.

तरी ई.एन.टी.शस्त्रक्रिया व ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया विभागात ईपॉक्सी फ्लोअरींगचे काम मे. ॲपल एअरकॉन प्रा.लि.मुंबई यांचेकडून मागील मंजूर दराने करण्यास व सदरचे खरेदीकामी येणाऱ्या रु.१०५३८६/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**२३) मे. सिमेन्स कंपनीचे ५०० एम. ए. एक्स-रे मशिनचे दुरूस्तीबाबत.**

श्री साईनाथ रूग्णालयातील रेडीओलॉजी विभागात रुग्णांचे एक्स-रे काढण्यासाठी मे. सिमेन्स ली. मुंबई या कंपनीचे ५०० mA एक्स-रे मशीन (Model: HD / KLH) खरेदी करण्यात आले आहे. सदर मशीन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.१७/१०/२००९ रोजी संपला आहे. खरेदी आदेशातील अट क्र. ११ नुसार पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता म्हणजेच दि. १७/१०/२०१० पर्यत कंपनी मोफत AMC सर्व्हिस देत आहे. सदर AMC कालावधीत दुरुस्तीसाठी लागणा-या स्पेअर पार्टची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या एक्स-रे मशीन व्यवस्थीत काम देत नसल्यामुळे मे. सिमेन्स ली. मुंबई यांचे इंजिनीअर त्यांचे तातडीच्या भेटीकरीता श्री साईनाथ रुग्णालयात आले होते. त्यांनी मशिनची तपासणी करून मशीनचा एक्स-रे टयुब हा पार्ट खराब झाला असल्यामुळे तो बदलणेकामी सर्व करांसहीत एकुण रु. १,३५,०००/- (अक्षरी रु. एक लाख पस्तीस हजार मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर रकमेची कंपनीने आगाऊ मागणी केलेली आहे. परंतु एक्स-रे टयुब हा पार्ट प्रोप्रायटरी ॲटम या प्रकारचा

नसुन तो अशा प्रकारच्या एक्स-रे मशीनचा पुरवठा करणाऱ्या तसेच एक्स-रे टयुब बनविणाऱ्या विविध कंपन्याकडे देखील उपलब्ध असतो. त्यामुळे सदरचा एक्स-रे टयुब (THX१) हा पार्ट विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून विहित पध्दतीने खरेदी करता येईल.

तरी मे. सिमेन्स लि. मुंबई यांचे एक्स-रे मशीनची टयुब विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून निम्नतम दराने बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. १,३५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, एक्स-रे मशिन खरेदी तारीख, वॉरंटी कालावधी इत्यादीबाबत सविस्तर माहिती घेऊन प्रस्ताव फेर सादर करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**२४) साईबाबा भक्तनिवास जनरेटर कक्षाजवळ पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

साईबाबा भक्तनिवास परिसरात असलेले जनरेटर रुम जवळ पावसाळयामध्ये चिखल होतो, इतर दिवसात गवत येते त्यामुळे सर्व परिसर अस्वच्छ दिसतो करीता सदर जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे बाबत विद्युत विभाग यांनी दिनांक १०/१२/२००९ रोजीचे टिपणी अन्वये इकडील विभागास कळविले आहे.

साईबाबा भक्तनिवास जनरेटर रुम जवळील भागाची पहाणी केली असता जनरेटर रुमचे जवळ कॉईल कुलींग सिस्टीमचे खाली पी.सी.सी. करुन त्यावर ब्लॉक बसवता येईल. १५.० मी. X ५.२० मी. जागेत ७८.०० चौ.मी. (८३९.०० चौ.फुट) खोदाई, मुरुम भराई, पेव्हींग ब्लॉक बसविणेकरीता रुपये ५३,०४७.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

साईबाबा भक्तनिवास जनरेटर रुम परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेकरीता येणारे रुपये ५३,०४७.०० मात्रचे खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन मागवून काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**२५) द्वारावती भक्तनिवास तळमजल्यावर जनसंपर्क कार्यालयासाठी सुविधा तयार करणेबाबत.**

**अ)** श्री साईबाबा मंदिर परिसरात महाद्वार क्र.१ जवळ पुर्वीपासून जनसंपर्क कार्यालय आहे. अतिमहत्वाच्या व्यक्ती (VIP) / साईभक्त दर्शन पाससाठी मागणी करीत असतात. त्यामुळे तेथे नेहमी गर्दी असते. मंदिर परिसरातील गर्दी कमी करणे सुरक्षेच्या कारणास्तव गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून जनसंपर्क कार्यालय व्दारावती भक्तनिवास परिसरात स्थलांतरीत करण्याचे ठरले आहे.

**ब)** उपरोक्त सुचनेनुसार व्दारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यामध्ये जनसंपर्क कार्यालय स्थलांतरीत करणेकामी पूर्वेकडील जिन्याचे उत्तर बाजूस तळमजल्यावर ३८६.०० चौ. फुट जागेत ३' उंचीचे बांधकाम करून त्यावर कलर ॲनोडाईज्ड ॲल्युमिनियम पार्टीशन, दरवाजा, सिरॅमिक टाईल फ्लोअरींग इत्यादि कामे करणेकामी अंदाजपत्रकानुसार रु.१,३७,३००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदरचे काम तातडीने करणे गरजेचे असल्याने उपरोक्तप्रमाणे व्दारावती भक्तनिवास येथे विभागामार्फत ३' उंचीचे बांधकाम करून प्लॅस्टर व रंगकाम करणेत आले असून ॲल्युमिनियम पार्टीशनचे काम मगर जायभावे असोशिएटस, नाशिक याचेकडून बुकस्टॉलसाठी मागविलेले कोटेशन मधील निम्नतम दराने (ॲल्यु. दरवाजा रुपये ४०००/- प्रति चौ. मीटर व ॲल्यु. पार्टीशनासाठी रुपये १७००/- प्रति चौ. मीटर) करुन घेण्यात येत आहे.

तरी वरिल तपशिलामध्ये नमूद केले प्रमाणे कामे व ॲल्युमिनीयम पार्टीशनचे काम मगर जायभावे असोशिएटस्, नाशिक यांचेकडून करुन घेणेकामी येणारे अंदाजे रुपये १,३७,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,वरीलप्रमाणे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत आली. तथापी साईभक्त व मान्यवरांच्या सोयीच्या दृष्टीने जनसंपर्क कार्यालय जुने प्रसादालय परिसरात जागा निश्चित करुन स्थलांतरीत करावे,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**२६) मंदिर परिसरातील महाद्वार क्र.०२ चे बाहेरील पश्चिम बाजूस स्त्रियांसाठी प्रसाधनगृह उभारणेबाबत.**

मंदिर परिसरात प्रवेश करणेसाठी एकूण ०४ महाव्दारे उभारणेत आलेली आहेत, त्यापैकी महाव्दार क्रमांक ०२ हे मंदिर परिसराचे उत्तरेस जुने पिंपळवाडी रस्त्यालगत असून, या महाव्दाराचे बाहेरील पश्चिम बाजूस, संरक्षक भिंतीचे आंत साधारणतः ११०० ते १२०० चौरस फुट जागा रिकामी आहे.

नाताळच्या सलग सुट्टयांच्या कालावधीत जुन्या पिंपळवाडी रस्त्याचे पदपाथावरुन भक्तांसाठी दर्शन रांगेची सुविधा करणेत आलेली होती तसेच सध्या याच ठिकाणाहून दर्शन रांगेची व्यवस्था सुरु ठेवणेत आलेली आहे. गर्दीच्या वेळेस स्त्री - पुरुष भक्तांना प्रसाधनगृहाची अत्यंत निकड भासते, असे निदर्शनास आले आहे. त्यादृष्टीने दि.०३ जानेवारी, २०१० रोजी परिसर पहाणीच्या वेळेस महाव्दार क्रमांक ०२ चे बाहेरील पश्चिम बाजूस, संरक्षक भिंतीच्या आत रिकाम्या असलेल्या उपरोक्त जागी स्त्रीयांसाठी

प्रसाधनगृह उभारणेची शक्यता पडताळून पहाणेत यावी व त्यासाठी बांधकाम आराखडा तयार करणेत यावा, असे ठरले.

त्यानुसार, बांधकाम आराखडयानुसार, मंदिर परिसराशी सुसंगत असे प्रसाधनगृह बांधणेकामी येणारा अंदाजित खर्च खालीलप्रमाणे :

स्त्रीयांसाठी ०५ मुतारी / ०३ शौचालय अंदाजित खर्च

अंदाजे ३०७.०० चौरस फुट बांधकाम रु.३,०७,०००/-

उपरोक्तप्रमाणे मंदिर परिसरातील महाव्दार क्रमांक ०२ चे बाहेरील पश्चिम बाजूस स्त्रीयांसाठी प्रसाधनगृहांचे बांधकाम विहीत पध्दतीने स्थानिक बांधकाम ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागवून पूर्ण करुन घेता येईल. तरी सदर प्रस्तावास व त्याकामी येणारे अंदाजित रक्कम रुपये ४ लाख मात्र पर्यन्तचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी स्थानिक विश्वस्तांनी समक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**२७) मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नं.१८२/५ एकूण २ हेक्टर ३७ आर जमिनीस तारकम्पाऊंड करणेबाबत.**

मौजे निमगांव कोऱ्हाळे तालुका राहाता येथील गट नं. १८२/५ पैकीचे खातेदार श्री सचिन भाऊसाहेब बनकर व इतर ०६ तसेच श्री विजय तुळशिराम कोते व इतर ०५ या खातेदाराचे जमिनी संस्थानने नव्याने खरेदी केलेल्या आहे. खरेदी खतातील अटी व शर्तीनुसार सदर जमिनीची सरकारी मोजणी दि.१२/११/२००९ रोजी मा. तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, राहाता यांचेमार्फत पूर्ण केली आहे.

संस्थान मालकीचे क्षेत्रावर लगतचे शेतकऱ्यांचे अतिक्रमण होऊ नये म्हणून संरक्षणाचे दृष्टीने खरेदी केलेल्या जमिनीचे हद्दीवर काटेरी तारेचे कुंपण करणे आवश्यक आहे. तसचे प्लॉटमध्ये प्रवेश करणेकरीता आर.सी.सी कॉलमसह एम.एस. ग्रील गेटची उभारणी करावी लागणार आहे. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र | तार कम्पाउंडची लांबी | तारकम्पाउंडचा खर्च प्रती ४३२.८२५मी. प्रमाणे | गेट उभारणीचा खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.सचिन भाऊसाहेब बनकर व इतर सहा | ०१ हे १७ आर | ३३७ मी | १४५८६२.०० | ३४६२९.०० | १,८०,४९१.०० |
| ०२ | श्री विजय तुळशीराम कोते व इतर ५ | १ हे २० आर | ३६५ मी | १,५७,९७९.०० | -- | १,५७,९७९.०० |
| | | | | **एकूण रुपये** | | **३,३८,४७०.००** |

सदरचे काम संस्थानचे विविध ठिकाणच्या जमिनीचेकडेने तार कम्पाउंड करणे कामाचे ठेकेदार आर.एल.भुतडा, कोपरगांव यांचे मंजूर दरात करुन घेता येईल. याकामी रुपये ३,३८,४७०.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील नव्याने खरेदी केलेल्या गट नं. १८२/५ पैकीचे क्षेत्राला ठेकेदार आर.एल. भुतडा, कोपरगांव यांचेकडून काटेरी तारेचे कुंपण करणेकामी व यासाठी येणारे रुपये ३,३८,४७०.०० मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली..

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**२८) मंदिर परिसरातील जनसंपर्क कार्यालयाजवळील कारंजा बगीचाचे बाजूस रेड स्टोनची जाळी देणगीदाखल बसविणेबाबत.**

समाधी मंदिर परिसरात जनसंपर्क कार्यालयाजवळ पाण्याच्या कारंजासह बगिचा तयार करण्यात आलेला आहे. बगिचाचे बाजुने लोखंडी ग्रील बसविण्यात आलेली आहे. सदर बगिचाला बसविण्यात आलेल्या लोखंडी ग्रील ऐवजी रेड स्टोनची ग्रील देणगी दाखल बसवून देणेस परवानगी मिळणेबाबत द रॉक स्केप, मुंबई यांनी दि. ३०/०१/२०१० इ-मेल व्दारे विनंती केली आहे.

एम.एस. ग्रील पावसामुळे ठिकठिकाणी गंज येऊन खराब होते. नेहमी रंगकामही करावे लागते करीता रेड स्टोनचे ग्रील बसविल्यास दुरुस्ती देखभालीचा खर्च कमी होईल तसेच दिसण्यासही सुशोभित दिसेल व मंदिर परिसरास खिडक्यांना बसविण्यात आलेल्या रेड स्टोन जाळीला सुसंगत होईल.

द रॉक स्पेस कंपनी, मुंबई यांनी विनंती केल्यानुसार देणगीदाखल जनसंपर्क कार्यालय जवळील पाण्याचे कारंजाकरीता रेड स्टोन जाळी बसविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, द रॉक स्पेस कंपनी, मुंबई यांनी विनंती केल्यानुसार देणगीदाखल जनसंपर्क कार्यालय जवळील पाण्याचे कारंजाकरीता रेड स्टोन जाळी बसविणेस मान्यता देण्यात यावी परंतू देणगीदाराचे नांव टाकण्यात येऊ नये अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**२९) सर्व्हे नं.४/२१ मधिल मोकळया जागेस संरक्षण भिंतीचे बांधकाम करणेबाबत.**

अ) संस्थानचे मनोजकुमार गोस्वामी मार्गावर साई उद्यान व साईनाथ मंगल कार्यालय या मधून जाणाऱ्या शिर्डी- रुई रस्त्यालगत असणाऱ्या सर्व्हे नं. ४/२१ मध्ये ४००चौरस मीटर जागा असून, सदरची जागा ॲड. रामचंद्र बाळकृष्ण कोतवाल, मुंबई यांनी संस्थानला दिनांक २७ जानेवारी, १९७३ मध्ये बक्षिस पत्राने (देणगी) दिलेली आहे. सदरहू जागेच्या पूर्वेस रस्ता आहे. सदर रस्त्याचे कामाच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे मार्फत निवीदा काढण्यात आल्या आहेत. सदर रस्त्याचे विस्तारीकरणात संस्थानचे जागेतून काही भाग जात आहे. सदर जागेत भुमीगत पाण्याची टाकी, दोन कौलारु खोल्यांचे जुने बांधकाम आहे. उर्वरीत मोकळया जागेमध्ये खाजगी वहाने पार्किंग करतात, तसेच बाजूचे बांधकामकर्ते त्या जागेमध्ये मटेरियलचा साठा करतात करीता सदरहू जागेमध्ये अतिक्रमण होऊ नये व त्याचे संरक्षण व्हावे यासाठी सदरहू जागेस संरक्षणाचे दृष्टीने संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

ब) सदरहू जागेचे कडेने ९८.०० मी. लांबीचे कम्पाउंड भिंतीसाठी आर. सी. सी. पाइल्स व बीम घेऊन जमिन लेव्हलचे वर अंदाजे १.८ मीटर पर्यंतचे वीट बांधकाम करुन एम. एस. गेट बसविता येईल करीता याकामी अंदाजे रुपये ४,९८,६७८.०० मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त परिछेद " अ " मध्ये नमूद केले प्रमाणे संस्थान मालकीचे जागेचे संरक्षण होणेच्या दृष्टीने सदरहू जागेस संरक्षक भिंत बांधकाम करणेकामी येणारे अंदाजे रुपये ४,९८,६७८.०० मात्रचे अपेक्षित खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निवीदा मागवून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मा.विश्वस्त श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे,डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी सदरची जागा सुशोभित करुन उपयोगात आणण्याचे दृष्टीने समक्ष पहाणी करावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**३०) संस्थानचे श्री साई समाधी मंदिर परिसरात जलकुंभाचे ठिकाणी टाईल्स बसविणे बाबत.**

मे. राजु वेगेसना फौंडेशन (इंडिया), विशाखापट्टणम यांनी मंदिर परिसरात भक्तांना स्वच्छ व निर्जंतुक पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून आर. ओ. प्लॅन्टस् देणगी दाखल बसवून दिलेले आहेत. या विविध जलकुंभाच्या ठिकाणी नेहमी भक्तांची मोठी वर्दळ असते. सध्या या आर.ओ.प्लॅन्टसच्या ठिकाणी (जलकुंभाच्या ठिकाणी) सिमेंट कॉंक्रिट करुन प्लास्टर केलेले आहे, त्यामुळे याठिकाणी नेहमी ओलसरपणा असतो. या ओलसरपणामुळे भक्तांचे पाय घसरुन दुर्घटना होण्याचा संभव आहे. त्याकरीता मा. कार्यकारी अधिकारीसो. यांनी परिसर पहाणीचे वेळेस, या सर्व ठिकाणी Anti Skid Tiles बसविणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

सध्या समाधी मंदिर परिसरात खालील ठिकाणी पिण्याचे पाण्याचे जलकुंभ (आर.ओ.प्लॅन्टस्) सुरु करणेत आलेले आहेत :

०१. श्री शनि मंदिराजवळील प्रवेशव्दाराजवळ
०२. महाव्दार क्रमांक ०२ जवळ आतील बाजूने.
०३. महाव्दार क्रमांक ०३ जवळ आतील बाजूने.
०४. लेंडीबागेतील श्री दत्त मंदिराजवळ.
०५. साईप्रसाद नं. २ चे पूर्व बाजूस.

उपरोक्त ०५ ठिकाणी अंदाजे ४५० चौरस फुट Anti Skid Tiles बसविणेसाठी साहित्य व मजुरीसह अंदाजे रक्कम रुपये ६६,७९५/- मात्र इतका खर्च येईल.

यापुर्वी जनसंपर्क कार्यालयाजवळील ट्रान्झिट सुट क्रमांक ०१ व ०२ चे प्लोअरिंगसाठी Belgium Rock Gold प्रकारच्या ९०० एमएम x ६०० एमएम या आकाराच्या टाईल्स बसविणेत आलेल्या आहेत. सदर टाईल्स मे. टिबीके दिपगिरी टाईल्स बाथ किचन प्रा. लि., नाशिक यांचेकडून रक्कम रुपये १३५.१० प्रती चौरस फुटाप्रमाणे (वाहतुक खर्च अतिरिक्त) या मंजूर न्यूनतम दराने खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त ०५ आर.ओ.प्लॅन्टस्च्या ठिकाणी ४५० चौरस फुट Belguim Rock Gold या प्रकारच्या टाईल्स पूर्वीच्या मंजुर दराने संबंधीत पुरवठादाराकडून खरेदी करणेस, तसेच सदर टाईल्स बसविणेसाठी मजुरी दराचे दरपत्रक मागवून काम पूर्ण करुन घेणेस आणि या कामासाठी अंदाजित रक्कम रुपये ६७,०००/- मात्र (अक्षरी रुपये सदुसष्ट हजार मात्र) पर्यन्तचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**३१) श्री रामनवमी-२०१० या निमित्ताने मंदीर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करणेबाबत.**

समाधी मंदिर व मंदिर परिसरास संस्थान तर्फेसाजरा करण्यात येणाऱ्या श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा, दसरा उत्सव व नववर्ष निमित्त संस्थान खर्चाने अथवा साईभक्त देणगी स्वरुपात सजावट करीत असल्यास फुलांची सजावट करुन घेण्यात येते.

श्रीरामनवमी उत्सव २०१० मंगळवार दि.२३/०३/२०१० ते दि. गुरुवार २५/०३/२०१० अखेर ०३ दिवस साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने समाधी मंदिर व मंदिर परिसरास खालील प्रमाणे फुलांची सजावट करावयाची आहे.

**अ) समाधी मंदिर**

०१) श्रींच्या पाठीमागील कमान सजवणे
०२) श्रींचे समाधीच्या दक्षिण-उत्तर बाजूस फुलांच्या माळा सोडणे
०३) नंदी जवळील गेटला तोरण लावणे.
०४) प्रवेशव्दार तोरण लावणे.

**ब) व्दारकामाई**

०१) व्दारकामाईतील आतील तोरण लावणे
०२) दगडाजवळील फोटोस बुके व माळा लावणे.

**क) चावडी**

०१) चावडीचे आतील फोटोस माळा सोडणे व बुके लावणे
०२) चावडी समोरील बाजूस तोरण लावणे.

**ड) गुरुस्थान**

०१) संपूर्ण मंदिरास तोरण लावून माळा सोडणे.

**इ)** श्री शनिमंदिर, श्री गणपती मंदिर , श्री महादेव मंदिर व श्री दत्त मंदिर

उपरोक्त सजावट करणेकामी अंदाजे रु ५०,०००/- ( रु. पन्नास हजार ) मात्र खर्च अपेक्षित असून,त्यास मान्यता देणेबातचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीरामनवमी उत्सव-२०१० या निमित्ताने मंदीर व मंदिरपरिसरास फुलांची सजावट देणगी दाखल करुन घेण्यात यावी. देणगीदार न मिळाल्यास संस्थान खर्चाने सजावट करण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

**३२) प्रसादालयासाठी कडधान्य खरेदीबाबत.**

प्रसादालयासाठी सन २०१०-११ करिता आवश्यक किराणा माल, धान्य, कडधान्य, डाळी खरेदीकामी विहित पद्धतीने प्रथम मा.व्यवस्थापन मंडळाची खर्चास तत्वतः मान्यता घेऊन निविदा मागविणे वगैरे कार्यावाही केली जाते, दि.१०.०१.१० चे सभेत रु.४६,०२,००,०००/- चे खर्चास तत्वतः मान्यता मिळाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

प्रसादालय विभागाने त्यांचे दि.२९.०१.१० चे डि.पी. नं. ३२४०अन्वये मठ, मुग, तुरदाळ, मुगदाळ याखेरीज आणखी खालील कडधान्ये खरेदी करुन मिळाल्यास भक्तांना प्रसाद भोजन देण्यास सोईस्कर होईल असे कळविले आहे. खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | मालाचा तपशिल | मालाचे परिमाण क्विंटल | अंदाजे दर प्रती किलो | अपेक्षित खर्च रु. |
|---|---|---|---|---|
| ०१. | घेवडा बी | २०० | ६०.०० | १२,००,०००/- |
| ०२. | राजमा | २०० | ७०.०० | १४,००,०००/- |
| ०३. | मसुर आख्खा | २०० | ६०.०० | १२,००,०००/- |
| ०४. | मठदाळ | ६० | ७५.०० | ४,५०,०००/- |
| | | | **एकुण खर्च रु.** | **४२,५०,०००/-** |

सदर कडधान्याचा प्रसादालय सन २०१०-११ माल खरेदी परिशिष्टामध्ये निविदा मागविणेकामी खरेदी विभागाचे दि.०१.०२.१० चे टिपणीवरील मा.कार्यकारी अधिकारी साो. यांचे मान्यतेने समावेश करण्यात आलेला आहे. दि.०५.०२.१० ते ०७.०२.१० चे दरम्यान वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिद्ध होऊन दि.०९.०२.१० पासून निविदा विक्री सुरु होणार आहे.

तरी रु.४२,५०,०००/- चे खर्चास तत्वतः मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त पैकी फक्त मसूर आख्खा व मठदाळ खरेदी करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**३३) भांडार विभागाकडे पडून असलेले ब्लॅकेट, चादर व बेडशिटाबाबत.**

भांडार विभागाकडे बऱ्याच दिवसांपासून पुरग्रस्तांसाठी खरेदी केलेल्या चादरी सबंधित ठिकाणी वाटून शिल्लक आहेत. तसेच लेखाशाखा कापड कोठी विभागामार्फत देखील चादरी, बेडशिट, ब्लॅकेंटस भांडार विभागात देणगीदाखल जमा झालेल्या आहेत. सदरचे चादरी, ब्लॅंकेंटस, बेडशिटस सबंधित निवासस्थान विभागांना वापरण्याबाबत लेखी विचारणा केली असता, त्यांनी त्या स्विकरण्यास स्पष्ट नकार दर्शविलेला

आहे. तसेच चादरी, बेडशिट व ब्लँकेंटस भांडार विभागाकडे दिर्घ काळ पडून राहिल्याने खराब होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. याबाबत तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | वस्तूंचे नांव | दे.पा.नं./ खरेदी भांडार आवक दिनांक | नग | साठा रजि.नं. | दर | एकुण किमंत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | सतरंजी | ३२६/३०.०४.०८ | ०१ | १७/१६ | २५००.०० | २५००.०० |
| ०२. | सतरंजी | ३७१२/३०.०५.०९ | ०१ | १७/९६ | ७००.०० | ७००.०० |
| ०३. | ब्लँकेटस | ४६८१५/३०.०१.०८ | १०० | १७/५१ | १००.०० | १०,०००.०० |
| ०४. | ब्लँकेटस | ४८६५७/३०.०१.०८ | ४५ | १७/५१ | १४५.०० | ६,५२५.०० |
| ०५. | ब्लँकेटस | ३३४५७/११.०९.०८ | १४ | १७/५१ | १७५.०० | २,४५०.०० |
| ०६. | ब्लँकेटस | ५७७२४/१३.०१.०९ | १०० | १७/५१ | १००.०० | १०,०००.०० |
| ०७. | ब्लँकेटस | ६१४७८/१२.०२.०९ | २५१ | १७/५१ | १२३.५० | ३०,९९८.५० |
| ०८. | चादर (पुरग्रस्तांसाठी) | खरेदी०१.०९.२००६ ते १८.०९.२००६ अखेर | ३८८४ | १७/९१ | ८०.०० | ३,१०,७२०.०० |
| ०९. | चादर देणगी | ५२६१९/२९.०२.०८ | १०० | १७/९१ | १००.०० | १०,०००.०० |
| १०. | चादर देणगी | ३३४५६/११.०९.०८ | ९४ | १७/९१ | १९५.०० | १८,३३०.०० |
| ११. | बेडशिट देणगी | ६१४७८/१२.०२.०९ | ५०२ | १७/९७ | ७९.०० | ३९,६५८.०० |
| | | | | | **एकुण रक्कम रु.** | **४,४१,८८१.५०** |

उपरोक्तप्रमाणे पडून असलेले चादरी, बेडशिट, ब्लँकेटस इत्यादी जिल्ह्यातील सर्व रिमांड होम अनाथ आश्रम,वृद्धाश्रम व मुकबधिर विद्यालय यांची यादी घेऊन त्यांना वाटप करण्यात यावे,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक-भांडार विभाग)

**३४) कनकूरी साठवण तलाव येथील ४५ के.व्ही.ए.जनरेटरसेट दुरुस्तीबाबत.**

श्री साईबाबा संस्थानच्या कनकुरी साठवण तलावावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी १०० केव्हीए व ४५ केव्हीए जनरेटरसेट असे एकुण दोन जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहे. त्यापैकी ४५ केव्हीए जनसेट हा बंद पडलेला आहे.

सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वीजपुरवठा हा दररोज एकुण सहा तास खंडीत होत आसतो. या कालावधीत दररोज १०० केव्हीए चा जनरेटर हा सहा तास चालू आसतो. परंतू १०० केव्हीएचा जनरेटर अचानक बंद पडल्यावर पाणीपुरवठा चालविणेकामी काहीच पर्यायी व्यवस्था नाही. त्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्था विस्कळीत होऊ शकते. ४५ केव्हीए जनरेटर स्टँडबाय ठेवल्यानंतर त्यावर रॉ वॉटर ५ एच.पी.पंप व ट्रिटेड वॉटरचा २५ एच.पी.चा पंप चालवून पाणीपुरवठा सुरळीत चालू शकतो. त्याकरीता ४५ केव्हीए जनरेटरसेट तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्याकरीता येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | नग | दर रुपये | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | इंजिन ओव्हरहॉलींग किट | ०१ नग. | रु. ३०,०००.०० | ३०,०००.०० |
| ०२) | मेन सी.आर.बेरींग | ०१ नग. | रु. ३,०००.०० | ३,०००.०० |
| ०३) | हेड रिंगा बदलणे | ०१ नग. | रु. २,५००.०० | २,५००.०० |
| ०४) | ऑईल फिल्टर व ऑईल | | रु. ४,०००.०० | ४,०००.०० |
| ०५) | क्रँग पॉलिश व लाईन बोर | | रु. ५,०००.०० | ५,०००.०० |
| ०६) | इतर किरकोळ साहित्य | | रु. २,०००.०० | २,०००.०० |
| ०७) | गाडी भाडे (जनरेटर ने-आण) | | रु. ३,५००.०० | ३,५००.०० |
| ०८) | ओव्हरहॉलींग चार्जेस | | | १०,०००.०० |
| | | | एकुण रक्कम :- | ६०,०००.०० |

उपरोक्तप्रमाणे दुरुस्तीचे काम स्थानिक इंजिन रिपेअरींग वर्कशॉपमधून कोटेशन मागवून करवून घेता येईल. तरी पाणीपुरवठा साठवण तलावावरील ४५ केव्हीए जनरेटरसेट दुरुस्तीचे काम करुन घेणे करीता अंदाजे रक्कम रुपये ६०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,कनकुरी साठवण तलाव येथील ४५ केव्हीए जनरेटरसेट चे स्पेअर सध्या बाजारात सहजासहजी उपलब्ध होत नसल्याने सदर जनसेटची दुरुस्ती करुन त्याची जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी व त्याऐवजी साठवण तलावावर नविन २५० केव्हीए क्षमतेचा नामांकित कंपनीचा जनरेटर सेट त्वरीत खरेदी करण्यात यावा व त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व जनसेट खरेदीकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**३५) मध्यवर्ती भांडार व श्री साईनाथ रुग्णालय येथील दुरध्वनी विस्तारीकरणाबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल येथील दूरध्वनी एक्सचेंजमधून श्री साईनाथ रुग्णालयामध्ये संपर्कासाठी अंतर्गत दूरध्वनी देण्यात आलेले आहे. साईनाथ रुग्णालय-इमारतीचे तळमजल्यातील खोल्यांमध्ये दूरध्वनी केबल केसींग केपींग पध्दतीने सुव्यवस्थित टाकण्यात आलेली आहे. परंतु, वरील मजल्यांवर सदर केबलसाठी

केसींग केपींग पध्दतीने न टाकता विविध ठिकाणी टांगती आहे. केबल टांगती ठेवल्याने तिचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संभाव्य नुकसान टाळणेसाठी तसेच केबल सुव्यवस्थीत राहणेसाठी सदर केबल केसींग केपींग पध्दतीने टाकावी लागणार आहे. तसेच धर्मशाळेची समोरच्या इमारतीमध्ये रुग्णालयासाठी खोल्या तयार केलेल्या आहे. सदर इमारतीमध्ये काही ठिकाणी अंतर्गत दूरध्वनी कनेक्शन दिलेले आहे. परंतु, काही ठिकाणी देणे बाकी आहे. साईनाथ रुग्णालयाने आणखी १५ कनेक्शनची मागणी केलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारतीमधील केबल केसींग केपींग करणे तसेच नवीन अंतर्गत दूरध्वनी कनेक्शन देणे आदिंसाठी तेथील दूरध्वनी जाळ्याचे विस्तारिकरण करावे लागणार आहे. सदर विस्तारिकरणासाठी खालील तपशीलाप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Approx. Rate | Approx. Price | |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Supply & erection of telephone cable 2 pair (0.5mm Polly cap copper) in provided conduit | 1200 Mtr. | 16.80 per mtr. | 20160 | 00 |
| 02. | Supply & erection of telephone cable 10 pair Polly cap copper | 140 | 56.70 per Mtr. | 7938 | 00 |
| 03. | Supply & erection of telephone cable 20 pair Polly cap copper | 160 | 105.00 | 16800 | 00 |
| 04. | Telephone socket modular (Anchor) | 28 Nos. | 97.65 | 2734 | 20 |
| 05. | Modular surface 1 model switch box (Anchor) | 28 Nos. | 108.20 | 3028 | 20 |
| 06. | Casing capping 25 mm. | 500 mtr. | 34.65 | 17325 | 00 |
| 07. | Supply & erection of jelly field 10 pair telephone cable Polly cap copper | 500 mtr. | 93.45 | 46725 | 00 |
| 08. | Supply & erection of Junction box for 10 pair | 1 Nos. | 580.70 | 580 | 70 |
| 09. | Supply & erection of Junction box for 20 pair | 1 Nos. | 619.50 | 619 | 50 |
| | | | **TOTAL** | **११५९१०** | **६०** |

मध्यवर्ती भांडार व श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारतींमधील दूरध्वनी केबल केसींग केपींग करणे विविध ठिकाणी अंतर्गत दूरध्वनी देणे आदिंसाठी उपरोक्त तपशीलाप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार असून, यासाठी अंदाजे रुपये १,१६,०००/- पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. सदर साहित्य खरेदीची कार्यवाही दूरध्वनी साहित्यांचे विविध अधिकृत पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागवून करता करता येईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, मध्यवर्ती भांडार व श्री साईनाथ रुग्णालय येथील दूरध्वनी विस्तरिकरणासाठी दूरध्वनी साहित्य खरेदी कामी विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागवून न्यूनतम दरपत्रकधारकाकडून सदर साहित्य खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,१६,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**३६) शैक्षणिक वर्ष २०१०-११ वर्षाकरिता ज्युनिअर के.जी.वर्गाचे विद्यार्थी प्रवेशाबाबत.**

श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये सन १९९० पासून केजी विभाग सुरु असून प्रथेप्रमाणे दरवर्षी शिरडी व परिसरातील ज्यु.केजी या वगार्तील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया सुरु करावयाची आहे.

त्यामध्ये ३.९ ते ५ वय वर्षे या वयोगटातील शिरडी गावातील व परिसरातील अशा दोन यादया तयार करुन सुरुवातीस शिरडी गावातील व त्यानंतर परिसरातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता. त्यानंतर ३.८, ५.१ व ५.२ या विद्यार्थ्यांना तसेच अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देवून १४५ विद्यार्थी प्रवेश पुर्ण करण्यात आले. सदरची प्रवेश प्रक्रीया ०९ मार्च २००९ रोजी सुरु करण्यात होवून दि. २५ जून २००९ रोजी पुर्ण झाली. म्हणजे तब्बल साडे तीन महिने प्रवेश प्रकीया चालू होती. ज्यु.केजीची प्रवेश प्रक्रीया प्रवेशास विलंब होत असलेबाबत दि.२९.०५.२००९ रोजी वर्तमान पत्रामध्ये बातमी आलेली होती.

खालील तपशिलात नमूद केले प्रमाणे प्रवेश प्रकीया ठेवल्यास सर्व पालकांना प्रवेश फॉर्म स्विकारणे, कागदपत्रांची पुर्तता करणे, प्रवेश फॉर्म कार्यालयात जमा करणे, फार्मची छाननी व प्रवेश दयावयाच्या विद्यार्थ्यांची यादी बोर्डवर जाहिर करणे ही सर्व प्रक्रीया आपल्याला दि.०९ मार्च २०१० ते २३ एप्रील २०१० पर्यत पुर्ण करता येईल व पालकांनाही प्रवेशासाठी जास्त वेळ वाट पहावी लागणार नाही..

| अ.नं. | तारीख | तपशिल | वेळ |
|---|---|---|---|
| १. | दि.०९.०३.२०१० ते २०.०३.२०१० | माहिती पत्रक व प्रवेश अर्ज विक्री. | सकाळी -१० ते १ |
| २. | दि.२२.०३.२०१० ते ०५.०४.२०१० | प्रवेश अर्ज स्विकृती. | सकाळी-१० ते १ |
| ३. | दि.०९.०४.२०१० | प्रवेश दिलेल्या विद्यार्थीची यादी नोटीस बोर्डवर प्रसिध्द्. | सकाळी -१० ते ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | दि. १०.०४.२०१०. ते २३.०४.२०१० | शालेय शुल्क शाळा कार्यालयात जमा करुन, पुस्तकांची यादी व गणवेशा संदर्भात माहिती घेऊन पालकांनी प्रवेश निश्चिती करणे. | सकाळी- १० ते १ |

**अ) शाळेकडील वर्ग खोल्यांची सदयस्थिती-**

सध्या शाळेकडे सोबतचे तक्ता क मध्ये दर्शविलेप्रमाणे ज्यु.केजी या वर्गाच्या तीन वर्ग/तुकडया आहेत. तसेच सि.केजी या वर्गाच्या एकूण पांच वर्ग/तुकडया आहेत. सोबतचे तक्ता ख मध्ये दर्शविलेप्रमाणे चालू वर्षी (सन २००९-१०) आपल्या कडे ३१ वर्ग/खोल्या असून त्यातील २६ खोल्या वर्गांसाठी वापरात आहेत.

पुढील वर्षी सन २०१०-११ मध्ये दर्शविलेप्रमाणे आपल्या शाळेत नैसर्गिक वाढीने वर्ग/तुकडयांची वाढ होणार आहे. त्यासाठी दोन जादा वर्ग/खोल्या आपल्याला आवश्यक आहेत. त्यामध्ये एक खोली पुरुष शिक्षक व एक स्त्री शिक्षकांना स्टाफ रुमकरीता लागणार आहे.

चालू वर्षी ज्यु.केजीच्या १४५ विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देवून तीन वर्ग/तुकडया करण्यात आलेल्या आहेत.

पुढील वर्ष २०१०-११ मध्ये वर्ग/खोल्यांची कमतरता असल्याने ज्यु केजीच्या तीन तुकडया कराव्यात असे मत आहे.

**ब) पुढील वर्ष २०१०-११ वर्ग/खोल्या नियोजन व ज्यु केजी प्रवेश प्रक्रीया-**

०१) वर्ग/खोल्यांची अडचण असल्याने ज्यु.केजीच्या तीन तुकडया तयार करुन १५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावेत.

०२) मागील वर्षी प्रमाणे सुरुवातीस वय वर्षे ३.९ ते ५ या वयोगटातील शिरडी गावातील व परिसरातील विद्यार्थ्यांना प्रवेश दयावेत.त्यामध्ये अनुतीर्ण विद्यार्थ्याचे प्रवेश प्राधान्याने करु घेण्यात येतील.

०३) नेहमीप्रमाणे शिरडी गाव व परिसरातील इतर गावांतील विद्यार्थी शाळेत ज्यु.केजी साठी प्रवेश घेतात. त्यामध्ये सुरुवातीस शिरडी गावातील विद्यार्थ्यांना प्रवेश दयावा व त्यानंतर १५० विद्यार्थी पुर्ण होईपावेतो परिसरातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावेत.

०४) प्रवेश प्रक्रीया दि ०९ मार्च २०१० ते २३ एप्रील२०१० पर्यत पुर्ण करण्यात यावी.

०५) प्रवेश प्रक्रीयेसंबंधी पालकांना माहिती होणेकामी स्कूलबसवर तसेच शाळेच्या मुख्य प्रवेशव्दार, सुचना फलकावर प्रवेश प्रक्रीयेसंबंधी सुचना लावण्यात येतील.

०६) संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना प्रवेश घेणेकामी परिपत्रक काढून सर्व विभागातील कर्मचा-यांना माहिती साठी संबंधीत सर्व विभागांना परिपत्रकाव्दारे कळविण्यात येईल.

तरी वरील प्रमाणे पुढील वर्ष २०१०-११ करीता ज्यु.केजी या वर्गाची प्रवेश प्रक्रीया सुरु करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात यावी,तसेच शिरडी व शिरडी परिसरातील सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल याची दक्षता घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मि.स्कुल)

**३७) स्कूल कोडनुसार इंग्लिश मिडीयम स्कूलचे प्राथमिक व माध्यमिक विभाग वेगळे करणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा ईंग्लिश मिडीयम स्कुल सन १९९० साली सुरु करण्यात आले. सुरुवातीस केजी विभागाचे वर्ग सुरु करण्यात आले. मा.शिक्षण उपसंचालक पुणे-१ चे दि.२३.०१.१९९१ च्या शासन पत्राने सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळा (इ.१ ली ते इ.७ वी ) सुरु करणेस मान्यता देणेत आली. सुरुवातीस सन १९९० साठी इ.१ ली वर्ग सुरु होवुन सन १९९७ साली इ.७ वी चा वर्ग सुरु झाला. तदनंतर नैसर्गिक वाढीने इ.४थी, इ.५ वी, इ.६ वी, इ.७ वी च्या तुकडया वाढल्या. या वाढीव तुकडीच्या मान्यतेसाठी मा.शिक्षणाधिकारी, जि.प.अ.नगर यांचेकडे खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे पत्रव्यवहार केला. तथापी त्यांचेकडुन कोणतीही कार्यवाही झाली नाही.

०१) जा नं.एसएसएस/ इंमिस्कूल/१४/०५, दि.२४.०१.२००५ चा प्रस्ताव(इ४थी व ५ वी).

०२) जा.नं.एसएसएस/ इंमिस्कूल/१०४८७ /०६, दि.०७.०८.२००६ चे विनंती पत्र.

०३) जा नं.एसएसएस/ इंमिस्कूल/१६७/०६, दि.०९.११.२००६ चा प्रस्ताव..(इ.४ थी ते ६ वी)

०४) जा नं.एसएसएस/ इंमिस्कूल/१४४०/०७, दि.२७.०१.२००७ चे विनंती पत्र..

०५) दि.०५.०८.२००८ रोजीचा श्री एस बी कराड, विस्तार अधिकारी(जि प) यांचा शाळा भेटीचा अहवाल.

०६) जा नं.एसएसएस/ इंमिस्कूल/११६/०७, दि.१४.०८.२००७ चा प्रस्ताव.(इ. ४ थी ते ६ वी)

०७) जा नं.एसएसएस/इंमिस्कूल/०३०/०९ ,दि.३१.०१.२००९ चे विनंती पत्र..

०८) जा नं.एसएसएस/इंमिस्कूल/३४६/०९ दि.२३.१२.०९चे विनंती पत्र ..

०९) जा नं.एसएसएस/इंमिस्कूल/३०७/०९, दि.१०.११.२००९ चा प्रस्ताव( इ.१ ली व इ.७ वी)

१०) जा नं.एसएसएस/इंमिस्कूल/३४५/०९, दि.२३.१२.२००९ चे विनंती पत्र

सदर कार्यवाहीस अनुसरुन दि.२०.०४.२००७ रोजी जिल्हा परिषद विभागातील शिक्षण अधिकारी श्री. बी.डी. विरकर व दि.०५.०८.२००८रोजीचे श्री एस बी कराड यांनी शालेय भेटीच्या वेळेत शालेय शेरे बुकात खालील प्रमाणे नमूद केले आहे.( सोबत शाळा भेटी अहवाल )

१) शाळेचा प्राथमिक व माध्यमिक विभाग एकत्र आहे.
२) इ. १ ली ते ७ वी हा प्राथमिक विभाग स्वतंत्र असावा. पुर्व प्राथमिक विभाग स्वतंत्र असावा.
३) प्राथमिक विभागाची शिक्षक निश्चिती (Staff fixation) करुन घ्यावी.
४) प्राथमिक विभागासाठी डी एड(D Ed) शैक्षणिक पात्रताधारक शिक्षक असावेत.
५) शाळेच्या हिशोबाची कागदपत्रे पुर्व-प्राथमिक वर्गापासून माध्यमिक विभागापर्यंत एकत्र आहेत.

उपरोक्त बाबीस अनुसरुन दि.१५.०१.२०१० रोजी मा.श्री काळे सो. शिक्षण विस्तार अधिकारी , पंचायत समिती राहाता यांचेशी चर्चा केली असता. त्यांनी उपरोक्त सुचनेप्रमाणे कार्यवाही केल्यास अतिरिक्त तुकडयास मान्यता देणेत येईल असे सांगितले आहे.

**अ)** त्यानुसार खालील प्रमाणे विभाग करणे जरुरीचे आहे.

०१) पुर्व प्राथमिक ( ज्यु.केजी / सि.केजी )
०२) प्राथमिक विभाग ( इ.१ ली ते इ.७ वी )
०३) माध्यमिक विभाग ( इ.८ वी ते इ.१० वी )

यासाठी इमारतीमध्ये १) प्राथमिक विभाग (इ.१ली ते इ.७ वी ) यास जोडुन पुर्वप्राथमिक विभाग (ज्यु.केजी व सि.केजी) व २) माध्यमिक विभाग (इ.८ वी ते इ.१० वी ) असे वेगळे विभाग करुन त्यांची कार्यालये स्वतंत्र करुन तेथे लिपीक व शिपाई कर्मचारी ठेवता येतील. पुर्व प्राथमिक विभागासाठी शासनाची नियमावली नाही. या विभागासाठी शासन मान्यतेची आवश्यकता नाही. सबंधीत संस्थेच्या व्यवस्थापनाखाली पुर्व प्राथमिक विभाग चालविला जातो.

पुर्व प्राथमिक ( ज्यु.केजी/सि.केजी ) व प्राथमिक विभाग ( इ.१ ली ते इ.७ वी ) हा माध्यमिक विभागापासुन ( इ.८ वी ते इ.१० वी ) स्वतंत्र करुन तेथे प्राथमिक विभागासाठी सेवाजेष्ठतेनुसार स्वतंत्र मुख्याध्यापक नेमता येईल. ( पात्रता एच.एस.सी, डी.एड वेतनश्रेणी-५,२०० - २०,२००- पात्र शिक्षकाची नवीन वेतन आयोगानुसार वेतन निश्चित करण्यात येईल.)

सध्या प्राथमिक विभागाकडे (इ. १ ली ते ७ वी) साठी जे शिक्षक नेमलेले आहेत, ते शाळा संहीता नियमाप्रमाणे एचएसस्सी डी एड या शैक्षणिक पात्रतेचे नेमलेले आहेत. त्यातील चित्रकला शिक्षक श्री हेमंत गिते हे एसएससी अेटीडी आहेत. चित्रकला शिक्षकांसाठी डी एड ची आवश्यकता नाही.(ATD Equivalent to D Ed)

प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापक पदासाठी महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी(सेवेच्या शर्ती), नियम १९८१ (भाग तीन) मधील ३) मुख्याध्यापकाची अर्हता व नेमणूक- (१) (अ) (एक ) पटावर २०० पेक्षा अधिक विद्यार्थी असणाऱ्या किंवा १ ते ७ इयत्ता असणाऱ्या प्राथमिक शाळेचा मुख्याध्यापक म्हणुन नेमणुक करावयाची व्यक्ती ही ज्यांची कमीत कमी ५ वर्षा इतका काळ सेवा झाली असेल असा जेष्ठतम प्रशिक्षित शिक्षक असेल . या नियमाप्रमाणे जेष्ठतम शिक्षकांस नेमणुक देता येईल.

दि.२२.०२.२०१० रोजी शिक्षण विस्तार अधिकारी मा.श्री काळे सो, पंचायत समिती, राहाता यांचेशी प्राथमिक मुख्याध्यापकाची अर्हता व नेमणूक या बाबत चर्चा केली असता त्यांनी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापकासाठी एसएससी डी एड अथवा एचएसस्सी डी एड ही शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. प्राथमिक विभागाचे इ. ५ वी ते ७ वी या वर्गाचे इंग्रजी विषयाचा शिक्षक फक्त पदवीधर आवश्यक आहे. या उलट प्राथमिक विभागासाठी इंग्रजी विषयाव्यतिरिक्त इतर पदवीधर शिक्षक untrained समजले जातात असे त्यांनी सांगीतले.

तसेच प्राथमिक व माध्यमिक विभागासाठी अनुक्रमे डी एड व बी एड शिक्षक आवश्यक असतात. त्यांना त्या त्या विभागाचे स्कूलकोडनुसार वर्ग अथवा तासिका दिल्या जातात. शिक्षक डी एड अथवा बी एड नसतील तर ते शिक्षक त्या त्या विभागाचे स्कूलकोडनुसार एकूण शिक्षकाचे यादीत येत नाही.आपल्याकडे प्राथमिक व माध्यमिक विभागासाठी दोन स्वतंत्र संगणक शिक्षक नेमले आहेत. त्यांची स्कूलकोडप्रमाणे शिक्षकांचे एकूण संख्येत मोजदाद करता येणार नाही. स्कूलकोडप्रमाणे संगणक शिक्षक विचारात घ्यावयाचे झाल्यास त्यांना डी एड व बी एड करणे आवश्यक आहे असे श्री काळे सो. यांनी सांगीतले.

दि.२३.०२.२०१० रोजी प्रवरा एज्युकेशन सोसायटी प्रवरानगर संचलित प्रवरा पब्लिक स्कूल, प्रवरानगर येथील श्री लाटे सर(कार्यालय) यांचेशी फोनवरुन संगणक शिक्षक नेमणुकीबाबत चर्चा केली असता प्राथमिक व माध्यमिक विभागासाठी नेमलेले सर्व शिक्षक(संगणक शिक्षक सोडून) जि.प.नियमाप्रमाणे नेमलेले असून त्यांना त्याप्रमाणे वेतन दिले जाते. संगणक शिक्षक हे जि.प. व स्कूलकोड प्रमाणे नियमात बसत नसलेमुळे संस्थेच्या अधिकारात त्यांच्या नेमणुका केले असलेबाबत श्री लाटे सर यांनी सांगीतले.

**ब)** विद्यार्थी संख्या नैसर्गिक वाढीने माध्यमिक विभागासाठी शासनाकडील मा. उपसंचालक , शिक्षण विभाग पुणे यांचे कडील जा.क्र.माध्य.३ (१४ ) नमाशा / मान्यता / ११२१८/पुर्वी /२००० दि.०६.०९.२००० अन्वये सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत स्वतंत्र माध्यमिक विभाग ( इ.८ वी ते इ.१० वी ) सुरु करणेस मान्यता देणेत आलेली असुन सन १९९८-९९ साठी इ.८ वी चा वर्ग सुरु करण्यात आलेला आहे. त्यानंतर नैसर्गिक वाढीने इ.९ वी व इ.१० वी चे वर्ग सुरु करण्यात आलेले आहेत. चालु वर्षी ( २००९-१० ) इ.८ वी ते इ.१० वी या वर्गाची प्रत्येकी एक तुकडी प्रमाणे एकुण ३ तुकडया असुन , एकुण विद्यार्थी संख्या १८१ इतकी आहे. पुढील वर्षी इ.८ वी या वर्गाच्या २ तुकडया तर इ.९ वी व इ.१० वी या वर्गाची प्रत्येकी एक तुकडी या प्रमाणे एकुण -४ तुकडया होणार असुन, एकुण विद्यार्थी संख्या २२८ इतकी होणार आहे. शासनाचे नियमानुसार यापुढे व स्वतंत्र माध्यमिक विभाग सुरु करणेबाबत शासनाने दिलेल्या मंजुरी नुसार माध्यमिक विभाग ( इ.८ वी ते इ.१० वी ) वेगळा करणे जरुरीचे आहे.यासाठी एक मुख्याध्यापकाची गरज आहे. ( पात्रता पदवीधर / बी.एड वेतनश्रेणी - ९,३०० - ३४,८०० माध्यमिक विभागासाठी प्राचार्य नेमलेले आहेत.)

**प्राथमिक विभाग स्वतंत्र असणेबाबत खालील महत्वाचे बाबीचे अवलोकन होणे आवश्यक आहे.**

I) प्राथमिक व माध्यमिक विभागाची दरवर्षी सेवक संच निश्चिती शासन निर्धारीत वेळेत त्या त्या विभागाच्या मुख्याध्यापकाचे सहीने स्वतंत्र प्रस्ताव सादर करुन घ्यावी लागते. तसे ते बंधनकारक असते. दरवर्षी माध्यमिक विभागाची सेवक संच निश्चिती नियमित पणे केली जाते. प्राथमिक विभागाची सेवक संच निश्चिती / पटपडताळणी करताना प्राथमिक विभाग स्वतंत्र नसल्याने त्याकडे जि.प.कडून दुर्लक्ष होत आहे.

II) शासनाने प्राथमिक विभाग (इ. १ ली ते ७ वी) व माध्यमिक विभाग ( इ. ८ वी ते १० वी) यांच्या स्वतंत्र मान्यता दिलेल्या असून शिक्षणाधिकारी यांनी त्यांचे वेळोवेळी भेटीचे अहवालात व तोंडी सुचनेनुसार दोन विभाग स्वतंत्र करणेबाबत सुचीत केलेले आहे, की जेणेकरुन तुकडी मान्यता, सेवक संच निश्चिती, इतर पत्रव्यवहार व मान्यता यांना अडचण येणार नाही असे नमुद केले आहे.

III) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०९.२००८, निर्णय क्र.६९८ अन्वये माध्यमिक विभागापासुन प्राथमिक विभाग स्वतंत्र करणे बाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे. परंतु वैधानिक लेखापरिक्षण (ऑडीट) अहवालामध्ये शाळेकडुन सादर करण्यात आलेला प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे. त्यासाठी शिक्षण विभागाचे म्हणण्यानुसार प्राथमिक विभाग स्वतंत्र असतो या संदर्भात सर्व समर्थनीय बाबींचा खुलासा करुन सदरचा विषय पुन्हा मा.व्यवस्थापन समिती ठेवुन प्राथमिक विभाग स्वतंत्र करावा" असे सुचविले आहे.

०१) शिक्षणाधिकारी यांनी सुचविलेप्रमाणे व स्कूलकोडनुसार दोन्ही विभागाचे दैंनदिन रेकॉर्ड, हजेरीपत्रक, पत्रव्यवहार, फी पावत्या ही कामे स्वतंत्र ठेवता येतील. त्यासाठी स्वतंत्र लिपीक व शिपाई देता येईल.

०२) सध्या ज्यु.केजी/ सि.केजी व इ.१ ली ते इ.१० वी या सर्व वर्गासाठी (विभागासाठी) एक मुख्याध्यापक (प्राचार्य) आहे. यात प्राथमिक विभाग इ.१ ली ते इ.७ वी) व माध्यमिक विभाग (इ.८ वी ते इ.१० वी) वेगळा करुन स्कुलकोडनुसार शाळेच्या सेवाजेष्ठतेनुसार किमान एसएससी/एचएसस्सी- डी एड शैक्षणिक पात्रता असलेला तसेच किमान पाच वर्ष इतका काळ सेवा झालेली असलेल्या जेष्ठतम प्रशिक्षीत शिक्षकास प्राथमिक विभागाचा मुख्याध्यापक पदाचा पदभार देता येईल व त्यास जोडुन ज्यु./ सि.केजीचे वर्गही त्यांचे देखरेखी खाली सोपविता येईल.

०३) माध्यमिक विभाग स्वतंत्र करुन कामकाज सध्या असलेल्या प्राचार्या/मुख्याध्यापक यांचेकडे देता येईल.म्हणजे वाढीव तुकडयांना त्वरीत मंजूरी मिळेल.

यावर सविस्तर चर्चा होऊन,वरील प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात यावी. याकामी मा.अध्यक्ष महोदय यांनी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन निर्णय घ्यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्या, इंग्लिश मि.स्कुल)

**३८) वाहन विभागातील वाहनांसाठी टायर्स खरेदी करणेबाबत.**

वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील वाहनांचे सध्याचे टायर खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक होते. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार / वापर | टायर वापराचे एकुण कि.मी. | आवश्यक टायर साईज | कंपनी | टायर नग |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | एमएच-१७/ डब्ल्यू-५५ | महिंद्रा स्कॉर्पिओ / कार्यालयीन | ६०,१२५ | २३५-७०R-१६ रेडियल | ब्रिजस्टोन | ०४ |
| ०२. | एमएच-१७/ व्ही-८४८३ | महिंद्रा झायलो / कार्यालयीन | ४१,२१८ | २१५-७५R-१५ रेडियल | ब्रिजस्टोन | ०५ |
| ०३. | एमएच-१७/ टी-६४२१ | स्वराज ट्रॅक्टर / मालवाहतुक | ८३९.१० तास | ०६-००-१६ | अपोलो | ०२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४. | एमएच-१७/ टी-८५०१ | टाटा बस / स्कुलबस | २२,४१६ | ०९-००-२० | अपोलो | ०२ |
| ०५. | एमएच-१७/ टी-७१३१ | टाटा- ४०७/ शववाहिका | ६६,०१२ | ०८-२५-१६ | अपोलो (अमर डिलक्स) | ०५ |
| | | | | | एकुण | १८ |

वरील प्रमाणे पाच वाहनांकरीता १८ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी कामी रू.१,३०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

महिंद्रा स्कॉर्पिओ व महिंद्रा झायलो या वाहनांकरीता ब्रिजस्टोन कंपनीचे तसेच स्वराज ट्रॅक्टर, स्कुलबस तसेच टाटा- ४०७ वाहनांकरीता अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचे कडून कोटेशन बोलावुन खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**३९) जुन्या गॅस टँकचे हायड्रो टेस्टींग फी चे वाढीव रकमेस मान्यता मिळणेबाबत.**

जुन्या प्रसादालयामध्ये प्रसादभोजन, मोतीचूर लाडू बर्फी नाष्टापाकीट बनविणेसाठी एल.पी.गॅसचा वापर करण्यात येत होता. एल.पी.गॅसचा साठा करण्यासाठी १० टन क्षमतेच्या दोन व अनुषंगिक यंत्रणा उभारलेली आहे. सदर स्टोअरेज टँकची दर ०३ (तीन) वर्षांनी हैड्रोलिक टेस्ट करावी असा विस्फोटक विभाग, भारत सरकार यांचा नियम आहे.

त्यानूसार हैड्रोलिक तपासणीची दि.२१/०४/२००९ ही अंतीम तारीख होती. परंतू ०८ जानेवारी २००९ पासून प्रसादभोजन व्यवस्था नविन श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये सुरु करण्यात आली व त्या पाठोपाठ मोतीचूर लाडू व नाष्टापाकीटे बनविणेचे काम नविन इमारतीत सुरु करण्यात येणार असे नियोजीत होते. त्यामुळे जुन्या प्रसादालयातील एल.पी.गॅस प्लॅन्टचा वापर बंद करण्यात येणार होता. जुन्या गॅस प्लॅन्टचा वापर बंद करणेचा असल्याने दि.२१/०४/२००९ ची हैड्रोलिक तपासणी करण्याची गरज लागणार नाही असे वाटले होते. परंतू मोतीचूर लाडू नविन प्रसादालयात बनविण्यास सुरुवात केल्यानंतर महिनाभरात लाडू खराब झाल्याचे आढळून आले व लाडू बनविणेचे काम पुन्हा जुन्या प्रसादालयात सुरु करावे लागले.

मोतीचूर लाडू बनविणेचे काम पुन्हा जुन्या प्रसादालयात सुरु केल्यामुळे जुन्या एल.पी.गॅस प्लॅन्टचे परवान्याचे नुतणीकरण करणे क्रमप्राप्त झाले. मात्र परवान्याचे नुतणीकरण करणेकामी सदर स्टोअरेज टँकची हैड्रोलिक तपासणी करुन घेणे आवश्यक असल्याने त्याकामी मे.ग्लोब गॅस इक्वीपमेंट प्रा.लि. मुंबई यांचेकडून दुरध्वनीवरुन खर्चाचा अंदाज घेण्यात आला. दुरध्वनीवर त्यांनी अंदाजे रु.२५,०००/- पर्यंत खर्च येईल असे कळविलेले होते व त्यानूसार दि.०४/१२/२००९ टिपणीअन्वये अंदाजे रु.२५,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता घेणेत आली होती. व त्यानूसार मे.ग्लोब गॅस इक्वीपमेंट प्रा.लि. यांनी २ टँकची हायड्रोलिक तपासणी करुन अधिकृत थर्ड पार्टीकडून हायड्रोटेस्ट सर्टीफिकेट पाठविलेले आहे. सदर सर्टीफिकेट विस्फोटक विभाग , भारत सरकार यांचेकडे वार्षिक परवाना नुतणीकरणासाठी पाठविलेले आहे.

मे.ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. मुंबई यांनी हायड्रोटेस्ट सर्टीफिक्टेसह रु. २४,९००/- + सर्व्हीस टॅक्स व इतर टॅक्सेससह बील सादर केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| तपासणी फी | रु. | २४९००.०० |
| सर्व्हीस टॅक्स १०% | रु. | २४९०.०० |
| शैक्षणिक कर २ % | रु. | ४९.८० |
| एच.एस.ई १ % | रु. | २४.९० |
| एकूण | रु. = | २७,४६४.७० |
| पुर्णांकीत रक्कम | रु. = | २७,४६५.०० |

उपरोक्तप्रमाणे एल.पी.गॅस टॅक्सची हायड्रोलिक तपासणीसाठी रु.२५,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली होती. प्रत्यक्षात मात्र रु.२७,४६५/- खर्च आलेला आहे. म्हणजेच मान्यतेपेक्षा रु.२४६५/- एवढी रक्कम जादा खर्च झालेली आहे. सदरील रु.२४६५/- जादा खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**४०) हायप्रेशर वॉटर जेट मशिन दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

श्री साई प्रसादालयाकडील डिश वॉशिंग मशिा, किचामधील भांडी व भोजा पदार्थ वाढणेच्या ट्रॉलीज साफ करणेसाठी दि.०७/०८/२००७ रोजी हायप्रेशर वॉटर जेट (इम्पोर्टेड) चार मशिस खरेदी करण्यात आलेले होते. सदर मशिसचे सततचे वापरामुळे स्पेअरपार्ट खराब होऊा मशिस बंद पडलेले होते. मशिाचे पुरवठादार मे.ए.व्ही. ए. इंजिाअर्स, मुंबई यांचेकडे दुरुस्तीसाठी पाठविणेस प्रशासकिय मान्यता घेणेत आलेली होती. मशिस परदेशी बनावटीचे असल्याने स्पेअर पार्ट व दुरुस्ती अन्यत्र होत नाही. त्यामुळे

सदरचे मशिस दि. १२.०१.२०१० रोजी दुरुस्ती खर्चाचा अंदाज घेणेसाठी मे.ए.व्ही. ए. इंजिनिअर्स, मुंबई यांचेकडे पाठविणेत आलेले आहेत.

सदरचे मशिन्स मे.ए.व्ही. ए. इंजिनिअर्स, मुंबई यानी खोलून पाहीले असता खराब झालेले स्पेअरपार्ट बदलणे, दुरुस्ती कामाचा तपशिल व खर्चाचा अंदाज फॅक्स पत्राो कळविलेला आहे. त्याुसार मशिस दुरुस्ती खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | मशिन नं. १ | मशिन नं.२ | मशिन नं.३ | मशिन नं.४ | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ऑईल सिल सेट | २६००.०० | २६००.०० | २६००.०० | २६००.०० | |
| २. | पंप हाऊजींग पिस्टा सेट व स्प्रिग | -- | -- | ९८००.०० | -- | |
| ३. | इले. मोटार रिवायडींग | -- | -- | -- | ३५००.०० | |
| ४. | प्रेशर स्वीच कंट्रोल व्हाल्व | २८००.०० | २८००.०० | -- | २८००.०० | |
| ५. | ऑईल | १५०.०० | १५०.०० | १५०.०० | १५०.०० | |
| ६. | सर्व्हिसींग | ५००.०० | ५००.०० | ५००.०० | ५००.०० | |
| | एकुण खर्च रुपये | ६०५०.०० | ६०५०.०० | १३०५०.०० | ९५५०.०० | ३४,७००.०० |
| | | | | | + व्हॅट १२.५% | ४,३३८.०० |
| | | | | | एकूण खर्च रुपये | **३९,०३८.००** |

ए.व्ही.ए.इंजिनिअर्स, मुंबई यांनी हायप्रेशर वॉटर जेट मशिन्स नग ४ दुरुस्तीकामी वरीलप्रमाणे एकूण खर्च रु.३९,०३८/- कळविलेला आहे. त्यानुसार सदर ४ मशिन्स दुरुस्त करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.३९,०३८/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली..

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**४१) माईक केबल व ॲक्सेसरीज खरेदी करणेबाबत.**

श्रीं च्या समाधी मंदिरासमोरील स्टेजवर दररोज कलाकारांची हजेरी (गायनाचा कार्यक्रम) होतो, तसेच दर गुरूवारी द्वारकामाई व चावडीत बाबांची पुजा, आरती व भजन होते, गायनाची हजेरी व आरती पुजेसाठी माईक दिले जातात, माईक चालु बंद करणेसाठी ध्वनिक्षेपणमध्ये असलेल्या मिक्सरपासून मंदिर स्टेज, चावडी, द्वारकामाई मंदिरापर्यंत एकुण १२ केबल पुर्वीपासून टाकलेल्या आहेत, त्या प्रत्येक केबल सुटया असून केबलचे आवरण जूने झाल्याने एकाच केबलमध्ये वेगवेगळे गेन्स एकत्र होवून कार्यप्रणालीत व्यत्यय येतो.

हल्ली मार्केटमध्ये एकाच केबलमधून माईकचे सिग्नल विनाव्यत्यय व दिर्घकाळ चालु शकतील अशा इम्पोर्टेड केबल मिळतात. मंदिर स्टेज, द्वारकामाई, चावडी तसेच उत्सवातील स्टेज साऊंड सिस्टीमसाठी खालीलप्रमाणे केबल व ॲक्सेसरीज खरेदी करणे योग्य होईल.

| **अ.नं.** | **तपशील** | **नग** | **अंदाजे दर** | **एकूण किंमत** |
|---|---|---|---|---|
| 1 | 16 ch.multicore balance audio snake cable Draka Co. made in Jermani | 70 मीटर | रु.575/- प्रति मी. | 40,250.00 |
| 2 | वरील केबलसाठी XLR मेल न्युट्रीक कंपनी, केबलच्या एका बाजुस सोल्डर केलेले | 16 नग | रु.150/- प्रति नग | 2,400.00 |
| 3 | 04 ch.multicore balance audio snake cable Draka Co. made in Jermani | 105 मीटर | रु.175/- प्रति मी. | 18,375.00 |
| 4 | वरील केबलला दोन्ही बाजुने मेल पीन सोल्डर केलेले | 08 नग | रु.150/- प्रति नग | 1,200.00 |
| 5 | 16 ch. Audio multicore snake one & XLR fan out another and cable drum end 20 metre with stand | 01 नग | रु.25,000/- प्रति नग | 25,000.00 |
| 6 | Prolink junction box 8 position enclosed junction box | 02 नग | रु.2,000/- प्रति नग | 4,000.00 |
| 7 | Prolink junction box 4 position enclosed junction box | 03 नग | रु.1,000/- प्रति नग | 3,000.00 |
| 8 | 08 ch. multicore snake audio cable XLR male-female | प्रत्येक 10मी. चे 03 नग | रु.6,000/- प्रति मी. | 18,000.00 |
| 9 | RCA female to RCA female Neutric Co. | 10 नग | रु.100/- प्रति नग | 1,000.00 |
| 10 | RCA male to BNC female | 05 नग | रु.400/- प्रति नग | 2,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Neutric Co. | | | |
| 11 | RCA male to XLR female Neutric Co. | 02 नग | रु.500/- प्रति नग | 1,000.00 |

वरीलप्रमाणे समाधी मंदिर स्टेज, द्वारकामाई, चावडी व उत्सवातील कार्यक्रमासाठी केबल व ॲक्सेसरीज खरेदी विभागामार्फत खरेदी करणेसाठी रु.१,३०,७५३.०० चे पुर्णांकीत रु. १,३५,०००.०० मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली

.(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख)

**४२) व्दारावती इमारतीतील ए.सी. रुम साठी एल.सी.डी टीव्ही खरेदी करणे बाबत**

नविनच सुरु झालेल्या व्दारावती इमारतीत प्रत्येक रुमसाठी २४ तासाचे रुपये १,०००/- इतका दर आकारला जातो. त्यामूळे संस्थानमध्ये ए.सी. रुममध्ये निवासासाठी येणारे भक्तांच्या रुममध्ये संस्थानमार्फत टी.व्ही.ची सुविधा देणे योग्य होईल.त्यानुसार ८० रुमसाठी आवश्यक असलेल्या टी.व्ही.चे वर्णन खालीलप्रमाणे-

| अ.नं. | टी.व्हींचे वर्णन | नग | अंदाजे प्रत्येकी किंमत रु. | अंदाजे एकुण किंमत रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३२" एल.सी.डी. टीव्ही सोनी कं. मॉ. नं. KLV३२EX३००with wall mounting bracket & installation | ८० | ३०,०००/- | २४,००,०००/- |
| | | | एकुण- | २४,००,०००/- |

वरील सोनी कंपनीचे टी.व्ही. कंपनी किंमतीत मिळणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी साईभक्त श्री रमणी, चेन्नई यांचेशी केलेल्या चर्चेनुसार सोनी कंपनीचे सल्स इनचार्ज श्री रविंद्र श्रीवास्तव हे शिर्डी येथे येऊन गेले व कमीत कमी किंमतीमध्ये टी.व्ही देणेचे चर्चेमध्ये त्यांनी मान्य केले.

तरी सोनी कंपनीकडून तसेच किंमतीची तूलना करणेसाठी स्टॉकिस्ट व अन्य एजंटकडून कोटेशन घेऊन ८० नग टीव्ही खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये २४,००,०००/- खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती इमारतीतील रुमसाठी ३२"टीव्ही खरेदी करण्याऐवजी २६" टीव्ही खरेदी करण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**४३) साईनिवास अतिथीगृह व शांतीनिवास दर्शनलाईनकरीता २६" ऐवजी ३२" LCD टी.व्ही खरेदीस मान्यता मिळणेबाबत**

साई निवास अतिथी गृहातील प्रत्येक रूममध्ये ०१ याप्रमाणे २४ रुममध्ये २४ व इतर अतिथींसाठी ०२ तसेच मेन्टनन्स कामासाठी ०२ असे एकुण २८ नग, तसेच शांति निवास १ ला माळा दर्शन लाईनमध्ये नग १५ असे एकुण ४३ नग २६" टीव्ही खरेदिसाठी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली आहे

सोनी कंपनीचे टीव्ही, कंपनी किंमतीत मिळणेसंदर्भात मा.कार्यकारी अधिकारी सो. व साईभक्त श्री.रमनी चेन्नई यांच्यात झालेल्या चर्चेप्रमाणे, सोनी कंपनीतर्फे औरंगाबाद येथिल सेल्स इन्चार्ज श्री रविन्द्र श्रीवास्तव हे दि.०२/१२/२००८ रोजी शिर्डी येथे आले होते. मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चेअंती झालेल्या प्रत्यक्ष पाहणीमध्ये २६" ऐवजी ३२" टीव्ही खरेदी करणे योग्य होईल, असे श्री. श्रीवास्तव यांनी सांगितले, तसेच २६" व ३२" टीव्हींचे किंमतीत जास्त तफावत नसल्याने व कंपनीला एकाच साईजचे जास्त टी.व्ही. कमी किंमतीत देता येतील, असेही श्री.श्रीवास्तव यांनी सांगितले त्यानुसार सोनी कंपनी व इतरांकडून कोटेशन मागविणेत आले. प्राप्त झालेल्या ५ कोटेशनमध्ये श्री.श्रीवास्तव यांचेमार्फत अ.नगर यंथील न्यु अनिल इलेक्ट्रॉनिक्स यांनी ३२" प्रति टी.व्हीची मुळ किंमत रु.३९,९००/- असताना रु.३०,०००/- एवढी दिलेली असून ती इतर कोटेशनधारकांच्या तुलनेत कमी असलेमुळे, जा.नं.एसएसएस/ वशी-ध्वनी-खरेदी/ १५८५४ दि.३०.१२.२००९ अन्वये ३८ नग टी.व्ही. न्युनतम दराने खरेदी केलेले आहेत, त्यासाठी एकुण रु.११,४०,०००/- मात्र खर्च झालेला आहे.

उपरोक्तप्रमाणे २६" ४३ नगांऐवजी, ३२" ३८ नग एल.सी.डी. टीव्ही खरेदी करण्यात आलेले आहेत.

खरेदी करण्यात आलेल्या ३८ टीव्हींपैकी २४ टीव्ही साईनिवास अतिथीगृहात बसविण्यात आलेले असून उर्वरीत १४ टीव्ही दर्शन लाईनमध्ये बसविणेत आलेले आहेत.

२६"४३ नग टीव्ही खरेदिसाठी रूपये १३,०५,५००/- ची मान्यता असून ३२"३८ नग टीव्ही साठी रूपये ११,४०,०००/- (अक्षरी रूपये अकरा लाख चाळीस हजार)खर्च झालेला आहे.

तरी, वर नमुद केल्याप्रमाणे २६" ४३ नग LCD टीव्ही खरेदि ऐवजी ३२" ३८ नग LCD टीव्ही खरेदिचे कार्यवाहीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**४४) शिर्डी नगरपंचायत व शिर्डी संस्थान यांच्यातील विशेष स्वच्छता कर, आरोग्य कर (नाके), पथकर अनुदान करारनाम्याबाबत.**

शिरडी नगरपंचायत यांना विशेष स्वच्छता कर आरोग्य कर (नाके) पथकर अनुदान नोंव्हेबर-२००५ ते डिसेंबर-२००८ पर्यंत रुपये- १,४०,४६,६६३/- अधिक जानेवारी-२००९ ते मार्च-२००९ पावेतो रक्कम रुपये- १२,०९,९९९/- देण्यात आलेली आहे. सदर रक्कम शासन मान्यतेस अधिन राहून देण्यात आलेली आहे. मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई यांचेकडे खालील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविलेले आहे.

| अ.नं. | शासनास पाठविलेले पत्राचा क्रंमाक व दिनांक | प्रस्तावाचा तपशिल |
|---|---|---|
| ०१ | जा.नं.एसएसएस/वशी-०२/ १३०५४/०५ दि.०९/११/२००५. | शिरडी नगरपंचायतीस भक्तांकडून स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण कर आकारु नये. यासाठी प्रतीवर्षी रुपये- ४०,००,०००/- ( अक्षरी रुपये- चाळीस लाख ) मात्र शिरडी नगरपंचायतीस देणेसाठी मान्यता मिळणेबाबत प्रस्तावात विनंती केलेली आहे. |
| ०२ | जा.नं.एसएसएस/वशी-०२/ १६५९३/०८ दि.१२/११/२००८. | शिरडी नगरपंचायत शिरडी यांना अदा केलेल्या रक्कमेस ( ऑगष्ट -२००८ अखेर ) मान्यता मिळणेसाठी तसेच सन २००८-०९ या वर्षासाठी मागील अदा केलेल्या रक्कमेवर १०% वाढ रक्कम अदा करणेसाठी प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी विनंती केलेली आहे. |
| ०३ | जा.नं.एसएसएस/वशी-०२/ ३९८७/०९ दि.०७/०४/२००९. | सन २००५-०८ अखेर पावेतो शिरडी नगरपंचायत शिरडी यांना अदा केलेली रक्कम रुपये- १,४०,४६,६६३/- ( अक्षरी रुपये- एक कोटी, चाळीस लाख, सेहेचाळीस हजार, सहाशे त्र्येसष्ठ ) मात्र इतक्या अदा केलेल्या रक्कमेस प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती केलेली आहे. |
| ०४ | जा.नं.एसएसएस/वशी-०२/ ६०५१/०९ दि.२०/०५/२००९. | ०१) शिरडी नगरपंचायत शिरडी यांना विशेष स्वच्छता आरोग्य प्रदुषण कर अदा करणेत यावी.तसेच सन २००८-०९ या वर्षासाठी मागिल अदा केलेल्या रक्कमेवर १०% वाढ करुन देण्यात यावी. यापुढेही दरवर्षी १०% वाढ देणेबाबत ( दि.०९/११/२००५ व दि.०७/०४/२००९ ) रोजी शासनास प्रस्ताव पाठविले आहे. त्या प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती केलेली आहे.<br>०२)शिरडी नगरपंचायत शिरडी यांना जानेवारी-२००९ ते मार्च-२००९ या तीन महिने कालावधीसाठी रक्कम रुपये- १२,०९,९९९/- ( अक्षरी रुपये- बारा लाख, नऊ हजार, नऊशे नव्यान्नो ) मात्र रक्कम अदाई करणेत आलेली आहे.त्या प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती केलेली आहे. |

उपरोक्त प्रकरणी शासनाची मान्यता / परवानगी मिळावी, यासाठी शासनाकडे पाठपुरावा चालू आहे. जा.नं.एसएसएस/वशी-०२/६०५१/२००९ दि.२०/०५/२००९ रोजीच्या पत्राने मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पुनःश्च विनंती केली आहे.

दि. ०७/०४/२००९ रोजीच्या संस्थानचे पत्राबाबत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांचेकडून दि.११/०८/२००९ रोजी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण ( नाके ) नियंत्रण कराची भरपाई करण्याबाबत शिरडी नगरपंचायत शिरडी व श्री साईबाबा संस्थान यांच्यात लेखी करार करण्यात येऊन त्याबाबत शासनास अवगत करण्यात यावे, जेणेकरुन शासनास पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल, असे संस्थानला कळविणेत आले आहे.तसेच लेखापरिक्षण अहवालामध्येही संबंधीत प्रकरणी ( MOU मेमोरंडम ऑफ अंडरस्टँडीग ) समजुतीचा करार करण्यात आलेला नसल्याचे नमुद करण्यात आले आहे. यासर्व बाबींचा विचार करता इकडील कार्यासनामार्फत सोबतच्या प्रमाणे मेमोरंडम ऑफ अंडरस्टँडीग कराराचा मसुदा तयार करण्यात आला असून त्याची प्रत शिरडी नगरपंचायत शिरडी यांना जा.क्र.एसएसएस वशी-०२/१२५६६/०९ दि.०९/१०/२००९ चे पत्राने पाठविण्यात आली होती. तसेच त्यांना जा.क्र. एसएसएस वशी-०२/१४७०६/२००९ दि.०२/१२/२००९ चे स्मरण पत्राने करारनामा करणेबाबत विनंती करण्यात आली होती. शिरडी नगरपंचायत शिर्डी यांचे जा.क्र.न.पं./ साप्र/ कावि. ०१/१५३/२०१० दि.०१/०१/२०१० चे पत्राने मंजुर करारनामा प्रत इकडेस पाठविला आहे. सदरचा करारनामा शिरडी नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५८ दि. २२/१२/२००९ अन्वये करारनामा करणेस मंजूरी देण्यात आलेली आहे.

संस्थानने शिरडी नगरपंचायतीस पाठविलेल्या करारनाम्यात ०१ ते ०८ अटी / शर्ती आहेत. व त्यास शिरडी नगरपंचायतची मान्यता आहे.सदर मुद्यांचे व्यतिरिक्त त्यांनी खालील प्रमाणे मुद्दे वाढविलेले आहेत.

**०९)** शिरडी नगरपंचायत सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५८ दि. २२/१२/२००९ अन्वये सदरचा करारनामा करणेस मंजूरी देण्यात आलेली आहे.

**१०)** शिरडी नगरपंचायतीने सदर कर बंद केलेनंतर वाहने व भाविकांचे संख्येत मोठया प्रमाणावर वाढ झाल्याने सुधारीत अनुदान प्रस्ताव सादर केला असून त्यास शासन मंजूरी मिळणेस स्वतंत्र कार्यवाही चालू असून त्यास या करारनाम्यामुळे प्रतीबंध राहणार नाही.

**११)** भविष्यात सदर कराबाबत मतभेद झाल्यास मंजूर उपविधीनुसार विशेष स्वच्छता कर / आरोग्य कर वसुल करण्याचे अधिकार शिरडी नगरपंचायतीस राहील.

**१२)** टोल नाका टोल कर साईभक्तांचे हितासाठी व भक्तांचे सोयीसाठी वसूल न करणेचा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांचा निर्णय आहे व त्याचा मोबदला जबाबदारी म्हणून वर नमुद उभयतांचे समजूतीने ठरविलेली रक्कम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांनी शिरडी नगरपंचायतीस देण्याचे ठरले आहे व त्याचे लिखीत स्वरुपात लेखी करार असावा, म्हणून उभयतांनी हा करारनामा करुन दिला असे.

यात कोणतेही मतभेद झाल्यास संस्थानचे कार्यकारी अधिकारी, शिरडी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व उभयतांचे वकील यांनी बसून निवाडा करावा. अटी / शर्तीचे उल्लंघन अथवा अनुदान बंद केलेस शिरडी नगरपंचायतीस मंजूर उपविधीनुसार पुढील कार्यवाही करता येईल.

वरीलप्रमाणे उभयतांनी करारनामा समजून /उमजून केला आहे. शासन मंजूरीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांनी तातडीची कार्यवाही करावी.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता मुळतः संस्थानचे कार्यासनामार्फत तयार केलेला व वाढीव ( अ.नं.०९ ते १२ असे ४ मुद्दे ) तरतुदीसह शिरडी नगरपंचायतीकडून प्राप्त झालेला मंजूर करारनामा किरकोळ दुरुस्त्यासह Approved करणेत आलेला असून दिनांक २२/०१/२०१० रोजी उभय पक्षामध्ये करारनामा Execute करणेत येत आहे त्याची नोंद घेण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**४५) श्री रामनवमी उत्सव-२०१० कलाकार निश्चीतीबाबत.**

श्री रामनवमी उत्सव -२०१० हा मंगळवार दि.२३/०३/२०१० ते गुरुवार, दि.२५/०३/२०१० अखेर तीन दिवस साजरा होणार आहे. उत्सवात भाग घेऊ इच्छिणाऱ्या कलाकारांची नांवे खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कलाकाराचे नांव व पत्ता | संख्या | बिदागी रुपये | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री विश्वनाथ रमेश ओझा, साई मिलनकी आंस, के.व्ही.रोड, वार्ड नं.५, श्रीरामपूर फो.नं.२२३५६१/२२५२६३ | ०८ | १/- व नारळ | भजन संध्या कार्यक्रम |
| ०२. | श्री रमेश रावेतकर, १, अपूर्वा अपार्टमेंट, प्लॉट नं.१६, सर्व्हे नं.८२/१ बी, सहकारनगर-नं.१, पर्वती, पूणे-४११ ००९, मो.नं.९३७३२८४०७६ | ०३ | रु. ५,०००/- | साईगीते कार्यक्रम. |
| ०३. | सौ.शितल विनित खंडकर, ए-२२, रत्नसमुह हौसींग सोसा. डी.एन.नगर पोष्ट ऑफीस समोर, डी.एन.नगर, अंधेरी(प.) मुंबई-५३, मो.नं.९३२५२९५२५३ | १० | ०७,०००/- | तन्मय- एक अनुभव स्वरलहरींवर झुलण्याचा हा गायन कार्यक्रम. |
| ०४. | श्रीमती मंजूषा पाटील, बी-२५, स्नेह हौसींग सोसा. स्पेनर्स डेलीचे समोर, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२, मो.नं.९८२२७६१४७३ | ३ | १०,०००/- | गायन कार्यक्रम |
| ०५. | श्री रमेश तगारे/संजय तराणेकर, काळा मारुती चौक, सी.टी.पोष्टाशेजारी, मु.पो.येवला, जि.नाशिक-४२३४०१, मो.नं.९४२५६४४६९ | १५ | ११,०००/- | रामायण संगितीका " राम उसिने पाया " हा कार्यक्रम. |
| ०६. | श्रीमती वनिता बजाज, न्यु दिल्ली मो.नं.०९२१०४०४४९०/०९३५०७८०१३३ | १२ | १५,०००/ | साई भजन संध्या कार्यक्रम |
| ०७. | श्रीमती शितल कोलवालकर, शिवदिप, पुष्कराज अपार्टमेंट, ८८/१/१, कोहीनुर कॉलनी, सहकार नगर-२, पुणे-४११ ००९, मो.नं.९९७०२८८५३८ | ७-८ | १५,०००/- | कथ्थक नृत्य |
| ०८. | श्री दिलीप मंत्री, उपाध्यक्ष, श्री सालासार बालाजी सत्संग मंडळ, पावन हनुमान मंदिर, हातमपूरा, अहमदनगर, श्री लोकमत होजिअरी, मुथ्था चेंबर्स, जुनी वसंत टॉकीज, अहमदनगर-४१४००१, मो.नं.९२२६४७१७५७ | ३०-४० | १५,०००/- | संगीतमय सुंदरकांण्ड पाठ मा.अध्यक्षमहोदय यांनी कार्यक्रम ठेवणेस सांगितले आहे. |
| ०९. | कैलास हरेकृष्णदास, ७९, प्रशांत नगर, हनुमान मंदिराजवळ, कातोल रोड, नागपूर-४४००१३, मो.नं.०९८२३७२१५६३ | ७ | २१,०००/- | भजन संध्या कार्यक्रम |
| १०. | श्री आर.के.सक्सेना, ९०३, टाईप-४, लक्ष्मी बाई नगर, आय.एन.ए.मार्केट समोर, दिल्ली हटचे जवळ, न्यु दिल्ली-११० ०२३ मो.नं.०९८१११२६४३९/०९८११३१३४५१ | ९ | २१,६००/- | साई भजन कार्यक्रम |
| ११. | कीर्ती अनुराग, ३-बी / ३०३, आशा नगर, दत्तनी पार्कचे समोर, कांदीवली (पु), मुंबई-४०० ०६६, मो.नं.९९२०४४३०९५ | ८ | २५,०००/- | भजन कार्यक्रम |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | डॉ.उध्दव अस्तुरकर, २, पोष्टल क्लब, कन्हेरेवाडी, नासिक-४२२००१, मो.नं.९४२२२४८३०९, | ७ | २५,०००/- | सतार वादनाचा कार्यक्रम. मा.श्री.अशोक खांबेकर, विश्वस्त, यांची शिफारस. |
| १३. | श्री कुमारसेन गुप्ते, आरती थिएटर्स, बि.नं.१४, पितांबर लेन, छोटाणी रोड , क्रॉस लेन नं.२, माहिम रेल्वे स्टेशन, माहिम(प.), मुंबई-४०० ०१६, मो.नं.९८३३७७९२५२ | ४० | ३५,०००/- | " श्री शिरडीचे साईबाबा " ३ अंकी नाटक. |
| १४. | श्री श्रीपाद सोवनी, ८०७/२, गांवभाग सांगली, राजाजी पथ, डोंबीवली मो.नं.९४२३०१७९१५ | ०८ | ४०,०००/- | अभंग, भावगीते, भक्तीगीते इ. |
| १५. | श्री सुधीर बावकर, साई सुमिरन संध्या, ११-ए/१२, साईबाबा नगर, मुंबई-पुणे रोड, कळवा(प.)ठाणे-४०० ६०५ मो.नं.९८२०३६३६०८ | ४० | ५०,००० + प्रवासखर्च | हींदी मराठी, बहुश्रुत व लोकप्रिय गाणी. |
| १६. | डॉ.पी.एस.आर. अप्पा राव, अध्यक्ष, श्री कुचिपुडी नृत्य निलायम, २-२-११२३/९/जे, न्यु नल्लाकुंटा, हैद्राबाद, (आं.प्र.) मो.नं.९८४८४६६३५१ | | ५०,०००/- | कुचिपुडी डान्स बॅलेट. मा.श्री.अशोक खांबेकर, विश्वस्त, यांची शिफारस. |
| १७. | संध्या देशमुख, स्कॉलर म्युझीक अॅकडमी, गंगासागर वॉटर टँक समोर, खेर हॉस्पीटलचे मागे, रामनगर, वर्धा-४४२००१ मो.नं.९८५०४२०२९९/९३७३११४२१२ | ९ | ५१,०००/- | साईभजन कार्यक्रम |
| १८. | रविराज नासेरी, साई ग्रेस म्युझीक, डी/७०२, सिव्हर टॉवर, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदीवली(पु.)मुंबई-४०० १०१, मो.नं .९८९२३०६१७३/ ९८२०९८८२२६ | १० | ८०,०००/- | साई भजन संध्या कार्यक्रम. |
| १९. | श्री रंगनाथ वेद्य, अध्यक्ष, कलासंपदा, शिर्डी | | संस्थान देईल ते मानधन. | " गोष्ट एका वाल्याची " - सामाजिक नाट्यप्रयोग. |
| २०. | राम कोठेकर-संगीत शिक्षक, विवेकानंद आश्रम, विद्यामंदिर, मु.पो.हिवरा आश्रम, ता.मेहकर, जि.बुलढाणा, मो.नं.९६५७२३७०९७ | ०४ | संस्थान देईल ते मानधन. | भक्ती संगीत कार्यक्रम |
| २१. | श्री. के.व्ही.सत्यनारायणा, के.व्ही.एस. ब्रिंदावनम्, गांधीनगर, एलुरु, मो.नं.९८४८१२२४१३ | २० | संस्थान देईल ते मानधन. | कुचिपुडी डान्स बॅलेट. |
| २२. | श्री लक्ष्मीकांत सहकारी, द्वारा श्रीमती उषा पंडीत, प्लॉट नं.१८, जिव्हेश्वर हौसींग सोसा. साखरे मंगलकार्यालयामागे, एन-८ जवळ, सिडको, औरंगाबाद, फो.नं.०२४०-२३११५०६ मो.नं.९८२३४७६८९२/९८२२४१६४८३ | ८ | ४०,०००/- | संगीत कार्यक्रम. |

वरील १ ते २२ कलाकारांनी श्री रामनवमी उत्सवात कार्यक्रम करणेस संधी मिळावी म्हणुन विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सवात कलाकाल कार्यक्रम निश्चित करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष,मा.स्थानिक विश्वस्त व मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**४६) झेरॉक्स मशिनसाठी टोनर कार्टेज व ड्रम खरेदी करणेबाबत.**

प्रशासन शाखेत झेरॉक्स काढण्यासाठी दि.१७/११/२००९ रोजी मे.व्यंकटेश सर्व्हिसेस औरंगाबाद या डीलरकडून झेरॉक्स कंपनीचे मॉडेल ४१५० चे झेरॉक्स मशीन देणगी घेतलेले आहे.

सदर मशिनच्या एका टोनर कार्ट्रेजमध्ये साधारण बाराहजार झेरॉक्स प्रती व एका ड्रममध्ये पंचावन्न हजार झेरॉक्स प्रती निघतात.

मा.व्यवस्थापन समितीची सभा व दैनंदिन संस्थानचे सर्व विभागांचे झेरॉक्स कामासाठी सदर मशीनला दर महीण्याला ४ टोनर कार्टेज व १ ड्रम आवश्यक आहे. संस्थानचे वार्षीक खरेदीला साधारण अडीच महीणे अवधी असल्यामुळे अडीच महीणेकरीता ८ टोनर कार्ट्रेज व २ ड्रम लागणार आहे.

सदर मशीनचे अधिकृत डीलर मे.व्यंकटेश सर्व्हिसेस औरंगाबाद यांनी एक टोनर कार्ट्रेजची किंमत रु.६२०० + व्हॅट व एक ड्रम ची किंमत रु.८००० + व्हॅट अशी दिलेली आहे.

८ टोनर कार्ट्रेज व २ ड्रम साठी अंदाजे रु.६८,२२४/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे टोनर कार्ट्रेज व ड्रम, खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासन शाखा वशी-१२)

**४७) सन २०११ चे श्रीसाई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेबाबत.**

सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ समितीची कर्तव्य अधिकाराबाबत कलम नं. १७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

प.पुज्य श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करणेच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, मार्फत श्री साई दैनंदिनी तसेच दिनदर्शिका छपाई करुन किफायतशीर किंमतीला साईभक्तांना उपलब्ध करुन दिल्या जातात.

सन २०१० चे छपाईकामी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्राप्त दरपत्रके मा.उपसमितीचे सभेत उघडून, मा. व्यवस्थापन समितीसमोर वाटाघाटी करुन प्रेसला छपाई कामाचा कार्यादेश देण्यात आला होता, चालू वर्षीही मागिल वर्षाप्रमाणे कार्यवाही करता येईल.

अ) खालील तपशिलाप्रमाणे सन २०११ ची श्री साई दैनदिनी तसेच दिनदर्शिका छपाई करावी असे मत आहे.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | अंदाजे छपाई दर रुपये | अंदाजे विक्री दर | एकूण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी | १,५०,००० | ६०/- | ६५/- | ९०,००,०००/- |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका<br>१ पानी- लहान साईज १७"X२२" | २,५०,००० | ८/- | १०/- | २०,००,०००/- |
| ०३ | श्री साईबाबा दिनदर्शिका<br>१ पानी- मोठी साईज १९"X२९" | २,५०,००० | १८/- | २०/- | ४५,००,०००/- |
| | | | | एकूण अंदाजे खर्च रु. | १,५५,००,००० |

वरील प्रमाणे श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका २०११ छपाई करणेकामी रुपये १,५५,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी, पंचावन्न लाख) मात्र इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

ब) खालील तपशिलाप्रमाणे श्री साई दैनंदिनी २०११ मधील छपाई सुधारणा.

१) कव्हरचे पुढील व मागिल बाजूस आसपास १२० जीएसएम वजनाचा सुपर सनशाईन मॅपलिथो प्रिंटींग पेपर बल्लारपूर कंपनीचा त्यावर श्री साईबाबांचे जीवनावरील प्रसंगांचे ९ प्रकारचे चित्रे रंगीत छपाई केल्यास दैनंदिनी आकर्षक चांगली होईल.

२) श्री साई दैनंदिनीमध्ये ४ रंगात फोटो १) समाधी मंदिरातील सिंहासनावरील मूर्ती समाधीसह २) द्वारकामाईत बसलेले बाबा ३) दगडावर बसलेले ४) चावडीतील ५) पालखी फोटो असे ५ फोटो जे मान्य आहेत, असे फोटो कायमस्वरुपी दैनंदिनीत द्यावेत.

३) दरवर्षीच्या दैनंदिनीत पौर्णिमा/आमावस्या प्रारंभ व समाप्तीच्या वेळा १ पेजवर छापण्यात येतात. प्रत्येक महिन्यातील तारखेवर सदरची माहिती छपाई असते त्यामुळे स्वतंत्र पानावर छपाई करण्याची आवश्यकता नाही. असे मत आहे.

४) रेल्वेचे वेळापत्रकात नोव्हेंबर महिन्यात बदल होतो सुधारित वेळापत्रक मिळणेस विलंब होतो. साईभक्त प्रत्यक्ष शिर्डीत येतेवेळी एखादी ट्रॅव्हल कंपन्या रेल्वेशी संपर्क साधूनच प्रवासाचे नियोजन करीत असल्याने, रेल्वेचे व हवाई सेवेचे वेळापत्रका ऐवजी साईभक्तांचे माहितीसाठी शिर्डी नजिकेचे रेल्वेस्टेशनचे ठिकाण व अंतर छपाई करता येईल.

५) दैनंदिनीसाठी स्वच्छ पांढरा कागद वापरणेत येतो. त्याऐवजी Off-white कागद वापरावा,असे मत आहे.

क) श्री साईबाबा दिनदर्शिका ६ पानी छपाई न करणेबाबत.

सन २०१० मध्ये ६ पानी दिनदर्शिका छपाई करण्यात आली होती. परंतु भक्तांचा फारसा प्रतिसाद नाही असे दिसून येते. तरी ६ पानी दिनदर्शिका छपाई करु नये असे मत आहे.

उपरोक्त "अ" प्रमाणे श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका २०११ छपाईस व त्याकामी येणारे अंदाजे रुपये १,५५,००,०००/- मात्रचे खर्चास तसेच सन २०११ चे "ब" मध्ये दर्शविलेप्रमाणे बदल करणेस, "क" प्रमाणे श्री साईबाबा दिनदर्शिका ६ पानी छपाई न करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११ करीता श्रीसाई दैनंदिनी ३ लाख प्रती व दिनदर्शिका ५ लाख प्रती छपाई करण्यात याव्यात.त्याचप्रमाणे श्री साई दिनदर्शिका सहा पानी छपाई करण्यात येऊ नये. तसेच साध्या व एक्झिक्यूटीव्ह अशा दोन प्रकारच्या दैनंदिनी ठेवण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक-प्रकाशने विभाग)

**४८) राधा कालीयानदास दर्यानानी ट्रस्ट यांचेकडून रुई येथील गट नं.२९३ मधील ७ हेक्टर ३२ आर देणगी मिळालेली जागा विकसित करणेकामी आर्किटेक्टंची नेमणूक करणेबाबत.**

**(अ)** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५ नोव्हेंबर, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८४२ अन्वये राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांची मौजे रुई, तालुका राहाता येथील जमीन काही अटी शर्तीसह विनामोबदला बक्षीसपत्राने / देणगीदाखल स्वीकारणेबाबत निर्णय झालेला होता. त्यानुसार सदरहू दर्यानानी ट्रस्टचे मालकीची मौजे रुई येथील गट नंबर २९३ क्षेत्र ०७ हेक्टर ३२ आर जमीन बक्षीसपत्राने दान म्हणून स्वीकारणेत आलेली असून, सदर बक्षीसपत्र मा. दुय्यम निबंधक, राहाता यांचे कार्यालयात दिनांक ०१ डिसेंबर, २००९ रोजी नोंदणीकृत दानपत्र क्रमांक ४१५९/२००९ नुसार नोंदविण्यात आलेले आहे. बक्षीसपत्रानुसार जमिनीचे ७/१२ चे अभिलेखास संस्थानचे नांव लावणेबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर जमिनीची हद्द व क्षेत्र निश्‍चिती करणेसाठी सरकारी मोजणी करणेत येत आहे. सध्या मा. कार्यकारी विश्‍वस्त, राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी प्रत्यक्ष वहिवाटीनुसार दाखविलेल्या हद्दीनुसार संस्थानमार्फत सिमांकन करणेत आलेले असून, जमीन प्रत्यक्ष संस्थानचे ताब्यात घेण्यात आलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व बक्षीसपत्रातील अटी-शर्तीमध्ये, सदर मौजे रुई येथील गट नंबर २९३ मधील ०७ हेक्टर ३२ आर जमिनीमध्ये, संस्थानने स्वखर्चाने आध्यात्मिक शैक्षणिक संस्था उभारण्यांत यावी. आध्यात्मिक शैक्षणिक संस्थेचे कामकाजास जमीन ताब्यात मिळाल्यापासून १ ते २ वर्षात सुरुवात करावी, असे नमूद केलेले आहे.

**(ब)** सदर **The Audi Group, Pune** यांचे आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे यांनी दिनांक ०४ ऑगष्ट, २००९ रोजीचे पत्रानुसार त्यांचे संस्थेबाबत माहिती कळविलेली आहे. त्यांनी पत्रात असे नमुद केले आहे की, त्यांची संस्था गेली २३ वर्षापासून वास्तु आणि नगररचना क्षेत्रात कार्यरत असून, नगर परिसर नियोजन क्षेत्रात अनुभवी आहे. सदर संस्थेने याकालावधीत, सुमारे २५० प्रकल्प पुर्ण केलेले असून, त्यामध्ये निवासी इमारती, शैक्षणिक संकुले, औद्योगिक इमारती यांचा समावेश आहे. या प्रकल्पांमध्ये नॅशनल इन्शुरन्स ॲकॅडमी, पुणे, नॅशनल इन्स्टीटयुट ऑफ बँक मॅनेजमेंट, पुणे, आगरकर रिसर्च इन्स्टीटयुट, पुणे या शैक्षणिक संस्थेचे तसेच फ्रेंडस् पार्क को-ऑप. हौसिंग सोसायटी, पुणे, गंगा निवास, मुंबई, व्होरा हाऊस, मुंबई आदि प्रकल्पांचे काम पुर्ण केलेले आहे. उपरोक्त पत्राव्दारे, त्यांचे संस्थेची संस्थानमार्फत करावयाचे नियोजित आध्यात्मिक शैक्षणिक विकास प्रकल्पासाठी वास्तुविशारद म्हणून नेमणूक व्हावी, म्हणून विनंती केलेली आहे.

तसेच, दिनांक २६ जानेवारी, २०१० रोजीचे फॅक्स पत्राव्दारे, वास्तुविशारदाच्या अनुषंगिक कामांसाठी प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या ३ टक्के इतकी रक्कम आर्किटेक्ट फी (वास्तुविशारद शुल्क) म्हणून मिळावी, अशी विनंती केली आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेप्रमाणे, **The Audi Group, Pune** यांची मौजे रुई येथील बक्षीसपत्राने मिळालेल्या जमिनीमध्ये भक्तनिवासस्थाने, कर्मचारी निवासस्थाने, शैक्षणिक, आध्यात्मिक शैक्षणिक विकास प्रकल्पांसाठी वास्तुविशारद म्हणून नेमणुक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली व याकामी आर्किटेक्ट फी म्हणून २% अधिक सेवाकर त्यांना देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**४९) मा.विश्‍वस्तांचे सुचनेबाबत.**

मा.विश्‍वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

(०१) देशाच्या थोर राष्ट्रपुरुषांचे फोटो संस्थान मार्फत तयार करण्यात येऊन, त्या राष्ट्र पुरुषांच्या जयंती/ पुण्यतिथीच्या दिवशी या फोटोस हार फुले अर्पण करण्यात यावे. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

(०२) मा.श्री.मुनीआप्पा व ममता बॅनर्जी यांना रेल्वे अंदाजपत्रकाबाबत अभिनंदन करणारे पत्र पाठविण्यात यावे. तसेच या पत्रात श्रीसाईभक्तांचे सोयीसाठी शिरडी ते दिल्ली स्वतंत्र रेल्वे सुरु करणेबाबत विनंती करावी. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

(०३) शिरडी परिसरात २५ हजार झाडे लावणे व ३ वर्षापर्यंत जगविण्यासाठी संस्थानमार्फत निविदा मागविण्यात याव्यात. (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

(०४) संस्थानचे सर्वच इमारतींमध्ये विज बचतीसाठी CFL दिवे बसविण्यात यावेत. तसेच याकामी वार्षिक खरेदीसाठी फिलिप्स कंपनीशी रेट कॉन्ट्रॅक्ट करुन घेण्यात यावे. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

०५) श्रीसाई प्रसादालय इमारतीचे पहिल्या माळ्यावरील कॉन्फरन्स हॉलमध्ये रुपये १००/-या दराने शाही प्रसादभोजन सुरु करणेत यावे. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

०६) सध्या साई अतिथी कक्षात रुपये ४०/- भरुन प्रसाद भोजन घेऊ इच्छिणाऱ्या सर्व साईभक्तांना प्रसादभोजन देण्यात यावे. (कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग)

०७) श्रीसाई प्रसादालय इमारतीचे स्वंयसेवी भोजन कक्षामध्ये रुपये २०/- या दराने साईभक्तांना बुफे प्रसादभोजन सुरु करण्यात यावे.

उपरोक्त तीनही ठिकाणी प्रसादभोजन घेऊ इच्छिणाऱ्या साईभक्तांचेकडून पासेसची मागणी करण्यात येऊ नये. वरीलप्रमाणे १ ते ३ प्रकारचे प्रसादभोजन सुविधेबाबत साईभक्तांचे माहितीसाठी फलक तयार करुन ते योग्य ठिकाणी लावणेत यावेत. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.०४ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमा खर्च तक्ता माहे जानेवारी- २०१०**

**(ब) माहे जानेवारी- २०१०मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे जानेवारी- २०१० मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे जानेवारी- २०१०मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(A) माहे जानेवारी,२०१० मधील जमा रु. २३,१५,६७,३६५/- आणि खर्च रुपये १३,४८,७२,२३६/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील जानेवारी,२०१० रुपये २,७५,५२४/- चा तक्ता, दिनांक १२.०२.२०१० अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ४१६,४१,०५,३०३/- चा तक्ता, माहे जानेवारी,२०१० या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण रुपये १०,२१,९४,७४८./- देणगीचा तक्ता, माहे जानेवारी,२०१० मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये २,४३,६००/- चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२७७ नोंद घेण्यात आली.**

**०२. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाच्या माहे एप्रिल,२००९ ते डिसेंबर,२००९ अखेर जमाखर्च तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. २७७ नोंद घेण्यात आली.**

---

**०३. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डिसेंबर, २००९ व जानेवारी-२०१० या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे डिसेंबर,२००९ व जानेवारी,२०१० मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये अनुक्रमे रुपये २२,९६,४६१/-व रुपये २०,६३,१८२/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. २७७ नोंद घेण्यात आली.**

---

**०४. साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी- २०१० या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

(C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे जानेवारी,२०१० मध्ये रुपये ३२,८०,६५०/-/- देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. २७७ नोंद घेण्यात आली.**

---

**०५. श्रीसाईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी- २०१० मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(D) साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी,२०१० मध्ये रुग्णांना अंतररुग्ण रुपये ७७,४०७/- बाह्य रुग्ण रुपये ६०,३९८/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ४९,२००/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. २७७ नोंद घेण्यात आली.**

---

**०६. माहे डिसेंबर- २००९ व माहे जानेवारी- २०१० मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(E) माहे डिसेंबर- २००९ व माहे जानेवारी- २०१० संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या अनुक्रमे ४४,५४४ व ४३,६७४ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. २७७ नोंद घेण्यात आली.**

---

**०७. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(F) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. २७७ नोंद घेण्यात येऊन तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे बांधकामाची अंतिम बिले आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(०१) स.नं.५४,५५ जागेवर तारकुंपण करणे कामाचे ठेकेदार श्री.संतोष एन. गुंजेगावकर, निघोज यांचे रु.१,७५,१६५/- मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०२) संस्थानचे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.८७,८८ मध्ये वाहनतळाचे खडीकरणे करणे कामाचे ठेकेदार श्री.शेख मकबुल बादशहा, अहमदनगर यांचे रु.२५,५१,४७६/- मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०३) श्रीसाईप्रसादालय येथे पार्किंग शेड उभारणे कामाचे ठेकेदार श्री.ईश्वर पंढरीनाथ जंजीरे, श्रीगोंदा यांचे रु.५,११,८६१/- मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०४) साईनाथ रुग्णालयाकरिता शेड उभारणे या कामाचे ठेकेदार श्री.संतोष एन. गुंजेगावकर, निघोज यांचे रु.६२,४२७/- मात्र जादा खर्चासह रु.८,४६,२९३/- मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०५) श्रीसाईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरिता पार्किंग शेड उभारणे कामाचे ठेकेदार श्री.मिलींद एस. पाचोरकर, निफाड यांचे रु.३,७२,४७९/- मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०६) द्वारावती भक्तनिवास इमारत ४ था मजला बांधकाम करणे व रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे कामाचे ठेकेदार मे.गोलाणी बिल्डर्स, मुंबई यांचे मटेरीयल भावफरक बील रु. ३०,६७,१०८/- सह रु.६,५०,६७,०१६/- मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०७) पांढूर्ली ता,सिन्नर येथे पालखी विसावा थांब्याचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे.एन.एस. बनकर पा. ॲण्ड कं., श्रीरामपूर यांचे रु.३५,३४,५४५/- मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५ सन २०१०-११ प्रसादालय व कँटीन वार्षिक किराणा माल खरेदी निविदा उघडणे व नमूने निवडणे**

**प्रस्ताव-** सन २०१०-११ मध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल वार्षिक दराने खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.०१.२०१० मध्ये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.०५-०८.०२.२०१० चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०९.०२.२०१० ते दि.१८.०२.२०१० अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.२०.०२.२०१० अशी निविदा स्विकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली होती.

वरीलप्रमाणे निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची तसेच स्वतंत्र पॅकींगमध्ये नमुन्यांची मागणी केलेली आहे. तरी दोन्ही निविदांचे लिफाफे आपलेसमक्ष उघडणेत येवून मालाचे नमुने निवडणेत यावेत असे नम्र मत आहे. निविडलेल्या नमुना धारकांना पुढील सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत येईल. दरम्यानच्या काळात निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी करणेत येईल. मागणीनुसार बयाणा रक्कम तसेच कागदपत्रे नसल्यास त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आमंत्रित करण्यात येणार नाही. प्राप्त निविदांचा तपशील सोबतच्या परिशिष्टात सादर करणेत येत आहे. तरी प्राप्त निविदाधारकांच्या निविदा उघडणेस व नमुने निवडणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, स्थानिक समिती सभेमध्ये सन २०१०-११ प्रसादालय व कँटीन वार्षिक किराणा माल खरेदीसाठी निविदा उघडून नमूने निवडणेत यावे, तसेच ज्या पुरवठादारांनी EMD भरलेले नाही, माल पुरविलेला नाही, तसेच Black list केलेल्या पुरवठादारांचे टेंडर्स विचारात घेऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय न.०६ मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १९८, गट नंबर १९९ व गट नंबर २०१ मधील जमिनीमध्ये साईगार्डन उभारणेकामी प्राप्त झालेल्या निविदांबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ ऑक्टोबर, २००८ रोजीचे सभेत साई गार्डन उभारणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्रमांक ७४९ संमत झालेला आहे :

.. .. उपरोक्त बाबीबाबत आजचे मा. व्यवस्थापन समितीचे सभे समोर आर्किटेक्ट श्रीमती सोनीया काप्रे, नवि दिल्ली यांनी प्रस्तावीत साईगार्डन प्रकल्पाचे सादरीकरण (Presentation) व तपशीलवार माहिती सादर केली.

तसेच खालील बाबींकरीता आर्किटेक्ट यांनी योग्य ते सल्लागार न मिळाल्यामुळे संस्थान मार्फत सदर सल्लागार यांची नेमणूक करणे व फी ठरविणे योग्य राहील असे सांगितले.

०१. वॉटर स्क्रिन कम लेझर शो डिझाईन करणे व सूपरव्हिजन करणे.

०२. म्युझियमचे करिता संशोधन, कथालेखन व थिमसाठी स्क्रिप्ट रायटर नेमणे.

०३. म्युझियमचे विशेष प्रकारचे प्रदर्शनासाठी परिणामकारक, डिझाईन व ले आऊट साठी सल्लागार नेमणे.

०४. श्री साईबाबांचे जीवनावर आधारीत Documentry तयार करणेबाबत कार्यवाही करणे.

साईगार्डन साठी उपरोक्त बाबी व्यतिरीक्त करावयाचे सोयी-सुविधा ( बांधकाम,प्लंबिंग व सॅनटरी इलेक्ट्रीकल इ. कामासाठी) साठी रु. ३५.५० कोटी मात्र रकमेचे एस्टीमेट सादर केले होते. यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की, आर्किटेक्ट यांनी सूचविलेप्रमाणे उपरोक्त कामी सल्लागार नेमणे व साईगार्डनचे बांधकाम व अनुषंगिक कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरलें.

सदरहू निर्णयानुसार, आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांच्या प्रतिनिधी श्रीमती सोनिया काप्रे यांनी दिनांक १२ जून, २००९ रोजीचे पत्रानुसार नियोजित साई गार्डन प्रकल्पाचे एकूण रुपये ६६.१५ कोटीचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले होते. आर्किटेक्ट यांनी, सदर प्रकल्पाचे काम खालीलप्रमाणे तीन टप्प्यात करण्याचे नियोजित केले होते.

<u>पहिल्या टप्प्यामध्ये</u> ५००० भक्तांसाठी ॲम्पीथिएटर, आर्ट गॅलरी, लायब्ररी, प्रसाधनगृहे, वर्तुळाकार पदपाथ, संग्रहालय, उपहारगृह, ऑडिटोरियम, दुकानगाळे, लायटींग थिम ॲम्पीथिएटर आदि इमारतींच्या बांधकामासह विद्युत, पाणीपुरवठा आदि विषयक कामांचा समावेश करणेत आला होता. आर्किटेक्ट यांनी कळविल्यानुसार यासाठी अंदाजित खर्च रक्कम रु. २६.४९ कोटी मात्र अपेक्षित होता.

<u>दुसऱ्या टप्प्यामध्ये</u> रस्ते व पदपथ, सांडपाणी प्रकल्प, पाणीपुरवठा, जलकुंभ व ड्रेनेज, रेन वॉटर हार्वेस्टींग, विद्युतीकरण व डी.जी.सेट, उद्वाहने (लिफ्टस्), अग्नीशमन यंत्रणा, फुड कोर्ट, लँड स्केपिंग, वॉटर फाऊंटन व म्युझिक गार्डन, चिल्ड्रन प्ले एरिया, मेडिएशन गार्डन, थिम पार्क, स्पिरिच्युरल गार्डन, कियॉस्क, पब्लिक युटीलिटी  आदि इमारतींच्या बांधकामासह इतर अनुषंगिक सुविधा निर्माण करणेकामी करावयाच्या कामांचा समावेश करणेत आला होता. आर्किटेक्ट यांनी कळविल्यानुसार यासाठी अंदाजित खर्च रक्कम रु. २४.३२ कोटी मात्र अपेक्षित होता.

<u>तिसऱ्या टप्प्यामध्ये</u> नियोजित साईगार्डनमध्ये सेंट्रल थिम वॉटर फिचर - लेजर लाईटसह,म्युझियम व आर्ट गॅलरी - इंटेरिअर, थिम पार्कसाठी लाईटिंग व साऊंड साईनेज व सुशोभिकरण आदि तांत्रिक व मनोरंजनात्मक सुविधा तयार करण्याचे कामाचा समावेश करणेत आला होता. आर्किटेक्ट यांनी कळविल्यानुसार यासाठी अंदाजित खर्च रक्कम रु. १५.३४ कोटी मात्र अपेक्षित होता.

नियोजित साईगार्डनमध्ये वरील टप्प्यांव्यतिरिक्त वॉटरस्क्रिन, म्युझियम, श्री साईंचे जीवनावरील माहितीपट आदिं कामासाठी स्वतंत्ररित्या सल्लागार नेमून ही कामे पूर्ण करुन घेणे या कामांचा समोवश आहे. सदरहू कामे ही वैशिष्टयपूर्ण असल्याने या कामांसाठी किती खर्च येईल याचा निश्चित अंदाज वर्तविणे शक्य नाही.

थोडक्यात, नियोजित साई गार्डनचे एकूण ०३ टप्प्यांच्या बांधकामासाठी विहीत पध्दतीने कार्यवाही करणेस व ते संपूर्णपणे अंमलात येईपर्यन्त साधारणतः ०३ ते ०४ वर्षाचा कालावधी लागेल, असा अंदाज आहे. या कालावधीमध्ये बांधकामासह इतर अनुंषगिक साहित्यांच्या दरामध्ये तसेच वैशिष्टयपूर्ण करावयाचे कामांच्या तांत्रिक कामांच्या तंत्रज्ञानामध्ये मोठया प्रमाणावर बदल होण्याची शक्यता आहे. संस्थानकडे नियोजित साई गार्डन च्या विविध कामांसाठी आवश्यक असणारे तांत्रिक मनुष्यबळही उपलब्ध नाही. या सर्व बाबी लक्षांत घेतां, नियोजित साई गार्डन हे <u>बांधा, वापरा व हस्तांतरीत करा</u> या तत्वावर निर्माण करणे उचित राहील, असे मत आहे.

**(ब)** नियोजित साई गार्डन प्रकल्पांमध्ये यापूर्वी ठरलेप्रमाणे खालील गोष्टींचा अंतर्भाव आहे :

०१. साईभक्तांना आकर्षित करणे.

०२. साईबाबा संस्थानसाठी मोठ्या स्वरुपाचे कार्यक्रम आयोजित करणेकरीता योग्य जागा निर्माण करणे.

०३. श्री साईबाबांच्या काळातील व जीवनावरील माहिती आकर्षक व देवाणघेवाणीच्या स्वरुपात उपलब्ध करणे.

०४. जे साईभक्त श्रीसाईबाबांचे उद्देशाबाबत आकलन व जागृती करण्यास उत्सुक असतील त्यांना संधी उपलब्ध करुन देणे.

०५. सदर नियोजित प्रकल्प सुमारे १५ ते २० एकर जागेवर उभारण्यात येईल. तेथे जाण्यासाठी मंदिर परिसरापासून शटल बससेवा उपलब्ध असेल.

०६. नियोजित साई गार्डनमध्ये सॉफ्ट लॅण्डस्केपिंग, वॉटर फ्युचर, बेंचेस, पेव्हेलियन, लायटिंग, सिंगीग, रोड, पार्किग इत्यादी सुविधा करणे.

०७. श्री साईबाबा थ्रीडी इमेज, पेपर गोस्ट स्पेशल इफेक्टस, हॉलोग्राफिक  डिस्प्ले आदि थिम डिस्प्ले, उपहारगृह, स्टॉल्स, रेल्वे, बस, ट्रेन बुकींग, पीआरओ सेंटर, हरवले सापडले, प्रशासकिय इमारत, लायब्ररी, रिसर्च व नेटवर्कींग, प्रकाशने विभाग, आर्ट गॅलरी, हॉल्स, साईम्युझियम, लहान मुलांसाठी म्युझियम, देणगी, सार्वजनिक सोयीसुविधा, इमारत अंतर्गत सुशोभिकरण व फर्निचर आदिंचा समावेश असेल.

नियोजित साई गार्डन प्रकल्पाची उभारणी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर केल्यास, अशा प्रकारची उद्याने तयार करणे, उच्च तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मनोरंजनात्मक गोष्टी निर्माण करणे, वॉटर फॉल्स व इतर सुविधा करणे अशी कामे करणाऱ्या मोठ-मोठया खाजगी संस्था / कंपन्या, नियोजित साई

गार्डन प्रकल्प उभारणेस पुढे येतील. तसेच अशा संस्था / कंपन्या पूर्ण वेगाने सदरहू प्रकल्प पूर्ण करुन साईभक्तांसाठी लवकरात लवकर उपलब्ध करुन देऊ शकतील.

अशा प्रकारचे नियोजित साई गार्डन हे बी.ओ.टी. तत्वावर उभारणी करण्याचे ठरल्यास, अशी कामे करणाऱ्या खाजगी संस्थांना संस्थानचे बांधकाम आराखडयाप्रमाणे नियोजित साई गार्डन उभारणी करणे अथवा संस्थानचा हेतू व उद्देश लक्षांत घेऊन स्वतंत्ररित्या नवीन आराखडयाप्रमाणे नियोजित साई गार्डनची उभारणी करणे असे दोन पर्याय देता येतील.

तसेच बी.ओ.टी. तत्वावर नियोजित साई गार्डन प्रकल्प उभारणेचे निश्चित झाल्यास, बी.ओ.टी. तत्वावर प्रकल्प उभारणीसाठी स्वारस्य असलेल्या संस्थांकडून संस्थानला दरवर्षी निश्चित स्वरुपाची रॉयल्टी घेता येईल. तसेच संस्थानमार्फत सदरहू प्रकल्पाची उभारणी करतांना त्यासाठी करावयाची देखभाल दुरुस्ती, त्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग व इतर बाबींवरील मनुष्य व तांत्रिक बळाचा बोजा ही कमी होईल.

तरी उपरोक्तप्रमाणे परिच्छेदांमध्ये नमूद केल्याप्रमाणे, नियोजित साई गार्डन प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर उभारणेकामी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ सप्टेंबर, २००९ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर सदरहु सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्रमांक ७३१ (८) संमत करण्यात आलेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे यांचेमार्फत याकामी सविस्तर आराखडा व अंदाजपत्रक तयार केलेले आहेत. त्यानुसार ३० वर्षाचे कालावधी करिता बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर उपरोक्त नमूद केल्यानुसार साईगार्डनची निर्मिती करण्यास व याकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर साईगार्डन निर्मितीसाठी इच्छुकांकडून कालावधी, अपेक्षित खर्च, संस्थानसाठी यामधुन किती उत्पन्न मिळेल या सर्व बाबींसह सविस्तर प्रस्ताव मागविणेत यावेत, याकरिता शिफारस करण्यात आली ती मान्य करण्यात आली."

वरिल प्रमाणे झालेले निर्णयानुसार साईगार्डनची निर्मिती करण्यास वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहीरात प्रसिद्ध करुन बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर साईगार्डन निर्मितीसाठी इच्छुकांकडून कालावधी, अपेक्षित खर्च, संस्थानसाठी यामधुन किती उत्पन्न मिळेल या सर्व बाबींसह सविस्तर प्रस्ताव दिनांक २४ डिसेंबर, २००९ अखेर पर्यंत मागविणेत आले होते. तत्पुर्वी दिनांक ०३ डिसेंबर, २००९ रोजी इच्छुक निवीदा धारकांची निवीदा - पूर्व बैठक शिर्डी येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर निवीदा-पूर्व बैठकीस खालील कपन्यांचे प्रतिनीधी उपस्थीत होते.

०१.AMBICA AGARBATHIES & AROMA INDUSTRIES LTD., ELURU (A.P.)
०२.VARDHMAN GROUP, MUMBAI
०३. IMAGE ENGINEERING, MUMBAI

उपरोक्त निवीदा-पूर्व बैठकीमध्ये कंपन्यांचे प्रतिनीधींनी विचरलेली माहिती व शंकांचे निरसन करण्यात आले. तसेच त्याबाबतचे "Common Set of Deviations" सर्व इच्छुक निवीदासादरकर्त्यांना जा. नं. १५३४८, दि. १७.१२.२००९ चे पत्राव्दारे पाठविण्यात आले. याप्रमाणे इच्छुक निवीदाधारकांना कळविण्यात आलेल्या" Common Set of Deviations" पैकी काही ठळक बाबी खालील प्रमाणे आहेत.

| S.No | Point | Clarification |
|---|---|---|
| ०१ | Is there any possibility to add our brand name before or after to Sai Garden? | May be considered, subject to approval by SSST. |
| ०२ | Give clarity in regard user charges, Can the developer at its liberty to fix the user charges or Sansthan will have any role to fix the same. | The developer is at liberty to fix the user charges. However Section-III, Salient features of the bid documents clearly defines the purpose as well as limitations to the user charges. The user charges fixed by developers are subject to approval by SSST. |
| ०३ | Please clarify the exclusivity on the project. We mean that there should not any similar project from Sansthan during the entire concession period. | SSST may undertake the development of another similar type of project but excluding the major attractions provided by the bidder. If the proposed facility will be insufficient in the future, SSST may consider to develop another similar facility and that with the major attractions provided by the bidder. In such case the preference will be given to the existing BOT operator to quote for the same, if the project will have to undertake on BOT basis. |
| ०४ | Please clarify, can developer at its liberty to change the project components? The Sansthan shall allow the developer to choose the project components to enable the project more commercially viable & | The developer is at liberty to change the project components, subject to final approval by SSST. |

| | | |
|---|---|---|
| | bankable. | |
| ०५ | Will be sufficient water supply and reservoir to create similar laser shows like Sentosa park which is situated right at sea shore? | SSST will provide water up to २.०० Lakh ltrs. per day on chargeable basis subject to the bidder should provide facility for water recycling and rain water harvesting. The water connection will be provided at one point. Arrangement for storage and distribution of water within the site shall be provided by the bidder. The bidder shall make his own arrangement for water during scarcity. |
| ०६ | What provision has been made for content to keep both large format theaters running? | The BOT operator will have to produce the content. The BOT operator will have to obtain pre and post production approval from the Sansthan before screening. Screening of some other films may be envisaged. |
| ०७ | What assistance one can expect from Sansthan to obtain all necessary government & legal permission? | Sansthan will provide required documents & assistance wherever necessary. |
| ०८ | Accessibility to the plot such as road & other infrastructure. | The plot is Accessible. Road widening, strengthening & other related infrastructure will be taken up by the Sansthan. |
| ०९ | How much FSI can be utilised & in which zone does the plot situated. | The plot is situated in green zone. The proposal for zone change is under consideration by Govt. of Maharashtra. The allowable FSI is ०.७५ distributed over maximum up to three storeys. |
| १० | Model agreement to be provided. | Will be provided. |
| ११ | Instead of Imax, Giant screen should be taken. | May be considered, subject to approval by SSST. |
| १२ | Mortgage to bank-Lease hold rights | May be considered, subject to approval by SSST. |
| १३ | Parking can be added to BOT project | May be considered, subject to approval by SSST. |
| १४ | Viability gap | Bids without any viability gap shall have preference over the others. |
| १५ | Technology change | May be considered, subject to approval by SSST. |
| १६ | Large format screen digital | May be considered, subject to approval by SSST. |
| १७ | Sponsorship | It will be a private sub-contract between bidder and sponsor, subject to approval by SSST. |

उपरोक्त निवीदा-पूर्व बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रस्ताव सादर करण्यांची अंतिम तारीख दिनांक ३१ जानेवारी, २०१० अखेर वाढविण्यात आली होती. त्याबाबतचे शुद्धिपत्रक वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानूसार विहीत मुदतीत खालील दोन इच्छुक संस्थांनी आपले प्रस्ताव सिलबंद पाकीटात सादर केलेले आहेत.

**०१.AMBICA AGARBATHIES & AROMA INDUSTRIES LTD.,**
POWERPET, **ELURU-** ५३४ ००२
W.G.DT. (**A.P.)**

**०२.VARDHMAN GROUP,**
५८/६४, HARI CHAMBERS,
१ST FLOOR, SHAHID BHAGATSING MARG,
FORT, **MUMBAI-** ४०० ००१

दिनांक ३१ जानेवारी, २०१० अखेर दिलेल्या विहीत मुदतीत उपरोक्त दोन इच्छुकांनी सादर केलेले प्रस्तावातील Technical bid व Financial bid उघडून त्यातील Technical bid ची आर्किटेक्ट यांचेमार्फत व Financial bid ची चार्टर्ड अकौंटंट यांचे मार्फत अथवा वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या संपूर्ण प्रस्तावांची या क्षेत्रातील तज्ञ सल्लागारा मार्फत तपासणी करुन त्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त इच्छुक संस्थांना सादरीकरण व चर्चा वाटाघाटीसाठी बोलावता येईल.

तरी वरिल परिच्छेदामध्ये नमूद केलेप्रमाणे व प्राप्त झालेल्या प्रस्तावातील Technical bid व Financial bid उघडून उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कामी फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्याने, या निविदा न उघडता, सदर कामासाठी जादा इच्छुक निविदा सादरकर्त्यांना सहभाग घेता यावा, म्हणून निविदा मागविणेची मुदत विहीत पध्दतीने वृत्तपत्रात आणि संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक १०.०५.२०१० अखेर वाढविण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०७ श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता तातडीचे Craniotomy Set चर्चा/ वाटाघाटी करुन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२३/०१/२०१० रोजीचे मागणी पत्रकान्वये Craniotomy Set या इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली आहे. उपरोक्त Craniotomy Set हा मेंदुच्या

शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असतात. त्यांचेकडे यापूर्वीचे असलेला सेट हा व्यवस्थीत काम देत नाही. कारण सध्या असलेला Craniotomy Set हा गेल्या दोन महिन्यापासून नादुरुस्त आहे व तो दुरुस्तीसाठी देण्यात आलेला आहे.

सदर सेट हा इम्पोर्टेड असून तो दि.१३/०४/२००७ रोजी रु.२०,९९,७०३/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेला आहे. सदर सेट दुरुस्त होऊन येईपर्यंत ऑपरेशनचे काम थांबू नये म्हणून त्यांनी मनमन,पुणे या भारतीय उत्पादक कंपनीच्या Craniotomy Set १ नगाची तातडीने मागणी केलेली आहे. सदरचा Craniotomy Set हा जुना दुरुस्त होऊन येईपर्यंत वापरता तर येईलच व त्याशिवाय नंतर देखील त्याचा पर्यायी जुना नादुरुस्त किंवा व्यवस्थीत कामच देत नसेल त्यावेळेस उपयोग होईल.

आपणाकडे एका वर्षात सुमारे ४०० ते ५०० शस्त्रक्रिया होत असतात यातील बहुतेक शस्त्रक्रियेसाठी सदर Craniotomy Set ची गरज भासत असते. याकामी मे.मनमन,पुणे यांचेकडून डॉ.टिंगरे यांनी दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविले होते. त्यानुसार मे.मनमन ,पुणे यांनी त्यांचे दि.१८/०१/२०१० चे पत्रान्वये फॅक्सव्दारे सदरचे दरपत्रक पाठविले आहे. त्यांचे दरपत्रकानुसार आपणास आवश्यक असलेल्या चार प्रकारच्या इन्स्ट्रुमेंटसाठी रु.१,०५,७७७/- इतका खर्च येईल. त्याची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे.

| Sr. No. | Description | Qty | Rate in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Manman Driving Unit with Stand Foot Control, Flaxible Shaft(Two No.s) Motor (200 Watt) Tool Kit, Oil Bottle & Special Container | 1 | 35940.00 | 35940.00 |
| 2 | Manman Craniotome Handpiece (with five Cutter) | 1 | 28900.00 | 28900.00 |
| 3 | Manman Perforetor Handpice (with 12mm Cutter) | 1 | 28900.00 | 28900.00 |
| 4 | Manman Pen type Drill Handpiece with fixed S.S.Chuck dia 4mm | 1 | 12037.00 | 12037.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 105777.00 |

वरीलप्रमाणे सेट खरेदीकामी अंदाजे रु. १,०५,७७७/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा सेट हा त्यांना त्याच कंपनीचा (मे.मनमन,पुणे) व तातडीने पाहिजे असल्याने विलंब टाळण्यासाठी मे.मनमन,पुणे यांना आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटी बोलविण्यात आले असून त्यांचेशी समक्ष चर्चा/ वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२८०** **आजचे सभेत मे.मनमन,पुणे यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांचेशी चर्चा केली असता त्यांनी देऊ केलेल्या रकमेत १५ टक्के सुट व मुळ मोटारची १० वर्ष वॉरंटी दिलेली आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.मनमन, पुणे यांनी देऊ केलेली सुट स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०८** **श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागाकरिता पोर्टेबल २ डी इको/कलर डॉपलर खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागाने त्यांचे दि.२५/०६/२००९ चे पत्रान्वये एक नविन पोर्टेबल २ डी इको / कलर डॉप्लर मशिनची मागणी केलेली आहे. त्यांचेकडे सध्या एक मशिन आहे, सदर मशिनवर साधारण एका वर्षात ४००० ते ५००० २ डी इको केले जातात. परंतु सी.आर.यु., आय.सी.सी.यु. किंवा जी.आय.सी.यु. मध्ये रुग्णांचा २ डी इको करावयाचा झाल्यास सदर मशिन तेथे स्थंलातरीत करावे लागते, अशा वेळी सदर मशिन नादुरुस्त होण्याचा धोका संभवतो, त्यामुळे त्यांनी एक नग पोर्टेबल २ डी इको / कलर डॉप्लर मशिनची मागणी केलेली आहे. याकामी टेक्नीकल स्पेसीफिकेशन हे डॉ.बजाज कार्डीओलॉजिस्ट व वरिष्ठ बायोमेडीकल इंजिनिअर यांचे दोघांकडून निश्चित करुन घेण्यात आलेले आहे. त्यानुसार सदरचे मशिन खरेदीकामी अंदाजे रु.१५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर मशिन खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०७/११/२००९ रोजीचे सभेत विहित पध्दतीने चांगल्या नामांकित कंपन्यांकडून थेट दरपत्रके (कोटेशन) मागवुन उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १५,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सहा नामांकित कंपन्याकडून इकडील पत्र क्र.१४२५८ दि.२३.११.२००९ अन्वये सिलबंद कोटेशन मागविण्यात आले होते, परंतू पुरवठाधारक वेळोवेळी तगादा करुन देखील कोटेशन पाठवत नव्हते. त्यामुळे त्यांना वेळोवेळी फोन करुन तगादा करणेत आला व त्यानंतर त्यांनी कोटेशन पाठवले आहे. त्यामुळे कोटेशन वेगवेगळया तारखेस प्राप्त झालेली आहे. त्यास अनुसरुन तीन कंपन्यांचे कोटेशन प्राप्त झाले होते. ते खालील प्रमाणे.

१) M/s.Emerging Meditek Systems, Pune (प्राप्त दि.०५.१२.२००९)
२) M/s.Siemens Ltd., Aurangabad (प्राप्त दि.२५.१२.२००९)
३) M/s.D.D.Eneterpirses, Nashik (प्राप्त दि.२७.०१.२०१०)

मे. टुलीप्स इलेक्ट्रोमेडीकल्स (इं) प्रा. लि., पुणे हि कंपनी देखील सदरचे मशिन बनवत असल्यामुळे त्यांनी स्वतःहून कोटेशन दिलेले आहे ते देखील विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

४) M/s.Tulips Electromedicals India Pvt.Ltd., Pune (प्राप्त दि.०४.०१.२०१०)

उपरोक्त प्रमाणे चार सिलंबद कोटेशन उघडणे बाबतचा प्रस्ताव दि.२५/०२/२०१० चे मा. उपसमितीचे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन सदरचे कोटेशन हे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे उघडून तसेच पुरवठाधारकांना चर्चा / वाटाघाटीसाठी बोलवून निर्णय घेण्यात यावा असे ठरले आहे.

त्यानुसार सदर पुरवठाधारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले आहे.

**निर्णय क्र.२८१ उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांशी समक्ष चर्चा केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.**

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | मॉडेल | कोटेशनमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | वॉरंटी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | M/s.Emerging Meditek Systems, Pune | Micro Max | 16,12,000/- | 14,90,000/- | 5 years |
| 02 | M/s.Siemens Ltd., Aurangabad | Acuson 300 | 51,100 (USD) | 24,00,000/- | 1 years |
| 03 | M/s.D.D.Eneterpirses, Nashik | Vivide | 16,50,000/- | 16,00,000/- | 5 years |
| 04 | M/s.Tulips Electromedicals India Pvt. Ltd., Pune | Micro Max | 16,70,000/- | 14,50,000/- | 5 years main unit poweradaptor &battery 1 years |

**यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त तक्त्यातील M/s.Tulips Electromedicals India Pvt. Ltd., Pune यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०९ द्वारावती भक्तनिवासस्थान हाऊसकिपींग कामासाठी निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** व्दारावती निवासस्थान ईमारत दिनांक ०५/०३/२००९ पासून साईभक्तांचे वापरासाठी चालू केलेली असुन दिनांक १५/०८/२००९ पासून चौथ्या मजल्यावरील एसी रुम चालु करण्यात आलेले आहे सध्या ईमारतीमध्ये चारही मजले भक्तांचे निवासासाठी चालू आहे. इमारतीत २३६ नॉन एसी व ८० एसी असे एकुण ३१६ रुम आहेत

या इमारतीची स्वच्छता उच्च दर्जाची, मशिनरीद्वारे व्हावी याकरीता हाउसकिपींगची कामे आउट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सन २००९ ते २०१० चे काम आयएसएस इंटिग्रेटेड फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ,मुंबई यांना प्रायोगिक तत्वावर दिलेले होते त्याची मुदत दिनांक ३१/०१/२०१० अखेर संपत असल्याने मा.व्य.स. दिनांक १०/०१/२०१० चे सभेत ठरलेप्रमाणे त्यांना दोन महीने ( दिनांक ३१ /०३/२०१०अखेर ) मुदतवाढ देवुन महाराष्ट्र टाईम्स राज्य आवृत्ती व सार्वमत वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या दि.२५/०१/२०१० ते ३०/०१/२०१० या टेंडर विक्री कालावधीत खालील प्रमाणे १७ एजन्सींनी निवीदा खरेदी केलेल्या होत्या.

| अ.नं. | एजन्सींचे नाव | अ.नं. | एजन्सींचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे | १० | माऊली इंडस्ट्रीज सर्व्हीसेस पुणे |
| ०२ | आय.एस.एस. फॅसिलिटी सर्व्हीस प्रा.लि. मुंबई | ११ | श्री ज्ञानेश्वर काशिनाथ वाघ नाशिक |
| ०३ | श्री दिपक माधव नाईकवाडे साकुरी | १२ | ग्लोबल एन्टरप्रायजेस पुणे |
| ०४ | श्री एम एम गंधे अहमदनगर | १३ | श्री कृपा सर्व्हीसेस प्रा लि.पुणे |
| ०५ | रिलायन्स एन्टरप्रायजेस पुणे | १४ | श्री साई निर्माण प्रतिष्ठाण , रुई |
| ०६ | पर्क्स लिंक्स ॲण्ड सर्व्हीसेस मुंबई | १५ | त्रिमुला एंटरप्रायजेस पुणे |
| ०७ | श्री चंद्रकांत सोन्याबापु शेळके शिरडी | १६ | संजय मेन्टनेन्स सर्व्हिसेस पुणे. |
| ०८ | जय भवानी एंटरप्रायजेस चिंचवड पुणे | १७ | सिध्दांत सामाजिक प्रतिष्ठान मुंबई |
| ०९ | जय तुळजाभवानी एन्टरप्रायजेस पुणे | -- | -- |

निवीदाधारकांना निवीदा फॉर्ममध्ये काही अडचणी असल्यास व प्रत्यक्ष कामाची माहीती मिळावी म्हणून दि.०४/०२/२०१० रोजी प्री बीड मिटींग घेण्यात आलेली असून त्यात निवीदाधारकांचे शंकेचे निरसन करण्यात आलेले असुन काय काम करावयाचे आहे याची माहिती दिली व प्रत्यक्ष इमारतीचे ठिकाणी जावुन पहाणी करुन चर्चेतील नऊ मुद्दे विचारात घेवुन निविदा भरण्यास सांगितले त्यानुसार दि.१०/०२/२०१० या विहीत मुदती अखेर उपरोक्त १ ते १७ एजन्सींपैकी खालील ७ एजन्सींनी निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | एजन्सींचे नाव | अ.नं. | एजन्सींचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | पर्क्स लिंक्स ॲण्ड सर्व्हीसेस मुंबई | ०५ | संजय मेन्टनेन्स सर्व्हिसेस पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | आय.एस.एस. फॅसिलिटी सर्व्हीस प्रा.लि. नाशिक | ०६ | श्री कृपा सर्व्हीसेस प्रा लि. पुणे. |
| ०३ | बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे | ०७ | ग्लोबल एन्टरप्रायजेस पुणे |
| ०४ | रिलायन्स एन्टरप्रायजेस पुणे | | |

दिनांक १७/०२/२०१० रोजी विश्वस्त सर्वश्री मा. श्री डॉ. गोंदकर , मा. श्री खांबेकर , श्रीमती जयश्रीताई थोरात यांचे समोर वरील ०१ ते ०७ निविदातील टेक्नीकल बीड उघडण्यात आलेल्या आहेत. निविदेमध्ये नमूद केलेली पात्रता व निविदा सादरकर्त्यांनी कळविलेली पात्रता (टेक्नीकल बीड) याचा अभ्यास करुन तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. १.(मनुष्यबळ तक्ता) २. (तात्रिंक माहिती तुलनात्मक तक्ता ) तसेच निविदाधारकांच्या पुर्तता / अपुर्ततेची माहिती खालील प्रमाणे आहे..

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | पुर्तता / अपुर्तता तपशिल |
|---|---|---|
| ०१ | पर्क्स लिंक्स ॲण्ड सर्व्हीसेस मुंबई | १. आयएसओ ९००१-२००० आहे ९००१-२००८ चे नाही.<br>२. हाऊस किपींगचा पाच वर्षाचा अनुभव नाही-दोन वर्षाचा आहे.<br>३. ज्या ठिकाणी कॉन्ट्रॅक्ट चालु त्याचे कार्यादेश प्रती नाहीत.<br>४. मोठया प्रमाणात कामाचे दाखले नाही.<br>५. निविदेत जोडलेले कागदपत्र साक्षाकिंत केलेली नाही. |
| ०२ | आय.एस.एस. फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि. नाशिक | १. निविदेत जोडलेले कागदपत्र स्वतःचे सहीने साक्षाकिंत केलेले आहे. |
| ०३ | बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे | सर्व कागदपत्राची पुर्तता केलली आहे. |
| ०४ | रिलायन्स एन्टरप्रायजेस पुणे | १. हाऊस किपींगचा पाच वर्षाचा अनुभव नाही. चार वर्षाचा आहे.<br>२. निविदेत जोडलेले कागदपत्र साक्षाकिंत केलेली नाही. |
| ०५ | संजय मेन्टनेन्स सर्व्हिसेस पुणे | १. मनुष्यबळ यादीचा पी. एफ. चलनावर उल्लेख आहे स्वतंत्र्य यादी नाही.<br>२. कुशल कर्मचारी यादी दिलेली नाही. |
| ०६ | श्री कृपा सर्व्हीसेस प्रा लि. पुणे. | १. निविदेत जोडलेले कागदपत्र स्वतःचे सहीने साक्षाकिंत केलेले आहे. |
| ०७ | ग्लोबल एन्टरप्रायजेस, पुणे ( पात्र नाही ) | १. आय एस ओ नामांकन सर्टीफिकेट जोडलेले नाही.<br>२. मनुष्यबळयादी नाही.<br>३. मशिनरी यादी नाही.<br>४. उपकरणे यादी नाही. |

वरीलप्रमाणे पात्र निविदासादरकर्त्यांना मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आलेले आहे निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.२८२ उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन,निविदासादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| **०१** | **पर्क्स लिंक्स ॲण्ड सर्व्हीसेस मुंबई** | **६,६६,००८.००** | **५,८८,०००/-** |
| **०२** | **आय.एस.एस. फॅसिलिटी सर्व्हीस प्रा.लि. नाशिक** | **७,५९,८०१.००** | **७,००,०००/-** |
| **०३** | **बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे** | **४,४२,६०६.३९** | **४,५६,०००/-** |
| **०४** | **रिलायन्स एन्टरप्रायजेस पुणे** | **४,८७,१०८.००** | **४,५७,०००/-** |
| **०५** | **संजय मेन्टनेन्स सर्व्हिसेस पुणे** | **४,९६,३८३.४६** | **४,९०,०००/-** |
| **०६** | **श्री कृपा सर्व्हीसेस प्रा लि. पुणे.** | **७,२९,५३४.००** | **६,२५,०००/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांना प्रसादालयातील कामाचा अनुभव असून, त्यांनी केलेले काम अत्यंत समाधानकारक आहे. तसेच त्यांनी मनुष्यबळ दररोज ५० ऐवजी ७० देऊ केले असून ते कामाची क्वालिटी उत्तम ठेवणार आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांनी चर्चेअंती देऊ केलेले दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,द्वारावती निवासस्थान)

---

**विषय नं.१० सिक्यूरिटी साहित्य खरेदीकामी उघडण्यात आलेल्या निविदांवर चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** दि.२२.०९.२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.२७ व निर्णय क्र.७७२ अन्वये समधी मंदिर व परीसराचे सुरक्षा साहित्य खरेदी करणे कारीता सुरक्षा कन्सल्टंट म्हणुन मे. ट्रायकलर कन्सल्टंट प्रा.लि.मुंबई, यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीची सभा दि.१८.१०.२००८ विषय नं.३६ निर्णय क्र.७९३ नुसार अत्याधुनिक सुरक्षा साहित्य खरेदीकामी व त्याकरीता अंदाजे रक्कम रुपये ४.५ कोटीचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

सुरक्षा साहित्य खरेदीकामी निविदा धारकांकडून निविदा मागविण्यात आलेल्या पैकी दि.२५.०६.०९ रोजी मुंबई येथे मा.अध्यक्ष साो व ज.तेज कैाल (एम.डी.ट्रायकलर) यांचे मिटींगमध्ये ..

१. एच.सी.एल इन्फो सिस्टीम लि.मुंबई
२. मे.व्हेन्टेज इंन्टीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन प्रा.लि.मुंबई
३. मे.चेक पॉईट सिस्टीम (इंडीया)प्रा.लि.मुंबई

या निवड झालेल्या कंपन्यांचे निविदेतील दर (कमर्शिअल बिड) दि.१०.०१.२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत विषय नं.०३ निर्णय क्रं.०३ द्वारे उघडण्यात आलेले आहे.

उपरोक्त कंपण्यांच्या उघडण्यात आलेल्या निविदा मे.ट्रायकलर कन्सल्टंट प्रा.लि.मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेल्या असुन सुरक्षा कन्सल्टंट यांनी त्या बाबतचा सविस्तर अहवाल सादर करणेस व उपरोक्त निविदा धारकांना चर्चा व वाटाघाटी करणेकामी बोलाविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२८३ याकामी मे.ट्रायकलर कन्सल्टंट प्रा.लि.मुंबई हे आजचे सभेत उपस्थित होते. त्यांनी निविदाधारका बाबतचा टेक्नीकल इव्हॅल्यूएशन रिपोर्ट सादर केला तो खालीलप्रमाणे.**

**Technical Evaluation of Vendors based on Vendors Proposal**

| Ranking (Highest Rank First | Name of Vendor | Points Awarded (Total 100) |
|---|---|---|
| T 1 | Vantage Integrated Security Solutions Ltd | 93.75 |
| T 2 | Checkpoint Systems India Pvt.Ltd | 86.96 |
| T 3 | HCL Info Systems Limited | 49.18 |

**उपरोक्त निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | एच.सी.एल इन्फो सिस्टीम लि.मुंबई | २,४४,३९,४०४/- | २,४४,३९,४०४/- |
| ०२ | मे.व्हेन्टेज इंन्टीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन प्रा.लि.मुंबई | ४,५७,७१,५२५/- | ४,११,९४,३७३/- |
| ०३ | मे.चेक पॉईट सिस्टीम (इंडीया)प्रा.लि.मुंबई | ६,२८,५१,४९०/- | ५,९८,९७,४७०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन,सदर खरेदीसाठी संस्थानचे वतीने नेमणूक केलेले सुरक्षा कन्सल्टंट मे.ट्रायकलर कन्सल्टंट प्रा.लि.मुंबई यांनी संबधितांच्या निविदा,आवश्यक माहिती, केलेल्या कामाचा दर्जा इ. तपासून दिलेल्या माहिती व किंमतीनुसार मे.एच.सी.एल इन्फो सिस्टीम लि.मुंबई हे निम्नतम असले तरी त्यांनी देऊ केलेले साहित्य तांत्रिकदृष्ट्या कमी दर्जाचे असल्याने त्यांचा विचार केलेला नाही. तसेच मे.व्हेन्टेज इंन्टीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन प्रा.लि.मुंबई हे तांत्रिकदृष्ट्या क्र.०१ वर असल्याने व त्यांनी देऊ केलेले साहित्य उच्च प्रतिचे असल्याबाबतची ट्रायकलर कन्सल्टंट यांचे बरोबर बैठकीत चर्चा केली व तद्नंतर किंमतीनुसार निम्नतम क्र.०२ ची निविदा स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.११ सन- २०१०-११ या वर्षाचे मुळ अंदाजपत्रक.**

**प्रस्ताव-** **(अ) अ)**श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२)(क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे :

(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्तांकडे पाठवील.

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबतच्या सन २०१०-११ या आर्थिक वर्षाच्या जमा-खर्चाच्या अंदाजपत्रकामधील ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेतः

**जमेचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २००९-१० | अंदाजपत्रक २०१०-११ | | वाढ / घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम |
| ०१ | प्रारंभीची शिल्लक | ४,०५,००,००० | ३,५४,५०,००० | ०% | -५०,५०,००० |
| ०२ | अपेक्षित अनावर्ती जमा | २,०९,८०,५५,००० | २,२१,९७,६०,००० | ५५% | १२,१७,०५,००० |
| ०३ | अपेक्षित आवर्ती जमा | ९८,९६,७५,००० | ८८,२५,००,००० | २२% | -१०,७१,७५,००० |
| ०४ | अपेक्षित निर्गुंतवणुक | | ९१,९६,१३,००० | २३% | ९१,९६,१३,००० |
| | एकुण अपेक्षित जमा :- | ३,१२,८२,३०,००० | ४,०५,७३,२३,००० | १००% | ९२,९०,९३,००० |

**खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयात)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २००९-१० | अंदाजपत्रक २०१०-११ | | वाढ / घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम |
| ०१ | अपेक्षित अनावर्ती खर्च | ८३,१०,३८,००० | १,०१,१८,६१,००० | २५% | १८,०८,२३,००० |
| ०२ | अपेक्षित आवर्ती खर्च | ३०,८१,०९,००० | ३८,६५,४६,००० | १०% | ७,८४,३७,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | अपेक्षित किरकोळ खर्च | ६१,५०,००० | ४९,२०,००० | ०% | -१२,३०,००० |
| ०४ | न्यासाच्या उदीष्टांवरील अपेक्षित खर्च | १,५६,२५,९३,१२० | २,२१,०५,५२,००० | ५४% | ६४,७९,५८,८८० |
| ०५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | २७,३८,०८,००० | ३८,७९,४४,००० | १०% | ११,४१,३६,००० |
| ०६ | अपेक्षित गुंतवणूक | ११,१०,८१,८८० | - | | -११,१०,८१,८८० |
| ०७ | अंतिम शिल्लक | ३,५४,५०,००० | ५,५५,००,००० | १% | २,००,५०,००० |
| | एकुण अपेक्षित खर्च :- | ३,१२,८२,३०,००० | ४,०५,७३,२३,००० | १०० % | ९२,९०,९३,००० |

**ब)** अधिनियम २००४ चे कलम २२ (२) मधील तरतुदींनुसार, च व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल.

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधीतून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २०१०-११ या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधीतून होणारा संभाव्य खर्च भागविण्यासाठी अधिनियमातील १० टक्के तरतुद कमी पडणार आहे.

सन २०००५-०६ ते २००८-०९ या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल केलेले आहे. सदर प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहेत. सन २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधीतुन होणांरा अपेक्षित खर्च झाल्यास, वाढीव तरतुदीसाठी शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

**क)** संस्थानच्या विविध विभागांनी साईभक्तांना पुरविण्यात येणा-या पायाभुत सुविधेत वाढ करणे तसेच त्यांना दळणवळण्याच्या विविध सोयी उपलब्ध करून देणे याकामी नगरपंचायती अंतर्गत कामास व इतर खर्चासाठी अनुदान शिर्षकाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शिर्षकाखाली भरीव तरतुद दर्शविण्यात आली आहे.

**ड)** मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १०(२३)(सी) ५ मधिल तरतुदीमध्ये पाच वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५ टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधाकारक आहे. तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक केले आहे. मागील पाच वर्षातील अखर्चित उत्पन्न रुपये १८८ कोटी मात्र एवढे आहे. या अखर्चित उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे. हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठयाप्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये भरीव वाढ झालेली दिसत आहे. अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट अ व ब म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी सन २०१०-११ या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस व मा. व्यवस्थापन समितीच्या मंजुरीने राज्य शासन व मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे माहीतीसाठी पाठविणेस मान्यता मिळणेस विंनती.

**(ब)** **अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे :

(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील.

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबतच्या सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या जमा-खर्चाच्या अंदाजपत्रकामधील ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:

**रुग्णालये विभागाचे जमेचे अंदाजपत्रक**

(आकडे रुपयांत)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २००९-१० | अंदाजपत्रक २०१०-११ | | वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम | टक्के |
| ०१ | प्रारंभीची शिल्लक | ५,००,००० | ७,००,००० | | २,००,००० | ४० % |
| ०२ | अपेक्षित अनावर्ती जमा | Nil | Nil | ० % | Nil | ० % |
| ०३ | अपेक्षित आवर्ती जमा | ३४,४९,००,००० | ४३,२१,००,००० | ५९ % | ८,७२,००,००० | २५ % |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | संस्थानकडून वर्ग (तुट) | २७,८०,७९,००० | ३०,१५,२५,००० | ४१ % | २,३४,४६,००० | ८% |
| | **एकुण अपेक्षित जमा :-** | **६२,३४,७९,०००** | **७३,४३,२५,०००** | **१००%** | **११,०८,४६,०००** | **१८ %** |

**रुग्णालये विभागाचे खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयात)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २००९-१० | अंदाजपत्रक २०१०-११ | | वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के R/O | रक्कम | टक्के |
| ०१ | अपेक्षित अनावर्ती खर्च | ७,९३,५०,००० | ८,४५,००,००० | १२ % | ५१,५०,००० | ६ % |
| ०२ | अपेक्षित आवर्ती खर्च | ७,९४,७५,००० | ९,३४,००,००० | १३ % | १,४१,५०,००० | १८ % |
| ०३ | अपेक्षित किरकोळ खर्च | १७,८०,००० | १९,४०,००० | ०% | १,६०,००० | ९ % |
| ०४ | न्यासाच्या उदीष्टांवरील अपेक्षित खर्च | २५,५२,३५,००० | ३२,१४,३५,००० | ४३ % | ६,६२,००,००० | २६ % |
| ०५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | २०,६९,३९,००० | २३,२१,५०,००० | ३२ % | २,४९,८६,००० | १२ % |
| ०६ | अंतिम शिल्लक | ७,००,००० | ९,००,००० | ०% | २,००,००० | २९ % |
| | **एकुण अपेक्षित खर्च :-** | **६२,२७,७९,०००** | **७३,३४,२५,०००** | **१०० %** | **११,०६,४६,०००** | **१८ %** |

**ब)** अधिनियम २००४ चे कलम २२ (२) मधील तरतुदींनुसार, च्व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल.

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधीतून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २००९-१० या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधीतून होणारा संभाव्य खर्च भागविण्यासाठी अधिनियमातील १० टक्के तरतुद कमी पडणार आहे.

सन २००४-०५ ते २००७-०८ या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल केलेले आहे. सन २००८-०९ या वर्षातही व्यवस्थापन निधीतील खर्च वाढीव होणार आहे. वरील प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहेत. सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधीतुन होणांरा अपेक्षित खर्च झाल्यास, वाढीव तरतुदीसाठी शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

**क)** रुग्णालयाच्या विविध विभागांनी अनुदान शिर्षकाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शिर्षकाखली तरतुद दर्शविण्यात आली आहे.

**ड)** सन २०१०-११ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करताना मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार खालील नमुद बाबींवरही विचार करण्यात आला आहे.

**१)** ६ व्या वेतन आयोगानूसार देय फरक रक्कम गृहीत धरला आहे.

**२)** नियोजीत नविन सुपर व जनरल स्पेशालिटी रुग्णालयाचा खर्च यामध्ये गृहीत धरलेला नाही.

तथापी या बाबींसाठी कोणत्याही विभागाने निश्चित तरतुद दर्शविलेली नाही. त्यामुळे उपरोक्त बाबींसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी सन २०१०-११ या आर्थिक वर्षाचे रुग्णालये विभागाचे प्रस्तावित मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस व मा. व्यवस्थापन समितीच्या मंजुरीने राज्य शासन व मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे माहीतीसाठी पाठविणेस मान्यता मिळणेस विंनती.

**निर्णय क्र.२८४** **वरीलप्रमाणे सादर केलेल्या सन २०१०-२०११ च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. सन २०१०-११ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या प्रती पुन्हा एकदा सर्व विश्वस्तांना स्वतंत्रपणे अवलोकनार्थ अलाहिदा पाठविण्यात याव्यात व विश्वस्तांकडून त्यावर काही सुचना आल्यास आवश्यकतेनुसार दुरुस्त्या करुन विहीत मुदतीत सदर अंदाजपत्रकाच्या प्रती शासन व मा.धर्मदाय आयुक्त यांना पाठविण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१२** **सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. अधिनियमातील

कलम १७ समितीची कर्तव्य व अधिकार मधील पोटकलम-(०२) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे :

(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील.

सन २००९-१० या चालू आर्थिक वर्षासाठी (माहे एप्रिल,२००९ ते मार्च, २०१० या कालावधीसाठी) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ फेब्रुवारी,२००९ चे सभेतील निर्णय क्रमांक ८२ नुसार मंजुर करण्यात येऊन मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुबंई व मा.धर्मादाय आयुक्त, मुबंई यांना सादर करण्यात आलेले आहे.

माहे जानेवारी, २०१० अखेर प्रत्यक्ष जमा-खर्चाचे अवलोकन केले असता काही बार्बीवरील जमा व खर्च मुळ तरतुदींपेक्षा अधिक होतील अशी शक्यता असल्याचे / झाल्याचे दिसुन येते. यामुळे याबार्बीसाठीची मुळ तरतुद माहे मार्च, २०१० अखेर अपुरी पडणार आहे. अंदाजपत्रकातील काही वाढीव खर्चाच्या बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१. **व्दारावती कार्यालय खर्च :-** श्री साईभक्तांचे दिवसेंदिवस होंत असेलेली वाढ तसेच भक्तांना जास्तीत जास्त सुख-सुविधा पुरविण्यात येत असल्याने भक्तनिवास खर्चात १.७५ लक्ष रुपयांची तरतुद अपुरी असल्याने त्या विभागाचे मागणीनूसार ५६.०० लक्ष रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

२. **जनरेटर खर्चः-** लोड श्‍ेडींगमध्ये झालेली वाढ तसेच इंधन बिलात झालेली वाढीमुळे १.२४ कोटी रु.ची केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ०२.३० कोटी रु.ची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

४. **बँक चार्जेसः-** बॅक चार्जेसमध्ये झालेली वाढ तसेच बॅकासेवामध्ये झालेल्या वाढीमुळे ०५.०९ लक्ष रु.ची केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ०९.०० लक्ष रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

५. **किरकोळ खर्च :-** दैनदिन किरकोळ खर्चात झालेली वाढ तसेच वाढेलेले मुल्य १६.२५ लक्ष रुपयांची केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ३०.०० लक्ष रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

६. **प्रसादालय खर्च :-** श्री चे दर्शनार्थ येणां-या भक्तांचे संख्येत झालेली लक्षणिय वाढ तसेच वाढलेले दर पाहता ३०.६७ कोटी रुपयांचे केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ३५.५० कोटी रुपयांची सुधारीत तरतुद करण्यात आली आहे.

७. **शैक्षणिक फी परतावा :-** लाभार्थीच्या संख्येत तसेच शैक्षणिक शुल्कात झालेली वाढ पाहता १७.०० लक्ष केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ४५.०० लक्ष रुपायांची सुधारीत तरतुद करण्यात आली आहे.

८. **गृह कर्ज व्याजावरील सवलत** लाभार्थीच्या संख्येत तसेच बांधकाम साहीत्यात झालेली वाढ पाहता ४०.०० लक्ष केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ५५.०० लक्ष रुपायांची सुधारीत तरतुद करण्यात आली आहे.

१० **कर्मचारी कल्याण निधी खर्च :-** सदरचा खर्चाची नव्याने तरतुद करण्यात येत असुन शासकीय नियमानूसार बंधनकारक असल्याने ०७.०० लक्ष रुपयांची तरतुद करण्यात येत आहे.

११ **कर्मचारी वेतन :-** कर्मचारी संख्येत झालेली वाढ तसेच सुधारीत वेतन आयोग लागु केल्याने १८.५८ कोटी रुपयांची केलेली तरतुद पुरशी नसल्याने २५.९० कोटी रुपयांची सुधारीत तरतुद करण्यत आली.

उर्वरित मध्ये चौकशी कार्यालय रू. १९.५७ लक्ष, मशिनरी देखभाल व दुरूस्ती खर्च रू. २२.९० लक्ष, अन्नदान खर्च रू.५ लक्ष, नैवदय खर्च रु. १ लक्ष रुपयांनी खर्चात वाढ करण्यात आलेली आहे. इतर जमा वा खर्चाच्या बार्बीवरील मुळ तरतुदींमध्ये काही बदल अपेक्षित नसल्याने त्या तरतुदींचा पुनर्उल्लेख करण्यात आलेला नाही. सन २००९-२०१० चे जमेचे व खर्चाचे मुळ निव्वळ अंदाजपत्रक अनुक्रमे रुपये २८७,७५,३०,०००/- व २८६,०१,११,१२०/- मात्रचे आहे. (Opening व Closing-Cash Balances मुळे त्यांचा ताळमेळ झाला आहे) मुळ तरतुदींमध्ये अनुक्रमे रुपये १५,३३,५०,०००/- व १४,९०,२२,०००/- मात्रची वाढ करण्यात आली असुन,खर्चापेक्षा जादा शिल्लक राहीलेली रक्कम गुंतवणुक म्हणून दर्शविण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने जमेचे व खर्चाचे सुधारीत अंदाजपत्रक पुढील प्रमाणे आहे.

सुधारित निव्वळ जमा - रुपये ३०८,७७,३०,०००/-

सुधारित निव्वळ खर्च - रुपये २९८,१६,९८,१२०/-

तरी कृपया प्रस्तावित अंदाजपत्रकास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.२८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१३ सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकाचे नेमणूकीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. अधिनियम,२००४ मधिल सुधारित कलम २९ मध्ये खालील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

(१) समिती, त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षकाचा अहवाल, तसेच ज्यांना या विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्विकारणा-या संस्थांची (संपुर्ण पत्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्या मागील उद्देश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहीती सोबत जोडलेला छाननी समितीचा अहवाल, यासह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्ताला, त्यावर्षाच्या ३० जुनचे आत सादर करील.

(२) राज्य शासन, पोट-कलम (१) खाली प्राप्त झालेली अहवालाची प्रत, ती प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवील आणि त्याची प्रत किंवा त्यामधील कोणतेही उतारे, त्यांची मागणी करणा-या कोणत्याही व्यक्तीला, समिती निर्धारीत करील अशी वाजवी फी किंवा आकार प्रदान केल्यावर, विश्वस्तव्यवस्थेकडून दिले जातील.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे संस्थानचे लेखा परीक्षण करणेकामी मे. शरद एस गायकवाड ॲन्ड कं.,चार्टर्ड अकोंटंट, मुंबई यांची प्रवास व निवास व्यवस्थेच्या बाबीवर रू. २४,०००/- यापेक्षा जादा खर्च न होण्याच्या अटीवर महाराष्ट्र शासनाकडून मान्यता देण्यात आली होती.

तसेच पुढील लेखापरीक्षणाकरीता मुंबई व शिर्डीतील १ इंग्रजी व १ मराठी प्रथितयश वर्तमान पत्रात संस्थानच्या लेखापरीक्षणसंबंधी, आवश्यक अटींसह जाहिरात देऊन तीन लेखापरीक्षकांची नांवे अंतिमतः निवडीसाठी शासनाकडे पाठवावी असे सुचविलेले आहे.

उपरोक्त निर्देशित तरतुदीस अनुसरून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, न्यासाचे, सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाचे, वैधानिक लेखापरिक्षण करणेसाठी पात्र, चार्टर्ड अकोटंटची, महाराष्ट्र शासनाचे मान्यतेने नेमणुक करावयाची आहे. त्या अनुषंगाने दि.०२/०१/२०१० व दि.०३/०१/२०१० चे वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देऊन किमान १० वर्ष अनुभव असणाऱ्या व ज्या संस्थांची उलाढाल किमान ४०० कोटीं पर्यंत किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा संस्थांच्या लेखापरिक्षणाचा अनुभव असणाऱ्या, तसेच संस्थानचे बहुतांशी दैनंदिन कामकाज मराठीतून असल्याने मराठी भाषेचे ज्ञान असणाऱ्या, महाराष्ट्रातील चार्टर्ड अकौंटंट फर्म्स् कडून अर्ज मागविण्यात आले होते.

त्यानुसार संस्थानकडे विविध चार्टर्ड अकौंटंट फर्म्स्चे अर्ज प्राप्त झालेले असून त्याची तपशिलवार माहिती सोबत परीशिष्ट-अ मध्ये जोडलेली आहे.

तरी शासनाने निर्देश दिल्याप्रमाणे तीन पात्र लेखापरीक्षकांची नांवे, त्यांचे अपेक्षित मानधनासह शासनास कळविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२८६** **उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन, मे. शरद एस गायकवाड ॲन्ड कं.,चार्टर्ड अकौंटंट, मुंबई व एन.पी. रेडीज ॲण्ड कं., मुंबई व काळे-चौगुले-थिगळे ॲण्ड कं., इचलकरंजी यांची नावे शासनास कळविण्यात यावीत, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१४** **सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरीता पूर्व लेखापरिक्षण (Pre Audit) व अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Audit ) कामकाजासाठी सक्षम संस्थेची नेमणूक करणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच त्या अनुशंगाने आर्थिक व्यवहारातही मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या व्यवहारांवर योग्य नियंत्रण रहावे यासाठी लेखाशाखे कडून अदा करण्यात येणारे प्रत्येक देयक आदा करणे पूर्वी पूर्व लेखा परिक्षक (Pre Auditor) यांचे मार्फत परिक्षण झाल्यास नजर चुकीने होणा-या चुका व काही संभाव्य त्रुटी टाळणे सहज शक्य होतील. तसेच वैधानिक लेखापरिक्षणाच्या कालावधीमध्ये पूर्व लेखा परिक्षक स्वतः हजर राहणार असल्यामुळे, वैधानिक लेखा परिक्षणातही त्यांची मदत होवून, वैधानिक लेखा परिक्षंकाच्या आक्षेपांचे प्रमाणही बरेच कमी होण्यास मदत होईल. संस्थानचे व्यवहार हे अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार होतात की नाही हे पाहण्याचे सर्वस्वी जबाबदारी पूर्व लेखा परिक्षकांवर राहणार आहे.

**(अ)** सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरीता श्री.लोगांणी ए.जी.चार्टर्ड अकौटंट,कोपरगाव यांची पूर्व लेखा परिक्षक म्हणून वार्षिक रू.१,७५,०००/- (अक्षरी एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) एवढया एकत्रीत मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. सन २००९-१० या वर्षातील त्यांचे काम समाधानकारक आहे.

**(ब)** संस्थान मधिल सर्व विभागाकडील आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण, डेडस्टॉक, कंझुमेबल स्टॉक, अचानक रोख रक्कम तपासणी अशा एकूणच कामकाजासाठी प्रशासनाअंतर्गत पुरेशा तज्ञ व कुशल मनुष्यबळा अभावी सन २००५-०६ पासून सक्षम संस्थेची नेमणूक करण्यात येते. सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरीता श्री.ए.ए.शास्त्री, चार्टर्ड, अकौटंट, पुणे यांची एकून मानधन वार्षिक रू.१,७५,०००/-(अक्षरी एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) या एकत्रीत मानधानावर नेमणूक करण्यात

आली असून त्यांचे काम समाधानकारक आहे. तसेच वैधानिक लेखा परिक्षण दोष-दुरुस्ती अहवाल तयार करणे कामी त्यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे.

**(क)** संस्थानच्या मुंबई कार्यालयामध्ये चालणा-या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणेकामी उपरोक्त दोन्हीही संस्थेकडून लेखा परिक्षणाचे कामकाज केले जाते. परंतू वाढत्या कामकाजाचा व्याप लक्षात घेवून सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरीता मुंबई कार्यालयासाठी तसेच संस्थानचे परकिय चलनाचे व्यवहार, या कामी गेल्या नऊ वर्षापासून परकिय चलनाच्या लेखापरिक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेले श्री.एन.पी.रेडीज ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन प्रत्यक्ष खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या अटीवर नेमणुक करण्यात आलेली आहे.यासाठी प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती म्हणुन अंदाजे रू.२५,०००/- (अक्षरी रूपये पंचवीस हजार ) पर्यत खर्च अपेक्षित आहे.

आता सन २००९-१० हे आर्थिक वर्ष संपत आले असून नविन आर्थिक वर्ष सन २०१०-११ लवकरच सुरू होत आहे. तरी सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरिता पूर्व लेखापरिक्षण (Pre-Audit) अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Audit) शिर्डी, तसेच मुबई येथील कामकाजासाठी मागिल आर्थिक वर्षाप्रमाणे अथवा योग्य त्या वार्षिक लेखापरिक्षण फीसह बाहेरील सक्षम संस्थेची नियुक्ती होणेसाठी, तसेच मुंबई कार्यालयासाठी लेखा परिक्षण व परकिय चलनाच्या लेखा परिक्षणासाठी श्री. एन.पी.रेडीज ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची नियुक्ती होणेसाठी व त्यासाठी येणा-या खर्चास मंजूरी मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.२८७** **उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेले "अ", "ब" व "क" नुसार सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरीता पूर्व लेखापरिक्षण (Pre Audit) व अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Audit ) करणेकामी सन २००९-१० या आर्थिक वर्षात काम केलेल्या पूर्व लेखापरिक्षण (Pre Audit) व अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Audit) संस्थांची पूर्वीचेच अटी शर्तीवर नेमणूक करण्यात यावी, तसेच आवश्यकतेनुसार त्यांचे कामात आपसात बदल करण्यात यावे, तसेच यापूर्वी आयकरासाठी गणपूले केळकर ॲण्ड असोसिएटस् मुंबई व शंकर अंदानी,अहमदनगर यांच्या व विक्रीकरासाठी श्री ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडून घेण्यात येणाऱ्या सेवा यापूढेही चालू ठेवण्यात याव्यात त्यांना याकामी योग्य फी /मानधन आदा करण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१५** **रुग्णालये विभागासाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरिता स्वतंत्र पूर्व व अंतर्गत लेखपरिक्षण संस्थेची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढ झाली आहे व त्याप्रमाणात आर्थिक व्यवहारांतही मोठया प्रमाणावर वाढ होत आहे. वाढत्या आर्थिक व्यवहारांवर अचुक नियंत्रण राहण्यासाठी लेखाविभागाकडून अदा करण्यात येणारी देयके अदायगीपुर्व सर्वांगीन नियमाचे पालन झाल्याबाबत स्वतंत्र पुर्व लेखापरिक्षकांकडून (Pre Auditor) तपासणी करुन घेण्यात येत असल्याने संभाव्य चुका टाळल्या जात आहेत, तसेच हॉस्पिटल विभागाच्या इतर व्यवहारांवर लेखाविषयक नोंदी, अधिनियम- २००४ मधील तरतुदीचे पाल, डेड स्टॉक, रुग्णांची वैद्यकिय बिले, वेळोवेळी रोख रकमेपैकी तपासणी, इ. वैधानीक पुर्तता यांचे त्रैमासिक/ अर्धवार्षीक अंतर्गत लेखापरिक्षण केल्याने वैधानिक लेखापरिक्षणात संभाव्य आक्षेप व चुकांची संख्य कमी होऊन वेळीच निदर्शनास आणलेल्या अपुर्ततांची तात्काळ पुर्तता करण्यात येऊन वैधानीक लेखापरिक्षण सुरळीत होण्यास मदत होते.

आर्थिक वर्ष २००९-२०१० साठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये दोन्ही रुग्णालयांसाठी मे.व्ही.व्ही. कोठारी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंन्ट, श्रीरामपूर या लेखापरिक्षण संस्थेची पुर्वलेखापरिक्षक व मे. सुरेश डी. डौले ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटन्ट, राहुरी यांची अंतर्गत लेखापरिक्षण म्हणून प्रत्येकी रु.१,५०,०००/- एकत्रित फी वर नेमणूक करण्यात आली होती. हॉस्पिटल्स्च्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण राहण्याच्या दृष्टीने त्यांची चांगली मदत झाली असून त्यांची मुदत मार्च- २०१० रोजी संपत आहे.

आर्थिक वर्ष २०१०-२०११ साठी या लेखापरिक्षण संस्थांची पुर्व व अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करणेकामी अथवा इतर लेखापरिक्षण संस्थांनी अर्ज केल्यास त्यापैकी सक्षम लेखापरिक्षण संस्थांची हॉस्पिटल्स्साठी स्वतंत्र पुर्व व अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करुन मानधन ठरविणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.२८८** **उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन, रुग्णालये विभागासाठी सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता स्वतंत्र पूर्व व अंतर्गत लेखपरिक्षण करणेकामी नेमण्यात आलेल्या संस्थांची रुग्णालये विभागासाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरिता पूर्व व अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून पूर्वीचेच अटी शर्तीवर नेमणूक करण्यात यावी, तसेच आवश्यकतेनुसार त्यांचे कामात आपसात बदल करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१६** **रेग्यूलर दिवाणी मुकादमा क्र.५१/२००८ श्रीमती फातिमा बक्षू व इतर विरुध्द शिर्डी नगरपंचायत, शिर्डी वगैरे मे.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर कोपरगांव येथे सुरु असलेल्या दाव्याबाबतचे प्रकरण लोकन्यायालयात ठेवणेबाबत**

**प्रस्ताव-** **(अ) विषयाची पूर्वपीठीका :**

०१. मौजे शिर्डी येथील खाली नमुद केलेल्या खातेदाराच्या जमिनी भूसंपादनाने घेणेबाबत इकडील पत्र क्रमांक एसएसएस / वशी / बांधकाम / भूसंपादन / ५६७५ / २००६, दिनांक ०१ मे, २००६ रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पाठविणेत आलेला आहे.

| अ.नं. | सर्व्हे नंबर | सिटी सर्व्हे नंबर | संपादित करावयाचे क्षेत्र | खातेदाराचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३/२ | ९०९ पैकी | १५० चौमी | श्रीमती फातमाबी बक्षू शेख |
| ०२ | ३/३ | ९०९ पैकी | ०५० चौमी | श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार |

**०२.** मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दिनांक ०९ जून, २००६ रोजीच्या आदेशान्वये मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ५२ अ नुसार भूसंपादनाचे काम पुर्ण करणेस प्राधिकृत केलेले आहे.

**०३.** मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील क्र एलएक्यु/ एसआर/ ४३/२००६-कावि/भूसं-२/४०/२००९ दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजी उपरोक्त जमिनीचा भूंसपादनाचा निवाडा जाहिर केला आहे.

**०४.** भूसंपादनातील खातेदारांना जागेचा ताबा देणेबाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडील पत्र क्रमांक एलएक्यु/एसआर/४३/२००६ दिनांक २७ जानेवारी, २००९ नुसार कळविण्यांत आलेले आहे.

**०५.** भूसंपादनातील खातेदारांनी जमीन भूसंपादनाने घेता येत नाही असा व इतर मुद्दे मांडून मा. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांचे न्यायालयात रे.मु. नं. ५१/२००८ दाखल केला आहे.

**०६.** सदर दाव्यात सीपीसी १५१ खाली अर्ज दाखल करुन त्यांचा जाण्या-येण्याचा रस्ता बंद करु नये म्हणून अर्ज दिला आहे.

**०७.** ताबा घेण्याची प्रक्रिया चालू असतांना मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांनी दिनांक ११ फेब्रुवारी, २००९ रोजी जैसे थे स्थिती ठेवणेबाबत आदेश दिला. त्यामुळे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना भूसंपादित होणाऱ्या जमिनीचा ताबा घेता आला नाही व संस्थानला ताबा देता आला नाही.

**०८.** सदरहू जमिनी भूसंपादनाने घेणेपूर्वी वादी श्रीमती ठकुबाई शेलार यांनी त्यांची जमीन सर्व्हे नंबर ३अ/१अ/३/३ क्षेत्र ०.५ आर दिनांक २९ मे, २००४ रोजी तसेच श्रीमती फातमाबी शेख यांनी त्यांची जमीन सर्व्हे नंबर ३अ/१अ/२/२ क्षेत्र १.५ आर संस्थानने विकत घ्यावी म्हणून दिनांक २७ मार्च, २००४ तसेच दिनांक १२ एप्रिल, २००४ रोजी अर्ज दिलेला होता.

त्यांच्या अर्जाप्रमाणे सदरचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या दिनांक २९-३०/०५/२००४ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक २७० पारित करण्यात आलेला होता. मा. व्यवस्थापन मंडळाने त्यांच्या मागण्या मान्य नाहीत म्हणून त्यांना समक्ष सांगितलेले होते व वादींना दिनांक १७ जून, २००४ लेखी पत्राव्दारे कळविणेत आलेले होते. उपरोक्त प्रमाणे पत्र देऊन ही, दोन्ही खातेदारांनी थोडक्यात सध्या सुरु असणाऱ्या दाव्यातील वादींनी प्रतिसाद दिलेला नाही म्हणून सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८ डिसेंबर, २००५ रोजीचे पुनःश्च सादर करणेत येऊन, निर्णय क्रमांक ७७१ नुसार प्रस्तुत जमिनी भूसंपादन कायदा, १८९४ खाली घेण्यात याव्यात, असा निर्णय घेणेत आला. त्याप्रमाणे मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे.

०९. प्रस्तुत जमिनीकडे जाणे-येणेसाठी सार्वजनिक रस्ता नाही.

१०. या भूसंपादन प्रस्तावापोटी आजअखेर पर्यन्त खर्च झालेला आहे :

| अ.नं. | तपशील | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मोजणी फी | १२/०४/२००६ | ६,०००/- |
| ०२ | अधिसुचना जाहिरात बिल - दैनिक लोकयुग | २०/११/२००६ | ०,९६०/- |
| ०३ | अधिसुचना जाहिरात बिल - दैनिक श्रीरामपूर एक्सप्रेस | २५/१२/२००६ | १,२००/- |
| ०४ | अधिसुचना जाहिरात बिल - दैनिक सार्वमत | ०८/०४/२००८ | २,६४०/- |
| ०५ | अधिसुचना जाहिरात बिल - दैनिक श्रीरामपूर एक्सप्रेस | ०८/०४/२००८ | १,२००/- |
| ०६ | मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडे भूसंपादनापोटी भरलेली २/३ रक्कम - नुकसान भरपाई पोटी | ०६/१०/२००६ | ७,२८,०७२/- |
| ०७ | मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडे भूसंपादनापोटी भरलेली २/३ रक्कम - आस्थापना खर्चापोटी | ०६/१०/२००६ | २१,८४२/- |
| | **भूसंपादनापोटी आतापर्यन्त खर्च झालेली एकूण रक्कम रुपये** | | **७,६१,९१४/-** |

उपरोक्त परिशिष्टात दर्शविलेला खर्चापैकी अ.नं. ०१ ते ०५ हा प्रत्यक्ष झालेला आहेच, अ.नं. ०६ व ०७ मध्ये नमूद केलेला खर्च हा निवाडयानुसार गृहीत धरलेला असून, मा. उपविभागीय अधिकारी,

श्रीरामपूर यांचेकडेस या भूसंपादनापोटी एकूण रक्कम रुपये १२,९३,४९३/- मात्र दिनांक ०६ ऑक्टोबर, २००६ रोजी जमा करण्यात आलेले आहेत. सदरहू रक्कम दाव्याचा निकाल न लागलेमुळे तसेच जमिनीचा ताबा न मिळालेमुळे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडेस माहे ऑक्टोबर, २००६ पासून बिनव्याजी पडून आहे.

**(ब) विषयाची सद्य:स्थिती :**

**(१)** वादी यांनी खालीलप्रमाणे मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांचे न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत :

| अ.नं. | दाव्याचा क्रमांक | दाव्यात वादीची मागणी संक्षिप्तरित्या |
|---|---|---|
| ०१ | रे.मु.नं.५१/२००८ | प्रतिवादी क्रमांक २ (श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी) ने प्रतिवादी क्रमांक ३ व ४ (अनुक्रमे महाराष्ट्र सरकारतर्फे जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर (भूसंपादन अधिकारी)) यांचेशी भूमी संपादनासंबंधी कोणताही वैध करार केला नसल्याने त्या अनुषंगाने प्रतिवादी क्रमांक ३ व ४ यांनी सुरु केलेली भूसंपादनाची कार्यवाही पुढे चालवू नये व निवाडा जाहीर करु नये तसेच भूमी संपादन कायदा १८९४ कलम ५२ अ प्रमाणे प्रतिवादी क्रमांक ३ यांनी प्रतिवादी क्रमांक ४ यांना वरील कलमान्वये अधिकार दिले नसल्याने व त्या कलमा-अंतर्गत भूमी संपादन होऊ शकत नाही म्हणून त्यांना परावृत्त करण्याकरीता कायम मनाई हुकूम देणेकरीता वगैरे केलेला आहे. या शिवाय इतर काही मागण्या आहेत. |
| ०२ | वर नमुद केलेल्या दाव्यामध्ये आदेश ३९ नियम १ व २ तथा कलम १५१ सिपीसी प्रमाणे अर्ज दिला. | ०१. दाव्याच्या निकालापर्यन्त मनाईहुकूम मिळण्याकरीता खर्चासह मंजूर करण्यात यावे.<br>०२. दाव्याच्या निकालापर्यन्त आदेश देण्यात यावा की, सर्व्हे नंबर ३/२ व ३/३ मौजे शिर्डी पैकी मनाई हुकूम देण्यात यावा. |

वर नमुद केलेले दाव्यात, संस्थानमार्फत श्री. पी.के. कोते, वरिष्ठ लिपीक, मा. कार्यकारी अधिकारी तसेच श्री.डी.एम.देसाई, शाखा अभियंता यांनी वेळोवेळी न्यायालयात प्रतिज्ञापत्रे सादर केलेली आहेत.

**(०२)** वर नमुद केलेली दाव्याची वस्तुस्थिती असतांनाच, वादी यांनी लोकन्यायालयातील तडजोडीसाठी अर्ज केलेला आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे टिपणी आहे :

| अ.नं. | वादीचे म्हणणे | कार्यालयीन टिपणी |
|---|---|---|
| ०१ | दिनांक ७ जुलै, २००९ रोजी मे. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांच्या न्यायालयसमोर युक्तीवाद सुरु असतांना ज्या संबंधी विषय चर्चेमध्ये आला व दिनांक ०२/०५/२००९ रोजीचा वर संदर्भीत अर्ज दाखल करण्यात आला त्या अनुषंगाने वरील दावा चालविण्याचा हक्कास बाध न येता वरील संदर्भानुसार विवादामध्ये तडजोड शक्यता व पर्याय काढता येणेसाठी विषयाची ठोकळ मांडणी करण्यासाठी प्रस्तुतचे पत्र देण्यात येत आहे. खालील नमुद विषयाच्या व त्यातील मुद्यांच्या संदर्भाने आवश्यक तो विषय व मुद्दे चर्चेमध्ये अथवा तडजोड सभेमध्ये चर्चा करणे अंतिम करणे शक्य आहे व त्याकरीता विषयाची मांडणी पुर्व कल्पना म्हणून करण्यात येत आहे. | अर्जदार यांनी रेग्युलर मुकादमा दाखल करतांना संस्थानला भूसंपादन करण्याचा अधिकारच नाही असा मुद्दा नमूद केलेला होता व आहे. प्रस्तुत जमिनीबाबत मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी निवाडा जाहीर केलेला आहे.<br>ताबा घेण्याबाबत नोटीस देखील मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी दिलेली आहे. |
| ०१-अ | मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर ३/२ व ३/३ ज्याचा न.भु.क्र. ९०९ क्षेत्र ०६ हेक्टर ७७ आर या जमिनीमध्ये वादी क्र.०१ श्रीमती फातिमाबी भ्र. बक्षु शेख यांची एकुण १५० चौ.मी. (४५ चौ.मी.बांधकाम असलेली अधिक १०५ चौ.मी. खुली जागा) व वादी क्रमांक २ ठकुबाई भ्र. एकनाथ शेलार यांची ५० चौ.मी. ही जमीन मालकी व ताब्याची आहे व त्यासंबंधी वरीलप्रमाणे वाद सुरु आहे. | ही बाब बरोबर आहे. |
| ०१-ब | केंद्र शासनाने दिनांक ३१/१०/२००७ च्या जाहिर केलेल्या पुर्नवसन धोरणाप्रमाणे व भुमी संपादन कायद्याच्या अनुलक्षी तरतुदी अनुसार वादी यांचे महत्वाचे हक्क निर्माण झाले आहेत त्याचे पालन करणे प्रत्येक लोकसेवक व सरकारी अधिकारी यांना करणे आवश्यक आहे. | मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील क्रमांक एलएक्यू/ एसआर/ ४३/ २००६ - कावि/भूसं-२/४०/ २००९ दिनांक २७ जानेवारी, २००९ अन्वये जाहिर केलेला निवाडा हा कायदेशीर आहे. |
| ०१-क | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ व २००५ अन्वये वरील विषयांची | रेग्युलर मुकादमा नंबर ५१/२००८ मध्ये संस्थान हे पक्षकार आहे. |

| | | |
|---|---|---|
| | मांडणी या अगोदर वरील दाव्यामध्ये समाविष्ट आहे. | |
| ०१-ड | वरील वादाचा विषयामध्ये तडजोड व्हावी म्हणून व ती करता येणे शक्य असल्यामुळे खालील नमुद विषयांची मांडणी करण्यात येत आहे. | सदर दाव्यामध्ये तडजोड करता येईल अशी वादीची धारणा आहे. |
| **तडजोड शक्यता आजमिण्याचे विषय व मांडणी** | | |
| ०१ | वादी यांची जमीन शासनाच्या बी.ओ.टी. तत्वानुसार विकसित करावी व ती करण्याकरीता भांडवल उभारणी, खर्च, मालकी, भाडेतत्वावर बांधकाम व विकासक तथा मालक यांचेमध्ये कायमस्वरुपी ठेवण्यात येणे शक्य असणारे इमारत क्षेत्र व मजले. | संस्थानने सदरची जागा विद्युत कार्यालयाचे विस्तारीकरण व प्रसादालयाचा एक भाग (प्रसाद लाडू तयार करणे) यासाठी इमारत बांधणे व साईभक्तांच्या सोयी सुविधेच्या दृष्टीने बांधकाम करण्यासाठी भूसंपादन होऊन मिळावे म्हणून मागणी केलेली आहे. वरील बाबींचा विचार करता, सदरची जागा बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वानुसार विकसित करणे शक्य होणार नाही.<br>साईभक्तांची सुविधा करणे व त्याच ठिकाणी जमीन मालकांना जागा विकसित करुन देणे उचित होणार नाही.<br>सदरची जागा मिळाली तर संस्थानची पूर्वीची जमीन व भूसंपादीत जमीन एकत्रित होऊन एकसंघ (Compact Block) जमीन होणारआहे. |
| ०२ | सदरहु जागेसोबत असणारे स्वच्छतागृह हलवुन त्याची योग्य ठिकाणी मांडणी करुन उभारणे अथवा इमारत क्षेत्रामध्ये त्याचा समावेश करुन वेगळया प्रकारे त्याची उभारणी करणे. | सदर जागेलगत असणाऱ्या स्वच्छता गृहाची जागा ही संस्थानच्या मालकीची आहे. आजमितीस शिर्डीला येणाऱ्या साईभक्तांच्या गर्दीचा विचार करता असलेले स्वच्छतागृहच पुरेसे नाही. तसेच संस्थानच्या मालकीची जवळपास अशी मोकळी जागा नाही, जेणेकरुन स्वच्छतागृह हलविणे शक्य होईल. तसेच वादीची मागणी म्हणजे स्वतःची जागा अधिक संस्थानच्या जागेचा उपभोग घेण्याचा दिसतो. कोणत्याही परिस्थितीत स्वच्छतागृह हलविणे आजतरी शक्य नाही. |
| ०३ | सदरहु जागेचे इमारत उपयोग हा प्रसाद लाडु तयार करणे व नाष्टा तयार करणे व विद्युत कार्यालयाचे विस्तारीकरण ही बाब या जागेचे मागे असलेले व बाजुला असलेले संस्थानची इतर मिळकत व त्यात असलेली खुली जागा या मध्ये असलेली जागेची कमतरता पाहुन त्याचे सुनियोजन करणे. | प्रस्तुत जागेचे लगत प्रसादालयाची व साईभक्तांच्या निवासस्थानांच्या इमारती आहेत. वादी यांनी नमुद केलेली जागा फक्त दिसावयास मोकळी दिसते. इमारतीचा बांधकाम आराखडा मंजूर करतांना मोकळी जागा ठेवणे बंधनकारक असते व आहे. त्याप्रमाणे सदरची मोकळी जागा ठेवणेत आलेली आहे. त्यात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नाही. त्यामुळे अर्जदाराचे म्हणणे योग्य नाही. |
| ०४ | वादी उभयता हया स्त्री असुन त्यांचे वय जास्त आहे व त्यांचे उपजीवीकेचे ते एकमेव साधन असल्यामुळे त्यांचे पुर्नवसन करणे हे पुज्य श्री साईबाबा यांचे विचारसरणीस योग्य ठरेल व त्यासाठी भांडवल उभारणी ही संस्थानने करावी किंवा मालकांनी करावी किंवा उभयतांनी करावी याविषयी चर्चा. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मध्ये कोणत्याही व्यक्तीला खाजगी कामासाठी भांडवल उपलब्ध करुन देण्याची तरतुद नाही. तसेच निवाडयाप्रमाणे वादीपैकी श्रीमती फातमाबी बक्षु शेख रक्कम रुपये ५,३८,२०२/- मात्र व श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांना रक्कम रुपये १,८९,८७०/- मात्र अशी नुकसान भरपाई मिळणार आहे. |
| ०५ | संस्थान स्वतः खर्च करुन नाममात्र भाडयावर दिर्घ मुदतीचा परवाना करार काही मावेजा देऊन करु शकेल अथवा भांडवल उभारणी संस्थानने करुन इमारतीचे क्षेत्रफळ कमी जास्त ठरवुन दिर्घ मुदतीचा परवाना मालकाकडून करु शकेल. | सदरची जागा भाडेतत्वावर घेण्याचा संस्थानचा मानस नाही. |
| ०६ | इमारत आराखडा व उपयोग तथा इतर इमारतीशी असणारी संलग्नता अथवा त्याचा जास्त बहुउपयोग पाहता बाजुच्या जमीन व इमारतीशी त्याचा ताळमेळ घालुन त्याचा आराखडा बनविणे शक्य आहे. संस्थानला खर्च करावयाचा नसल्यास संस्थानच्या उपयोगाकरीता इमारतीचा वरचा भाग, टेरेस वगैरे या भागात मोबाईल टावरसारखी उभारणी करुन त्या संबंधी वीज जोडणी संयत्र बसविणे शक्य आहे. (विदयुत संयंत्र व जोडणी व त्याची जागा वगैरे भारतीय विज कायदा अन्वये नियमीत व मानांकित आहे) | सध्या असलेल्या इमारतींचा उपयोग विचारात घेता, वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे ताळमेळ घालून आराखडा तयार करता येणे शक्य नाही.<br>सध्या विद्युत कार्यालयाच्या पुर्व - उत्तर दिशेमध्ये सुलभ शौचालय ही इमारत आहे.<br>वादींनी मांडलेला मुद्दा तांत्रिकदृष्टया बरोबर नाही. सदर जागेचा साईभक्तांच्या सोयीसाठी इमारत बांधणे हा ही आहे. त्यामुळे वादीचे म्हणणे योग्य नाही. |
| ०७ | सदरहु बांधकाम पाडल्यामुळे उभय वादी हे बेघर होत आहे. त्यांच्या कुंटूंबातील माणसांची संख्या पाहता व त्यांचे घरातील जागा व उदरनिर्वाहाचे साधन पाहता त्याची व्यवस्थित बांधकाम व मांडणी होणे आवश्यक आहे. | वादी यांना नुकसान भरपाई मिळणार आहे. |
| ०८ | या अगोदर संस्थानने स्थानिक मिळकत धारकांची | संस्थानने भूसंपादन कायदा १८९४ च्या तरतुदीनुसार भूसंपादन |

| | | |
|---|---|---|
| | मिळकत संस्थानचे फायद्याकरीता ताब्यात घेऊन विकसित केली व त्याचा उचित फायदा व मावेजा मिळकत धारकांना दिला असून प्रस्तुत प्रस्ताव हा नवीन पायंडा नाही. | प्रस्ताव सादर केला आहे. भूसंपादन अधिकारी जी नुकसान भरपाई मंजूर करतात त्याप्रमाणे संस्थानकडून संबंधित विभागाकडे नुकसान भरपाई रक्कम वर्ग केली जाते. त्यानुसार या भूसंपादन प्रस्तावापोटी संस्थानने संपूर्ण रक्कम सन २००६ मध्येच भूसंपादन अधिकारी यांचेकडेस वर्ग केलेली आहे.<br>ज्यावेळेस संस्थान एखाद्याची जमीन खरेदी करते त्यावेळेस वाटाघाटीने जमिनीचा दर ठरविण्यात येत असतो व त्याप्रमाणे खरेदी खत होते. |
| | शेवटी भक्तांची सोय परंतु त्यासाठी स्थानिक रहिवाशी निर्वासीत व बेघर अशा प्रकारचे धोरण आखता येणार नाही. | केवळ कोणी बेघर व्हावेत म्हणून भूसंपादन करण्यात येत नाही. जमिनीची / जागेची आवश्यकता असल्यानेच संस्थान भूसंपादन करीत आहे. |
| ०९ | शिर्डी कायदा २००४ व २००५ प्रमाणे संस्थानकडे अमाप मालमत्ता आहे ही बाब मान्य करण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये दोन्ही पक्षांचे उद्देश सफल होण्यात मदत होईल व तडजोड होऊन तोडगा निघु शकेल अशी वादींची धारणा आहे. त्याकरीता सकारात्मक प्रयत्न होणे आवश्यक आहे. अशी तडजोड झाल्यास भुसंपादन मावेजा व त्यासंबंधी पुढील कार्यवाही व कोर्ट प्रकरणे संपुर्णपणे संपुष्टात येतील व मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय तथा केंद्र शासनाचे धोरण व निकालपत्र व कायद्यान्वये संपुर्ण वाद संपुष्टात येणे शक्य आहे. | संस्थानकडे अमाप मालमत्ता आहे हे वादीचे म्हणणे खरे नाही. संस्थानला भक्तांच्या सेवा-सुविधेसाठी तसेच स्थानिक रहिवाशांना ही सुविधा प्राप्त व्हाव्यात म्हणून आणखी जमिनीची आवश्यकता आहे.<br><br>वादीने तडजोड करण्याची सुचविलेली योजना योग्य नाही. |
| १० | वरील बाबीमध्ये मे. न्यायालयासमक्ष अथवा खाजगी उभय पक्षांतील सभेमध्ये विषयाचे स्वरुप निश्चित करुन विषय संपुष्टात आणणे योग्य होईल. | वादीने सुचविलेली तडजोड योग्य व उचित नाही. |
| **वादीची विनंती** | | |
| ०१ | वरील विषयात सकारात्मक दृष्टिकोन ठेवून श्री साईबाबा यांचे आर्शिवादाने पुढील कामकाज चालविण्याकामी घेऊन भक्तांची सोय व विस्थापना न होण्याची काळजी घेऊन सभा आयोजित करावी व योग्य तो कायदेशीर तोडगा काढावा. | वादीची जागा सोडून देण्याची अथवा बांधा, वापरा व हस्तांतर करा याची अंमलबजावणी करुन योजना राबवावी हे म्हणणे व्यवहार्य नाही. |

**(ड)** वर नमुद केलेप्रमाणे, तडजोडीचे अर्जाबाबत संस्थान वकील ॲड. एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांना दिनांक ०८ ऑगष्ट, २००९ रोजी पत्र देऊन अभिप्राय मागविणेत आलेला होता. त्यानुसार ॲड. एस. डी. कुलकर्णी यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २००९ रोजीचे पत्रानुसार खालीलप्रमाणे अभिप्राय दिला आहे, त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

०१. मा. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांनी भूसंपादनाचा निवाडा जाहिर करु नये असा आदेश दिलेला नव्हता, त्यामुळे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर विभाग, श्रीरामपूर यांनी दिनांक २७ मे, २००९ रोजी जाहिर केलेला निवाडा योग्य व कायदेशीर आहे.

०२. वादी यांनी सीपीसी ८९ अन्वये तडजोडीसाठी सदरची केस लोकन्यायालयात ठेवण्याबाबत अर्ज दिलेला आहे, परंतु भूसंपादनाचा निवाडा जाहिर झालेला आहे. सदरचा निवाडा मागे घेता येणार नाही, त्यामुळे वादी यांनी सदरचे प्रकरण लोकन्यायालयात ठेवण्याबाबत अर्ज असला तरी त्यांत समेट होणे कायद्याने शक्य नाही.

०३. तसेच वादी यांनी संस्थानची स्वच्छतागृहाची इमारत पाडून त्यांचे जागेसह बीओटी तत्वावर बांधकाम करावे अशी केलेली मागणी योग्य नाही. तसेच ती अवास्तव आहे. त्यामुळे त्यांच्या अर्जाप्रमाणे समेट करणे योग्य होणार नाही.

०४. भूसंपादनाची कार्यवाही जवळजवळ अंतिम टप्प्यावर आलेली आहे. मा.न्यायालयात वादीतर्फे युक्तीवाद पूर्ण झाला आहे. आता प्रतिवादी श्री साईबाबा संस्थान यांचा युक्तीवाद होणे आहे. भुसंपादनाची कार्यवाही कायदेशीर मार्गे झालेली आहे. भूसंपादनाची कार्यवाही वादींना रद्द करुन मागण्याचा अधिकार नाही, तसा अधिकार या न्यायालयालापण नाही.

०५. वादी मागणी करतात तशी तडजोड करण्याचे कारण नाही. वादीची मागणी योग्य व रास्तपण दिसत नाही. संस्थानने याबाबत लवकर निर्णय घेतला तर युक्तीवाद पूर्ण करता येईल.

तसेच या प्रकरणी जरी तडजोड झाली तरी फक्त नुकसान भरपाईची रक्कम वाचणार आहे, परंतु आस्थापना खर्चाची ०३ टक्के प्रमाणे होणारी रक्कम रुपये २१,८४२/- मात्र भरावीच लागणार आहे व इतर दर्शविलेला खर्च प्रत्यक्षात झालेला आहे, तो परत वसूल करणे शक्य नाही.

**(इ)** वरील परिच्छेदांमध्ये दिलेल्या सर्व बाबींचा विचार करतां व ॲड. एस. डी. कुलकर्णी यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २००९ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार, सदरहू प्रकरणी वादी श्रीमती फातिमा बक्षू

शेख व श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांनी दाखल केलेला रेग्युलर मुकदमा नंबर ५१/२००८ हा दावा समेटासाठी (तडजोडीसाठी) लोकन्यायालयात सादर करणे उचित होणार नाही. त्यामुळे संस्थान वकीलांना सदरहू दाव्यात प्रतिवादी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे युक्तीवाद पूर्ण करुन दाव्याची कार्यवाही पूर्ण करणेस मान्यता देणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८९ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे ॲड. एस. डी. कुलकर्णी यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २००९ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार, सदरहू प्रकरणी वादी श्रीमती फातिमा बक्षू शेख व श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांनी दाखल केलेला रेग्युलर मुकदमा नंबर ५१/२००८ हा दावा समेटासाठी (तडजोडीसाठी) लोकन्यायालयात सादर करणे उचित होणार नाही. त्यामुळे संस्थान वकीलांना सदरहू दाव्यात प्रतिवादी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे युक्तीवाद पूर्ण करुन दाव्याची कार्यवाही पूर्ण करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७ विविध बांधकामाचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव- ०१. कामाचे नाव :- नविन पिंपळवाडी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे**

नविन पिंपळवाडी रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाचे काम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अर्थिक सहाय्यातून करणेत येत असून, सदरचे काम ठेकेदार मे. शिंदे डेव्हलपर्स, पुणे यांचे मार्फत प्रगतीपथावर असून या प्रकल्पाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | नविन पिंपळवाडी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ०२ | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार | युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे |
| ०३ | बांधकाम ठेकेदार | मे. शिंदे डेव्हलपर्स प्रा. लि., पुणे |
| ०४ | मंजूर निविदा रक्कम | रु.३,९४,००,५६४/- |
| ०५ | कार्यादेश क्रमांक / दिनांक | जा.क्र.एसएसएस/बांध/८११५/०९ दि.०१,जूलै,२००९. |
| ०६ | कामाची मुदत | ०६ महिने ( दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१० अखेर). |

ठेकेदार मे. शिंदे डेव्हलपर्स प्रा. लि., पुणे यांचेमार्फत सुरु असलेल्या कामाची मुदत दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१० अखेर पर्यंत असून सदरहू कामामध्ये ठेकेदार यांना आलेल्या खालील प्रमाणेचे अडचणीमुळे दिनांक ०५ एप्रिल, २०१० अखेर पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत त्यांनी त्यांचेकडील दिनांक १९/०१/२०१० रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे.

चारीमध्ये पाईपलाईन करणेचे काम करणेस चारीतील घाण, कचरा, गाळ, कॅनॉल रोटेशन, इत्यादि कारणांमुळे वेळ लागला.

सदरहू रस्त्याचे मध्ये येत असलेल्या नगरपंचायत, जिवन प्राधिकरण, संस्था व खाजगी नागरिकांच्या पाणीपुरवठयासाठी असलेल्या पाईपलाईन्स, ड्रेनेजलाईन्स, स्टॉर्मवॉटर लाईन्स,भुमिगत व मोकळया विद्यूतवाहिन्या, टेलिफोन लाईन्स शिफ्ट करणे इत्यादि बाबींमुळे कामास विलंब लागला.

रस्त्याचे बाजूने (फुटपाथचे बाजूने) खाजगी मालकीचे अतिक्रमण काढणेस शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना वेळ लागला.

अवेळी पावसामुळे रस्त्यात पाणी साचल्याने कामास विलंब लागला.

पिंपळवाडी कडे जाणारी, या भागातील सर्व हॉटेल्सकडे तसेच आठवडे बाजार, कालिकानगर, बिरेगांव रोड, भाजी मंडई, विरभद्र मंदिर याकडे जाणारी वाहतुक नविन पिंपळवाडी रस्त्याने जाते. या सततचे रहदारीमुळे कामाची गती राखता आली नाही.

उपरोक्त बाबींमुळे काम पूर्ण करणेस विलंब झाल्याने सदर प्रकल्पाचे सल्लागार मे.युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांनी दिनांक १०/०२/२०१० रोजीचे पत्रानुसार सदर कामाचे बांधकाम ठेकेदार मे. शिंदे डेव्हलपर्स प्रा. लि., पुणे यांना दि.३१/३/२०१० अखेर मुदतवाढीच्या कारणामुळे कुठलीही आर्थिक वाढ न देता मुदतवाढ देणेकामी अभिप्राय दिला आहे.

त्यास अनुसरून ठेकेदार मे. शिंदे डेव्हलपर्स प्रा. लि., पुणे यांना त्यांचेकडील दि.१९/०१/२०१० रोजीचे विनंतीपत्रानुसार व प्रकल्प सल्लागार यांचे अभिप्रायानुसार सदर कामाचे पूर्ततेसाठी दिनांक ३१ मार्च, २०१० अखेर पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता असावी.

**०२. कामाचे नाव :- साई आश्रम प्रकल्पाचे परिसर विकास करणे**

शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. साई आश्रम प्रकल्पाचे इमारतींचे बांधकाम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नईचे देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही. रमणी यांचेमार्फत करण्यात येत आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे मार्फत इमारतींचे बांधकाम करणेसाठी ठेकेदार मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स, लि; दिल्ली यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्पाचे परिसर विकासाचे काम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे. संस्थानमार्फत साई आश्रम प्रकल्पाचे परिसर विकासाचे काम ठेकेदार मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कं. लि; नाशिक यांना इकडील कार्यादेश जा.क्र.

एसएसएसटी/बांध./३४०२/२००९, दि. २५/०३/२००९ अन्वये बहाल करण्यात आले आहे. त्यानुसार ठेकेदार यांनी दि. ०९/०४/२००९ रोजी सदरचे कामास सुरुवात केलेली आहे. ठेकेदार यांचा कामाचा कालावधी हा १० महिन्यांचा होता व तो दि. ०९/०२/२०१० रोजी संपुष्टात आलेला आहे. ठेकेदार यांची सध्या साईटवर खालीलप्रमाणे कामे प्रगतीपथावर आहेत.

१. रोड, पार्किंग व पाथवे विकसीत करणे,
२. प्लिंथ प्रोटेक्शन करणे,
३. ड्रेनेज स्टॉर्मवॉटर लाईन्स, टेलीफोन व इलेक्ट्रीकल केबल लाईन्स टाकणे
४. कंम्पाउंड वॉल, एन्ट्रन्स गेट बांधकाम करणे
५. डी.जी. रुम बांधकाम करणे इ. कामे प्रगतीपथावर आहेत.

**ठेकेदार यांनी दि. ०८/०२/२०१० रोजीचे पत्रान्वये काम पूर्ण करणेस झालेल्या विलंबासाठी खालीलप्रमाणे कारणे कळविली आहेत.**

१. साई आश्रम प्रकल्प भाग- I येथील रोड व पार्किंगचे काही भागातील काम मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि; दिल्ली यांचे आर.एम.सी. प्लॅन्टमुळे स्थगित आहे.
२. ठेकेदार मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., दिल्ली यांचे बांधकाम साहित्य, लेबर कॅम्प, साईट ऑफिस इत्यादींमुळे पाथवेज, स्टॉर्म वॉटर लाईन, सिवेज लाईन, सांडपाणी जल वाहिनी इत्यादींची कामे स्थगित आहेत.
३. मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि; दिल्ली यांचे इमारतींचे अपूर्ण कामांमुळे पाण्याचे जी.आय. लाईन्स टाकणेचे काम स्थगित आहे.
४. इमारतींचे प्लिंथ प्रोटेक्शनचे काम पार्श्वनाथ डेव्हलपर्स यांचे इमारतींचे रंगकाम पूर्ण झालेनंतर करणे शक्य आहे. त्यामुळे सदरचे काम स्थगित आहे.

**उपरोक्त कारणांमुळे आम्हाला काम वेळेत पूर्ण करणे शक्य झाले नाही. तरी आम्हास पार्श्वनाथ डेव्हलपर्स यांचे काम पूर्ण झालेनंतर ०४ महिने मूदतवाढ मिळावी अशी विनंती ठेकेदार यांनी केली आहे. साई आश्रम प्रकल्पाचे व्यवस्थापन सल्लागार मे. डॉर्श कन्सल्ट (इं.) प्रा.लि., मुंबई यांनी कळविले आहे की, पार्श्वनाथ डेव्हलपर्स यांचे भाग-I येथील कामाची मूदत दि. ३१/०५/२०१० व भाग - II येथील कामाची मूदत दि. २८/०२/२०१० रोजी संपुष्टात येत आहे.**

परंतू पार्श्वनाथ यांचे काम वेळेत पूर्ण होणे शक्य दिसत नाही. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि, दिल्ली हे दि.२८/०२/२०१० रोजी फेर बार चार्ट सादर करणार आहेत. कन्सलटंट यांनी कळविले आहे की, पार्श्वनाथ यांचे संपूर्ण काम हे साधारणतः दि. ३०/१०/२०१० पर्यंत पूर्ण होईल असा अंदाज आहे. तरी परिसर विकास कामाचे ठेकेदार शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., नाशिक यांना त्यानंतर दोन महिन म्हणजेच दि. ३१/१२/२०१० पर्यंत मूदतवाढ देणेस हरकत नाही.

तरी उपरोक्त बाबींचा व प्रकल्पाचा विचार करता ठेकेदार मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कं. लि; नाशिक यांना दि. ३१/१२/२०१० अखेर पर्यंत मुदतवाढ देणेकरीता मान्यता असावी.

**०३. कामाचे नाव :- संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे शिर्डी व कनकुरी येथील जमिनीचे कडेने तारकंपाउंड करणे**

संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील शेती महामंडळाकडून भूसंपादनाने संपादीत केलेल्या तसेच शिर्डी व कनकुरी येथील नव्याने खरेदी केलेल्या अशा एकूण २१ प्लॉटचे भोवताली काटेरी तारेचे कुंपण करणेकामी रुपये ५३,८२,६७३.०० रक्कमेचे काम ठेकेदार आर.एल. भुतडा, कोपरगांव यांना देणेत आलेले आहेत. कार्यादेशान्वये काम पूर्ण करण्याचा कालावधी नऊ महिने (दि. ०१.०१.२००९ ते दि. ३०.०९.२००९) असा होता. संस्थान प्लॉटमध्ये लगतचे शेतकऱ्यांचे अतिक्रमण असल्यामुळे सदर क्षेत्रातील अतिक्रमण काढून हद्दीच्या खुणा कायम करणेत आल्या व त्यानुसार तार कंम्पाऊंडचे काम करणेत आले. याकामी बराच कालावधी वाया गेल्यामुळे ठेकेदार यांना मूदतीत काम पूर्ण करता आले नाही. त्यामुळे दि. ३०.०१.२०१० पर्यत वाढीव मूतदवाढ देणेत आली होती. परंतू अद्यापही चार प्लॉटचे तार कम्पांउडचे काम बाकी आहे व तीन प्लॉटचे प्रत्येकी एका बाजुचे तारकंम्पाऊडचे काम बाकी आहे.

**सद्यस्थितीत ठेकेदार यांनी पूर्ण केलेले व बाकी असलेल्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे-**

**अ) आज अखेर खालील गट नं. चे तार कम्पाऊंडचे काम पूर्ण झालेले आहे.**

| **अ.नं.** | **गट नं.** | **क्षेत्र हे. -आर** | **तार कंम्पाऊंडची लांबी (मिटरमध्ये)** | **कामाचा तपशिल/ शेरा** |
|---|---|---|---|---|
| १ | १९९ | १-९६ | १६८ | तार कम्पाउंडचे काम पूर्ण |
| २ | २०० | १-८८ | २९२ | तार कम्पाउंडचे काम पूर्ण |
| ३ | २०१ | ०-९८ | ३१२ | तार कम्पाउंडचे काम पूर्ण |
| ४ | २३४ पै. | ०-८४ | ३६८ | ग्रील गेटसह तार कंम्पाउंडचे काम पूर्ण |
| ५ | २२१ पै. | ३-२६ | ७५६ | ग्रील गेटसह तार कंम्पाउंडचे काम पूर्ण |
| ६ | २४५ पै. | ३-३० | ५८० | तार कंम्पाउंडचे काम पूर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | २५० पै. | १-८५ | ९६७ | ग्रील गेटसह तार कंम्पाउंडचे काम पूर्ण |
| ८ | २१८ पै. | १-०० | ५१० | ग्रील गेटसह तार कंम्पाउंडचे काम पूर्ण |
| ९ | ८७ | १-७५ | ५७७ | तार कंम्पाउंडचे काम पूर्ण |
| १० | ८८ | १-४६ | | |
| ११ | १८३ | ५-४० | ९७३ | ग्रील गेटसह तार कंम्पाउंडचे काम पूर्ण |
| १२ | १८६ | १-२४ | ५१५ | ग्रील गेटसह तार कंम्पाउंडचे काम पूर्ण |
| १३ | १९५ पै | | ३२४ | ग्रील गेटसह तार कंम्पाउंडचे काम पूर्ण |
| १४ | २३५ | २-४१ | ८११ | ग्रील गेटसह तार कंम्पाउंडचे काम पूर्ण |
| | | **एकूण लांबी** | **७१५३.००** | |

**ब)** लगतचे शेतकऱ्यांनी विरोध केल्यामुळे खालील प्लॉटमधील तार कंम्पाउंडचे काम अपूर्ण/ बाकी आहे.

| अ.नं. | गट नं. | क्षेत्र हे. -आर | तार कंम्पाऊंडची लांबी (मिटरमध्ये) | कामाचा तपशिल/ शेरा |
|---|---|---|---|---|
| १५ | १९८ | ३-३६ | ५३८ | उत्तर बाजुकडील शेतकरी श्री देवीदास मते व सतिष मते या शेतकऱ्यांचे अतिक्रमण असल्याने ३०० मीटर लांबीचे कंम्पाऊंड काम बाकी |
| १६ | २४९ | १-७९ | १०१४ | पूर्व बाजुकडील श्री गाडेकर व इतर यांचे अतिक्रमण आहे. ऊसाची तोड झाल्यानंतर ४८४ मीटर काम करता येईल. |
| १७ | २३८ | ०-२७ | २४० | सदर प्लाटचे दक्षिण बाजुकडील शेतकऱ्यांचे अतिक्रमण असल्यामुळे ८७ मीटर लांबीचे काम बाकी |
| १८ | २२९ | ०-९८ | ५७५ | पूर्व व पश्चिम बाजुकडील शेतकऱ्यांचे अतिक्रमणामुळे काम बाकी |
| १९ | १२१/ब-१, १२१/अ२ कनकुरी | ०-७९ ०-७४ | ५०८ | सदर गटाची मोजणीनुसार हद्दीच्या खुणा दि. ३०.०१.२०१० रोजी दाखविण्यात आल्या अद्याप नकाशा प्राप्त झ ालेला नाही. |
| २० | १२४/२ब/२/ १ शिर्डी | ०-६० | ३१३ | सदर प्लॉटचे उत्तर बाजुकडील शेतकरी श्री कांतीलाल लोढा यांनी जमिनीची वाटणी हिस्सा: मोजणी करणेकामी अर्ज केलेला आहे. तुर्त उत्तर बाजूस कंम्पाऊड करु नये अशी तोडी हरकत घेतली आहे. |
| २१ | १२४/२ब/२/ २ शिर्डी | ०-६० | ३१४ | सदर प्लॉटचे उत्तर बाजुकडील शेतकरी श्री कांतीलाल लोढा यांनी जमिनीची वाटणी हिस्सा: मोजणी करणेकामी अर्ज केलेला आहे. तुर्त उत्तर बाजूस कंम्पाऊड करु नये अशी तोडी हरकत घेतली आहे. |
| | | **एकूण** | **३५०२.००** | |

उपरोक्तप्रमाणे २१ प्लॉटचे एकूण १०६५५ मी. लांबीचे तारकंम्पाउंड कामापैकी अ.क्र. १ ते १४ या प्लॉटचे ७१५३ मी. लांबीचे तारकम्पाऊंडचे काम ठेकेदार यांनी पूर्ण केले आहे. अ.क्र. १५ ते १७ या प्लॉटचे ८८८ मी लांबीचे तार कम्पाउंडचे काम पूर्ण केलेले आहे. अ.क्र. १७ ते २१ या प्लॉटचे संपूर्ण काम बाकी आहे.

ठेकेदार यांना दिलेल्या वाढीव मूदतीत काम पूर्ण झाले नाही. ठेकेदार श्री. आर.एल. भुतडा, कोपरगांव यांनी दि. २८/०१/२०१० रोजीचे पत्रान्वये तार कंम्पाऊंड करावयाचे प्लॉटचे हद्दी कायम नसल्याने एक महिन्यापासून काम बंद असून प्लॉटचे हद्दी कायम करुन मिळणेबाबत अथवा नविन प्लॉट उपलब्ध करुन द्यावा असे कळविले आहे.

ठेकेदार यांची वाढीव मूदत दि. ३०/०१/२०१० रोजी संपुष्टात आलेली आहे. उपरोक्तप्रमाणे सात प्लॉटचे तार कंम्पाऊड करावयाचे बाकी असलेल्या प्लॉटमध्ये लगतचे शेतकऱ्यांचे असलेले अतिक्रमण काढणेकामी कालावधी लागणार असल्याने जसे प्लॅट उपलब्ध होतील तसे काम करावे लागणार आहे. ठेकेदार यांना उर्वरीत कामासाठी ठरावीक असा कालावधी देता येता येणार नाही. त्यामुळे कामासाठी जसजसे प्लॉट उपलब्ध होतील त्यानुसार ठेकेदार यांचे कामाची वाढीव मूदत देणेस हरकत नाही असे मत आहे.

**०४. <u>श्री साई प्रसादालय येथील कर्मचारी पार्किंग शेड उभारणी कामाचे मुदत वाढीबाबत...</u>**

संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथिल श्री साई प्रसादालयाचे कर्मचाऱ्यांकरीता वाहन पार्किंगची व्यवस्था करणेकामी पार्किंग शेड उभारणीचे काम ठेकेदार ईश्वर पंढरीनाथ जंजीरे यांना जा.नं.१११११६/ २००९ दि.०३/०९/२००९ रोजीचे कार्यादेशान्वये देणेत आलेले आहे. कार्यादेशान्वये काम पूर्ण करण्याचा कालावधी ( दि.१३/०९/२००९ ते १२/१२/२००९) तीन महिने होता. परंतु सदरचे मुदतीत ठेकेदार यांनी काम पूर्ण केले नाही. दि. १०/१२/२००९ व दि. १९.०२.२०१० रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांनी काम करतांना त्यांना आलेल्या खालील अडचणींमुळे मुदतीत काम करता आले नाही, असे कळविले आहे.

१. उत्सव काळात साई भक्तांची गर्दी वाढल्यामुळे काम पंधरा दिवस बंद करावे लागले.

२. पावसामुळे पंधरा दिवस काम बंद करावे लागले.

३. स्ट्रक्चरल स्टील एक महिना उशिरा मिळाल्यामुळे काम बंद ठेवावे लागले.

उपरोक्त कारणामुळे काम पुर्ण होणेस विलंब झाला करीता दोन महिना मुदतवाढ मिळणेची विनंती ठेकेदार यांनी केली आहे.

ठेकेदार यांनी दि. ३०/०१/२०१० रोजी काम पूर्ण केले आहे. म्हणजे दिलेल्या मुदतीपेक्षा कामांस ४९ दिवस विलंब झालेला आहे. तरी उपरोक्तप्रमाणे ठेकेदार यांनी केलेल्या विनंतीवरुन त्यांना कामात आलेल्या अडचणींचा विचार करता दि. ३०/०१/२०१० पर्यंत मुदतवाढ देणेस हरकत नाही .

**निर्णय क्र.२९० उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेल्या कामांसाठी संबंधित ठेकेदारांना मुदतवाढी देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८ संस्थानचे नविन पाणीपुरवठा योजनेकरिता नविन जलशुद्धीकरण केंद्र उभारणे, ओव्हरहेड टँक उभारणे, नविन जलवाहिन्या टाकणे इ.कामासाठी नव्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानची भविष्यातील वाढत्या पाण्याची गरज लक्षात घेता साठवण तलाव ते ओव्हरहेड टँक व ओव्हरहेड टँक ते जुने प्रसादालय परिसर, धर्मशाळा, द्वारावती , नविन प्रसादालय, नविन भक्त निवासस्थान (५०० रुम), साईआश्रम प्रकल्प व साईगार्डन इत्यादी प्रकल्पांसाठी नविन जलवाहिन्या टाकणे,नविन वाढीव मोठया क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे, नविन ओव्हरहेड टँक उभारणे इत्यादी कामासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. किर्लोस्कर कन्सलटंटस् लि. पुणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांनी कामास सुरुवात केली व डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट (DPR) तयार केला. सदरचे DPR नुसार त्यांनी वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्ट (WTP) इंटरमेजिएट स्टेजला (२०२५) डिझाईन केला. सदरचे DPR मध्ये त्यांनी ८.२५ MLD क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र (WTP) १६ तास पंपींग गृहीत धरुन डिझाईन केले. परंतू १६ तास पंपीगमध्ये ८.२५ ML पाणी मिळण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता जवळपास १२.४० MLD इतकी येते. कन्सल्टंट यांनी केलेल्या प्लॅन्टचे डिझाईन व अंदाजपत्रकामध्ये अशाप्रकारे मुलभूत व मोठया स्वरुपाची त्रुटी आढळून आलेली आहे. संस्थानला सदरचा जलशुध्दीकरण केंद्र प्रकल्प पूर्णतः संगणकीकृत व ॲटोमॅटीक करावयाचा आहे. परंतू किर्लोस्कर कन्सल्टटंस्, पुणे यांना प्लॅन्ट ऑटोमेशन बाबत काही माहिती दिसुन येत नाही. तसेच निविदेतील अंदाजपत्रकामध्ये त्यांनी प्लॅन्ट ऑटोमेशनसाठी ढोबळ स्वरुपात (Lump Sum) रुपये १.०० कोटी रक्कम नमुद केलेली आहे. सदर प्लॅन्ट ऑटोमेशनचे काहीही स्पेसिफिकेशन्स् त्यांनी नमुद केलेले नाहीत. सदर प्रकल्पासाठी कन्सल्टंट यांनी सादर केलेल्या निविदेमध्ये ब-याच त्रुटी आढळून आल्या आहेत. त्या संस्थानने दुरुस्त केल्या आहेत.अशा प्रकारे किर्लोस्कर कन्सल्टंटस् प्रा.लि.पुणे यांचेकडून देण्यात येणारी सेवा समाधानकारक नसल्याचे आढळून आले आहे.

सदर प्रकल्प महत्वाचा व मोठया स्वरुपाचा असून त्यासाठी किर्लोस्कर कन्सल्टंट यांचे कडून पुढील सेवा घेणे उचित होणार नाही असे मत आहे. तसेच सध्या ठेकेदारांना विक्री करण्यात आलेल्या निविदांमध्ये मोठया प्रमाणात बदल व सुधारणा कराव्या लागणार आहेत. त्यासाठी किर्लोस्कर कन्सल्टंट यांची सेवा खंडीत करून प्लॅन्ट ऑटोमेशनबाबत माहिती असलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नव्याने नियुक्ती करण्यात यावी असे मत आहे.

किर्लोस्कर कंन्सल्टंट यांना जा.नं.३३६१, दि.२०-०२-२०१० चे पत्रान्वये त्यांची नेमणूक संपुष्टात का आणू नये, याबाबत स्पष्टीकरण मागणारी नोटीस पाठविण्यात आलेली आहे. तसेच जा.नं.३४०४, दि.२०-०२-२०१० चे पत्राव्दारे सदर कामाचे दहा निविदाधारकांना फेर निविदा मागविण्यात येत असलेबाबत कळविण्यात आलेले आहे.

दिनांक २३-०१-२०१० रोजी संस्थानचे बांधकाम विभाग प्रमुख, पाणी पुरवठा विभाग प्रमुख, पाणी पुरवठा विद्युत पर्यवेक्षक व बांधकाम कनिष्ठ अभियंता यांनी बारामती येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी उभारलेला ६.५० MLD क्षमतेच्या संगणकीकृत जलशुध्दीकरण केंद्राची पाहणी केली. सदरचा प्रकल्प हा पुर्णतः ऑटोमॅटिक केलेला आहे. सदरचे प्लँटचे ठिकाणी SCADA (Supervisory Control And Data Acquisition) तंत्रज्ञान वापरुन व PLC (Programmable Logic Controller) व्दारे व संगणकाच्या सहाय्याने एका ठिकाणाहून हाताळता येतो. सदर प्लँटचे रॉ वॉटर पंप, ट्रिटेड वॉटर पंप, क्लेरीफ्लॉक्युलेटर, फिल्टर्स, इ. चे पंपस् तसेच सर्व व्हॉल्व संगणकाच्या सहाय्याने एका ठिकाणाहुन हाताळता येतात. सदरच्या सिस्टिममध्ये रॉ-वॉटरची PH Value व Turbidity तपासण्यात येते. त्यानंतर ॲलम व क्लोरीनचा डोस दिल्यानंतर परत पाण्याची PH Value व Turbidity तपासण्यात येते व त्यानुसार ॲलम व क्लोरीनचा डोस नियंत्रीत करण्यात येतो. त्यानंतर शुध्द पाण्याची PH Value व Turbidity तपासण्यात येते. हे सर्व संगणकाच्या स्क्रिनवर एक ठिकाणी पहावयास मिळते व त्यानुसार संगणकाच्या सहाय्याने सर्व सिस्टिम नियंत्रित करण्यात येते.

संस्थानचे उपरोक्त प्रकल्पासाठी यापुर्वी कन्सल्टंटचे नियुक्तीसाठी प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३-०१-२००९ सभेतील निर्णय क्रं.१४ अन्वये निविदा सादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटी करून किर्लोस्कर कंन्सल्टंट यांची प्रकल्पाच्या किमतीचे ३% (सर्व्हिस टॅक्ससह) इतक्या फि वर नेमणूक करणेस मान्यता देणेत आली होती. त्यावेळी युनिटी कंन्सल्टंट प्रा.लि.पुणे यांनी वाटाघाटीनंतर ५.१८% (सर्व्हिस टॅक्ससह) असा दर देवू केला होता व त्यानुसार ते व्दितीय निम्नतम होते. इतर तीन निविदा सादरकर्ते अपात्र होते.

वरीलप्रमाणे शिरपुर व बारामती येथील प्रकल्पासाठी इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि पुणे यांनी प्रकल्पाचे ठेकेदार लक्ष्मी सिव्हिल इंजिनियरींग सर्व्हिसेस प्रा.लि.कोल्हापुर यांना जलशुध्दीकरण केंद्राचे (WTP) हायड्रॉलिक डिझायनिंग, स्ट्रक्चरल डिझायनिंग, ऑटोमेशन डिझायनिंग, सुपरव्हिजन या सेवा पुरविलेल्या आहेत. संस्थानचे उपरोक्त प्रकल्पासाठी कन्सल्टन्सी सेवा पुरविणेबाबत त्यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी प्रकल्पाच्या किंमतीचे ३ % अधिक सर्व्हिस टॅक्स या फी मध्ये सेवा देण्याचे मान्य केले असून दि. २१-०२-२०१० च्या ई-मेल व्दारे तसे संस्थानला कळविले आहे.

तरी उपरोक्त प्रकल्पाबाबत खालील बाबींविषयी निर्णय होणे आवश्यक आहे.

१) सध्याच्या निविदा रद्द करणे.
२) किर्लोस्कर कंन्सल्टंट यांची नेमणूक रद्द करुन इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि पुणे यांची कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणे व त्यासाठी त्यांना आदा करावयाची फी त्यांचेशी चर्चा व वाटाघाटी करुन ठरविणे.
३) इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे यांचेकडून प्रकल्पाचे डीझाईन व निविदा तयार करून घेवून फेरनिविदा मागविणे.

**निर्णय क्र.२९१ यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्याच्या निविदा रद्द करुन किर्लोस्कर कन्सल्टंटस् लि., पुणे यांची नेमणूक रद्द करण्यात यावी. तसेच, बारामती व शिरपूर येथील पाणीपुरवठा योजनेचे काम इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे या संस्थेची संस्थानचे नविन पाणीपुरवठा योजनेकरिता नविन जलशुद्धीकरण केंद्र उभारणे, ओव्हरहेड टँक उभारणे, नविन जलवाहिन्या टाकणे इ.कामासाठी नव्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात यावी आणि त्यांचेकडून प्रकल्पाचे डिझाईन व निविदा तयार करुन घ्याव्यात व त्यानुसार नव्याने निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९ श्रीमती कलावती वसंतराव डेंगळे व इतर यांची मौजे निमगांव-कोऱ्हाळे येथील गट नं १८२/१ पैकी मधील ०१ हेक्टर जमीन विकत घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्रीमती कलावती वसंतराव डेंगळे, श्री. प्रविण वसंतराव डेंगळे व श्री. सतिश वसंतराव डेंगळे यांनी त्यांची मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८२/५ पैकी मधील ०१ हेक्टर जमीन संस्थानने रक्कम रुपये दोन लाख ऐंशी हजार मात्र प्रति आर या दराने विकत घ्यावी, म्हणून दिनांक ०१ जानेवारी, २०१० रोजी विनंतीवजा प्रस्ताव दिला आहे.

अर्जदाराने अर्जात गट नंबर १८२/५ मधील असा उल्लेख केला आहे, तथापि अर्जासोबत जोडलेल्या ७/१२ उताऱ्यांमध्ये सदर अर्जदाराचा गट नंबर १८२/१ असा आहे.

मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८२/५ चा ७/१२ उतारा पाहिला असतां, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे :

| गावांचे नांव व गट नंबर | क्षेत्र | कब्जेदार सदरी असलेली नांवे व त्यांचे क्षेत्र | इतर हक्कात असलेल्या नोंदी |
|---|---|---|---|
| मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नंबर १८२/१ | ०७ हे १२ आर<br>०० हे १२ आर<br>पोटखराबा<br>०७ हे २४ आर | सौ.कलावती वसंतराव डेंगळे क्षे १=१७<br>प्रविण वसंतराव डेंगळे क्षे ०=३७<br>शारदा भाऊसाहेब कातोरे क्षे १=००<br>राजु भाऊसाहेब कातोरे क्षे १=००<br>सुनिल तात्या आढाव क्षे ०=६०<br>सौ.कुसूम तात्या आढाव क्षे०=६०<br>म.वा. सुनिल तात्या आढाव<br>अनिल तात्या आढाव<br>सौ.राणी दिलीप मन्तोडे<br>मिना तात्या आढाव<br>क्र.१,२,४ अ.पा.क. कुसुम तात्या आढाव क्षे ०=८०<br>म.वा. प्रविण वसंतराव डेंगळे<br>सतिश वसंतराव डेंगळे<br>कलावती वसंतराव डेंगळे क्षे १=३८ | जुनी शर्त<br>निमगांव सो.इ.प.क.घे. प्रविणचा हिस्सा<br>साई नागरी सह.पतसंस्था ग.ख.क.घे.<br>सुनिल तात्या आढावचा हिस्सा<br>आंध्रा बँक शाखा शिर्डी ग.ख.क.घे.<br>राजु भाऊसाहेबचा हिस्सा<br>आंध्रा बँक शाखा शिर्डी ग.ख.क.घे.<br>कलावती,सतिश, प्रविणचा हिस्सा<br>विहीर एक<br>नवीन विहीर एक तात्या शंकर आढाव |

**(ब) जमीन खरेदी करणेपूर्वी विचारात घ्यावयाच्या बाबी :**

**०१.** उपरोक्त ७/१२च्या उताऱ्यावरील नोंदीचे अवलोकन केले असता, सौ. कलावती वसंतराव डेंगळे व प्रविण वसंतराव डेंगळे या दोघांचे क्षेत्र ०१ हे १७ आर + ०० हे ३७ आर असे एकूण क्षेत्र ०१ हे ५४ आर दिसून येते तर श्री.प्रविण वसंतराव डेंगळे, श्री. सतिश वसंतराव डेंगळे व सौ. कलावती वसंतराव डेंगळे या तिघांचे क्षेत्र ०१ हे ३८ आर दिसून येते. या दोन क्षेत्रांपैकी नेमके कोणत्या क्षेत्रातून, कोणाचे क्षेत्र देणार याचा प्रस्तावात स्पष्ट उल्लेख नाही.

**०२.** तसेच उताऱ्यामध्ये पिकपहाणी या सदरी सोयाबीन, बाजरी, कडवळ अशी पिक पहाणी आहे. या पिक पहाणीवर विहीर पाणी अथवा पाटपाणी असा उल्लेख नाही. ही जमीन जिरायत असल्यास, वरील परिच्छेदात अर्जदार तिघांचे जे क्षेत्र नमूद केले आहे, त्या ०१ हे ३८ आर क्षेत्रातून ०१ हेक्टर जमीन संस्थानने खरेदी केल्यास अर्जदारांना ३८ आर क्षेत्र शिल्लक राहणार आहे. जमीन जिरायत असल्याने, ३८ आर क्षेत्राचा जमिनीचा तुकडा शिल्लक राहिल्यास तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याविरुध्द व्यवहार होणार असल्याने, मा. दुय्यम निबंधक खरेदीखताची नोंदणी करणार नाहीत. त्यामुळे जमिनीची प्रत्यक्ष पहाणी करुन याबाबत निर्णय घेणे उचित राहील.

**०३.** यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर १८२/५ पैकी मधील ०२ हेक्टर ३७ आर जमीन संस्थानने माहे जुलै / सप्टेंबर, २००९ मध्ये खरेदी घेतलेली आहे. त्या जमिनीचे लगत अर्जदार सौ. डेंगळे व इतर २ यांची जमीन असल्यास संस्थानने जमीन विकत घेणे उचित राहील. तथापि. अ.नं. ०२ मध्ये नमुद केलेप्रमाणे, तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याविरुध्द व्यवहार होऊ नये म्हणून, अर्जदार यांचे संपूर्ण क्षेत्र ०१ हे ३८ आर खरेदी करणे भविष्यातील विकास कामांच्या दृष्टीने योग्य व उचित राहील.

**०४.** तसेच सदर जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमीन खरेदीनंतर जमिनीची सरकारी मोजणी करणेकरीता संपूर्ण गट नंबर १८२ चे मोजणी शुल्क भरुन, गट नंबर मधील लगतच्या सर्व खातेदारांच्या संमतीदाखल स्वाक्षऱ्या घेऊन मोजणी अर्ज सादर करावा लागेल. लगतच्या खातेदारांनी संमती न दिल्यास याबाबत सक्षम न्यायालयात दावा दाखल करुन जमिनीची मोजणी करुन घ्यावी लागेल.

**०५.** इतर हक्कात, जुनी शर्त अशी असली तरी जमीन खरेदी करता येईल, तथापि संस्थानला इमारतीचे बांधकाम करावयाचे ठरल्यास, त्यावेळी प्रचलित असलेल्या मुल्यांकन दरानुसार जमिनीच्या होणाऱ्या एकूण किंमतीवर ५० टक्के नजराणा रक्कम शासनाकडे भरावी लागेल, त्यानंतरच बिनशेतीची परवानगी मिळेल.

**०६.** इतर हक्कात, निमगांव विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीने प्रविणचा हिस्सा तारण घेतलेला आहे, सदर सोसायटीची कर्जाची थकबाकी जमीन खरेदीपूर्वी पूर्ण आदा करणे आवश्यक राहील.

**०७.** इतर हक्कात, आंध्रा बँक, शाखा शिर्डी यांचेकडेस सौ.कलावती, श्री. सतिश व श्री. प्रविण यांचा हिस्सा नजरगहाण आहे, त्यामुळे सदर बँकेची थकबाकी जमीन खरेदीपूर्वी पूर्ण आदा करणे आवश्यक राहील.

**०८.** इतर हक्कात, विहीर - एक अशी नोंद आहे, जमीन पहाणीचे वेळेस संस्थान खरेदी करणार असलेल्या क्षेत्रात विहीर येते किंवा नाही याची पहाणी करणे आवश्यक राहील.

**(क) जमिनीच्या किंमतीविषयी :**

सन २०१० चे मुल्यांकन दरानुसार, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८२/१ मधील ०१ हेक्टर जमिनीची किंमत रक्कम रुपये ७०,००,०००/- मात्र होत आहे, प्रति आर रुपये ७०,०००/- मात्र अशी येत आहे.

यापुर्वी संस्थानने पूर्वाश्रमीचे जमीनमालक श्री. सचिन भाऊसाहेब बनकर, श्री. विजय तुळशीराम कोते व इतर ०५ यांची मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८२/५ पैकी मधील क्षेत्र ०२ हेक्टर ३७ आर रक्कम रुपये २,५१,०००/- मात्र प्रति आर या दराने माहे जुलै / सप्टेंबर, २००९ मध्ये खरेदी केलेली आहे.

अर्जदार यांनी जमिनीची किंमत रुपये २,८०,०००/- मात्र प्रति आर मिळावी, अशी मागणी केलेली आहे.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेल्या बाबींचा विचार होऊन खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती :

०१. श्रीमती कलावती वसंतराव डेंगळे व इतर २ यांची मौजे गट नंबर १८२ पैकी मधील जमिनीची पहाणी करुन, ०१ हेक्टर जमिनीऐवजी ०१ हेक्टर ३८ आर जमीन खरेदी करणेत यावी किंवा कसे ?

०२. जमिनीची खरेदी करावयाची ठरल्यास अर्जदार यांचेशी समक्ष चर्चा-वाटाघाटी करुन ०१ हेक्टर ३८ आर जमिनीचा प्रति आर दर ठरविणे.

०३.     जमीन खरेदी करावयाची ठरल्यास अर्जदार यांची लेखी संमती घेऊन, त्यांचेवर असलेले विविध सोसायटी / बँका यांची कर्ज थकबाकी जमिनीच्या किंमतीतून आदा करणे, खरेदीखताचे वेळेस जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम आदा करणे, उर्वरित २० टक्के रक्कम संस्थानचे जमिनीस नांव लागलेनंतर, रितसर सरकारी मोजणी झालेनंतर प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात आदा करणे, खरेदीखतासाठी आवश्यक मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, सरकारी जमीन मोजणी शुल्क भरणे, संस्थान वकिलांकडून सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणे, खरेदीखताचा मसुदा तयार करुन घेणे आदि कायदेशीर बाबींची पुर्तता करणेसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२९२  श्रीमती कलावती वसंतराव डेंगळे व इतर यांनी माघार घेतल्याने सदरहू विषय रद्द करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०  साईटेक (आय.टी.) प्रकल्पासाठी श्रीसाई प्रसादालय उत्तरेकडील पहिल्या माळयावरील हॉलमध्ये डाटा सेंटर व इतर अनुषंगिक सुविधा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत श्री.के.व्ही.रमणी यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणेची कार्यवाही करणेत येत आहे. सध्याची संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाची रुम छोटया आकाराची असुन सदर जागा नवीन सर्व्हर ठेवणे, प्रकल्पाचे कामकाज करणे आदिंसाठी अपुरी पडणार आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान विभाग नवीन प्रसादालय इमारतीमधील व्ही.आय.पी. डायनिंग हॉल नं ३ (एरिया १३६९ स्के.मी.) मध्ये स्थलांतरीत करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२०१० रोजीचे सभेमध्ये तत्वत: मान्यता मिळाली आहे.

त्यास अनुसरुन इकडील विभागामार्फत माहिती तंत्रज्ञान विभाग नविन प्रसादालय इमारतीमधील व्ही.आय.पी. डायनिंग हॉल नं. ३ (एरिया १३६९ स्के.मी.) मध्ये स्थलांतरीत करणेकामी खालीलप्रमाणे कामे करावी लागणार आहेत.

**अ)** डाटा सेंटर करीता प्रसादालय इमारतीचे व्हि.आय.पी. डायनिंग हॉल नं. ३ मध्ये Light weight bricks वापरुन विट बांधकाम करणे. श्री साईप्रसादालय इमारतीचे आर.सी.सी. कन्सलटंट श्री. प्रणय वर्मा, रजानी असोसिएटस्, मुंबई यांचे सल्ल्यानुसार सदर कामाकरीता Light weight bricks वापरण्यात येणार आहेत. तसेच, फॉल्स सिलींग, ॲल्यु. पार्टिशन व फर्निचर इ. सुविधांचा सदरहु कामात समावेश आहे. यासाठी रक्कम रु. २३,१९,१३५.०० मात्र खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | Description of work | Estimated Amount |
|---|---|---|
| A) | Civil work (including faulse ceiling) | ६,७०,२२०.०० |
| B) | Alluminium Partition | ३,२१,६८०.०० |
| C) | Furniture work | १२,१६,८००.०० |
| | Total | २२,०८,७००.०० |
| | Add Contingencies ५% | १,१०,४३५.०० |
| | **Total Estimated Cost for Data Centre** | **२३,१९,१३५.००** |

**ब)** डाटा सेंटर पासुन सर्व संस्थान परिसरातील संगणक जोडणेकरीता केबल टाकावी लागणार आहे. याकरीता खोदकाम करणे व चेंबर बांधणे यासाठी रु. ८,८१,१९०.०० मात्र खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | Description of work | Estimated Amount |
|---|---|---|
| D | Civil work for laying of cables, road crossings & chembers | ८,३९,२२९.०० |
| | Add contingencies ५% | ४१,९६१.०० |
| | **Total Estimated cost** | **८,८१,१९०.००** |

उपरोक्त प्रमाणे सिव्हील कामे, फर्निचर कामे, फॉल्स् सिलींग, ॲल्युमिनीयम पार्टिशन व केबलींगसाठी नाली खोदणे चेंबर बांधणे इत्यादींसह सर्व कामे करणेकरीता एकुण रक्कम रु. ३२.०० लाख मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

साईटेक प्रकल्पांकरीता आय.टी. विभागामार्फत Cognizant Technology System, Pune (CTS) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे कक्षात दि. २०/०२/२०१० रोजी Saitech Project संदर्भात बैठक झाली. यावेळी झालेल्या चर्चेनुसार साईटेक प्रकल्पात स्मोक डिटेक्टर, लिकेज डिटेक्टर इ. इक्वीपमेंट बसवावे लागणारआहेत. याकरीता CTS यांच्या स्टॅण्डर्ड रिक्वायरमेंट नुसार सदरचे काम अचुकतेने करणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे खर्चास व संस्थान मार्फत करावयाचे कामांचे कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२९३  उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१  श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नविन तपासण्यांचे दर व सुधारित रुम चार्जेस मान्यतेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय उपचार घेण्यासाठी भरती झालेल्या रुग्णांना अंतररुग्ण म्हणून २४ तासांसाठी रुम चार्जेस ट्वीन शेअरींग रु.२२०/-, स्पेशल एसी रु.५००/- व डिलक्स रुमसाठी रु.६००/- असे आहे. निर्णय क्र.१९६/ १६.०३.२००९ अन्वये सदर दर दरपत्रकास मंजूरी मिळाली आहे. सध्या

हॉस्पिटल पुर्ण क्षमतेने चालत आहे. रुग्णांची स्पेशल व डिलक्स रुमसाठी मागणी वाढली आहे. सदर दर बाहेरील लॉज/ हॉटेलच्या दरांपेक्षा कमी असल्याने रुग्णांचे नातेवाईक रुग्णांचे नावाखाली स्पेशल व डिलक्स रुमची मागणी करुन रुग्णांबरोबर राहतात असे निदर्शनास आले आहे. यामुळे अत्यावश्यक असलेल्या रुग्णांना अंतररुग्ण म्हणून सेवा देण्यास अडचणी येतात.

आवश्यकता असलेल्या गरजू रुग्णांना सेवा देण्याच्या दृष्टीने स्पेशल- एसी व डिलक्स व ट्वीन शेअरींग रुम चार्जेस रु.५००/-, रु.६००/- व रु.२२०/- वरुन रु.७००/-, रु.१०००/- व रु.३००/- असे करण्याबाबत व नव्याने सुरु झालेल्या सोनोग्राफी विभागात नविन तपासण्यांचे प्रस्तावित दर पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | तपासणी | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १ | Pelvis | ३००/- |
| २ | Joints | ५००/- |
| ३ | Sonomammography | ५००/- |
| ४ | Local examination | ३००/- |
| ५ | Guided procedure | ३५०/- |

अशाप्रकारे, सुधारीत रुम चार्जेस व सोनोग्राफी नवीन तपासण्यांचे प्रस्तावित दर मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२९४ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नविन तपासण्यांचे दर व सुधारित रुम चार्जेस आकारण्यास व त्याची कार्यवाही दि.१५.०३.२०१० पासून करण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय न २२ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयालॉजिस्ट व कार्डीयाक सर्जन यांचे कामकाजाची कार्यपध्दती निश्चित करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयालॉजीस्ट व कार्डीयाक सर्जन हे आपसातल्या किरकोळ भांडणांचे कारणावरुन थेट मा.विश्वस्तांकडे जातात. कायम आपसात भांडत असतात याकारणांमुळे असे ठरले होते की, स्थानिक विश्वस्त तसेच मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी सो. व सर्व कार्डीओलॉजीस्ट/कार्डीयाक सर्जन यांचे उपस्थितीत त्यांचे कामकाजाची कार्यपध्दती निश्चित करणेसाठी सभा बोलविणेत यावी. त्यानुसार दि.०५-१२-२००९ रोजी मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचे समोर सर्व कार्डीओलॉजीस्ट व कार्डीयाक सर्जन यांचे सभेचे आयोजन करणेत आले होते. सदर सभेस मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.उप कार्यकारी अधिकारी सो, व मा. वैद्यकिय संचालक तसेच उप वैद्यकिय संचालक हे उपस्थित होते. तसेच यापुर्वीही दि.२८-११-२००९ व ०४-१२-२००९ रोजी मा.विश्वस्त डॉ.ई.बी.गोंदकर सो. मा.कार्यकारी अधिकारी सो यांचेसमवेत यासंदर्भात मिटींग झालेली आहे.

उपरोक्त विषयांवर तदनंतर सखोल चर्चा होऊन पुढील प्रमाणे निर्णय घेणेत आले आहेत व कार्डीयालॉजीस्ट / कार्डीयाक सर्जन यांचेबाबत नियमावली बनवून ती मा.व्यवस्थापन समितीसमोर विचारार्थ सादर करणेत यावी असे मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी सो.यांचेशी झालेल्या चर्चेअंती ठरले आहे.

* **कार्डीयालॉजी विभागातील कामकाजाची कार्यपध्दती** *

१) डॉ.हरिष बजाज- यांचे ओपीडी वार- सोमवार (डॉ.राहूल पाटील यांचे ओपीडी दिवस सोडून) मंगळवार, बुधवार व गुरुवार (डॉ.बजाज यांच्या नावाने रेफर केलेल्या केसेस व नविन पेशंट)

२) डॉ.गौरव वर्मा यांचे ओपीडी वार-शुक्रवार व शनिवार ( डॉ.वर्मा यांच्या नावाने रेफर केलेल्या केसेस व नविन पेशंट )

३) व्हीजीटींग कार्डीओलॉजीस्ट)
डॉ.राहूल पाटील- पहिला व तिसरा सोमवार) त्यांच्या नावाने रेफर केलेल्या केसेस
डॉ.मनोज चोपडा- सर्व बुधवार)
डॉ.विनोद व्हिजन- सर्व शुक्रवार)
डॉ.धर्माधिकारी- सर्व शनिवार)

४) ज्या कार्डीओलॉजीस्टची ओपीडी डयुटी नाही त्यांनी सकाळच्या वेळेत कॅथलॅब मध्ये प्रोसीजर्स कराव्यात.

दुपारच्या वेळेत त्यादिवशी ओपीडी असलेल्या कार्डीओलॉजीस्टने कॅथलॅब मध्ये प्रोसीजर्स कराव्यात. शक्यतो फक्त इमर्जन्सी सोडून इतर पेशंटसाठी अपॉईंटमेंट सिस्टीमनेच कॅथलॅबमध्ये प्रोजीजर्स कराव्यात.

५) कॅथलॅबचे वेळापत्रक- कॅथलॅब ही सकाळी ९-०० ते रात्री १०-०० वाजेपर्यंतच सुरु राहील. यावेळेत बदल होता कामा नये.

६) पुर्णवेळ व व्हीजीटींग कार्डीओलॉजीस्ट यांनी ओपीडी ही ओपीडी नं. १० व ११ मध्येच पहावी यामध्ये बदल होता कामा नये. कुठल्याही परिस्थितीत ओपीडी ही कॅथलॅब विभागात, इकोरुम किंवा सीआरयू मध्ये पाहू नये ही बाब व्हीजीटींग कार्डीओलॉजीस्ट यांनी काळजीपुर्वक पाळावी.

७) डॉ.गौरव वर्मा यांना CAG, PTCA ,PTRA करण्याची परवानगी देण्यात येत आहे. परंतू BMV, BPV, BVA, ASD/ VSD/ PDA closer हे पुढील आदेश व वैद्यकिय संचालक यांचेकडून मुल्यमापन होईपर्यंत स्वतंत्रपणे करु नयेत.

८) व्हीजीटींग कार्डीओलॉजीस्ट यांना त्यांचे पीआरओ/ प्रतिनिधी/ सहाय्यक यांना हॉस्पिटलच्या परिसरात आणण्याची परवानगी नाही. वैद्यकिय संचालक यांच्या परवानगी शिवाय हॉस्पिटल परिसरात पीआरओ/प्रतिनिधी/सहाय्यक यांना आणू नये. सहाय्यक हा एमबीबीएस/एमडी/डीएनबी असेल तर त्यांचा बायोडाटा वैद्यकिय संचालक/उप वैद्यकिय संचालक यांचेकडे सादर करुन त्यांची परवानगी घ्यावी लागेल.

९) वेळोवेळी हदय विकारासाठी जीवनदायी योजनेमध्ये केलेल्या नियमांप्रमाणेच कामकाज करावे त्याचे उल्लंघन करु नये. उल्लंघन झाल्यास संबंधीत डॉक्टरांच्या चार्जेसमधून वसुली केली जाईल.

*** सीव्हीटीएस विभागातील कामकाजाची कार्यपध्दती ***

१) सर्व व्हीजीटींग व पुर्णवेळ कार्डीयाक सीव्हीटीएस सर्जन यांनी ओपीडी व फॉलोअपचे पेशंटस् ओपीडी नं.७ व १० मध्येच पहावीत. ओटी कॉम्पलेक्समध्ये व सीआरयु-१ मध्ये पेशंटला बोलविण्यास व पहाण्यास सक्त मनाई आहे.

२) सीव्हीटीएस ओटीची वेळ फक्त सकाळी ८-०० ते रात्री १०-०० ही राहील.

३) दररोज फक्त तिन ओपन हार्ट सर्जरीच्या केसेस केल्या जातील.

*** कार्डीयाक सर्जन यांचे ओपीडी/ओटी वेळापत्रक. ***

i. डॉ.विद्युतकुमार यांचे ओपीडी वार- सोमवार, बुधवार,गुरुवार व शनिवार हे रहातील.
डॉ.आशिष अग्रवाल- यांचे ओपीडी वार मंगळवार व शुक्रवार हे रहातील.
डॉ.कैचे यांनी बुधवारी व डॉ.वालीया यांनी शनिवारी त्यांच्या नावाने रेफर केलेल्या केसेस पहाव्यात.

ii. ज्या डॉक्टरांच्या नावाने केस रेफर केली असेल त्याच डॉक्टरांनी केस पहावी.

iii. डॉ.विद्युतकुमार सिन्हा यांनी मंगळवारी व शुक्रवारी तीन केसेस ऑपरेट कराव्यात, आणि सोमवार व गुरुवारी पहील्या दोन केसेस ऑपरेट कराव्यात. तिसरी केस तसेच रविवारच्या दोन केसेस डॉ.अग्रवाल यांना व्हॉलवच्या केसेस ऑपरेट कराव्यात. डॉ.अग्रवाल यांनी CABG केसेस वैद्यकिय संचालक यांच्या पुढील मुल्यमापनानंतरच करण्याची परवानगी राहील.

iv. डॉ.चैतन्य शेटे यांना स्वतंत्र सर्जरीकरणेसाठी सध्या परवानगी नाही.

पुढील काही दिवसात डॉ.शेटे यांचे स्वतंत्र सर्जरी बाबतचे मुल्यमापन केले जाईल व ते त्यात पात्र असल्याचे आढळल्यास त्यांना बुधवार व शनिवारी पहीली केस व्हाल सर्जरीची करण्यास परवानगी देण्यात येईल. उर्वरीत दोन केसेस व्हीजीटींग कार्डीयाक सर्जन ऑपरेट करतील. याव्यतिरिक्त डॉ.शेटे हे स्वतंत्र CABG करण्यास पात्र असल्याचे आढळून आल्यास त्यांना मंगळवार व शुक्रवारी पहीली केस करण्याची परवानगी देण्यात येईल व डॉ.विद्युत कुमार यांनी त्यानंतरच्या दोन केसेस कराव्यात.

*** डॉक्टर चार्जेस व जीवनदायी पॅकेज ***

१. चॅरिटेबल/सिव्हील सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील कॅथलॅब व सीव्हीटीएस ओटी मधील ऑपरेशन्स व प्रोसीजर्स साठीचे डॉक्टरचे चार्जेस दुस-या रुग्णालयांचा अभ्यास केलेनंतर बदल केले जातील. त्याचप्रमाणे जीवनदायी पॅकेजचे चार्जेसमध्ये ही कमी जास्त बदल करणेत येतील.

२. असे निदर्शनास आले आहे की, कॅथलॅब टेक्निशियन व फरप्युजनिष्ट यांना सहाव्या वेतन आयोगानुसार पगार देणेत येतो तरीही याव्यतिरिक्त त्यांना इंसेंटीव्ह देखील देण्यात येत आहे. त्यामुळे कॅथलॅब व सीव्हीटीएस ओटीमध्ये काम करणारे इतर कर्मचारीही पगाराव्यतिरिक्त इन्सेंटीव्हची मागणी करीत आहेत त्यामुळे असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, सर्वच कर्मचा-यांना एकच निकष लावण्याचा प्रस्ताव दुस-या रुग्णालयाचा अभ्यास करुन प्रस्तुत करण्यात यावा.

*** शिस्त ***

१. जागेच्या व पॅरामेडीकल कर्मचा-यांच्या कमतरतेमळे पुर्णवेळ तसेच व्हीजीटींग डॉक्टर्स यांनी ओपीडी व ओटी चे वेळापत्रक कटाक्षाने पाळणे बंधनकारक आहे.

२. अंतर्गत रुग्णांना इन्फेक्शन होऊ नये याकरीता पुर्णवेळ व व्हीजीटींग डॉक्टर्स यांनी ओपीडी ही ओपीडी विभागातच पहावी. रुग्णांची सुरक्षितता व शांततेस प्राधान्य दिले जाईल. याबाबतीत कुठल्याही प्रकारचा बेशिस्तपणा प्रशासनाकडून खपवून घेतला जाणार नाही.

३. कोणत्याही अंतर्गत अडचणी असल्यास वैद्यकिय संचालक/उप वैद्यकिय संचालक यांचे निदर्शनास आणून दयाव्यात व कोणीही अनाधिकृत मार्गाचा अवलंब करुन स्वतःचा हेतू साधण्याचा प्रयत्न करु नये किंवा प्रशासनाने पारीत केलेल्या नियमावलीच्या विरोधात प्रशासनावर दडपण आणण्याचा प्रयत्न करु नये.

तरी उपरोक्तप्रमाणे कार्डीयालॉजीस्ट व कार्डीयाक सर्जन यांचे कामकाजा बाबतची नियमावली मान्यतेस्तव सादर,

**निर्णय क्र.२९५ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयालॉजिस्ट व कार्डीयाक सर्जन यांचे कामकाजाची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.डॉ.पी.एल.तिवारी व स्थानिक विश्वस्तांनी हॉस्पिटल विषयासंदर्भात विशेष बैठक बोलावून वेगळा अंजेडा काढून अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२३ सन २००९-१० या वार्षिक औषधे खरेदीमधील सर्जिकल साहित्य वार्षिक मंजूर दराने खरेदीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या खालील सर्जिकल साहित्याकरीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| S. N. | Name of Drugs / Medicines | Name of Supplier | P.O. No. & Date | Make | Brand Name | Packing | Org. Tender Qty. | Rate Per IN Rs. | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Liq Eco Shield 1lit | Purva Enterprises, Aurangabad | 5398/ 05.05.2009 | Torrent | Torcilol ECO | 1 liter | 10 | 394.00 | 3940.00 |
| 2 | Sls Clips Horizontal Yellow | B.L. Lifesciences pvt. Ltd., New Delhi | 5339/ 05.05.2009 | Vitalitec, France | SLS | 1 box of 30 crtd. | 33 | 4212.00 | 138996.00 |
| 3 | Prolene 3-0 NW 838 | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | | 12 foils | 100 | 1393.00 | 139300.00 |
| 4 | Ethilon black monofilament 70cm 2-0 3/8 circle reverse cuttting 45mm NW3336 | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | | 12 foils | 60 | 754.00 | 45240.00 |
| 5 | Silkam black size size 2/0 25m reels code-289299 | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | Ethicon R823 | 6 foils | 12 | 1243.00 | 14916.00 |
| 6 | Silkam black size size 2 25m reels code-R826 | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | Ethicon R826 | 6 foils | 50 | 1536.00 | 76800.00 |
| 7 | Prolene 4-0 NW849, Single Needle | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | | 12 foils | 20 | 2997.00 | 59940.00 |
| 8 | Vicryl (undyed)coated braided. 90cm 2-0 1/2 circle taperpoint ct-1 needle 36mm code-VCP945h | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | Vicryl plus | 36 foils | 25 | 9870.00 | 246750.00 |
| 9 | Permicron braided polyester 2/0, 4 green /4 white suture 75cm per foil, double arm 1/2 circle round body with trocar point 17mm easyslide needle without pledgets | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | Ethibond 1/2circle taper cut 5 green 5 white code w10b52 | 6 foils | 15 | 16252.00 | 243780.00 |
| 10 | Permicron braided polyester 2/0, 4 green /4 white suture 75cm per foil, double arm 1/2 circle round body with trocar point 26mm easyslide needle with ptfe pledgets 6x3x1.5mm code -m0027733 | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | Ethibond 1/2circle taper cut 5 green 5 white code w10b77 | 6 foils | 100 | 20938.00 | 2093800.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 11 | ETO Paper 10"x200MTR. | Yoga Enterprises, Pune | 5443/ 05.05.2009 | Rups | | | 10 | 1294.80 | 12948.00 |
| | | | | | | | | | |
| 12 | ETO Paper 20"X200MTR. | Yoga Enterprises, Pune | 5443/ 05.05.2009 | Rups | | | 10 | 2444.00 | 24440.00 |
| | | | | | | | **Total Amt** | | **3100850.00** |

त्यानुसार पुरवठाधारकांनी पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सदरचे सर्जिकल साहित्याचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही रुग्णालयात पेशंटच्या सततच्या वाढणाऱ्या संख्येमुळे उपरोक्त सर्जिकल साहित्याचा वापर देखील वाढलेला आहे. तसेच कार्डीयाक ऑपरेशन थिएटर मधील ऑपरेशनच्या संख्येत वाढ झालेली आहे. त्यामुळे तुर्तास चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| S. N. | Name of Drugs / Medicines | Name of Supplier | P.O. No. & Date | Make | Brand Name | Packing | Add. Required Qty. | Rate Per IN Rs. | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Liq Eco Shield 1lit | Purva Enterprises, Aurangabad | 5398/ 05.05.2009 | Torrent | Torcilol ECO | 1 liter | 90 | 394.00 | 35460.00 |
| 2 | Sls Clips Horizontal Yellow | B.L. Lifesciences pvt. Ltd., New Delhi | 5339/ 05.05.2009 | Vitalitec , France | SLS | 1 box of 30 crtd. | 30 | 4212.00 | 126360.00 |
| 3 | Prolene 3-0 NW 838 | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | | 12 foils | 50 | 1393.00 | 69650.00 |
| 4 | Ethilon black monofilament 70cm 2-0 3/8 circle reverse cuttting 45mm NW3336 | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | | 12 foils | 50 | 754.00 | 37700.00 |
| 5 | Silkam black size size 2/0 25m reels code-289299 | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | Ethicon R823 | 6 foils | 15 | 1243.00 | 18645.00 |
| 6 | Silkam black size size 2 25m reels code- R826 | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | Ethicon R826 | 6 foils | 30 | 1536.00 | 46080 |
| 7 | Prolene 4-0 NW849, Single Needle | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | | 12 foils | 30 | 1393.00 | 41790.00 |
| 8 | Vicryl (undyed) coated braided. 90cm 2-0 1/2 circle taperpoint ct-1 needle 36mm code-VCP945h | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | Vicryl plus | 36 foils | 10 | 9870.00 | 98700.00 |
| 9 | Permicron braided polyester 2/0, 4 green /4 white suture 75cm per foil, double arm 1/2 circle round body with trocar point 17mm easyslide needle without pledgets | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | Ethibond 1/2circle taper cut 5 green 5 white code w10b52 | 6 foils | 15 | 16252.00 | 243780.00 |
| 10 | Permicron braided polyester 2/0, 4 green /4 white suture 75cm per foil, double arm 1/2 circle round body with trocar point 26mm easyslide needle with ptfe pledgets | J&J, Mumbai | 5368/ 05.05.2009 | J&J, | Ethibond 1/2circle taper cut 5 green 5 white code w10b77 | 6 foils | 15 | 20938.00 | 314070.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6x3x1.5mm code - m0027733 | | | | | | | | |
| 11 | Eto paper 10"x200mtr. | Yoga enterprises, pune | 5443/ 05.05.2009 | Rups | | | 10 | 1294.80 | 12948.00 |
| 12 | ETO Paper 20"X200MTR. | Yoga Enterprises, Pune | 5443/ 05.05.2009 | Rups | | | 10 | 2444.00 | 24440.00 |
| | | | | | | | | Total Amt. | 1069623.00 |

वरीलप्रमाणे सार्जिकल साहित्य खरेदीकामी पुरवठाधारकांचे वार्षिक मंजुर दरानुसार रु.१०,६९,६२३/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी वरीलप्रमाणे सर्जिकल साहित्य वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.१०,६९,६२३/- चे खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.२९६ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सन २००९-१० या वार्षिक औषधे खरेदीमधील सर्जिकल साहित्य वार्षिक मंजूर दराने खरेदीकामी येणाऱ्या रु.१०,६९,६२३/- चे खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२४ श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब व आर्थोपेडीक ओ.टी. विभागाकरीता Radiation Protection साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाने दि.१९.११.२००८ रोजीचे मागणी पत्रान्वये तसेच आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने दि.१९.१२.२००९ रोजीचे मागणी पत्रान्वये खालील प्रमाणे Radiation Protection Material ची मागणी केलेली आहे. सदरचे Radiation Protection Material हे शस्त्रक्रियेच्या वेळी सर्जन व त्यांचेसोबत असलेल्या सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी मशिनरी मधून होणाऱ्या Radiation पासून संरक्षण मिळावे म्हणून आवश्यक असते. सदरचे मटेरियल खरेदीकामी अंदाजे दरांसाठी व सविस्तर तांत्रिक माहिती घेण्यासाठी दोन अधिकृत विक्रेते यांचेकडून तांत्रिक माहितीपत्रक व दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार खालील प्रमाणे Radiation Protection Material खरेदीचा प्रस्ताव आहे.

| अ.नं. | वर्णन | कॅथलॅब | आर्थो. ओ.टी | अंदाजे दर प्रती नग रु. | एकुण किंमत रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Thyroid Shield Zero Lead 0.5 pb | 03 | - | 5800.00 | 17400.00 |
| 2 | Thyroid Shield Zero Lead Max 0.5 pb | 02 | 06 | 3125.00 | 25000.00 |
| 3 | Skirt Full Double Cover & Vest Full & Partial Cover in Zero Lead (Small Size -01 , Medium Size -01) .5 (F) .25 B | 02 | - | 21598.00 | 43196.00 |
| 4 | Radiation Goggle (Protective Eye Wear R.1620001) Plano Front & Side (Lead 0.75mm) | 02 | - | 13000.00 | 26000.00 |
| | | | | **एकुण रक्कम रु.-** | **111596.00** |

वरील प्रमाणे मटेरियल खरेदीकामी अंदाजे एकुण रु.१,११,५९६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे Radiation Protection Material विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,११,५९६/- चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी .

**निर्णय क्र.२९७ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब व आर्थोपेडीक ओ.टी. विभागाकरीता Radiation Protection Material विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,११,५९६/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२५ श्री नंदकिशोर चंद्रकान्त जमधडे, वर्ग-४ कर्मचारी, श्री साईनाथ रुग्णालय यांचा वैद्यकीय उपचारासाठी ॲडव्हान्स मिळणेबाबतचा अर्ज**

**प्रस्ताव-** श्री.नंदकिशोर चंद्रकांत जमधडे, (वर्ग-४ , श्री साईनाथ रुग्णालय) यांची आई श्रीमती सुलोचना चंद्रकांत जमधडे वय वर्ष ५५ यांना पोटात दुःखत असताना त्यांनी श्री साईनाथ रुग्णालयातील डॉ.मंजुषा काळे यांना दाखविले होते. डॉक्टरांनी रक्तांच्या विविध तपासण्या केल्या असता त्यांना पुढील उपचारासाठी दि.१८.०१.२०१० च्या शिफारस पत्रान्वये प्रवरा रुरल हॉस्पिटल,लोणी येथे पाठविले होते. तेथे गेल्यानंतर श्रीमती जमधडे यांनी तेथील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रक्ताच्या विविध तपासण्या व उपचार केल्यानंतर

तेथे त्यांना Ovary चा कॅन्सर या आजाराचे निदान झाले असून तेथेच त्यांना अंतररुग्ण म्हणून दाखल करुन घेऊन उपचार चालू केले.

सदर उपचारासाठी प्रवरा रुरल हॉस्पिटल,लोणी यांनी दि.२५.०१.२०१० चे पत्रान्वये रु.१,००,०००/- (अक्षरी रु.एक लाख मात्र ) इतका अंदाजे खर्च कळविला आहे.

श्री.जमधडे हे वर्ग ४ चे कर्मचारी असून त्यांची आर्थीक परिस्थिती ही अत्यंत हालाखीची असून इतका खर्च करण्याची त्यांची ऐपत नाही, असे त्यांनी त्यांचे दि.२९.०१.२०१० चे विनंती अर्जात म्हटले आहे. प्रवरा रुरल हॉस्पिटल,लोणी हे संस्थानचे मान्य यादीत असून "वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ क्र.१४ अन्वये संस्थान कर्मचाऱ्यांना, ह्दय शस्त्रक्रिया, मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया, एन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया, रक्ताचा कर्करोग आणि उपमार्ग साधक ह्दय शस्त्रक्रिया (बायपास कॉरोनरी सर्जरी) यांच्याबाबतीत उप-यंत्रे किंमती औषधे खरेदी करता येण्यासाठी संस्थान कर्मचाऱ्यांना साह्य देण्यासाठी रु.७५,०००/- एवढी आगाऊ रक्कम, किंवा उप-यंत्रे आणि किंमती औषधे यावरील प्रत्यक्ष खर्च, यापैकी जो कमी असेल तेवढया खर्चाची रक्कम मंजुर करण्यात आली आहे अशी तरतुद आहे. "

तर मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ११/०४/२००४ चे सभेतील निर्णय क्रमांक १९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकिय बीले वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर साहेब व मा. विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी साहेब यांनी तपासून त्यांचे शिफारशीनूसार अंतीम मंजूरीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावीत, असे ठरले आहे.

त्यानुसार तातडीची गरज असल्याने मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर यांना दाखवुन घेण्यात आले असून त्यांनी रक्कम रु.५०,०००/- रक्कमेपर्यंत ॲडव्हान्स देण्यास हरकत नाही व नंतर व्यवस्थापन समिती सभेसमोर विषय घेण्यात यावा असे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार त्यांचे उपचार थांबु नये म्हणून त्यांना रक्कम रु.५०,०००/- आगाऊ देण्यात आलेली आहे.

तरी श्री.जमधडे यांना एकुण रक्कम रु.१,००,०००/- (रु.एक लाख मात्र) आगाऊ देण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२९८ सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६ श्री साईसत्यव्रत पूजेच्या दरात वाढ करणे बाबत**

**प्रस्ताव-** मंदिर विभागार्तंगत श्रींचे नैवेद्यकोठीमध्ये श्री साईसत्यव्रत पूजेचा शिरा प्रसाद तयार करणेत येतो. दररोज श्री साईसत्यव्रत महापूजेच्या दोन किंवा तीन बॅचेस होतात. एका बॅच मध्ये १०० पूजा मांडलेल्या असतात. एका दिवसात साधारणपणे २५० ते ४७५ साईभक्त दररोज श्री सत्यनारायण पूजेचा लाभ घेतात. श्रावण महिन्यात ५०० पर्यंत या पूजा जाऊ शकतात. श्री साईसत्यव्रत पूजेनंतर पुजेसाठी बसलेल्या साईभक्तांना संस्थानचे वतीने ०.४७० ग्रॅम शिराप्रसाद व श्रीफळ देण्यात येते. यात सध्या एकपुजेसाठी शिराप्रसादासाठी पाणी वापरुन एकूण रुपये रु. ५१.९६ पै. इतका खर्च येत आहे. त्यामध्ये प्रशासकीय खर्च धरल्यास एकूण खर्च रु.१९१.७१ पै. इतका होतो. म्हणजे आपण तोटा सहन करुन सदरचा पुजाविधी करतो.

सध्या सत्यनारायण पुजेसाठी एका पुजेत रु. ५०/- (अक्षरी रुपये पन्नास) आकारत जातो. सध्याचे पुजेचे दर व खर्च पाहता सदरचे सत्यनारायण पूजेचे दर रुपये ५०/- पेक्षा अधिक वाढवून एका पुजेसाठी दर कमीतकमी रुपये १५०/- (अक्षरी एकशे पन्नास रुपये) अथवा रु. २००/- (अक्षरी रुपये दोनशे ) पर्यंत करावा असे नम्र मत आहे.

व्यवस्थापन समितीचे दि.२४/०२/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्रं.१९७ अन्वये भक्त अभिषेक पुजेचे दर रु.२५/- वरुन वाढवून एका पुजेसाठी दर रुपये १०१/- करण्यात आलेला आहे. सदरची कार्यवाही गुढीपाडवा याशुभमुहूर्तावर दि. ०६/०४/२००८ पासून अंमलात आणलेली आहे. यामध्ये भक्ताना अभिषेक पुजेनंतर प्रसाद म्हणून लाडूप्रसाद पाकीट व श्रीफळ, हळदी कुंकू, अक्षता, उदीची पुडी, दिली जाते.

तरी सत्यनारायण महापूजेचे दर वाढविणे गरजेचे आहे असे नम्र मत आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती. तसेच सदरची कार्यवाही मंजूरी नंतर ०१ जानेवारी २०१० पासून अंमलात आणता येईल असे मत आहे.

**निर्णय क्र.२९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसत्यव्रत पूजेच्या दर दिनांक ०१.०४.२०१० पासून रुपये ५०/- ऐवजी रुपये १००/- करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**विषय नं.२७ श्री साईबाबांचे व्दारकामाईमधील दगडावरील पादूकांना सोन्याचे प्लेटींग /अथवा दगडावर सोन्याच्या पादूका बसविणेबाबत**

**प्रस्ताव-** श्रींचे द्वाराकामाई मंदिरात बाबांची बसण्याची शिळा (दगड) आहे. या शिळेवर बाबा पुर्वी बसत असत. सध्या ही शिळा द्वारकामाई मंदिरात भक्तांचे दर्शनासाठी ठेवण्यात आलेली असून सध्या शिळेच्या समोरील बाजूने स्टिलचे ग्रील करुन लावणेत आलेले आहेत. प्रमुख उत्सव, स्थानिक उत्सव व नित्याचे पालखी मिरवणूकीचे दिवशी चावडी मंदिरातील मिरवणूकीचा फोटो या शिळेवर ठेवून चवरीने वारा घातला जातो. त्या ठिकाणी सवाद्य पारंपारीक दोन भजने म्हटली जातात व फोटोला कोट चढविला जातो. त्यानंतर फोटो पालखीत अथवा

रथात मिरवणूकीसाठी ठेवला जातो. सदरची शिळा ही बाबांच्या काळापासून द्वारकामाई मंदिरात असून त्यावर सध्या चांदीच्या पादुकांही बसविण्यात आलेल्या आहेत. सदरच्या पादुका ह्या शिळेवर बसविण्यात आलेल्या असून त्यांना व्हाईट सिमेंट लावणेत आलेले आहे. सिमेंट मधून मधून निघून जाते. बाबांच्या शिळेवरती पादुकां बसविल्या आहेत त्या आवश्यक तेवढ्या पक्क्या व मजबूत बसविता येत नाही.

साईभक्त श्री केतन हिमतलाल मेहता, मुंबई यांनी बाबांच्या बसण्याच्या शिळेवर ०१ किलो वजनाच्या सोन्याच्या पादुका देणगीदाखल बसवून देण्याची इच्छा प्रदर्शित केलेली असून त्यासाठी लागणारे सोने व स्वखर्चाने मजूरीसह देणगी दाखल बसवून देणेस तयार आहेत. याबाबत त्यांनी दि.२० नोव्हेंबर २००९ रोजी पत्राने कळविले आहे.

परंतू सदरच्या सोन्याच्या पादुका शिळेवरती बसविल्यास संरक्षणाचा प्रश्न आहे. सोन्याच्या पादुका बसविल्यास शिळेवर स्टेनलेस स्टिलची जाळीचे मजबूत संरक्षक कव्हर करावे लागेल. शिळा सध्या ज्या ठिकाणी ठेवलेली आहे तो द्वारकामाईचा भाग रात्रभर खुला असतो. व त्याठिकाणी एकच वाचमन पाहारा देणेकामी असल्याने संरक्षणाची मोठी जबाबदारी आहे.

तरी साईभक्त श्री केतन हिमतलाल मेहता, मुंबई यांचेकडून बाबांच्या बसण्याच्या शिळेवर ०१ किलो वजनाच्या सोन्याच्या पादुका अंदाजे २० लाख रुपये किंमतीच्या देणगीदाखल बसवून घ्याव्यात किंवा कसे याबाबतचा निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री केतन हिमतलाल मेहता, मुंबई यांचेकडून बाबांच्या बसण्याच्या शिळेवर ०१ किलो वजनाच्या सोन्याच्या पादुका अंदाजे २० लाख रुपये किंमतीच्या देणगीदाखल बसवून घेण्यात याव्यात.**

**याचवेळेस श्री दत्तात्रय गोविंद कोते,शिर्डी यांनी त्यांचे दि.२२.२.२०१० चे पत्रान्वये श्रींचे द्वारकामाई मंदीरात धुनीलगत असलेल्या छोट्या चांदीच्या पादूकांऐवजी त्याच आकारमानाच्या सोन्याच्या पादूका देणगीदाखल बसवून देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली आहे. सदर पादुकांसाठी लागणारे सोने व मजूरीसह येणारा खर्च ते स्वतः करणार असल्याने सदरची देणगी स्विकारण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

---

**विषय नं.२८** **श्रींचे व्दारकामाईतील शिळेला अक्रेलिक काचेचे तावदाने (सुरक्षा कवच) बसविणेबाबत**

**प्रस्ताव-** श्रींचे द्वाराकामाई मंदिरात बाबांची बसण्याची शिळा (दगड) आहे. या शिळेवर बाबा पुर्वी बसत असत. सध्या ही शिळा द्वारकामाई मंदिरात भक्तांचे दर्शनासाठी ठेवण्यात आलेली असून सध्या शिळेच्या समोरील बाजूने स्टिलचे ग्रील करुन लावणेत आलेले आहेत. प्रमुख उत्सव, स्थानिक उत्सव व नित्याचे पालखी मिरवणूकीचे दिवशी चावडी मंदिरातील मिरवणूकीचा फोटो या शिळेवर ठेवून चवरीने वारा घातला जातो. त्या ठिकाणी सवाद्य पारंपारीक दोन भजने म्हटली जातात व फोटोला कोट चढविला जातो. त्यानंतर फोटो पालखीत अथवा रथात मिरवणूकीसाठी ठेवला जातो. सदरची शिळा ही बाबांच्या काळापासू द्वारकामाई मंदिरात असू त्यावर चांदीच्या पादुकांही बसविण्यात आत्ल्या आहेत. ही शिळा म्हणजे श्रींची एक अनमोल ठेव आहे. सदरच्या शिळेचे जतन करणे हे संस्थानचे आद्य कर्तव्य आहे. बाबांची बसण्याची शिळा असल्याने साईभक्त आपल्या भावनेपोटी त्या शिळेला केमीकल मिश्रीत सुंगधी द्रव्ये लावतात. अलीकडे माहे मे २००९ पासून सदरची सुगंधी द्रव्ये लावण्याचे बंद करणेत आलेले आहेत परंतू रात्री द्वारकामाई आतील मंदिर बंद केलेनंतर काही भक्त नकळत बाहेरील भागातील त्या शिळेला सुंगधी द्रव्ये लावतात. त्यामुळे शिळेचे आयुष्य कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी द्वारकामाई मंदिरातील या पवित्र शिळेवर अक्रेलीक काचेचे तावदान (सुरक्षा कवच) बसविण्यास मंजूरी मिळणेस विनंती आहे. जेणेकरुन त्यास कुठल्याही प्रकारची हानी होणार नाही व तिचे आयुष्य वर्षानुवर्षे राहील असे नम्र मत आहे. सदरचे तावदान साईभक्त श्री. मिलन शेठ, मुंबई हे बनवून देणगीदाखल ते देणेस तयार आहेत. तरी बाबांचे बसण्याचे शिळेवरती व भोवताली अक्रेलीक बसविणे बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३०१** **प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे द्वारकामाई मंदिरातील या पवित्र शिळेवर अक्रेलीक काचेचे तावदान (सुरक्षा कवच) साईभक्त श्री. मिलन शेठ, मुंबई यांचेकडून देणगी दाखल तयार करुन घेऊन बाबांचे बसण्याचे शिळेवर व भोवताली बसविणेत यावे,असें ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

---

**विषय नं.२९** **अति महत्वाच्या व्यक्तिंचे शिरडी भेटीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री शिरडी क्षेत्र हे अंतरराष्ट्रीय कीर्तीचे देवस्थान असून श्री साईबाबांचे दर्शनासाठी संपूर्ण भारतातूनच नव्हे तर विदेशातूनही येणा-या साईभक्तांची नेहमीच वर्दळ असते. यामध्ये मा. नामदार, खासदार, आमदार,मंत्री महोदय व वरिष्ठ सनदी अधिकारी, भारतीय वायुदल, पायदळ, नौदल अधिकारी तसेच विवीध राज्यांचे मुख्यमंत्री, राज्यपाल येत असतात. विशेष प्रसंगी मा. पंतप्रधान तसेच महामहिम राष्ट्रपती हेसुद्धा श्रींचे चरणी नतमस्तक होणेसाठी आवर्जुन उपस्थित राहतात. मा.व्यवस्थापन मंडळाचे समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त, यांचे वेळोवेळीचे सूचनेनुसार अतिमहत्वाचे व्यक्तींच्या शुभहस्ते श्रींची पाद्यपुजा करणेत येते. पाद्यपुजेनंतर मान्यवर व्यक्तींना समाधी मंदिराचे शेजारील कक्षात त्यांचा संस्थानचे वतीने शॉल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येतो. विशेष प्रसंगी श्रींची मार्बलमूर्ती, साईचरित्र देऊन यथोचित सत्कार करण्यात येतो.

दर्शनासाठी येणा-या मान्यवरांची पहिली माहिती जनसंपर्क कार्यालयास मिळते व त्यांचे सुचनेनुसार कुठल्या मान्यवरांचे सत्कारासाठी कोणत्या वस्तू भेट म्हणून द्याव्यात याबाबत जनसंपर्क कार्यालयामार्फत सांगीतले जाते. मंदिर विभागाकडून सत्कारासाठी शॉल,श्रीफळ देण्यात येतात. प्रसंगी मा. चेअरमन,

व्हा.चेअरमन, कार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेनुसार श्रींची मार्बलमुर्ती तसेच प्रसंगी चांदीची मूर्तीही खरेदी करुन देण्यात येतात. मान्यवरांना सत्काराचे वेळी देण्यात येणारे साईचरित्र ग्रंथ, डायरी, कॅलेंडर हे प्रकाशने विभागार्तंगत आहेत. लाडूप्रसाद पाकीटे हे प्रसादालय विभागार्तंग आहेत. तसेच पुष्पगुच्छ, बुके पुरविण्याचे काम बगीचा विभाग करते. उपरोक्त सर्व साहित्य जनसंपर्क कार्यालयामार्फत मंदिर विभागास पुरविले जातात. मंदिरातील व्ही.आय.पी., इतर मान्यवर, महत्वाचे व अतिमहत्वाचे मान्यवरांचे सत्काराचे वेळी पी.आर.ओ. विभागाने त्यांचे विभागामार्फत नियोजन करावे असे वाटते. सत्कार O नंबर मध्ये करण्याची व्यवस्था केल्यास जनसंपर्क कार्यालयामार्फत सदरची व्यवस्था पाहणे योग्य होईल असे वाटते. याबाबत पी.आर.ओ.विभागामार्फत नियमावली तयार करावी असे ठरले होते.

तसेच मान्यवरांचे सत्कार जुने सभागृह मिटींग हॉल कक्षात पी.आर.ओ.विभागामार्फत केल्यास मंदिरात आावश्यक गर्दीही होणार नाही. कारण एका महत्वाच्या व्यक्तीबरोबर इतर लवाजमा मोठ्या प्रमाणात असतो. मंदिर विभागातील व्ही.आय.पी कक्षाची खोली ही आकाराने लहान असल्याने त्याठिकाणी मान्यवरांचे सत्काराचे वेळी उभे राहण्यासाठीही पुरेशी जागा नसते. तसेच मान्यवरांचा मंदिरात फक्त श्रींचे दर्शन हाच एकमेव हेतू असतो. ज्यावेळी मान्यवर व्ही.आय.पी.रुममध्ये येतात त्यावेळी इतर भक्तही व्ही.आय.पी.कक्षात येतात व व्ही.आय.पी.बरोबर उभे राहतात. त्यावेळी त्यांचाही सत्कार करुन त्यांनाही श्रीफळ, प्रसाद द्यावा तगतो. इतर व्ही.आय.पी.प्रमाणे त्यांनाही वागवावे लागते.सध्या मान्यवरांचे सत्कारासाठी अंदाजे प्रत्येक महि-न्यात अंदाजे ४०० ते ५०० शॉल्स संस्थानच्या खर्ची पडतात. यामध्ये काही देणगीदार भक्तांचाही समावेश असतो. तसेच एका महिन्यात अंदाजे २० ते २५ मार्बल मुर्त्याही खर्ची पडतात. मान्यवर अथवा देणगीदार साईभक्त यांचा सत्कार पी.आर.ओ.विभाग सुचनेनुसार करण्यात येतो. यावेळी पी.आर.ओ.विभागाचे प्रति-नधी मान्यवरांचे समवेत हजर असतात. तसेच मा. विश्वस्तांचे सुचनेनुसार वेळोवेळी जुने मिटींग कक्षाकडे शॉल्स पुरविण्यात येतात. ब-याच वेळा काही सत्कारमूर्ती मान्यवरांची नावेही कळत नाही परंतू या मान्यवरांची नांवे व पद यांची पी.आर.ओ. दप्तरी प्रथम नोंद करण्यात येते. यामुळे शॉल, मुर्ती व इतर साहित्य वस्तू खर्ची घालणेस सोईस्कर होईल. याकामी मंदिर विभागाकडून वेळोवेळी श्रीफळ व उदीप्रसाद पाकीटे, शॉल, मूर्ती पुरविले जातील. याकामी जुने व्ही.आय.पी. चे कर्मचारीही सत्कारासाठी मदत करतील.

उपरोक्त प्रमाणे सर्व मान्यवरांचे देणगीदारांचे सत्कार पी.आर.ओ. विभागामार्फतच करावेत असे नम्र मत आहे जेणेकरुन सत्काराचे वेळी कुठलीही उणीव भासणार नाही. याबाबत मा.सुरेशराव वाबळे , विश्वस्त यांचेशी चर्चा होऊन सूचना मांडण्यात आली होती परंतू त्याची अमंत्बजावणी अद्यापही झाली नाही. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.३०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त बाबत मा.कार्यकारी अधिकारी यांना परिस्थितीनुरुप निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले.** (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

---

**विषय नं.३०** **श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील सोलर वॉटर हिटींग सिस्टमद्वारे गरम पाणी वाटपाबाबत कालावधी निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानने, साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये (५०० खोल्या) येथे साईभक्तांची राहण्याची सोय केलेली आहे. सदर इमारतीत एकुण ४ विंग असुन ४९२ खोल्यांमध्ये अंदाजे २००० साईभक्तांची निवासाची सोय होते. साईभक्तांना स्नानाकरीता गरमपाण्याची सोय व्हावी म्हणुन दि.१३.१२.२००१ व नंतर दि.०१.०३.२००४ पासुन संस्थानने सोलर वॉटर हिटींग सिस्टीम उभारलेली आहे. त्यासाठी संस्थानने रु.३८,६०,०००/- एवढा खर्च केलेला आहे. सोलर वॉटर हिटींग सिस्टीमद्वारे ४ विंग्जसाठी ५४ हजार लिटर पाणी गरम होण्याची क्षमता असून सदर पाणी ४,५०० लिटर क्षमतेच्या १२ टाक्यामध्ये व्यवस्था केलेली आहे.

दि.२९-.३०.०५.२००४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या सभेत विषय नं.५६ निर्णय क्र.२६४ अन्वये, ठरावास अनुसरुन दि.०१.०३.२००४ पासून, भक्तनिवासस्थान इमारतीतील ४ विंगमधील खोल्यांकरीता सोलर वॉटर हिटींग सिस्टीमद्वारे होणारे गरम पाणी प्रत्येक माळयावरील स्टोअर रुम ते साईभक्तांच्या खोल्यांपर्यंत वितरणाची व्यवस्था व त्या अनुषंगिक खर्च याकरीता प्रती बादली, प्रती व्यक्ती, प्रती दिवशी रु.३/- प्रमाणे जमा होणारे रकमेपैकी मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना अर्धी रक्कम रु.१.५० मात्र याप्रमाणे प्रत्येक महिन्यानंतर अदा करण्यात येत आहे.

गेल्या तीन वर्षाची मिळालेली मासिक सरासरी रक्कम खालीलप्रमाणे-

| वर्ष | संस्थान ५०% रक्कम रु. | सोसायटी ५०% रक्कम रु. |
|---|---|---|
| २००६- २००७ | १,०२,२००.०० | १,०२,२००.०० |
| २००७- २००८ | १,०४,३००.०० | १,०४,३००.०० |
| २००८- २००९ | १,०८,७६७.०० | १,०८,७६७.०० |

लिव्ह ॲण्ड लायसेन्सी करारनामा रु.१०००/- चे स्टॅम्प पेपरवर लायसेन्सॉर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व लायसेन्सी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप. सोसायटी लि., शिर्डी

यांचेमध्ये नियमीत करारनामा दि.०६.०३.२००९ ते दि.०५.०२.२०१० अखेर (११ महिने) या कालावधीसाठी झाला असून त्याची मुदत दि.०५.०२.२०१० रोजी संपुष्टात येणार आहे.

उपरोक्तचे करारनाम्याचा कालावधी दि.०५.०२.२०१० रोजी संपुष्टात आलेनंतर सदरचे कामकाज पुन्हा आहे त्याच अटी शर्तीवर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांनी पुर्ववत चालू ठेवणेबाबत व प्रती ११ महिनेनंतर विधी विभागाने (वशी-०२) कायदेशीर बाबी तपासून करारनामा करुन घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी यांना देण्यात आलेल्या विविध व्यवसायांची सविस्तर माहिती व्यवस्थापन समितीचे सभेस सादर करण्यात यावी, तसेच सध्याचे पध्दतीप्रमाणे साईभक्तास पुर्णवेळ गरम पाणी पुरविण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,सर्व निवासस्थान/विधी अधिकारी)

---

**विषय नं.३१** **नविन कार्डीयाक ॲम्ब्यूलन्स खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल करीता नवीन अत्याधुनिक कार्डीयाक ॲम्ब्युलन्स खरेदी करणे कामी जा.नं.एसएसएस/ १३८०२/२००९ दि.१०/११/२००९ ने श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी दिलेल्या स्पेशिफिकेशन नुसार, नवीन कार्डीयाक ॲम्ब्युलन्सकरीता वाहन, आवश्यक यंत्रणा, उपकरणे तसेच फॅब्रीकेशन करणेकामी मे. युनिक मेडीकल सिस्टिम्स, पुणे व मे. इमरजिंग मेडिटेक सिस्टम, पुणे या नामांकीत बॉडीबिल्डर यांचेकडून कोटेशन बोलविण्यात आली होती.

दि.१०/०१/२०१० चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडणेत आली होती. मे. इमरजिंग मेडिटेक सिस्टम, पुणे यांनी मे. अलकेअर, बेळगांव यांचे नावे कोटेशन दिलेली असलेने त्यांचेशी दुरध्वनी वरून चर्चा केली असता. मे. इमरजिंग मेडिटेक सिस्टम, पुणे व मे. अलकेअर, बेळगांव या दोन्ही कंपन्या एकच असुन विक्री पश्चातसेवा (लेबर) मे. इमरजिंग मेडिटेक सिस्टम या नांवे देण्यात येते तसेच विक्री व बिलींग मे. अलकेअर, बेळगांव यांचे नांवे करण्यात येत असले बाबत इकडील आवक नं.३६६०० दि.२३/११/२००९ चे पत्राने कळविलेले आहे.

वरील प्रमाणे उघडणेत आलेली दोन्ही कोटेशन्स श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी दिलेल्या स्पेशिफिकेशन प्रमाणे बरोबर आहेत किंवा नाहीत ? तसेच स्पेशिफिकेशनचा तांत्रीक तुलनात्मक तक्ता तयार करणे कामी दि.१८/०१/२०१० रोजी वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचेकडे पाठविण्यात आली होती.

वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/वशी-३९/२०१० दि.०३/०२/२०१० चे पत्रान्वये, दोन्ही कंपन्यानी कर्डीयाक ॲम्बुलन्स करीता दिलेल्या स्पेशिफिकेशनचा तांत्रीक तुलनात्मक तक्ता तयार करून पाठविलेला आहे.

तरी नवीन कार्डीयाक ॲम्ब्यूलन्स खरेदी कामी मे. युनिक मेडीकल सिस्टिम्स, पुणे व मे. अलकेअर, बेळगांव या दोन्ही कंपन्याच्या प्रतिनीधीशी चर्चा / वाटाघाटी करून नवीन कार्डीयाक ॲम्ब्यूलन्स खरेदीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुढील निर्णयाकरीता सविनय सादर.

**निर्णय क्र.३०४** **आजचे सभेत मे. युनिक मेडीकल सिस्टिम्स, पुणे व मे. अलकेअर, बेळगांव यांनी सादर केलेले कोटेशन्स आजचे सभेत उघउण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.**

| Sr. No. | Our Requirment | Unique Medical System, Pune | | Ali Care, Belgaum | |
|---|---|---|---|---|---|
| | | Quoatation Rate (Rs) | Negotiated Rate (Rs) | Quoatation Rate (Rs) | Negotiated Rate (Rs) |
| 01. | Vehicle Model Force Motors Traveller Ambulance Wheel base 3350 Turbo Charged Euro III Diesel Engine | 16,39,510/- (Incl All Taxes) | 14,50,000/- (Incl All Taxes) | 15,38,960/- (Incl All Taxes) | 14,85,000/- (Incl All Taxes) |
| 02. | Ambulance Fabrication | | | | |
| 03. | Electrical Items | | | | |
| 04. | Air conditioning System | | | | |
| 05. | Oxygen Therapy | | | | |
| 06. | Automatoc Loading Stretcher | | | | |
| 07. | Scoop Stretcher | | | | |
| 08. | Spine Board | | | | |
| 09. | Wheel Chair | | | | |
| 10. | Emergency Kit | | | | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन नवीन कार्डीयाक ॲम्ब्यूलन्स खरेदीकामी युनिक मेडिकल सिस्टिम्स,पुणे यांचे निम्नतम दर रुपये १४,५०,०००/- मात्र मान्य करण्यात येऊन पुरवठा आदेश देण्यात यावा. पुरवठा आदेश देतेवेळी टेम्पो ट्रॅव्हलर वाहनांकरीता पूर्ण रक्कम रुपये ८,१४,७०५/- व फॅब्रीकेशन, इक्वीपमेंट करीता ५० टक्के रक्कम रुपये ३,१७,६४७/- अशी एकूण रुपये ११,३२,३५२/-**

**मात्र रकमेचा डी.डी देण्यात यावा व उर्वरित रक्कम रुपये ३,१७,६४८/- मात्र कार्डीयाक ॲम्ब्यूलन्स ताब्यात घेतेवेळी देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३२ साईभक्तांना गर्दीचे प्रमाणात प्रसादभोजन सेवा पूरविणेकामी कर्मचारी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे सोईचे दृष्टीने दि.०८/०१/२००९ पासून नविन प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन व्यवस्था सुरु करण्यात आलेली आहे. जुन्या प्रसादालयामध्ये १००० भक्तांसाठी प्रसाद भोजनाची बैठक व्यवस्था असलेला हॉल होता. नविन प्रसादालयामध्ये ३५०० भक्तांसाठी बैठक व्यवस्था आहे. जुन्या प्रसादालयामध्ये साधारण गर्दीमध्येही प्रसाद भोजनासाठी भक्तांची प्रतिक्षा रांग लागत असे. साईभक्तांना प्रसाद भोजनासाठी प्रतिक्षा रांगेत उभे रहावे लागू नये म्हणून नविन श्री साई प्रसादालय बांधण्याचा निर्णय मा.व्यवस्थापन समितीने घेतला व त्यानुसार विना प्रतिक्षा भोजन व्यवस्था नविन प्रसादालयामध्ये असणे अपेक्षित आहे.

०८ जानेवारी २००९ पासून नविन प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन व्यवस्था सुरु झाल्यानंतर भोजन घेणा-या भक्तांची संख्या महिनावर व दैनंदिन सरासरी संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | महिना | भोजन घेणारांची मासिक संख्या | भोजन घेणारांची दैनंदिन सरासरी संख्या |
|---|---|---|---|
| ०१. | एप्रिल ०९ | ८,२२,३५४ | २७,४१२ |
| ०२. | मे ०९ | ८,८१,६३९ | २८,४४० |
| ०३. | जुन ०९ | ९,४०,०२४ | ३१,३३४ |
| ०४. | जुलै ०९ | ९,३१,२८२ | ३०,०४१ |
| ०५. | ऑगस्ट ०९ | ७,९१,५२३ | २५,५३३ |
| ०६. | सप्टेंबर ०९ | ७,६९,४०७ | २५,६४७ |
| ०७. | ऑक्टोबर ०९ | ८,४६,१८२ | २७,२९६ |
| ०८. | नोव्हेंबर ०९ | ८,५६,०१३ | २८,५३३ |
| ०९. | डिसेंबर ०९ | १०,७०,९९७ | ३४,५४८ |
| १०. | जानेवारी १० | १०,३३,९७२ | ३३,३५४ |

मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३९८ नुसार जादा ३५० कंत्राटी कर्मचारी प्रसादालयास पुरविणेस मान्यता मिळालेली आहे. व प्रसादालयाकरीता आवश्यक कर्मचारी आकृतीबंध मंजूर आहे. मात्र गर्दीचे प्रमाणात भक्तांना सेवा पुरविणेसाठी आवश्यक तेवढे कर्मचारी मिळालेले नाहीत.

गर्दीचे प्रमाणात विना प्रतिक्षा प्रसाद भोजन सेवा पुरविण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचा-यांचा सविस्तर कामाचे ठिकाणासह (पॉईंटवाईज) तक्ता सोबत जोडलेला असून संक्षिप्त माहीती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | २५ हजार पर्यंत भक्त संख्येसाठी आवश्यक कर्मचारी | २५ ते ३० हजारापर्यंत भक्त संख्येसाठी आवश्यक कर्मचारी | ३० हजाराचे पुढे भक्त संख्येसाठी आवश्यक कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| अ) | आकृतीबंधानूसा मंजूर संख्या | ७७४ | ७७४ | ७७४ |
| ब) | | | | |
| ०१. | पॉईंटवाईज आवश्यक कर्मचारी | ४९३ | ५५३ | ६७२ |
| ०२. | सध्या उपलब्ध असलेले कर्मचारी | ४४९ | ४४९ | ४४९ |
| ०३. | कमी असलेले कर्मचारी | ०४४ | १०४ | २२३ |

सोबतचे तक्त्यामधील पॉईंटवाईज कर्मचारी संख्या ही गर्दीचे प्रमाणात विना प्रतिक्षा प्रसाद भोजन व्यवस्थेसाठी प्रत्यक्ष गरजेनुसार दर्शविलेली आहे. त्यानुसार कर्मचारी मिळाल्यास साईभक्तांची प्रसाद भोजनासाठी गैरसोय होणार नाही.

आज मितीला कर्मचा-यांची संख्या अपुरी असल्यामुळे साईभक्तांना खालीलप्रमाणे अडचणीस सामोरे जावे लागते.

०१. प्रसाद भोजन व्यवस्थेसाठी एवढा मोठा प्रशस्त हॉल असूनही प्रसाद भोजन घेण्यासाठी साई भक्तांना प्रसंगी गर्दीचे काळात प्रतिक्षा करावी लागते. साधारणपणे दररोज श्रींची माध्यान्ह आरती झाल्यानंतर १.०० ते ३.०० या वेळेत तसेच सायंकाळी ७.०० ते ९.०० या वेळेत एकदम जादा संख्येने साईभक्त प्रसाद भोजनासाठी येतात. मात्र सेवा पुरविणेसाठी कर्मचारी कमी असल्यामुळे सुमारे अर्धा ते १ तास प्रसाद भोजन घेणेसाठी भक्तांना प्रतिक्षा करावी लागते.

०२. ज्यावेळी प्रसाद भोजन हॉलमध्ये प्रसाद भोजन घेण्यासाठी भक्त प्रतिक्षा करीत असतात किंवा भोजनाची वाट पहात पुढच्या रांगेत बसून असतात अशावेळी कर्मचा-यांवर दडपण येते. त्यावेळी कर्मचारी प्रसाद भोजन वाढणेच्या कामात घाई करतात, असे करतांना अन्न कमी/जास्त वाढणे, अन्न खाली

पडणे वगैरे क्रिया घडतात. त्यामुळे काही वेळा भक्तांचे ताटात जादा अन्न पडल्यामुळे वाया जाते, तर काही वेळा कमी अन्न ताटात पडल्यामुळे भक्तांचे जेवन व्यवस्थीत होत नाही.

०३. प्रसाद भोजनासाठी साईभक्तांची दैनंदिन गर्दी २५,००० पेक्षा कमी नाही असे दिसून येत आहे. मात्र साधारण सोमवार, मंगळवार, शुक्रवार या दिवशी काही प्रमाणात गर्दी कमी असण्याची शकयता असते व बुधवार, गुरुवार, शनिवार, रविवार या दिवशी गर्दी मात्र जास्तच असते. याशिवाय सोमवार, मंगळवार व शुक्रवार या दिवशी सार्वजनीक सुटी आल्यास गर्दीचे सरासरी प्रमाण जास्त होते.

जे काम दैनंदिन करता येत नाही अशी कामे (उदाः प्रसाद भोजनासाठी वापरण्यात येणारी स्टे.स्टील ताट ५०००, ग्लास ५०००, वाटी १००० साधारणतः १५ दिवसातुन एकदा क्लिनींग पावडरने घासणे, तेला-तुपाचे डब्यातील तेल निथळणे, वहातूक करणे, ट्रॉलीज घासणे, वगैरे कामे) कमी गर्दीचे वेळी काही स्टाफ वेगळा काढून करावी लागतात. मात्र कर्मचा-यांचे कमतरतेमुळे सदरची कामे वेळेवर होणेस अडचणी येतात.

०४. व्ही.आय.पी. भोजन कक्षामध्येही आरतीनंतर व सायंकाळी प्रसाद भोजन वाढणेसाठी कर्मचारी कमी पडतात. त्यामुळे त्यांनाही भोजनासाठी प्रतिक्षा करावी लागते.

०५. प्रसाद भोजन व्यवस्थेकामी वरीलप्रमाणे अडचणी येतात. व साईभक्त नाराजी व्यक्त करतात.

त्यामुळे साईभक्तांना विनाविलंब, शांततेने, समाधानकारक प्रसाद भोजनाचा लाभ घेता यावा यासाठी प्रसादालयासाठी नेहमीकरीता जादा १०४ कर्मचारी आवश्यक आहेत. याशिवाय नाताळ, दिवाळी, ऊन्हाळयाच्या सुटया व मोठया प्रमाणात होणा-या गर्दीचे कालावधीत वेळोवेळी मागणीनुसार जादा कर्मचा-यांची गरज भासणार आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे अडचणींचा विचार होऊन खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

०६. प्रसादालय विभागाकडे सध्या असलेल्या ४४९ कर्मचा-यांशिवाय जादा १०४ कर्मचारी मिळावेत.

नाताळ, दिवाळी सुटी, ऊन्हाळा सुटी अथवा सलग सुटी कालवधीत होणा-या मोठया प्रमाणातील गर्दीमध्ये आकृतीबंधानुसार मंजूर असलेल्या तक्त्यामध्ये दर्शविलेप्रमाणे आवश्यकतेनुसार वेळोवेळी कामगार कामावर घेण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३०५ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईभक्तांना गर्दीचे प्रमाणात प्रसादभोजन सेवा पूरविणेकामी कर्मचारी आऊट सोर्सिंग पध्दतीने घेण्यास मान्यता देण्यात आली. तसेच, इतर विभागाकडील अतिरिक्त कर्मचारी प्रसादालयाकडे पाठवावेत, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग/कामगार अधिकारी)

---

**विषय नं.३३ शिर्डी परिसरातील अंध,अपंग,मुकबधीर,मतीमंद,अनाथ व धार्मिक (वारकरी) शिक्षण संस्था, शाळा व वृध्दाश्रमातील वृध्द व्यक्तींना मोफत, सवलतीचे दरात प्रसादभोजन पुरविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत मा.व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानूसार शिर्डी परिसरातील अंध,अपंग,मुक व कर्णबधीर, मतीमंद, अनाथ, धार्मिक शिक्षण संस्थेतील विद्यार्थी वृध्दाश्रमातील वयोवृध्द व्यक्ती यांना (विना अनुदान संस्था) विनामुल्य व अनुदान प्राप्त संस्थेतील विद्यार्थ्यांना सवलतीचे दरात सशुल्क भोजन पुरविणेत येत आहे. याशिवाय खालील संस्था चालकांनी नव्याने संस्था सुरु केल्यामुळे व काही संस्थेच्या विद्यार्थी संख्येत वाढ झालेमुळे विनामुल्य भोजनाची मागणी केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने यापूर्वीपासून भोजन पुरवित असलेल्या व नव्याने मागणी झालेल्या संस्थांची दि.०६/०२/२०१० रोजी मा.श्री ई.बी.गोंदकर,मा.श्री सुरेशराव वाबळे,मा.श्री अशोकराव खांबेकर व्यवस्थापन समिती सदस्य , यांचे समवेत श्री मोरे साहेब,कार्यकारी अधिकारी, श्री माने साहेब, उपकार्यकारी अधिकारी , श्री रामदास कोते, वरिष्ठ लिपीक श्री साई प्रसादालय यांनी समक्ष जाऊन पहाणी केलेली आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अं. नं. | संस्थेचे / शाळेचे नांव | विद्यार्थी संख्या | भोजन सुविधेचा प्रकार | वाढीव /नव्याने मागणी | पहाणी अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| १) | ह.भ.प. काशिनाथ महाराज सेवाभावी ट्रस्ट निमगांव संचलित श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था , निमगांव-शिर्डी, नगर-मनमाड रोड | ४२ | मोफत | --- | १) ट्रस्टला कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही.<br>२) ट्रस्टमार्फत परिसरातील धार्मिक शिक्षणाची आवड असलेल्या मुलांना सकाळी व सायंकाळी भजन,किर्तन,पखवाज व पेटी वाजविणेचे शिक्षण देण्यात येते.<br>३) दुपारचे वेळेत निमगांव येथील शाळेमध्ये शैक्षणिक शिक्षणासाठी पाठविण्यात येते.<br>४) ट्रस्टमार्फत श्री ज्ञानेश्वर महाराजांचे मंदिराचे बांधकाम चालू असून मंदीराचे मागे ४-५ खोल्या आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | त्या खोल्यामध्ये विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था केली जाते.<br>५) निवासी विद्यार्थ्यांना ट्रस्टमार्फत गणवेष, गादी, चादर, बेडशीट पुरविण्यात येतात. तसेच वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते असे सांगण्यात आले |
| २) | श्री साई ग्रामीण बहुउद्देशीय समाजसेवी संस्था संचलित साईबाबा बालसदन (अनाथाश्रम) , नगर-मनमाड रोड , जनेश्वर मंदीराचे समोर , शिर्डी | --- | मोफत | ३० | १) संस्थेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही.<br>२) सदर संस्थेमध्ये शिर्डी परिसर,राहाता तालुका व इतर ठिकाणी सापडलेले, पोलिस स्टेशनमार्फत आलेले अनाथ मुले/मुलीचा सांभाळ (आश्रय देणे) करण्याचे काम केले जाते.<br>३) सदर मुलांना शिर्डीतील शाळेमध्ये शैक्षणिक शिक्षणासाठी पाठविण्यात येते.<br>४) संस्था त्यांची निवास,भोजन व गणवेष पुरविण्याची व्यवस्था संस्थेमार्फत केली जाते. तसेच त्यांना वैद्यकिय सेवा पुरविण्यात येते. मात्र हे सर्व करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. म्हणून एकूण ३० विद्यार्थ्यांची भोजनाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य व्हावी अशी विनंती केलेली आहे.<br>५) सध्याची जागा भाडयाने घेतलेली आहे. |
| ३) | आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ नांदुर दुमाला ता.संगमनेर संचलित श्री साईसेवा मतीमंद मुला-मुलींची शाळा, शिर्डी साकुरी शिव , शिर्डी | २५ | मोफत | ३५ | १) संस्थेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही.<br>२) ट्रस्टने ४-५ वर्षापुर्वी २९ गुंठे जागा खरेदी केलेली आहे.<br>३) २० गुंठे जागेपैकी सुमारे ३-४ गुंठयामध्ये पत्रा, विटामातीची शेड उभारली असून त्यामध्ये मतिमंद मुलांची निवास व शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे.<br>४) टॉयलेट बाथरुमची व्यवस्था केलेली आहे.<br>५) संस्था प्रतिकुल परिस्थितीमध्ये मतिमंद मुला-मुलींना स्वतःचे पायावर उभे राहुन जीवन जगण्यासाठी प्रयत्न करते.<br>सन २००५ पासून संख्येतील २५ विद्यार्थ्यांसाठी संस्थानकडून मोफत भोजन मिळते. मात्र त्यापुढील विद्यार्थ्यांसाठी भोजनाची संस्थानकडून मान्यता नसलेने सुमारे १७५ विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी आहे. परंतू सध्या त्यांचेसाठी इमारत नसल्यामुळे सध्या फक्त ३५ विद्यार्थ्यांसाठी वाढीव भोजन मिळावे अशी विनंती केली आहे. |
| ४) | व्दारकामाई सेवा ट्रस्ट वृध्दाश्रम , कनकुरी रोड शिर्डी | २५ | मोफत | --- | १) ट्रस्टला कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही.<br>२) ट्रस्टमार्फत चालविणेत येणा-या वृध्दाश्रमात निराधार वयोवृध्द व्यक्तींना प्रवेश देण्यात येतो.<br>३) ट्रस्टने वृध्द व्यक्तीचे निवास व इतर सोईसाठी ३६ गुंठे जागा घेऊन इमारत बांधलेली आहे.<br>४) इमारतीसमोर वृध्द व्यक्तीचे विरंगुळयाकरीता गार्डन बनविलेले आहे.<br>५) सध्या त्या ठिकाणी ३८ वृध्द निवासाकरीता आहे.<br>६) सदर वृध्द व्यक्तीसाठी कपडे, गादी, चादर, बेडशीट अल्पोपहार व एकवेळ जेवणाचा खर्च ट्रस्ट करते.<br>७) सध्या पूर्व मंजूरीनूसार २५ व्यक्तींचे एकवेळचे भोजन संस्थानकडून घेऊन जातात. |
| | | | | | १) ट्रस्टला ७५ विद्यार्थ्यांकरीता अनुदान |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५) | श्री साईश्रध्दा ग्रामीण मुक बधीर विद्यालय, पिंपळवाडी रोड | ७५ | रु.१३५/- या सवलतीचे दरात सशुल्क | २२ | मंजूर आहे.<br>२) ट्रस्टमार्फत मुकबधीर व कर्णबधीर विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येते.<br>३) ट्रस्टने विद्यार्थ्यांचे शिक्षणासाठी शाळा व निवासाकरीता इमारत बांधलेली आहे.<br>४) ट्रस्टमार्फत विद्यार्थ्यांना एक वेळ नाष्टा, गणवेष, गादी , चादर ,बेडशीट व वैद्यकिय सेवा पुरविण्यात येते.<br>५) सध्या संस्थानकडून ७५ विद्यार्थ्यांना रु.१३५/ या दराने सवलतीचे दरात भोजन पुरविले जाते.<br>६) २२ विद्यार्थ्यांची वाढ झालेली असल्याने व त्यांचेसाठी अनुदान मंजूर नसल्याने त्यांचेसाठी २२ विद्यार्थ्यांना मोफत भोजनाची मागणी केलेली आहे. |
| ६) | पद्मश्री डॉ.वि.ए.विखे पाटील विद्यालय , बाभळेश्वर | १०० सकाळी ५० रात्रौ | विनामुल्य | ---- | सदर संस्था शिर्डी परिसरात येत नसल्यामुळे पहाणी करण्यात आलेली नाही. |
| ७) | संत विचारधारा वारकरी शिक्षण संस्था भोजडे ता.कोपरगांव | | विनामुल्य | ---- | संस्थानकडून विनामुल्य भोजन मिळणेबाबत नव्याने मागणी केलेली आहे. परंतु सदर संख्या शिरडी परिसरात येत नसल्यामुळे पहाणी करण्यात आलेली नाही. |

वरीलप्रमाणे अं.नं.१ ते ५ संस्था / ट्रस्टमार्फत चालविणेत येत असलेल्या अंध , अपंग,मुकबधीर, मतीमंद, अनाथ व धार्मिक शिक्षण देणा-या शाळांना दिनांक ०६/०२/१० रोजी समक्ष भेटी देऊन पहाणी केलेली आहे. पहाणीनंतर खालीलप्रमाणे कार्यवाही चालू ठेवावी असा अभिप्राय स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य यांचा आहे.

१) वरीलपैकी अ.नं.१ यांना मा.व्यवस्थापन समिती सभेचे पूर्व मंजूरीनुसार दोन वेळ व अं.नं.४ यांना एक वेळ विनामुल्य भोजन व्यवस्था चालू ठेवावी.
२) अं.नं.२ यांचे विद्यार्थ्यांसाठी दोन वेळ भोजन विनामुल्य देणेचे सुरु करावे.
३) अं.नं.३ यांचे पुर्व मंजूरीनूसार २५ विद्यार्थ्यांचे दोन वेळचे विनामुल्य भोजन चालू ठेवून उर्वरीत वाढीव ३५ विद्यार्थ्यांना नव्याने दोन वेळेचे विनामुल्य भोजन देणेचे सुरु करावे.
४) अं.नं. ५ या संस्थेतील ७५ विद्यार्थ्यांसाठी शासकीय अनुदान मंजूर आहे. व एकंदरीत संस्थेची आर्थिक परिस्थिती ठीक असल्याने उर्वरीत २२ विद्यार्थ्यांसह एकूण ९७ विद्यार्थ्यांना संस्थान कर्मचा-यासाठी असलेल्या सवलतीचे दराने भोजन देणेत यावे.
५) अं.नं.६ या संस्थेस पूर्वीपासून दोन वेळचे विनामुल्य भोजन पुरविणेस येत असल्याने त्यांना पूर्वीसारखेच विनामुल्य भोजन देणेचे चालू ठेवावे.
६) अं.नं.७ ही संस्था शिर्डी परिसरात येत नसल्यामुळे त्यांना विनामुल्य भोजनाची सुविधा नव्याने सुरु करु नये.

उपरोक्तप्रमाणे अं. नं. १ ते ६ नूसार शिर्डी परिसरातील अंध,अपंग, मुकबधीर,कर्णबधीर, धार्मिक वारकरी शिक्षण संस्थेतील मुला मुलींना , व वृध्दाश्रमातील वृध्द व्यक्तींना मोफत , सवलतीचे दरात प्रसादभोजन पुरविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ.नं.०१ ते ०६ नुसार शिर्डी परिसरातील अंध,अपंग, मुकबधीर,कर्णबधीर, धार्मिक वारकरी शिक्षण संस्थेतील मुला मुलींना , व वृध्दाश्रमातील वृध्द व्यक्तींना तसेच अ. नं. ०७ संत विचारधारा वारकरी शिक्षण संस्था भोजडे ता.कोपरगांव यांना मोफत प्रसादभोजन पुरविण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

**विषय नं.३४ लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कामगारांचे माहे जानेवारी, २००९ ते नोव्हेंबर,२००९ याकालावधीतील गैरहजेरीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील विभागांना मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांचेमार्फत दि.०१-११-२००७ पासून कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., नाशिक लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत मंदिर परिसराबाहेरील इतर विभागांना दि.०१-११-२००७ पासून कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेत येत आहे. त्याचप्रमाणे संस्थानचे मंदिर परिसर, महाद्वार व मंदिराबाहेरील परिसराचे सुरक्षेकामी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी अनुक्रमे मे.टॉप्स सिक्युरिटी लि.,मुंबई मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया)लि.,नाशिक, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत दि.२१-०३-२००९ पासून व मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (युटी),महाद्वार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर, यांचेमार्फत दि.२५-०५-२००९ पासून पुरविणेत येत आहे. सदर लेबर व सिक्युरिटी एजन्सीमार्फत संस्थानचे मागणी व आवश्यकतेप्रमाणे पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार

व कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांची हजेरी पत्रकाप्रमाणे पटसंख्या तसेच कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी यांचे गैरहजेरी बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | लेबर व सुरक्षा एजन्सीचे नांव | माहे जानेवारी-२००९ ते माहे नोव्हेंबर-२००९ कंत्राटी कर्मचारी पटसंख्या | जानेवारी-२००९ ते माहे नोव्हेंबर-२००९ याकालावधीतील ६०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस हजेरी असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या | माहे जानेवारी-२००९ ते माहे नोव्हेंबर-२००९ याकालावधीतील ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजेरी असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे लेबर कॉन्ट्रॅक्टर | ६११ | ५८० | ३१ |
| | मे.बी.आय.एस.सिक्युरिटी,नाशिक लेबर कॉन्ट्रॅक्टर | ९४९ | ७९० | १५९ |
| | मे.टॉप्स सिक्युरिटी लि., मुंबई सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर | २८० | २४८ | ३२ |
| | मे.बी.आय.एस.सिक्युरिटी,नाशिक सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर | ३०३ | २२६ | ७७ |
| | मे.ईगल आय सिक्युरिटी, दमन (युटी) महाद्वार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर | १२२ | १०७ | १५ |
| | एकूण | २२६५ | १९५१ | ३१४ |

उपरोक्तप्रमाणे मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांचेकडील ६११ कंत्राटी अकुशल, कुशल कर्मचाऱ्यांपैकी ३१ कंत्राटी कर्मचारी व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., नाशिक, लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेकडील ९४९ कंत्राटी अकुशल, कुशल कर्मचाऱ्यांपैकी १५९ असे एकूण १५६० कंत्राटी कामगारांपैकी १९० अकुशल, कुशल कामगार हे माहे जानेवारी २००९ ते माहे नोव्हेबर २००९ या कालावधीत ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर/ अनुपस्थित राहीले आहेत.

त्याचप्रमाणे मे.टॉप्स सिक्युरिटी लि.,मुंबई यांचेकडील २८० कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांपैकी ३२ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी, मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., नाशिक, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेकडील ३०३ कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांपैकी ७७ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी व मे.ईगल आय एन्टरप्राईज सिक्युरिटी, दमन, महाद्वार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेकडील १२२ कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांपैकी १५ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी असे तिनही सुरक्षा एजन्सीकडील एकूण-७०५ कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यापैकी १२४ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी हे माहे जानेवारी-२००९ ते माहे नोव्हेबर-२००९ या कालावधीत ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर/अनुपस्थित राहीले आहेत.

सबब, उपरोक्तप्रमाणे लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेकडील ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर/ अनुपस्थित राहिलेल्या १९० अकुशल, कुशल कंत्राटी कामगारांना, त्याचप्रमाणे सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेकडील ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर/अनुपस्थित राहिलेल्या १२४ कंत्राटी सुरक्षा कामगारांना अशा एकूण-३१४ कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचाऱ्यांना कामावरून बंद (कमी) करावयाचे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.३०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागात लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी माहे जानेवारी २००९ ते माहे नोव्हेंबर २००९ या कालावधीत ज्या कर्मचाऱ्यांचे गैरहजेरीचे प्रमाण ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा संबधित गैरहजर रहाणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मागील सहा महिन्यांचे हजेरीचे प्रमाण तपासून त्यामध्ये ५०% पेक्षा जास्त कालावधीत गैरहजर असणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामावरुन बंद (कमी) करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.३५** **नविन लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर नेमणूकीसाठी जाहिरात प्रसिद्ध करणेस व सध्याचे कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लिमिटेड, नाशिक यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून ते दि.३१-१०-२००८ अखेर पर्यंत १ वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत आलेली होती. त्यानंतर त्यांना दि.०१-११-२००८ पासून ते पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे. तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मे.टॉप्स सिक्युरिटी लि.,मुंबई व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लिमिटेड, नाशिक यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.२१-०३-२००९ पासून ते दि.२०-०३-२०१० अखेर पर्यंत ०१ वर्ष कालावधीसाठी व मे ईगल आय एन्टरप्राईज,दमन (यु.टी.) गुजरात यांची श्री साईमंदिर परिसर व महाद्वार सुरक्षेकामी माजी सैनिकांमधुन

कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.२५-०५-२००९ पासून ते दि.२४-०५-२०१० अखेर पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत आलेली आहे. लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत सध्या प्रतिदिनी पुरविणेत येणाऱ्या अकुशल, कुशल कंत्राटी कामगार व माजी सैनिक, सिव्हीलियन सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

**अ) अकुशल कामगार : ८०५**

**ब) कुशल कामगार : १९८**

**** वर्गवारी ****

| अ.नं. | वर्गवारी | संख्या |
|---|---|---|
| १. | इलेक्ट्रीशियन | ३७ |
| २. | वेल्डर | ०३ |
| ३. | फिटर (प्रसादालय) | ०३ |
| ४. | मेंन्टेनन्स इंजिनिअर (प्रसादालय) | ०१ |
| ५. | लिपीक | ४६ |
| ६. | सीसीटीव्ही ऑपरेटर | ०२ |
| ७. | कॉम्प्युटर ऑपरेटर | ०५ |
| ८. | कॉम्प्युटर प्रोग्रॅमर | ०१ |
| ९. | सिव्हील सुपरवायझर | ०१ |
| १०. | सुतार | ०४ |
| ११. | गवंडी | ०४ |
| १२. | लॅब टेक्नीशियन | ०७ |
| १३. | परिचारीका | १८ |
| १४. | फार्मासिस्ट | १० |
| १५. | एक्स-रे टेक्नीशियन | ०३ |
| १६. | ब्लड बँक टेक्नीशियन | ०५ |
| १७. | बायोमेडीकल सहाय्यक | ०२ |
| १८. | डेंन्टल टेक्नीशियन | ०१ |
| १९. | एम.आर.आय.टेक्नीशियन | ०१ |
| २०. | सिटी स्कॅन टेक्नीशियन | ०१ |
| २१. | टेलरींग असिस्टंट | ०१ |
| २२. | कॉम्प्युटर शिक्षक | ०१ |
| २३. | बालवाडी शिक्षीका (इंग्लीश) | ०२ |
| २४. | शिक्षीका (इंग्लीश) | ०१ |
| २५. | लॅब असिस्टंट (कन्याशाळा) | ०१ |
| २६. | पर्यावरण शास्त्र शिक्षक | ०१ |
| २७. | ग्रंथालय सहाय्यक (आय.टी.आय) | ०१ |
| २८. | वाहन चालक | ३० |
| २९. | अॅटो इलेक्ट्रीशियन | ०१ |
| ३०. | फिटर/मॅकेनिक (वाहन) | ०४ |

**क) सुरक्षा कर्मचारी : ४७८**

**** वर्गवारी ****

| अ.नं. | वर्गवारी | संख्या |
|---|---|---|
| १. | सुरक्षा अधिकारी (माजी सैनिक) | ०३ |
| २. | सुरक्षा सुपरवायझर-(माजी सैनिक) | ११ |
| ३. | सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) | २१ |
| ४. | व्यायामशाळा प्रशिक्षक | ०१ |
| ५. | सुरक्षा गार्ड (माजी सैनिक) | ५३ |
| ६. | सुरक्षा गार्ड (सिव्हीलियन/पुरूष) | ३५६ |
| ७. | सुरक्षा गार्ड (सिव्हीलियन/स्त्री) | ३३ |

**ड) एकूण (अ+ब+क) = १४८१**

उपरोक्तप्रमाणे सध्या कार्यरत असलेल्या लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी / माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांचे ठेकेदारीची/ कराराची मुदत अनुक्रमे दि.२०-०३-२०१० व दि.२४-०५-२०१० अखेर संपत आहे. त्यामुळे पुढील दोन वर्षे कालावधीसाठी संस्थानला अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी/माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी प्रचलीत पध्दतीप्रमाणे नविन ठेकेदारांची/ कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करता येईल. त्याकरीता लायसेन्सधारक व अनुभवी ठेकेदारांकडून (ज्यांची ठेकेदारी कर्मचारी पुरविणेची क्षमता एक हजार संख्येपेक्षा जास्त आहे.,ज्यांना किमान तीन वर्षापेक्षा जास्त पुर्वानुभव आहे व ज्यांची वार्षिक उलाढाल रूपये एक कोटी पेक्षा जास्त आहे अशा पात्र ठेकेदारांकडून) चसिलबंद निविदाछ मागविणेकामी दैनिक सकाळ (पुणे व अहमदनगर आवृत्ती), दैनिक लोकमत (अहमदनगर व औरंगाबाद आवृत्ती) व दैनिक सामना (मुंबई आवृत्ती) या वर्तमानपत्रांतुन एक वेळ जाहिरात प्रसिध्दीस देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास (अंदाजे रूपये १, ५०, ०००/-खर्चास) मान्यता असावी.

अथवा संस्थानला सध्या कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी/माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणारे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस/करारास सध्याचे कंत्राटा संबंधातील वर्क ऑर्डर व करारातील अटी, शर्ती तसेच वेतनदर, सर्व्हिस चार्जेस, प्रॉव्हीडंड फंड, सर्व्हिस टॅक्स, इत्यादी सध्याचे दरपत्रक संबंधीत एजन्सीला मान्य असल्यास त्यास अधिन राहून दि.०१-०६-२०१० पासून ते दि.३१-०५-२०११ अखेर एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता असावी.

त्याचप्रमाणे संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी/माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन ठेकेदारांची/कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून " सिलबंद निविदा " मागविणे, सिलबंद निविदा प्राप्त झालेनंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडणे, त्याबाबतचा तुलनात्मक तक्ता तयार करून, निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे, निविदा सादरकर्त्या ठेकेदारांना मा.व्यवस्थाप समितीचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविणे, निवड केलेल्या ठेकेदारांना/कॉन्ट्रॅक्टर्स यांना वर्क ऑर्डर देणे, ठेकेदारांकडून नियमानुसार कागदपत्रांची पुर्तता करून घेणे इत्यादी कार्यवाहीस काही कालावधी लागणार आहे.

म्हणून कामाची गैरसोय होऊ नये याकरीता सध्याचे मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लिमिटेड, नाशिक, लेबर कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत पुरविणेत येणाऱ्या अकुशल, कुशल कामगारांच्या ठेकेदारीस/करारास तसेच मे.टॉप्स सिक्युरिटी लि.,मुंबई, मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लिमिटेड, नाशिक व मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी.)गुजरात सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांचे ठेकेदारीस/करारास सध्याचे कंत्राटा संबंधातील वर्क ऑर्डर, करारातील अटी व शर्ती तसेच दरपत्रक यास अधिन राहून अनुक्रमे दि.२१-०३-२०१० व दि.२५-०५-२०१० पासून ते नविन ठेकेदारांची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभाग निहाय लेबर व सिक्यूरिटी कामगारांची आवश्यकता लक्षात घेऊन आऊट सोर्सिंग पद्धतीने कर्मचारी पुरविणेकामी ठेकदाराची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात यावी. दरम्यानचे कालावधीत कामाची गैरसोय होऊ नये याकरीता सध्याचे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस /करारास सध्याचे कंत्राटासंबधातील वर्कऑर्डर, करारातील अटी व शर्ती तसेच दरपत्रक यास अधिन राहून अनूक्रमे दिनांक २१.०३.२०१० व दिनांक २५.५.२०१० पासून नवीन ठेकेदारांची नेमणूक होईपर्यन्त सध्याचे ठेकेदारांच्या करारास मूदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.३६ सशुल्क दर्शन/ आरती पासेसबाबत.**

**प्रस्ताव-** जनसंपर्क कार्यालयामार्फत श्रींच्या दर्शनासाठी येणा-या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तींची दर्शन/आरती पास देवून व्यवस्था करण्यात येते. सध्या श्रींच्या दर्शनासाठी दिवसेंदिवस जगाच्या कानाकोप-यातून सर्व जाती धर्माचे भाविक येत आहेत. त्यामुळे शिर्डीत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात गर्दी होत आहे. या येणा-या भाविकांच्या होणाऱ्या गर्दीचे योग्य नियोजन व्हावे व सर्व सामान्य भक्तांना बाबांच्या दर्शनाचा लाभ मिळावा याउद्‌शाने गुरुवार, शनिवार, रविवार, उत्सव व सलग सुटयांच्या कालावधीत व्हिआयपींसाठी देण्यात येणारे दर्शन/आरती पासेस सशुल्क करण्याचा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० रोजीचे सभेत घेण्यात आलेला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने सशुल्क पासची कार्यवाही खालीलप्रमाणे करावी असे मत आहे.

सशुल्क पासेस सुविधा गुरुवार, शनिवार, रविवार, संस्थान आयोजित रामनवमी , गुरुपोर्णिमा, पुण्यतिथी हे उत्सव, जोडुन आलेल्या शासकीय सुट्ट्या आणि गर्दीच्या काळात सुरु ठेवावी. सशुल्क पासेस फक्त व्हिआयपी स्वतः अथवा शिफारस पत्र घेवून येणाऱ्या मान्यवरांनाच लागु करावी. यासाठी शनिगेट पासून स्वतंत्र रांग ठेवून याचा सर्वसामान्य रांगेतील भक्तांना कोणताही प्रकारचा अडथळा न होता त्यांना सुलभरित्या दर्शनाचा लाभ घेता येईल अशी व्यवस्था करणे योग्य राहील. सशुल्क दर्शन पासेस धारकांना सकाळी ७.३० ते ११, दुपारी १.३० ते ५, सायंकाळी ७.३० ते ९ यावेळेत दर्शनासाठी शनि मंदिराजवळील प्रवेशव्दाराने सोडण्यात यावे. सशुल्क पास वितरणासाठी सकाळी ७.३० ते ११, दुपारी १.३० ते ५ व सायंकाळी ७.३० ते ९ अशा वेळा निर्धारीत करण्यात येवून प्रती व्यक्तीस १०० रुपये शुल्क ठेवावे सदरचे पासेस जनसंपर्क कार्यालयामध्ये भक्तांना वितरीत करण्याचे सुविधा उपलब्ध करता येईल.

याबरोबरच काकड आरतीसाठी माणसी ५०० रुपये व माध्यान्ह, धुपारती व शेजारती या प्रत्येक आरतीसाठी माणसी ३०० रुपये शुल्क ठेवून पास धारकांना शनि मंदिराजवळील प्रवेशव्दारानेच आरतीसाठी प्रवेश देण्यात यावा आरतीसाठी १६०० भक्त उभे रहाण्याची मंदिराची क्षमता आहे. मात्र प्रत्येक आरतीसाठी फक्त १४० व्यक्तींचीच मर्यादा ठेवून प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वाने प्रवेश देण्यात यावा. काकड आरती पासेस आदल्या दिवशी रात्रौ ९ ते ९.३०, माध्यान्ह आरतीचे पासेस त्याच दिवशी १० ते १०.३० यावेळेत, धुपारतीचे पासेस संध्याकाळी ४ ते ४.३० यावेळेत तसेच शेजारतीचे पासेस त्याच दिवशी रात्रौ

८.१५ ते ८.४५ यावेळेत वितरीत करण्यात यावेत. दर्शन आरती पासेस वितरण करण्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या वेळे व्यतिरिक्त कोणत्याही व्हिआयपीस पासेस देण्यात येवू नये अथवा दर्शन रांगेत सोडण्यात येवू नये. तसेच १० वर्षाच्या आतील मुलांना या प्रकारातून वगळण्यात यावे. सशुल्क पासेस प्रायोगिक तत्वावर उल्लेखित केलेल्या दिवशी सुरु करण्यात येवून याबाबत सर्व सामान्य साईभक्तांच्या, देणगीदारांच्या सुचना, अभिप्राय विचारात घेऊन आवश्यकतेनूसार यात बदल करण्यात यावेत.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही मार्च महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यापासून केल्यास गर्दीचे नियोजन करणे सोईचे होवून जास्तीत जास्त सर्वसामान्य भक्तांना बाबांच्या दर्शन/आरतीचा लाभ घेता येईल .

तथापि सदर बाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास प्रायोगिक तत्वावर मान्यता देण्यात आली. सशुल्क दर्शन पास वितरणासाठी सकाळी ७.३० ते ११.००, दुपारी २ ते ५ व सायंकाळी ७.३० ते ९ अशा वेळा निर्धारीत करण्यात येऊन पासेस धारकांना सकाळी ७.३० ते ११.००, दुपारी २ ते ५ व सायंकाळी ७.३० ते ९ यावेळेत दर्शनासाठी शनि मंदिराजवळील प्रवेशद्वाराने सोडण्यात यावे, याबरोबरच काकड आरतीचे पासेस आदल्या दिवशी रात्रौ ७.३० ते ९ यावेळेत, माध्यान्ह आरतीचे पासेस सकाळी ७.३० ते ११ यावेळेत, धुपारतीचे पासेस दुपारी २ ते ५ यावेळेत तसेच शेजारतीचे पासेस रात्रौ ७.३० ते ९ यावेळेत वितरीत करण्यात यावेत व काकड आरती पासधारकांना पहाटे ३.४५ वा., माध्यान्ह आरती पासधारकांना सकाळी ११.३० वा., धुपारती पासधारकांना आरती अगोदर ४५ मिनिटे, शेजारती पासधारकांना रात्रौ ९.४५ वा. आरतीसाठी शनि मंदिराजवळील प्रवेशद्वाराने सोडण्यात यावे. सदर आदेशाची कार्यवाही दिनांक १३.०३.२०१० पासून करण्यात यावी. तसेच सर्व आरत्यांकरिता वरीलप्रमाणे १४० व्यक्तिंशिवाय मा.विश्वस्तांसाठी ६० व्यक्तिंचा कोटा ठेवण्यात यावा. तसेच मा.विश्वस्त व त्यांचे कुटुंबीय यांची दर्शन व आरती व्यवस्था नेहमीप्रमाणे करण्यात यावी. देणगीदार साईभक्तांची देणगीची रक्कम बघून यथोचित दर्शन, आरती, सत्कार व प्रसाद आदी व्यवस्था करण्यात यावी, असें ठरलें.** (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.३७** **शिर्डी महोत्सव -२००९ साठीचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयानुसार सन २००८ सालात दि.०३/०१/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.०५ (१) अन्वये शिर्डी महोत्सव-२००८ साठी एकूण खर्च रु. ७,००,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. मागिल वर्षी कलाकारांनी बिदागी न घेतल्याने सदरच्या कार्यक्रमास काहीही खर्च आलेला नाही. "शिर्डी महोत्सव - २००८ " हा दि.३१/१२/२००८ अखेर फक्त एक दिवस साजरा करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमाचा उद्देश हा चालू वर्षाचा शेवट व नविन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावा असा आहे. तसेच दि.३१/१२/२००९ रोजी समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले रहाणार आहे. याहीवर्षी मागिल वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सव साजरा करणेबाबत व त्या अनुषंगाने मान्यवर गायकांचे व कलाकारांचे दि.२९/१२/२००९ ते दि.३१/१२/२००९ रोजी गायन व नृत्य कार्यक्रमास परवानगी मिळावी म्हणून अनेक पत्रे आलेली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कलाकाराचे नांव व पत्ता | कार्यक्रमाचे स्वरुप | मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री शैलभ बन्सल, ६०/१९, ओल्ड राजेंद्रनगर, न्युदिल्ली-११००६०, मो.नं.०९८१०६८००९२ | साई भजन | दि.३१/१२/२००९ विनामुल्य | श्री साईसच्चरित पारायण सोहळा-०९ मध्ये कार्यक्रम झाला आहे. |
| ०२. | श्री पारस जैन, शिर्डी फो.नं.२५५८८२ मो.नं. ९८२२५४६८१७ | भजन संध्या | ३१/१२/२००९ रात्रौ ९.०० ते १२.०० एक रु. व श्रीफळ | सन०६,०७,०८ मध्ये कार्यक्रम झाला आहे |
| ०३. | श्री.नीतू कुमार, ३ए, बी-१२, धवलगिरी अपार्टमेंट, नोईडा-२०१३०१ (उ.प्र.) | साई भजन | दि.३१/१२/२००९ विनामुल्य. | मा.अध्यक्ष महोदय यांची शिफारस. |
| ०४. | श्री अरुण महाजन, अमृतसर, मो.नं.०९२१६६७४४४८ | साई भजन | दि.३१/१२/२००९ विनामुल्य. | |
| ०५. | श्री राजकुमार लारोकर, ऑल इंडिया साई डिव्होटीज्, ५२, लँड मार्क टॉवर, ठाकुरबारी रोड, साकची जेएसआर-१, जमशेटपूर मो.नं.९९३११८४७१०/९९३४३७६०५३ | भजन संध्या | दि.३१/१२/२००९ मानधन रु.११,०००/- | |
| ०६. | सौ.सुनिता टिकारे, ४, देवदर्शन बिल्डींग, टी.एच.कटारिया मार्ग, माहिम, मुंबई-१६ फोन नं.०२२-२४३०००१९/२४२२६६२५ मो.नं.९८६७८१२७४२ | भजन, गायन. | दि.३१/१२/२००९ मानधन रु.१०,०००/- ते रु. १५,०००/- | |
| ०७. | सौ.दिपाली केतन कुलकर्णी, संचालिका, शारदा संगीत विद्यालय, मित्तल टॉवर्स, भाजी मार्केट, कोपरगांव,जि.अहमदनगर, | संगीत कार्यक्रम | दि.३१/१२/२००९, मानधन रु.२०,०००/- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मो.नं.९४२२२२६८५० | | | |
| ०८. | सचिव, कलारंजन नाट्य संस्था, कोपरगांव, मो.नं.९९६७३४१२२६ | श्री साई महिमा हिंदी नाट्यप्रयोग. | दि.३१/१२/२००९ मानधन-संस्थान नियम | मा.श्री.खांबेकरसाो. यांची शिफारस. |
| ०९. | सौ.संध्या देशमुख, स्कॉलर म्युझीक अॅकडमी, गंगासागर वॉटर टँकच्या समोर, डॉ.खेर हॉस्पीटलच्यामागे, रामनगर, वर्धा-४४२००१, मो.नं.०९८५०४२०२९९ | साई भजन | दि.३१/१२/२००९ मानधन रु.५१,०००/- | |
| १० | श्री सचिदानंद आप्पा, मुंबई, मो. ९८२०१४८६७८. | साई भक्ती गित | दि.३१/१२/२००९ प्रवास खर्च | |
| ११ | श्री. मधुसुदन कुट्टीलवार, लातुर मो.९८२२६६६०६४. | साईभजन | | |
| १२ | श्री रमेश रावतेकर, पुणे, मो.९३७३२८४०७६. | भक्ती गित | | |
| १३ | के.पी.लिपीका रेड्डी, विशाखापट्न. मो.९४४१४८००२१. | कुचीपुडी नृत्य | | |
| १४ | संगिता श्री साई, दिल्ली, मो.९८११४०७८७८ | भजन संध्या | | |
| १५. | किर्ती अनुराग, मुंबई | | पत्र नाही | मा.अध्यक्ष साो. |
| १६ | डॉ.यशवंत पाठक, मनमाड | | पत्र नाही | |
| १७ | ह.भ.प. मोरे दादा, दिंडोरी | प्रवचन | दि.३०/१२/२००९ दु.३-६ | मानधन संस्थान नियमाप्रमाणे. |

उपरोक्तप्रमाणे सतरा कलाकारांचे पत्र आलेले आहेत. तसेच दि.१७/१२/२००९ रोजी सायंकाळी ५.०० वा. मा.श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर, मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, व मा.डॉ.एकनाथ गोंदकर यांनी समक्ष बोलावून शिर्डी महोत्सवाचा कार्यक्रम हा दि.३०/१२/२००९ व दि.३१/१२/२००९ रोजी करायचा आहे, तसेच सर्व कार्यक्रम साईनगर मैदानावर घेण्यात यावे, असे सांगितले आहे. यावेळी उपरोक्त कलाकारांपैकी खालील कलाकारांचे कार्यक्रम व मानधन निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | दिनांक व वेळ | कलाकाराचे नांव व पत्ता | कार्यक्रमाचे स्वरुप | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | दि.३०/१२/२००९ दु.३.०० ते ६.०० | ह.भ.प. अण्णासाहेब मोरे , दिंडोरी | प्रवचन | २ | **रु. ५१,०००/- + टॅक्स .** |
| ०२. | दि.३०/१२/२००९ रात्रौ ७.०० ते ९.०० | नितुकुमार, नोएडा | साई स्वरांजन | १० | रु. ११,०००/- |
| ०३. | दि.३०/१२/२००९ रात्रौ ९.०० ते १०.३० | श्रीमती सुनिता टिकारे, मुंबई | भजन कार्यक्रम | ६ | रु. ११,०००/- |
| ०४. | दि.३१/१२/२००९ रात्रौ ७.०० ते ९.०० | श्रीमती संगीता श्री साई, दिल्ली | भजन संध्या | १२ | रु. ११,०००/- |
| ०५. | दि.३१/१२/२००९ रात्रौ ९.०० ते १०.३० | श्री पारस जैन व प्रविण महामुनी, शिर्डी | भजन संध्या | १० | प्रत्येकी रु. ०१/- |
| ०६. | दि.३१/१२/२००९ रात्रौ १०.३० ते १२.२० | श्री सच्चिदानंद अप्पा, मुंबई | एक शाम साई के नाम. | २३ | रु. ११,०००/- |

उपरोक्तप्रमाणे कलाकार कार्यक्रम आयोजित करणेस मान्यता असावी, ही विनंती.

दिनांक १५/११/२००८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णय क्र. ८७४ नुसार शिर्डी महोत्सव २००८ साठी खालीलप्रमाणे बजेट मंजूर झाले होते. त्यासाठी प्रत्यक्षात खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे. सन २००९ चे शिर्डी महोत्सवासाठी रकाना नं. ५ मध्ये दर्शविलेप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे, त्यास मंजूरी असावी.

| अ.नं. | तपशील | सन २००८ च्या महोत्सवाचे बजेट | सन २००८ चे शिर्डी महोत्सवासाठी प्रत्यक्ष झालेला खर्च | सन २००९ चे शिर्डी महोत्सवासाठीचे- अंदाजे बजेट |
|---|---|---|---|---|
| **०१.** | **०२.** | **०३.** | **०४.** | **०५.** |
| ०१. | स्टेज, ड्रेसींग रुम व ५०० खुर्च्यांसह बैठक व्यवस्था | ००,५५,०००.०० | ०५,१०,०१६.०० | ००,७०,०००.०० |
| ०२. | जाहिरात, कापडी बॅनर्स व बोर्ड | ००,२५,०००.०० | ००,०१,९८०.०० | ००,१०,०००.०० |
| ०३. | कलाकार मानधन व प्रवास खर्च | ०६,००,०००.०० | --- | ०१,२०,०००.०० |
| ०४. | इतर किरकोळ खर्च (मंदिर सजावट व इतर) | ००,१०,०००.०० | ००,१६,४७५.०० | ०१,००,०००.०० |
| ०५. | व्हि.डी.ओ. शुटींग व फोटोग्राफी | ००,१०,०००.०० | --- | --- |
| ०६. | जादा कर्मचारी खर्च | --- | ०१,८२,४५४.०० | --- |
| | **एकूण खर्च** | **०७,००,०००.००** | **०७,१०,९२५.००** | **०३,००,०००.००** |

दि.३१/१२/२००९ रोजी समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले रहाणार आहे.

दोन दिवसाच्या या शिर्डी महोत्सवासाठी साधारणपणे अंदाजीत रु. ३,००,०००/- (अक्षरी रु. तीन लाख मात्र) येणा-या खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३१० उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

---

**विषय नं.३८ श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२००९ चे प्रत्यक्ष खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयास अनुसरुन दि.२१/०६/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.०२, व निर्णय क्र.५०७ (४) निर्णय क्र.४४४ अन्वये श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००९ साठी एकूण खर्च रु. ४२,७५,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षा कमी खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| ०१. | मंडप,कमानी स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | १७,००,०००/- | ५,१७,९४३/- |
| ०२. | कलाकार बिदागी, | २,००,०००/- | ८०,०३५/- |
| ०३. | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ३,५०,०००/- | २,५५,१६९/- |
| ०४. | विद्युत रोषणाई | ५,०००/- | --- |
| ०५. | निमंत्रणपत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह. | १५,००,०००/- | १४,८७,२५५/- |
| ०६. | जादा कामगार<br>स्वयंसेवक(विद्यार्थी) मानधन | ०३,४५,०००/- | ९०,१४२/-<br>४८,५५०/- |
| ०७. | इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, लस्सी, शोभेच दारुकाम, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ.शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | ०१,००,०००/- | ३७,५०१/- |
| ०८. | पालख्या, पिण्याचे पाणी इ. | १०,०००/- | --- |
| ०९. | उत्सवात येणारे भक्तांसाठी रांगेत वाटण्यात येणा-या पाऊचचा खर्च | ६५,०००/- | --- |
| | एकूण खर्च | ४२,७५,०००/- | २५,१६,५९५/- |

**निर्णय क्र.३११ श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२००९ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

---

**विषय नं.३९ श्री पुण्यतिथी उत्सव -२००९ चे प्रत्यक्ष खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयास अनुसरुन दि.१९/०७/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.६४८ व दि.१९/०९/२००९ रोजीचे रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.७९० अन्वये श्री पुण्यतिथी उत्सव २००९ साठी एकूण खर्च रु. ४५,७१,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षा कमी खर्च झालेला आहे. तथापि काही बाबींवर जादा खर्च झालेला आहे, त्याचा अहवाल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च | जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप,कमानी स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | ११,५०,०००.०० | ०४,७२,०३४.०० | --- |
| ०२. | कलाकार बिदागी-कीर्तनकार व निमंत्रित कलाकार कार्यक्रमासह) | ०१,७१,०००.०० | १,७८,२८९.०० | ७,२८९.०० |
| ०३. | भक्तांना मिष्टान्न - श्रम परिहार - मजूरीसह | ०७,००,०००.०० | ०५,९४,५८९.०० | --- |
| ०४. | विद्युत रोषणाई - (डिझेल बिलासह) | ०६,००,०००.०० | ०५,२५,५३७.०० | --- |
| ०५. | निमंत्रणपत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह. | १५,००,०००.०० | १४,६४,६४२.०० | --- |
| ०६. | जादा कामगार<br>स्वयंसेवक (विद्यार्थी) मानधन | ०३,५०,०००.०० | ०१,४८,२५०.०० | --- |
| ०७. | इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, लस्सी, शोभेच दारुकाम, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ.शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | ०१,००,०००.०० | ३५,४२६.०० | --- |
| ०८. | पाणी व्यवस्था (जनरेटर भाडे व इतर खर्चासह) | --- | --- | --- |
| | एकूण खर्च | ४५,७१,०००.०० | ३४,१८,७६७.०० | ७,२८९.०० |

श्री पुण्यतिथी उत्सवात अंदाजीत खर्च रु. ४५,७१,०००.०० इतका अपेक्षीत होता मात्र परंतू प्रत्यक्षात खर्च रु. ३४,१८,७६७.०० इतका झालेला आहे. म्हणजे अंदाजीत खर्चापेक्षा रु.११,५२,२३३/- मात्रने खर्च कमी झालेला आहे.

कलाकार मानधन या बाबींवरच रु. **७,२८९.००** इतका जादा खर्च झालेला आहे. त्यास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३१२ श्री पुण्यतिथी उत्सव -२००९ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

---

**विषय नं.४० (अ) श्री रामनवमी उत्सव -२०१० चे नियोजन व त्याचे खर्चास मान्यतेबाबत.**

महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

" राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संथान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. "

त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्रीरामनवमी उत्सव मंगळ वार दिनांक २३/०३/२०१० ते गुरुवार दिनांक २५/०३/२०१० ( चैत्र शुध्द ७ शके १९३२ ते चैत्र शुध्द १० शके १९३२) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस बुधवार दिनांक २४/०५/२०१० आहे.

**<u>या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.</u>**

| अ.नं. | तपशील | उत्सवात तयारी करावयाची कामे |
|---|---|---|
| ०१. | उत्सव निमंत्रण पत्रिका | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री रामनवमी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १ लाख ५५ हजार निमंत्रण पत्रिका तसेच सन्माननीय पाहुण्यांसाठी १,००० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट( न्यूज अँटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| ०२. | उत्सव व्यवस्था- | **अ) कलाकार कार्यक्रम :-** |
| | **मंगळवार, दिनांक-२३/०३/२०१० ( प्रारंभ दिवस)** | सायंकाळी ०८.०० ते रात्रौ. ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |
| | **बुधवार दिनांक २४/०३/२०१० ( मुख्य दिवस)** | १) सायंकाळी ०८.०० ते रात्रौ. ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर.)<br>२) रात्री १०.०० ते सकाळी ०६.०० पर्यंत (०४/०४/२००९ )कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम.<br>या मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | **गुरुवार, दिनांक २५/०३/२०१० ( सांगता दिवस)** | गुरुवारची नित्याची पालखी व सायंकाळी ०७.३० ते १०.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर)<br>उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत. इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता नंतर सादर केला जाईल. |
| | **ब) कीर्तन कार्यक्रम** | श्री रामनवमी कीर्तन कार्यक्रम ह.भ.प.दासगणू महाराज आश्रम गोरटे, हे करीत असतात. त्यांचेकडून आलेल्या कीर्तनकारामार्फत कीर्तने होतील. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. |
| ०३. | श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण ) पूजा व अभिषेक पूजा | उत्सवकाळात दि. २३/०३/२०१० ते दि. २५/०३/२०१० अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा चालू राहतील. |
| ०४. | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दिनांक २३/०३/२०१० रोजी सकाळी ०६.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक २४/०३/२०१० रोजी सकाळी ०५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे ५ सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक २२/०३/२०१० रोजी मंदिर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.<br>या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.विश्वस्तांची नांवे ठरविणे आहेत. सोबत कोरा तक्ता जोडलेला आहे. तसेच श्री पुण्यतिथी उत्सव सन २००९ मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा घेतलेल्या मा. विश्वस्तांचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे. विश्वस्त सहभाग या सभेत निश्चित करणे आहे. |
| ०५) | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी दि.२३/०३/२०१० रोजी श्रींचे पालखीची गांवातून मिरवणूक व बुधवार दिनांक २४/०३/२०१० रोजी रथाची गांवातून मिरवणूक सायंकाळी ०४.४५ वाजता निघेल. गुरुवार दिनांक २५/०३/२०१० रोजी रात्रौ ९.१५ वाजता नित्याची गुरुवारची पालखी राहील. |
| ०६) | कावडी व निशाणांची मिरवणूक | उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक २४/०३/२०१० रोजी सकाळी कावडी व सायंकाळी निशाणांची मिरवणूक राहिल. श्री रामनवमीचे दिवशी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी कावडीने घेऊन येतात. यासाठी बाहेरील बाजूस स्टेडीयमच्या ठिकणी अभिषेक मूर्ती ठेवून स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते. कावडीधारकांना श्रीफळ व लहान मुलांना पेरु प्रसाद दिला जातो. सायंकाळी ०४.०० वाजता निशाणांची मिरवणूक होईल. (मंदिर विभाग व संरक्षण विभाग) |

| अ.नं. | तपशील | उत्सवात तयारी करावयाची कामे |
|---|---|---|
| ०७) | **विद्युत रोषणाई** | समाधी मंदिर, श्री द्वारकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री रामनवमी उत्सवात श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई हे विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च त्यांना द्यावा लागेल. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. (विद्युत विभाग) |
| ०८) | **संरक्षण व्यवस्था** | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना विनंती करण्यात येईल. (संरक्षण विभाग) |
| ०९) | **प्रसाद - भोजन व्यवस्था** | उत्सव काळात प्रसादाल्यात मिष्टांन्नासह रुपये १०.०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्याचे कुटुंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना व निमंत्रीत कलाकरांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅंटीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल. (प्रसादालय व कॅंटीन विभाग)<br>पुण्यतिथी उत्सवात सन २००९ तिन्हीही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते.<br>०१) प्रथम दिवस - शिरा (०२) मुख्य दिवस - जिलेबी (०३) सांगता दिन - बुंदी<br><u>या उत्सवाचे तीन मिष्टांन्न पदार्थ ठरवावयाचे आहेत.</u><br>०१) प्रथम दिवस - (०२) मुख्य दिवस - (०३) सांगता दिन - |
| १०) | **लिलाव** | श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल. (लेखाशाखा) |
| ११) | **देणगी काऊंटर्स** | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. (लेखाशाखा) |
| १२) | **जादा कंत्राटी कर्मचारी** | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील.(कामगार विभाग) |
| १३) | **भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था** | संस्थानचे साईप्रसाद नं. १ व नं. २, धर्मशाळा नं. २, द्वारावती , भक्तनिवासस्थान, इ. इमारतीमधून तसेच साईनगर, धर्मशाळा व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व उन्हाळी मंडपही टाकावयाचे आहेत. त्यास मान्यता असावी. आवश्यकतेनंसार व गरजेनुसार त्यात वाढ करावी लागेल. (बांधकाम विभाग) |
| १४) | **रुग्णालय व्यवस्था** | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात येईल. (दोन्ही रुग्णालय) |
| १५) | **पालखी व्यवस्था** | श्री रामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान, धर्मशाळा, परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगलकार्यालय, साईउद्यान, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, धर्मशाळा इ. इमारतीत तसेच साईनगर मैदानात, जुन्या प्रसादालयचे, न.भ.निवासाचे व धर्मशाळेच्या मोकळ्या जागेत मंडप/शामियाने इ.मध्ये करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. त्याच प्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिरडी रस्त्यावर मागील श्री रामनवमी प्रमाणे यंदाही करावी लागणार आहे. त्या संबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजूरीसाठी सादर करतील. गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी, लतीफवाडी, घाटनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नासिक, शिंदे, सिन्नर (एमआयडीसी), खोपडी- दत्तमंदिर, पांगरी, वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, सायाळे, जवळके, डो-हाळे, इ. ठिकाणी पालखी मंडप, वीजव्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईले. तसेच दोन वर्षापासून पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थानमार्फत शिर्डी येथे आलेवर एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येत आहे. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येईल. |
| १६) | **कुस्त्या हंगामा** | श्री रामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हंगामा गांवक-यां मार्फत भरविण्यात येतो. गेल्या वर्षी कुस्त्यांसाठी रुपये ७५,०००=०० ( अक्षरी रुपये पंच्याहत्तर हजार) मात्र खर्चास मंजुरी देण्यात आलेली होती. या वर्षी द्यावयाचे रक्कमेचा आंकडा निश्चित करणे आहे. |
| १७) | **पाणीपुरवठा** | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल.<br>नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८) | **कार्यक्रमाची सांगता** | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १९) | **खर्चाचे अंदाज पत्रक** | श्री रामनवमी उत्सव - २००९ मध्ये अंदाजपत्रकीय रुपये ४०,००,०००(अक्षरी रु. रू. चाळीस लाख मात्र) इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये २७,०२,२१९/- (अक्षरी रु. सत्तावीस लाख दोन हजार दोनशे एकोणावीस मात्र) इतका खर्च झाला होता. श्री रामनवमी उत्सव सन २०१० करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३५,००,०००.०० (अक्षरी रु. पस्तीस लाख मात्र) मंजूरीसाठी सादर केलेले आहे. |

तरी श्री रामनवमी उत्सव २०१० साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ३५,००,०००.०० (अक्षरी रू. पस्तीस लाख मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**(ब) तसेच, शिर्डी गावचे यात्रौत्सवासाठी तरतूद करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दरवर्षी श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री रामनवमी उत्सव साजरा केला जातो. श्री रामनवमी उत्सव हा श्री साईबाबांनी सुरु केलेला उत्सव असून श्री साईबाबांचे वेळेस श्री रामनवमी उत्सवात कुस्त्या, घाड्यांची शर्यत, तमाशा इ. विविध कार्यक्रम साजरे केले जात होते. यावर्षी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी , ग्रामस्थ व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) यांचे संयुक्त विद्यमाने मोठ्या प्रमाणात व नाविन्यपुर्ण असा श्री रामनवमी उत्सव साजरा करावयाचा असून त्याचे नियोजनासाठी मंगळवार, दि. ०२/०३/२०१० रोजी शिर्डी

नगरपंचायत, शिर्डी येथे नगरपंचायतीचे अधिकारी , पदाधिकारी व शिर्डी ग्रामस्थ यांनी आयोजीत केली होती. या सभेस मा.उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरपंचायतीचे अधिकारी, पदाधिकारी, आजी-माजी सदस्य व शिर्डी ग्रामस्थ उपस्थित होते. संस्थानमार्फत मा.डॉ.गोंदकर, विश्वस्त व मा.उपकार्यकारी अधिकारी हे उपस्थित होते.

चालू वर्षापासून श्री रामनवमी उत्सवाचे (यात्रेचे) सुयोग्य नियोजन करुन मोठ्याप्रमाणात आयोजीत करावी, अशी मागणी पदाधिकारी व ग्रामस्थ यांनी केली. या सभेत संस्थानमार्फत खालीलप्रमाणे श्री रामनवमी यात्रेस मदत करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी मांडली.

०१) दरवर्षी श्री साईबाबा संस्थानमार्फत कुस्त्यांसाठी रु. ७५,०००/- मात्र देत असते. यावर्षी मोठ्याप्रमाणात यात्रा भरवावयाची असलेने संस्थानने रु.७५,०००/- + कुस्त्यांमध्ये साई केसरी कुस्ती सुरु करुन रु १,००,०००/-असे एकूण रु.१,७५,०००/- द्यावे.

०२) सांस्कृतीक कार्यक्रमासाठी आलेल्या कलाकारांचे सत्कारांचे साहित्य-शाल, श्रीफळ, उदी, गुच्छ, साईचरित्र इ. संस्थानमार्फत देण्यात यावे.

०३) कावडी मिरवणूकीचे नियोजन पोलीस व ग्रामस्थ यांचे सहकार्यातून करणे.

०४) कुस्तीसाठी मैदानाचे नियोजन, बक्षीसाचे नियोजन, गाद्या देणेबाबतचे नियोजनासाठी एक समन्वय समिती स्थापन करुन प्रशासकीय दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्यात यावा.

वरीलप्रमाणे नियोजन संस्थानमार्फत करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केलेली आहे.

दि. १७/०२/२०१० रोजी मंदिर विभागामार्फत लेंडीबाग येथील सभागृहात मा.डॉ.गोंदकर, विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, अधीक्षक, मंदिर विभाग, संरक्षण विभाग प्रमुख, पाणीपुरवठा विभाग प्रमुख, मा.श्री शिवाजी गोंदकर, उपनगराध्यक्ष, माजी नगराध्यक्ष श्री कैलास(बापू) कोते, सर्व आजी-माजी नगरसेवक, शिर्डीतील सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी यांचे उपस्थीतीत सभा आयोजीत करण्यात आली होती.

त्यात मा.श्री शिवाजी गोंदकर, उपनगराध्यक्ष यांनी श्री रामनवमी उत्सव साजरा करणेबाबत नियोजन करावे, शिर्डीतील आजी माजी नगरसेवक, विविध मंडळाचे पदाधिकारी यांचेशी चर्चा करुन याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले होते. सदरच्या सभेत मा.डॉ.गोंदकर, विश्वस्त यांनी दरवर्षी संस्थानमार्फत कुस्त्यांसाठी रु. ७५,०००/- देत असते, त्याऐवजी यावर्षी एकच मोठी कुस्ती आयोजीत करावयाची व त्यासाठी संस्थानमार्फत रु. १,००,०००/- संस्थानमार्फत देण्यात येईल इतर जो काही खर्च आहे तो शिर्डी नगरपंचायत व ग्रामस्थ यांनी करावा, असे सांगितलेले आहे.

दि.०२/०३/२०१० रोजीचे सभेत चर्चेत उपस्थित झालेल्या १ ते ४ मुद्यांबाबत निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३१३** **उपरोक्त "अ" प्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच "ब" प्रमाणे कुस्तीसाठी रु.१,७५,०००/- चे खर्चास व उर्वरित कार्यवाही प्रथेप्रमाणे करणेस मान्यता देणेत आली. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि. २७.१२.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१८३ अन्वये शिर्डी गावचे दक्षिणमुखी हनुमान मंदिर दैनंदिन संस्थानकडे घेणेत आलेले आहे. तसेच तेथे दक्षिणापेटीत जमा होणारी रक्कमही संस्थान जमा करण्यात येते. सदर मंदिराचा जीर्णोध्दार करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४१५ (०१) अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर मंदीरातील पूर्वीची मूर्ती भंगल्यामुळे नवीन मूर्ती बनविण्यास व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०५)

---

**विषय नं.४१** **पालखीधारकांची बैठक आयोजित करणेबाबत, श्री.दिपक हांडे, अध्यक्ष, श्रीसाईबाबा पालखी पदयात्रा सोहळा महासंघ, मुंबई यांचे निवेदनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री दिपक हांडे, अध्यक्ष, श्री शिर्डी साईबाबा पालखी पदयात्रा सोहळा महासंघ, मुंबई, यांचे दि. २३/११/२००९ रोजीचे निवेदनात महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून तसेच इतर राज्यातूनही अनेक मंडळे पदयात्रेचे आयोजन करीत असतात आणि त्या निमित्ताने लाखो साईभकत पदयात्रेने श्री क्षेत्र शिर्डी येथे येत असतात. पदयात्रेला सुरुवात कधी व कशी झाली याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या वृत्तपत्राच्या कात्रणावरुन आपणांस येईलच.

आजवर सस्थानकडून पदयात्रेने येणा-या साईभक्तांना वेळोवेळी सोई-सुविधा पुरवून सहकार्य करण्यात आलेले आहे. तसेच सहकार्य यापुढेही मिळत राहील याची आम्हांस खात्री आहेच. मात्र या उपरोक्त पदयात्रेने येणा-या साईभक्तांनास व आयोजक मंडळांना श्री साईमहिमा, भक्तीमार्ग, सामाजिक बांधिलकी यांचे प्रबोधन व्हायला हवे असे आम्हांस वाटते. पुढील वर्षी रविवार, दि.१४/०३/२०१० रोजी मुंबईतून व अन्य भागातून पदयात्रांना सुरुवात होईल. तत्पूर्वी दोन महिने आपण सर्व मंडळांची, मंडळाच्या प्रतिनिधींची एकत्रित बैठक मुंबईत बोलावून चर्चा घडवून आणावी, अशी आम्ही आपणांस विनंती करीत

आहोत. या संदर्भात आवश्यक ते सर्व सहकार्य आम्ही आपणांस करुच. अशा आशयाचे निवेदन सादर केलेले आहे.

यापुर्वी श्री रामनवमी उत्सवाचे पुर्वी सन २००६ मध्ये माहे २४ जानेवारी २००६ मध्ये पालखीधारकांची व मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील सदस्यांची पालखी पदयात्री निर्याजन संदर्भात सभा आयोजित करण्यात आलेली होती. त्यात २०-२५ पालखी-पदयात्रींचे प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. संस्थानमार्फत, श्री सु.की.जगताप, प्र.अ., मा.श्री.वाबळे पाटील, विश्वस्त, व मुंबई कार्यालयातील कर्मचारीवृंद हजर होता. मा.श्री.वाबळेपाटील, यांनी सभेचे सुत्र संचलन केले होते. त्यात पालखी पदयात्रींनी केलेल्या सुचना व सुचविलेले पर्याय यांचा विचार करुन संस्थानमार्फत जास्तीत जास्त सोई - पालखी थांबा-त्याठिकाणी मंडप, लाईट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच आवश्यक त्याठिकाणी पक्की बांधकामे करुन निवासव्यवस्था तसेच पदयात्रींची निवासव्यवस्था, मंडप उभारुन, पालखीत येणा-या पदयात्रींनां शिर्डी येथे आलेवर एकवेळचे भोजन, दर्शन व्यवस्था इ. करणेचे ठरविले होते, त्यानुसार पालखीधारकांच्या सर्व सोई करण्यात आलेल्या आहेत व त्या आताही चालू आहेत.

तथापि श्री दिपक हांडे, अध्यक्ष, श्री शिर्डी साईबाबा पालखी पदयात्रा सोहळा महासंघ, मुंबई, यांनी सर्व मंडळांची व मंडळांच्या प्रतिनिधींची एकत्रित बैठक मुंबई येथे आयोजित करुन चर्चा घडवून आणणेबाबत विनंती केलेली आहे. तरी उपरोक्तप्रमाणे मुंबई येथे आयोजित करणेचे झालेस प्रथमतः मा.अध्यक्षमहोदय, मा. उपाध्यक्षमहोदय व मा.विश्वस्त यांना विचारुन तारीख निश्चित करुन त्यानुसार पालखीधारकांना त्याची पुर्वसुचना द्यावी लागेल व मुंबई कार्यालयला त्यानुसार सुचना द्याव्या लागतील. पालखी-पदयात्रींच्या सभेची तारीख निश्चित करुन संबंधीतांना व पालखीधारकांना पत्र पाठविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३१४ उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

---

**दिनांक ६.०३.२०१०**

**विषय नं.४२ नाताळ कालावधीत मंदीर परिसरात होणाऱ्या भजन कार्यक्रमाची जागा बदलणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. राजेंद्र हरिभाऊ गोंदकर व शिर्डी ग्रामस्थ ,यांनी दि.२३/१२/२००९ च्या निवेदनाने गेल्या काही वर्षापासून आपण गर्दी व्यवस्थापनाच्या भावनेतून मंदिर परिसरातील सर्व सार्वजनिक व ग्रामस्थांच्या कार्यक्रमाला बंदी घातली आहे. मात्र असे असतांनाही आपण उद्या दि.२४/१२/२००९ पासून सुरु होणा-या नाताळच्या कालावधीत मंदिर परिसरात एका भजन कार्यक्रमाला परवानगी दिली आहे. तसेच या कार्यक्रमासाठी व्यवस्थापनाने ठरावही केला आहे. गेल्या तीन वर्षापासून आपण अशा प्रकारची परवानगी देत आहोत. वास्तविक या कालावधीतील होणा-या उच्चांकी गर्दीचा इतिहास पहाता कोणतीही दुर्घटना घडू शकते. सदर कार्यक्रमास मंदिर परिसराबाहेर परवानगी द्यावी.

यामुळे या निर्णयाचा आपण फेरविचार करुन लेंडीबागेजवळ होणा-या या कार्यक्रमास परवानगी नाकारावी व सदरचा कार्यक्रम मंदिर परीसराच्या बाहेर नेण्यास संबंधीतांना भाग पाडावे. नाताळात लेंडीबागेजवळ होणा-या या कार्यक्रमाची जागा न बदलल्यास आम्हीही या कार्यक्रमाजवळच प्रतिकार्यक्रम घेवू. यामुळे निर्माण होणा-या कायदा व सुव्यवस्थेस व संभाव्य दुर्घटनेस साईबाबा संस्थान व आपण जबाबदार असेल याची नम्रपणे नोंद घ्यावी.

दि.१०/०१/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. (१०-१६) अन्वये श्री रेड्डी यांनी संस्थानला देऊ केलेली देणगी संस्थानचे इतिहासात सर्वाधिक व ऐतिहासिक आहे. याबाबत रेड्डी कुटुंबियांचा संस्थानमार्फत सत्कार करण्यात यावा, तसेच त्यांचे कुटुंबीयातील फक्त खालील व्यक्ती शिर्डीस येतील त्या त्या वेळेस त्यांना प्रत्येकी जास्तीत जास्त दहा कुटुंबीयांसमवेत तहहयात आरती व दर्शन व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी, तसेच दि. २० डिसेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत त्यांचेमार्फत लेंडीबागेत आयोजित करण्यात येणा-या नामसप्ताहास कायमस्वरुपी मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

गेल्या दोन वर्षापासुन लेंडीबागेत पालखी, भजन कीर्तन इ. कार्यक्रम करणेस इतर कोणालाही परवानगी दिलेली नाही. नाताळ व वर्षाअखेर असल्याने या कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणात होणारी गर्दी होत असते.

तथापि मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संबंधीतांना संस्थानमार्फत त्यांचे मागणीनुसार दि.२४/१२ ते २/१ अखेर भजन कार्यक्रम करणेस परवानगी देत असतो. यावर्षीही त्याचप्रमाणे परवानगी देण्यात आलेली आहे. संबंधीतांचे निवेदन हे परवानगी दिलेनंतर आलेली आहे. तथापि संबंधीतांचे निवेदनानुसार व शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी दिवसेंदिवस वाढत जाणारी गर्दी याचा विचार करुन यापुढे लेंडीबागेत अशाप्रकारच्या कार्यक्रमांना परवानगी देणेबाबत विचार करणे आवश्यक असलेमुळे तसा प्रस्ताव संस्थानच्या व्यवस्थापन समितीपुढे मांडुन त्यावर झालेला निर्णय संबंधीतांना

कळविता येईल. तसेच श्री ए.एन.रेड्डी, हैद्राबाद यांचे बाबत झालेल्या निर्णयावर फेर विचार करुन त्याबाबत योग्य त्या निर्णयासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.ए.एन.रेड्डी,हैद्राबाद यांचेसह कोणासही मंदीर परिसरात तसेच लेंडीबागेत भजन व अन्य कार्यक्रमासाठी परवानगी देण्यात येऊ नये,असें ठरलें.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

---

**विषय नं.४३** **सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास जिल्हा सैनिक कार्यालय, अहमदनगर यांना दिलेल्या आर्थिक मदतीबाबत**

**प्रस्ताव-** मा.डॉ.अन्बलगन, जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी दि.१३/०२/२००९ चे पत्रान्वये, मातृभुमिच्या संरक्षणाबरोबरच देशाअंतर्गत उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्था,भुकंप, महापूर, या सारख्या नैसर्गिक आपत्तीस धावुन जाणाऱ्या सैनिकांना वीरगती प्राप्त होतात, तसेच असंख्य जखमी व अपंग होतात. सैनिकांनी केलेल्या बलिदानाची पावती तसेच त्यांच्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी देशात डिसेंबर महिन्यात सर्वत्र ध्वजदिन साजरा केला जातो. वीरांच्या वीरमाता, वीरपीता, वीरपत्नी, अपंग सैनिक त्यांचे कुटूंबिय यांच्या कल्याणकारी योजणा राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडुन यावर्षी अहमदनगर जिल्हयासाठी रुपये ६० लाखाचे उदिष्ठ ठरवून देण्यात आलेले आहे. यासाठी शासकीय कार्यालये, विविध संस्था, महामंडळे, शैक्षणिक संस्था, शालेय विद्यार्थी यांचे मदतीने निधी जमविण्याचे प्रयत्न चालु आहे. श्री साईबाबा संस्थानकडून या कार्यास रु.११ लाख मदत मिळावी, अशी विनंती केली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०५/२००९ चे सभेत निर्णय क्र.४४७ अन्वये सदर निधी संस्थानचे कायम कर्मचाऱ्यांचे मासिक वेतनातुन नियमानूसार कपात करण्यात यावा, असे ठरले.

दि.०५/१२/२००९ रोजी मा.अध्यक्ष, श्री. ससाणे साहेब यांचेशी झालेल्या चर्चेत कर्मचाऱ्यांकडून अंदाजे रु.२,६१,०००/- रक्कम (प्रत्यक्ष वसून करतांना यात कमी-अधिक रक्कम होऊ शकेल) जमा होऊ शकेल, उर्वरित निधी संस्थानचा हिस्सा असे एकूण रुपये ५,००,०००/- (रु.पाच लाख) रक्कम सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी देण्यात यावे, असे सांगितले आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस,वशी-३/१४९३६/२००९, दि. ०६/१२/२००९ अन्वये रु.५ लाख मात्रचा भारतीय स्टेट बॅन्क शाखा शिर्डीचा धनादेश क्र.०११९२, दि.०५/१२/२००९ जिल्हा सैनिक कार्यालय अहमदनगर यांना दिला आहे.

दि.२८/०६/२००९ रोजीचे मा.छाननी समितीचे इतिवृत्त मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०७/ २००९ चे सभेत कायम करण्यात आले आहे. त्यात निर्णय क्र.५९३ (०२) क) अधिनियम कलम २१(२) नुसार शासकीय / वैयक्तीक अनुदान मागणी करणारे प्रस्ताव छाननी समितीच्या अखत्यारीत येत नसल्याने सदरचे प्रस्ताव परस्पर राज्य शासनाकडे पुढील निर्णयासाठी पाठविण्यात यावेत, असे ठरले आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव शासकीय असल्याने छाननी समितीचे शिफारसीसाठी सादर न करता मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानूसार शासनाचे मान्यतेसाठी सादर करावा लागेल.

तरी संस्थान कर्मचाऱ्यांकडून जमा करावयाची रक्कम रुपये २,६१,०००/- वजा जाता उर्वरीत रक्कम रुपये २,३९,०००/- मात्र संस्थानचा हिस्सा म्हणून खर्ची टाकण्यास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३१६** **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरलें.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

---

**विषय नं.४४** **संतकवि कै.दासगणू महाराज जन्मस्थळ अकोळनेर,ता.जि.अहमदनगर यांना विकास कामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अध्यक्ष, राष्ट्र हित संवर्धक मंडळ,अहमदनगर यांनी दि.१७/०१/२०१० चे पत्रान्वये, ,आमचा ट्रस्ट, नोंदणीकृत (सार्व.नों.क्र.एफ-१२० अ.नगर) असून ॲड.श्री.दाजीसाहेब दाभोळकर यांनी अकोळनेर, जि.अ.नगर येथील त्यांचा राहता वाडा व परसबागेची जागा बक्षीसपत्र करुन राष्ट्रहित संवर्धक मंडळास दिली आहे. या वाडयात संत कवी कै.दासगणू महाराजांचा जन्म दि.६ जानेवारी १८६८ रोजी झालेला आहे. त्यांच्या जन्मस्थळाचा विकास करण्यासाठी रु.१ कोटी २६ लाख रक्कमेचा आराखडा तयार केला आहे. कै.दासगणु महाराज व श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे ॠणानुबंध व नाते लक्षात घेता संस्थानमार्फत विकास प्रकल्पास लागणारे अर्थ सहाय्य उपलब्ध करुन द्यावे, अशी विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मध्ये विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग याबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**कलम २१ (२) पोट-कलम (१)** मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

**<u>कलम २१ मधील (२) पोट कलम (१) (एक)-</u>** राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी आधारगृहे किंवा इतर धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधीत असलेली एखादी नोदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी, मा.छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने अनुदान देण्याची तरतुद आहे.

**निर्णय क्र.३१७ संतकवि कै.दासगणू महाराज जन्मस्थळ अकोळनेर,ता.जि.अहमदनगर यांना विकास कामासाठी रुपये २५ लाख आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. याकामी छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

---

**विषय नं.४५ शिरडी नगरपंचायत शिरडी यांना रस्ते दुरुस्ती व कॉंक्रीटीकरण करणेस आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी दि.१६/०५/२००९ चे पत्रान्वये, "मा.ना.श्री अशोकरावजी चव्हाण साहेब, मुख्यमंत्री यांना, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील भावीकांची संख्या व शहरातील नागरीकांना नागरी सुविधा देण्येच्या बाबी विचारात घेता केंद्र व राज्य शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांचा पायाभुत योजनांच्या सुविधा (UIDSSMT) योजने अंतर्गत तसेच शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजना अंतर्गत शहरामध्ये खोदाई करुन पाईपलाईन टाकणेचे काम पुर्ण झालेले आहे. आता भुयारी गटार योजनेचे ४० टक्के काम झालेले आहे. सदरचे खोदाई कामाने शहरातील रस्ते पुर्णपणे उखडले असून त्याजागी रस्ते दुरुस्ती व कांक्रिटीकरण करणे गरजेचे आहे तसेच शिर्डी शहराचा वाढता विस्तार व नविन होत असलेली उपनगरातील रस्त्याची अतिशय दुरावस्था आहे. त्यामुळे पावसाळयात भाविकांना व नागरीकांना त्रास होतो.

शिर्डी हे अंतरराष्ट्रीय दर्जाचे तिर्थक्षेत्र असल्यामुळे दिवसेंदिवस श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहे. शहरातील बहुसंख्य रस्ते विकासीत करणे बाकी आहे. शहरातील दळणवळण व्यवस्था पुर्णपणे विकासीत नाही. त्यासाठी रस्ते विकासीत करणे आवश्यक आहे. शिर्डी नगरपंचायतीस उत्पन्नाची साधने मर्यादीत असल्यामुळे नागरीसुविधा देणे नगरपंचायतीस शक्य होत नाही. रस्ते रुंदीकरण, दुरुस्ती, कॉंक्रिटीकरण आदी कामे केल्याने नागरीकांना तसेच साईभक्तांना चांगली सुविधा मिळेल. त्यासाठी आपले संस्थानमार्फत रु. २ कोटी विशेष अनुदान मिळावे," अशी विनंती केली आहे. सदरच्या पत्राची प्रत श्री साईबाबा संस्थानला दिलेली नाही.

मा. ना. श्री विखे पाटील यांनी दि.१६/०६/२००९ चे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थानमार्फत रस्तेदुरुस्तीसाठी रु.२ कोटी विशेष अनुदान मंजुर करावे, असे कळविले आहे.

शासन पत्र क्र. सासंवि-२००९/३६५/(२५)-का सोळा, विधी व न्याय विभाग मुंबई दि.०६/०७/२००९ चे पत्रान्वये शिर्डी नगरपंचायतीचा लगतपुर्व दोन वर्षाचा ताळेबंद (जमाखर्च अहवाल) शासनास तात्काळ सादर करावे, असे कळविले आहे.

**१)** मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी दि.२०/०७/२००९ व **(२)** प्रशासन शाखा जा.नं.एसएसएस, वशी-२/१३११०/२००९, दि.२६/१०/२००९ चे पत्रान्वये, सन २००७-०८ व २००८-०९ या दोन वर्षाचा शिर्डी नगरपंचायतीचा दोन वर्षाचा ताळेबंद शासनास सादर केलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) पोटकलम (१) (दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी सांस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिडी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी अनुदान देणेची तरतुद आहे.

सन २००७-०८ च्या ताळेबंद मध्ये रु.१५,६९,७९,८७०/- व सन २००८-०९ चे ताळेबंद मध्ये रु.१६,०५,३५,६४०/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

शासन पत्र क्र. सासंवि-२००९/३६५/(२५)-का सोळा, विधी व न्याय विभाग मुंबई दि.१७/११/२००९ चे पत्रान्वये, शिर्डी नगरपंचायतीचा अर्थसंकल्प शिलकीचे असलेले दिसून येते. त्यामुळे शिर्डी नगरपंचायतीस रुपये दोन कोटी विशेष अनुदान श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडून देणे आवश्यक आहे काय, याबाबत आपले अभिप्राय शासनास पाठवावेत असे कळविले आहे.

शिर्डी नगरपंचायतीस रस्ते दुरुस्ती व कॉंक्रिटीकरणास रु.२ कोटी विशेष अनुदान द्यावे अगर कसे आदेश होणेस विनंती.

**निर्णय क्र.३१८ उपरोक्त प्रस्तावाबाबत स्थानिक समिती सभेने निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

---

**विषय नं.४६ शैक्षणिक संकुलाचे ग्रंथपाल पदासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, तसेच इंग्लिश मिडीयम स्कुल, तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था यामधील विद्यार्थी व विद्यार्थिनी करीता स्वतंत्र मध्यवर्ती ग्रंथालय कार्यरत आहे. शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुलाकडे याप्रमाणे विद्यार्थी संख्या आहे.

मध्यवर्ती ग्रंथालयाकडे ७,२४३ इतकी पुस्तक संख्या आहे.

| अ. नं. | विद्यालयाचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर | ६०२ |
| ०२ | श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय | ९३३ |
| ०३ | श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल इ.८वी ते १०वी | १८४ |
| ०४ | श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था | ४५० |
| | एकूण- | २१६९ |

याप्रमाणे विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्रशिक्षणार्थी सध्या शिक्षण घेत असून माध्यमिक शाळा संहिता नियम पृष्ठ क्रमांक ५६ नियम क्रमांक ५७.५ नुसार खालील तपशीलात दिल्याप्रमाणे ग्रंथपाल पदावर नेमणूक करता येऊ शकेल.

| अ. नं. | विद्यार्थी संख्या | मान्य पदे |
|---|---|---|
| ०१ | ५०१ ते १००० | ०१ अर्धवेळ ग्रंथपाल |
| ०२ | १००० ते १५०० | ०१ पुर्णवेळ ग्रंथपाल |
| ०३ | १०५१ ते २००० | ०१ पुर्णवेळ ग्रंथपाल |
| ०४ | २००० पेक्षा जास्त | ०१ ग्रंथपाल व ०१ सहाय्यक ग्रंथपाल |

अ.क्र.०४ करीता माध्यमिक शाळा संहितेनुसार ०१ पुर्णवेळ ग्रंथपाल व ०१ सहाय्यक ग्रंथपालाची नेमणूक करता येते.

ग्रंथपाल व सहाय्यक ग्रंथपाल पदासाठी अर्हता-

०१) कोणत्याही शाखेचा पदवीधर व ग्रंथालयशास्त्राची पदवी (बॅचलर ईन लायब्ररी सायन्स)
०२) एमएस- सीआयटी (संगणकाचे ज्ञान)
०३) ग्रंथपाल पदासाठी शालेय ग्रंथालय कार्यालयीन कामकाजाचा ५ वर्षाचा अनुभव आवश्यक
०४) सहा.ग्रंथपाल पदासाठी शालेय ग्रंथालय कार्यालयीन कामकाजाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक

| अ. नं. | पद | वेतनश्रेणी | ग्रेडपे |
|---|---|---|---|
| ०१ | ग्रंथपाल | ५२००-२०२०० | २८०० |
| ०२ | सहाय्यक ग्रंथपाल | ५२००-२०२०० | २००० |

तरी सदर प्रस्तावावर विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.३१९ शैक्षणिक संकुलाचे ग्रंथपाल पदासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**विषय नं.४७ पाणीपुरवठा विभागप्रमुख या पदावर नियुक्तीबाबत**

**प्रस्ताव-** श्री.प्रल्हाद गंगाधर शेळके, पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचे सेवानिवृत्तीचे विहीत वयोमान पूर्ण झाल्यामुळे त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/३९१०/२००८ दि.११/१२/२००८ अन्वये दि.३१/०३/२००९ रोजीचे माध्यान्होत्तर सेवानिवृत्त करण्यात आले आहे.

श्री. शेळके यांचे विनंती अर्जानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०२/२००९ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/११२३/२००९ दि.०३/०४/२००९ अन्वये त्यांची संस्थानचे पाणीपुरवठा विभागाकडे कंत्राटी पध्दतीने पाणीपुरवठा विभाग प्रमुख या पदावर दि.०३/०४/२००९ पासून पुढे सहा महिन्यासाठी नेमणूंक करण्यात आली होती.

सदरची मुदत संपुष्ठात आल्यानंतर श्री. शेळके यांचे दि.२३/०८/२००९ रोजीच्या विनंती अर्जानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२००९ रोजीचे निर्णय क्र.७७० नुसार "प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शासनाकडे मागणी करुन डेप्युटेशनवर कायम स्वरुपी इंजिनियरची नेमणूंक करण्यात यावी. तूर्त सहा महिने कालावधीसाठी अथवा नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत श्री. शेळके कंत्राटी पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांना पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. "
मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार श्री. शेळके यांना पूवीच्या अटी-शर्ती कायम ठेवून दि. ०३/१०/२००९ पासून पुढे मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दि.०२/०४/२०१० अखेर संपुष्ठात येईल.

तरी पाणी पुरवठा प्रमुख या पदावर जाहीरात देऊन कर्मचारी नेमणूक करावयाची अथवा शासनाकडून डेप्युटेशनवर मागणी करावयाची याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२० यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणीपुरवठा विभागप्रमुख या पदाची अर्हता निश्चित करुन या पदावर अनुभवी उमेदवाराची नेमणूक होणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात यावेत, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**विषय नं.४८ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल पूर्व प्राथमिक शिक्षण सेवक पदासाठी जाहीरातीद्वारे केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/०४/२००९ चे सभेतील निर्णयानुसार कन्या विद्या मंदिर शिक्षण सेवक व प्रयोगशाळा सहाय्यक तसेच इंग्लिश मिडीयम स्कूलसाठी पुर्व प्राथमिक शिक्षणसेवक पदांसाठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात येऊन दि.२३/०५/२००९ अखेर पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार आलेल्या अर्जातील जाहीरातीनुसार पात्र शैक्षणिक अर्हतेच्या व आरक्षीत प्रवर्गाच्या उमेदवारांना मुलाखत पत्र देऊन दि.१२/०७/२००९ रोजी खालील मा.विश्वस्त व संबंधीत विषयाचे तज्ञ (एक्सपर्ट) यांचे समोर मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

१) मा.डॉ.एकनाथ गोंदकर साहेब, विश्वस्त
२) मा.श्री.अशोक खांबेकर साहेब, विश्वस्त
३) मा.श्री.सुरेश वाबळे साहेब, विश्वस्त
४) मा.सौ.जयश्री थोरात, विश्वस्त
५) मा.श्री.ए.जी.कांबळे, एक्सपर्ट (इंग्रजी)
६) मा.श्री.जोशी, एक्सपर्ट (विज्ञान)
७) मा.कार्यकारी अधिकारी

मुलाखतीचे वेळी उमेदवारांची ७० मार्क्सची परिक्षा घेणेत आलेली आहे. कन्या विद्या मंदिर शिक्षण सेवक (इंग्रजी) व इंग्लिश मिडीयम स्कूलसाठी पूर्व प्राथमिक शिक्षणसेवक या तीन पदासाठी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना नेमणूक पत्र देण्यात येऊन मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९/०८/२००९ विषय क्र.५२ निर्णय क्र.७०८ नुसार कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे.

तथापी त्याचवेळी इंग्लिश मिडीयम स्कूल कडील पूर्व प्राथमिक शिक्षणसेवक या पदाच्या उर्वरीत एका जागेसाठी कु.सविता राधाकिसन कोटकर, कु.उज्वला नानासाहेब येवले व श्रीमती सोनाली बाबासाहेब साठे यांना सारखेच गुण असल्याने पतिक्षा यादीवर ठेवण्यात आलेले होते.

प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांपैकी कु.सविता राधाकिसन कोटकर यांनी एम.ए.(इंग्रजी) व मॉन्टेसरी कोर्स उत्तीर्ण असून तसेच त्या ०१/०७/२००७ पासून कंत्राटी पध्दतीने सेवेत आहेत. सबब श्रीमती सविता कोटकर ह्या प्रतिक्षा यादीवरील प्रथम क्रमांक असल्याने मा.अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने कु.कोटकर यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/२८६९/२००९ दि.२१/०८/२००९ अन्वये शैक्षणिक वर्ष २००९-२०१० साठी (३०/०४/२०१० अखेर) नेमणूक आदेश देण्यात आलेला असून त्या कामावर हजर झालेल्या आहेत.

**निर्णय क्र.३२१ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.४९ श्री साईबाबा /साईनाथ हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी / आर.एम.ओ यांचे नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल मध्ये वैद्यकिय अधिकारी /आर.एम.ओ पदे भरणेकामी टाईम्स ऑफ इंडीया या वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात येऊन दि.२५/०८/२००९ व दि. ३० नोव्हेंबर २००९ रोजी वॉक् इन इंन्टरव्हयू आयोजित करण्यात आले होते. त्यानुसार सदर दिवशी हजर असलेल्या उमेदवारांच्या मा.विश्वस्त तसेच वैद्यकिय संचालक व वैद्यकिय उपसंचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांच्या निवडी करुन खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे नेमणूक पत्र देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. प्रियंका बापुसाहेब गुळवे संगमनेर | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५०९३ /२००९ दि.११/१२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२७०००/- |
| ०२. | डॉ.प्रिती दिपक देसाई, नाशिक | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५०९४ /२००९ दि.११/१२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२७०००/- |
| ०३. | डॉ.समिर सुधाकर पालखे माळशिरस, जि. सोलापूर | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४३४९ /२००९ दि.२४/११/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२७०००/- |
| ०४. | डॉ.प्रशांत बालासाहेब गदाडे, कर्जत | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५०९१ /२००९ दि.११/१२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२७०००/- |
| ०५. | डॉ.अभिजीत किशोर रोकडे पूणे | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५०९० /२००९ दि.११/१२/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२७०००/- |
| ०६. | डॉ.पंकज के.मगर, लोणी | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५०८९ /२००९ दि.११/१२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२७०००/- |
| ०७. | डॉ.प्रदिप डि.गौड, नाशिक | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५०८८ /२००९ | आर.एम.ओ. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | दि.११/१२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२७०००/- |
| ०८. | डॉ.अभिषेक निर्मलकुमार शहा नाशिक | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५०९२ /२००९ दि.११/१२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२७०००/- |

उपरोक्त ०१ ते ०८ वरील उमेद्वारांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकिय अधिकारी/ आर.एम.ओ या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त ०१ ते ०८ वरील उमेद्वारांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकिय अधिकारी /आर.एम.ओ या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५० श्री साईबाबा हॉस्पिटलकडील कन्सल्टंट व वैद्यकिय अधिकारी यांना वेतनश्रेणी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ च्या कलम नं. १३ (०४) मध्ये "ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याची कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून असे पद शासनाने मान्य केलेल्या आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यत केली जाणार नाही " अशी तरतूद आहे.

त्यानुसार मासिक वेतन रु.२०००/- पेक्षा जास्त वेतनाची पदे भरणेकामी शासनाची मंजूरी घेणे आवश्यक होते हया कामी मंजूरी येण्यास बराच कालावधी लागणार असलेने रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व च्या आदेशाने श्री साईबाबा हॉस्पीटलमधील कन्सल्टंट / वैद्यकीय अधिकारी व इतर पॅरामेडीकल स्टाफ यांना नेमणूका करतांना मानधन / अॅडव्हॉक फिक्स पे वर करण्यात आल्या होत्या.

श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा / श्री साईनाथ हॉस्पीटलमधिल निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांना (आर.एम.ओ.) सुरुवातीस एक वर्षाकरीता नियत वेतनावर (एकत्रित वेतन) नेमणूका देण्यात येतात. त्यांनतर एक वर्ष पूर्ण झालेले आहे अशा निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांना वैद्यकीय संचालक / वैद्यकीय अधिक्षीका यांचेकडील त्यांचे एक वर्षाचे कालावधीतील कामाबाबतचे अभिप्राय विचारात घेऊन वेतनश्रेणी देण्यात येऊन त्यांची सेवा पूढे चालू ठेवण्यात येते.

सध्या २१ निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांना वेतनश्रेणीनुसार (वेतन बॅन्ड) वेतन देण्यात येत आहे. ०१ वर्ष पूर्ण न झालेल्या १८ निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांना (एकत्रित वेतन) देण्यात येत आहे.

यादीतील २४ कंन्सल्टंट, फिजीशियन, सर्जन यांना त्यांचे नेमणूकीपासून मानधन / एकत्रित वेतन देण्यात येत आहे. त्यांच्या माहितीचा तपशिलवार तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर केला आहे.

मंजूर संस्थान कर्मचारी आकृतीबंधात खालीलप्रमाणे तरतूद आहे.

१) क्र.०८ समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

२) क्र.११. आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचाऱ्यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्यांचे वेतन वेतनश्रेणीतील सुरुवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

मंजूर आकृतीबंधातील तरतूद नं.८ मध्ये नियमापेक्षा (वेतन बॅन्ड + ग्रेड पे महागाई) जास्त वेतन देण्यात येऊ नये असे अभिप्रेत आहे.

श्री साईबाबा / श्री साईनाथ हॉस्पीटलकडे वेळोवेळी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन कंन्सल्टंट / वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूका केलेल्या आहेत व मुलाखतीचे वेळी त्यांना त्यांचे नेमणूक आदेशात दर्शविलेप्रमाणे मानधन / वेतन हे दोहोंचे संमतीने देण्यात आलेले आहे व सदरचे मानधन / वेतन त्यांना मान्य झालेने ते कामावर हजर झालेले आहेत. तसेच त्यांचे मागणीप्रमाणे वेळोवेळी त्यांचे मानधनात / वेतनात वाढ करण्यात आलेली आहे.

संस्थान लेबर कंन्सल्टंट / लिगल अॅडव्हायझर अॅड.श्री अशोक पाटील, अ.नगर यांनी त्यांचेकडील दि. १७/०६/२००९ चे पत्रात "I.D.ACT - १९४७ च्या कलम नं.०९ नुसार सदरचे कंन्सल्टंट / वैद्यकीय अधिकारी हे वर्कमन म्हणून संबोधले जातात. " असे मत (Opinion) दिलेले आहे.

संस्थानने नेमलेले लेखापरिक्षक श्री ए.जी.लोंगाणी, कोपरगांव, मे.सुरेश डि.डौले & कंपनी,राहुरी, श्री विशाल कोठारी,श्रीरामपूर, श्री अभय अे.शास्त्री, पूणे यांचे सर्वांच्या म्हणण्याचा मतीतार्थ आहे की " संस्थानने सदर कंन्सल्टंट / वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूका मानधनावर केलेल्या असल्याने नोकर - मालक संबंध प्रस्तापीत होत नाही. त्यामुळे त्यांना संस्थान कर्मचारी म्हणता येणे योग्य होणार नाही. त्यांना इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे देय होणाऱ्या सवलत उदा. रजा, सुट्ट्या, सानुग्रह अनुदान, ग्रॅच्यूईटी, भविष्य निर्वाह निधी वगैरे सवलती देणे बंधनकारक नाहीत. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

आकृतीबंधातील तरतूद तसेच संस्थान लेबर कंन्सल्टंट व संस्थानचे लेखापरिक्षक यांचे मत विचारात घेता सोबतच्या तक्त्यातील कंन्सल्टंट, फिजीशियन, सर्जन यांना वेतनश्रेणीनुसार वेतन देणे आवश्यक आहे.

आता मंजूर आकृतीबंधातील तरतूद नं. ११ नुसार यादीतील कन्सल्टंट / वैद्यकीय अधिकारी यांना दि.०१/०३/२०१० पासून वेतन द्यावयाचे झाल्यास सोबत दर्शविलेल्या तक्त्यातील अ.क्र. ०१ व ०३ ते २१ कंन्सल्टंट / वैद्यकीय अधिकारी यांना सध्या रु.३५०००/- इतके एकत्रित मानधन देण्यात येत आहे. सुधारीत वेतन बँड नुसार त्यांच्या पदास देय असलेले वेतन बॅन्ड + ग्रेड पे + महागाई इतर अनुज्ञेय भत्ते मिळून एकूण रु. ३५९४५/- इतके वेतन देय होत आहे.

अ.क्र.०२ डॉ.संजय पटवर्धन यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.२२/०१/२०१० पासून संस्थान सेवेतून बडतर्फ केलेले आहे. सबब याबाबत त्यांचा विचार करणेची आवश्यकता नाही.

तसेच अ.क्र.२२,२३ व २४ या कंन्सल्टंट / वैद्यकीय अधिकारी यांना सध्या रु.३००००/- एकत्रित मानधन देण्यात येत आहे. सुधारित वेतन बँडनुसार त्यांच्या पदास देय असलेले वेतनबँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु. ५४००/- + महागाई व इतर अनुज्ञेय भत्ते मिळून एकूण रु. २८२१०/- इतके वेतन देय होत आहे. तथापी त्यांना सध्या रु.३००००/- मानधन देत असलेने रु.१७९०/- वैयक्तीक वेतन देऊन एकूण वेतन रु.३००००/- द्यावे लागेल. तसेच वेळोवेळी होणारी वार्षीक पगारवाढ तसेच महागाई वेतन व महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम त्यांच्या वैयक्तीक वेतनाच्या रक्कमेमध्ये समायोजीत करावी लागेल.

श्री साईबाबा/श्री साईनाथ हॉस्पीटलकडील कंन्सल्टंट / वैद्यकीय अधिकारी यांना दि.०१/०३/२०१० पासून सुधारीत वेतन बँड नुसार वेतन देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२३** **शासन नियमानुसार सर्व कन्सल्टंट व वैद्यकिय अधिकारी यांना दि.०१.०४.२०१० पासून वेतनश्रेणी देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**विषय नं.५१** **संस्थान सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना ९० दिवसांऐवजी १८० दिवस प्रसुती पगारी रजा मंजूर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान सेवा नियम, १९९१ मधील कलम १३ व दि मॅटरर्निटी बेनिफीट ॲक्ट, १९६१ चे तरतुदीस अनुसरून संस्थान सेवेत असलेल्या कायम अथवा रेग्युलर (प्रासंगिक व डेलीवेजेस तसेच कंत्राटी महिला कर्मचारी सोडून) महिला कर्मचाऱ्यास पूर्ण संस्थान सेवा कालावधीत शासन नियमाप्रमाणे ०२ बाळंतपणास ०६ महिने व एका बाळंतपणास ०३ महिने (१२ आठवडे) याप्रमाणे पगारी प्रसूती रजा (मॅटरर्निटी लिव्ह) मंजूर करणेत येते. दि मॅटरर्निटी बेनिफीट ॲक्ट, १९६१ चे तरतुदीप्रमाणे सदर महिला कर्मचाऱ्याची प्रस्तावीत प्रसूती पुर्वी कमीत कमी १२ महिने सेवा पूर्ण झालेली असावी व त्या कालावधीत तीने कमीत कमी ८० दिवस प्रत्यक्ष काम केलेले असावे हे बंधनकारक आहे.

आता केंद्र शासनाने सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र शासनातील महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेचा कालावधी १३५ दिवसांवरून १८० दिवसांपर्यंत वाढविला आहे. याच धर्तीवर राज्य शासनातील महिला कर्मचाऱ्यांना सध्या अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविणेबाबत महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाने शासन निर्णय क्र:अरजा-१४०९/ प्र.क्र:८/०९/सेवा-६, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.२४ ऑगस्ट, २००९ पारीत केलेला आहे. त्यात राज्य शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

०१) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम ७४ मधील तरतुदीनुसार राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविणेत यावी. या सुविधेचा लाभ फक्त दोन अपत्यांपुरताच मर्यादीत राहील. प्रसूती रजा मंजूर करण्याच्या इतर शर्ती पूर्वीप्रमाणे यापुढेही लागू राहतील.

०२) या सुविधेचा लाभ आदेश निर्गमीत झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

०३) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील या संबंधातील विद्यमान तरतुदी या शासन निर्णयातील तरतुदीपुरते सुधारण्यात आले असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमामध्ये रीतसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे ९० दिवसांऐवजी १८० दिवस प्रसूती रजा मिळावी अशी संस्थान सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडे वेळोवेळी मागणी केलेली आहे.

सबब, उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून राज्य शासनातील महिला कर्मचाऱ्यांच्या प्रमाणेच संस्थान सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना माहे डिसेंबर-२००९ पासून सध्या अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविणेस व सदर सुविधेचा लाभ फक्त दोन अपत्यांपुरताच देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना सध्या अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजेची मर्यादा आहे तशीच ठेवण्यात यावी त्यामध्ये वाढ करण्यात येऊ नये असे ठरले.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी )

---

**विषय नं.५२** **महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन ) नियम -२००९ नुसार वैद्यकीय अधिकारी यांना सुधारित वेतन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०५/२००९ मधील निर्णयानुसार राज्य शासकिय कर्मचा-यांप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना ०६ व्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार वेतनश्रेणी जून-२००९ च्या पगारापासून लागू करण्यात आलेली आहे. वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार रु.८०००-१३५०० वेतनश्रेणीतील वैद्यकिय अधिकारी यांना खालील प्रमाणे वेतनश्रेणी देण्यात येत आहे.

| अ.नं. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारित वेतन बॅन्ड व ग्रेड वेतन | |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकिय अधिकारी | ८०००-१३५०० | वेतन बॅन्ड<br>रु. ९३००-३४८०० | ग्रेडवेतन<br>रु. ५४०० |

आता शासन अधिसुचना क्रमांक वेपूर १२०९/प्र.क्र.१५३/सुधारणा -५/सेवा-९ मंत्रालय मुंबई ३२ दि.०४/११/२००९ अन्वये उपरोक्त वेतनश्रेणी व सुधारित वेतनबॅन्ड मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारित वेतन बॅन्ड व ग्रेड वेतन | |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकिय अधिकारी | ८०००-१३५०० | वेतन बॅन्ड<br>१५६००-३९१०० | ग्रेडवेतन<br>रु. ५४०० |

सदर निर्णयानुसार ०१ जानेवारी २००६ पासून वेतननिश्चिती करावयाची असून प्रत्यक्ष लाभ दि.०१ सप्टेंबर २००९ पासून द्यावयाचा आहे. ०१ जानेवारी २००६ ते ३१ ऑगष्ट २००९ पर्यंतची थकबाकी अनुज्ञेय नाही.

सुधारित शासन निर्णयानुसार वेतन बॅन्ड संस्थानचे हॉस्पीटल मधील संबंधीत वैद्यकिय अधिकारी, आर.एम.ओ. रक्तसंक्रमण अधिकारी यांना देण्यात यावा अशी विनंती वैद्यकिय संचालक, व वैद्यकिय अधिक्षीका, यांनी केली आहे.

शासनाच्या सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार संस्थान कर्मचा-यांना वेतन देणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०५/२००९ मध्ये निर्णय झालेला असल्याने वैद्यकिय अधिका-यांना वरीलप्रमाणे सुधारित वेतन देणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन ) नियम -२००९ नुसार वैद्यकीय अधिकारी यांना सुधारित वेतन दिल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतनात किती वाढ होईल व त्याचा संस्थानवर किती अर्थिक बोजा पडेल याबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५३** **डॉ.शितल ज्ञानेश्वर उंडे, ज्युनिअर डेन्टीस्ट श्री साईनाथ हॉस्पिटल यांना पदनाम देणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.शितल ज्ञानेश्वर ऊंडे, ज्यु. डेन्टीस्ट, श्री साईनाथ रुग्णालय ( प्रत्यक्ष काम श्री साईबाबा हॉस्पीटल) यांनी दि.१२/११/२००९ रोजी विनंती करुन त्यात "माहे नोव्हेबर -२००६ पासून ज्युनियर डेन्टीस्ट या पदावर श्री साईनाथ रुग्णालयाकडे दंत विभागात कार्यरत असून मला वेतनश्रेणी मिळालेली नाही. तरी मला वेतनश्रेणी मिळावी " अशी विनंती केली आहे.

वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल,शिरडी यांनी त्यांचे दि.१७/११/२००९ रोजीचे टिपणीत "डॉ. शितल ऊंडे यांची माहे नोव्हेंबर २००६ पासून ज्यु. डेन्टीस्ट या पदावर नेमणूंक करण्यात आलेली आहे. तथापी श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलचे मंजूर आकृतीबंधात ज्यु. डेंन्टीस्ट हे पद मंजूर नाही. त्यांची शैक्षणिक पात्रता बी.डी.एस. अशी आहे. त्यांना वेतनश्रेणी देणेबाबत नियमाप्रमाणे विचार व्हावा. असे नमूद केलेले आहे. "

०१. डॉ. शितल ऊंडे, यांची श्री साईनाथ हॉस्पीटल विभागाकडे, ज्यु. डेंन्टीस्ट या पदावर नेमणूंक करण्यात आलेली असून त्या प्रत्यक्ष श्री साईबाबा हॉस्पीटल कडे काम पहात आहेत. त्यांना सध्या सर्व मिळून दरमहा एकत्रित वेतन रु. १५,०००/- देण्यात येत आहे. त्यांच्या नेमणूकीस मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०१/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८ नुसार मान्यता मिळालेली आहे.

०२. श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलचे मंजूर आकृतीबंधात ज्यु. डेंन्टीस्ट हे पद नाही.

०३. आकृतीबंधामध्ये वेतनबँन्ड रु.९३००-३४८०० ची श्री साईबाबा हॉस्पीटलचे आस्थापनेवर डेंन्टीस्टची दोन पदे मंजूर असून सदरची दोन्ही पदे भरलेली आहेत. श्री साईनाथ रुग्णालयात डेंन्टीस्ट ची दोन पदे मंजूर असून एक पद रिक्त आहे.

संस्थान कर्मचा-यांच्या आकृतीबंधास दि.०७ ऑगष्ट २००९ च्या शासन निर्णयानुसार मान्यता मिळालेली आहे.

डॉ. शितल ऊंडे यांची नोव्हेंबर-२००६ पासून ज्यु. डेंन्टीस्ट या पदावर झालेली सेवा, डेन्टीस्ट या पदासाठी आवश्यक असलेली बीडीएस ही शैक्षणिक पात्रता त्यांचेकडे असल्याने वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांचेकडील उपरोक्त अभिप्राय या बाबी विचारात घेऊन श्री साईनाथ हॉस्पीटलकडे

डेन्टीस्ट या रिक्त पदावर वेतन बॅड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.५४०० + अनुज्ञेय भत्ते देऊन डॉ. शितल ऊंडे, यांना नेमणूक देणेबाबत मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात डेंटीस्ट या पदावर काम करत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून दररोज किती पेशंटची तपासणी केली याबाबत सविस्तर माहिती व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावी असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५४ डॉ.सी.एस.बोबडे, वैद्यकीय संचालक व डॉ.एन.एस.म्हस्के, वैद्यकीय उपसंचालक यांचे पगारवाढीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.सी.एस.बोबडे, वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दि.१६/०१/२०१० रोजी अर्ज करुन त्यात - "श्री साईबाबा हॉस्पीटल कडे नेमणूक होऊन मला दोन वर्षे कार्यकाल पूर्ण होईल. या कालावधीत आर.एम.ओ यांचे पगार मागील वर्षापेक्षा दुप्पट झालेले आहेत. पोष्ठ ग्रॅज्युएट डिग्री असलेलेली जनरल स्पेशालीटी कन्सलटंट ज्यांना १ ते ३ वर्षाचा अनुभव आहे त्यांनाही महिन्याला एक ते सव्वालाखापर्यंत कामाचा मोबदला मिळतो. तसेच नव्याने वैद्यकिय परिक्षा उत्तीर्ण झालेल्या सुपरस्पेशालीस्ट कन्सलटंट हयांनाही महिन्याला ०३ ते ०७ लाख रुपयापर्यंत कामाचा मोबदला मिळतो. माझे समतुल्य पदावरील अधिका-यांना इतर खाजगी / सार्वजनिक क्षेत्रातील हॉस्पीटलमध्ये कामाचा मोबदला/मेहनताना मला सध्या असलेल्या पगारापेक्षा जास्त आहे. तसेच सहाव्या वेतन आयोगानुसार त्यांचे पगार सव्वालाखापर्यंत वाढलेले आहेत. सध्या मी प्रशासकिय अधिकारी व वैद्यकिय प्रशासक (नेमणूक आहे परंतु अकार्यक्षम) या दोन्ही पदांचा कार्यभार सांभाळत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करुन दि.०१/०२/२०१० पासून मानधन वाढवून मिळावे " अशी विनंती केली आहे.

तसेच डॉ.एन.एस. म्हस्के, वैद्यकिय उपसंचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दि.१९/०९/२००९ रोजी अर्ज करुन त्यात "मी साईबाबा हॉस्पीटल मध्ये डे.मेडीकल डायरेक्टर म्हणून कामी करीत आहे. व मला दि.०६/०८/२००९ पासून मुदतवाढ दिलेली आहे. त्यावेळी मी आपणास विनंती केली होती की, मुदतवाढीबरोबर मला रु.१०,००० ते १५,००० पर्यंत पगारवाढ करावी तरी त्याचा विचार व्हावा "अशी विनंती केली आहे.

डॉ. सी.एस.बोबडे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय संचालक व डॉ.एन.एस.म्हस्के यांची वैद्यकिय उपसंचालक या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**०१)** डॉ.बोबडे यांची मूळ नेमणूक मा.व्यवस्थापन समिती दि.१६/०३/२००८ चे सभेतील निर्णयानुसार रु.७०,०००/- एकत्रित मानधनावर वैद्यकिय संचालक म्हणून करण्यात आलेली असून त्यांना दिलेली मुदतवाढ दि.०५/०४/२०१० रोजी संपुष्ठात येत आहे. त्यांचे सध्याचे वय ६१ वर्षे पूर्ण आहे.

**०२)** डॉ.म्हस्के,यांची मूळ नेमणूक मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०७/२००७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार रु.३०,०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेलीअसून दि.०६/०८/२००८ पासून त्याचे एकत्रित मानधन रु.४५०००/- करण्यात आलेले आहे. त्याचे सध्याचे वय ६६ वर्षे पूर्ण आहे.

| अ.नं. | नांव व पदनाम<br>जन्मतारीख व वय | नेमणूक तारीख<br>व मानधन | मुदतवाढ तारीख<br>व वाढविलेले मानधन | सध्या देत असलेले मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ.सी.एस.बोबडे<br>वैद्यकिय संचालक | ०६/०४/२००८<br>रु. ७०,०००/- | ०६/०४/२००९ पासून पुढे एक वर्ष<br>**(०५/०४/२०१० अखेर )** | प्रतिमहा रु.७०,०००/- |
| ०२. | डॉ. एन.एस.म्हस्के<br>वैद्यकिय उपसंचालक | ०६/०८/२००७<br>रु.३०,०००/- | ०६/०८/२००८ पासून पुढे एक वर्ष व वाढविलेले मानधन रु. १५०००/-<br>०६/०८/२००९ पासून पुढे एक वर्ष<br>**(०५/०८/२०१० अखेर )** | प्रतिमहा रु.४५०००/- |

श्री साईबाबा हॉस्पीटल चे मंजूर आकृतीबंधामध्ये वैद्यकिय संचालक व उपवैद्यकिय संचालक या हुद्याचे प्रत्येकी एक पद मंजूर असून सदर पदाची वेतनश्रेणी रु.१२०००-१६५०० अशी आहे. सहाव्या वेतन आयोगामध्ये सदर पदाचा मंजूर वेतनबॅन्ड रु.१५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु.७६०० असा आहे.

त्यानुसार सदरचे वेतनबॅन्ड मध्ये मूळवेतन रु.२१९०० + ग्रेडवेतन रु. ७६०० + महागाई भत्ता २७% + एन.पी.ए. २५% असे सर्वमिळून एकतित्रत वेतन रु. ४१९६५ इतके होत आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटल कडे सेवेत असलेले वैद्यकिय संचालक व उपवैद्यकिय संचालक हे दोघेही सेवानिवृत्त असून त्यांना वेतनश्रेणी ऐवजी एकत्रित मानधन देण्यात येत आहे. तरी संबंधीतांनी वेतनवाढ मिळणेबाबत केलेले विनंती अर्जावर विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२७ उपरोक्त प्रस्तावाबाबत मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५५** **(अ) अनुकंपा कारणास्तव श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर यांना संस्थान सेवेत घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** कै.राजेंद्र अशोक गोंदकर हे संस्थानचे कॅन्टीन विभागाकडे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते त्यांचे दि.१९/०७/२००९ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- राजेंद्र अशोक गोंदकर
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- वर्ग ४ कर्मचारी, कॅन्टीन विभाग
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०६/०८/२००४ ते दि.१८/०७/२००९
एकूण सेवा ०५ वर्षे
०४.मृत्यु दिनांक :- १९/०७/२००९

कै.राजेंद्र अशोक गोंदकर यांचे दि.१९/०७/२००९ रोजी निधन झाल्याने त्यांचे वारसदार त्यांची पत्नी नामे श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर यांनी संस्थानमध्ये पतीचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

**०१. अर्जदाराचे नांव :- श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर**
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- पत्नी
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- ०९/०१/१९८५ , वय २४ वर्ष १० महिने
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- अशिक्षीत

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर यांनी अर्ज सादर केलेला आहे.

दिवंगत राजेंद्र अशोक गोंदकर यांची पत्नी नामे श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर हया शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**(ब) अनुकंपा कारणास्तव श्री.साईनाथ कारभारी सोळसे यांना संस्थान सेवेत घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिवंगत कारभारी पुंजा सोळसे हे संस्थानचे पाणी पुरवठा विभागाकडे मदतनीस या पदावर सेवेत होते त्यांचे दि.०७/०१/२००७ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- श्री कारभारी पुंजा सोळसे
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- मदतनीस, पाणी पुरवठा विभाग
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०१/०२/१९८० ते दि.०६/०१/२००७
एकूण सेवा २७ वर्षे ०१ महिना
०४.मृत्यु दिनांक :- ०७/०१/२००७

दिवंगत कारभारी पुंजा सोळसे यांचे दि.०७/०१/२००७ रोजी निधन झाल्याने त्यांचे वारसदार त्यांचा मुलगा नामे श्री साईनाथ कारभारी सोळसे यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

**०१. अर्जदाराचे नांव :- श्री. साईनाथ कारभारी सोळसे**
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- २८/१२/१९९१ , वय १८ वर्ष.
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- १० वी पास, एम.एस.सी.आय.टी. कोर्स

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. शासन निर्णय अकंपा १०९५/प्र.क्र.३४/आठ मंत्रालय, दि.११/०९/१९९६ नुसार " सेवेत असतांना दिवंगत झालेल्या किंवा दुर्धर व्याधीमुळे अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाचे आत या योजनेखाली नोकरीसाठी अर्ज करावा " असे नमूद केलेले आहे. त्यानुसार श्री साईनाथ कारभारी सोळसे यांची जन्मतारीख २८/१२/१९९१ असल्याने त्यांना दि.२८/१२/२००९ रोजी १८ वर्ष पूर्ण झालेले असून त्यांनी अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत घेणेकामी दि.२९/१२/२००९ रोजी विनंती अर्ज सादर केलेला आहे.

दिवंगत कारभारी पुंजा सोळसे यांचा मुलगा नामे श्री साईनाथ कारभारी सोळसे हा शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेस पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर व श्री साईनाथ कारभारी सोळसे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेस पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५६ डॉ.मिलींद एम नवलाखे, मानद वैद्यकीय अधिकारी (इ.एन.टी) यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. मिलींद एम.नवलाखे, मुंबई यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे मानद वैद्यकीय अधिकारी (ई.एन.टी.) या पदावर दि.०१/०२/२००९ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी प्रति दोन महिन्यातून एक व्हिजीट व प्रति शस्त्रक्रियेसाठी रु.१०००/- एकत्रित मानधनावर (प्रवास खर्चासह) नेमणूक करण्यात आलेली असून त्यांचे नेमणूकीचा कालावधी माहे जानेवारी २०१० अखेर संपुष्ठात येत आहे. डॉ.मिलींद नवलाखे यांनी दि.१४/१२/२००९ रोजी अर्ज सादर करुन मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

वैद्यकीय संचालक, रुग्णालये यांनी दि.१९/१२/२००९ रोजी प्रस्ताव सादर करुन " डॉ. मिलींद नवलाखे, यांनी आतापर्यंत २० शस्त्रक्रिया केल्या असून त्यांच्या सेवेचा रुग्णालयातील २० रुग्णांनी लाभ घेतलेला आहे. डॉ. नवलाखे यांची ०१/०२/२००९ पासून जानेवारी २०१० अखेर मुदत संपत आहे. डॉ.नवलाखे यांनी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तरी त्यांना एक वर्ष मुदतवाढ देण्यास हरकत नाही." असे अभिप्राय दिले आहेत.

वैद्यकीय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता डॉ. मिलींद नवलाखे यांना यापुर्वी देण्यात आलेल्या नेमणूक ओदशातील अटी-शर्तीस अनुसरुन दि.०१/०२/२०१० पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणे बाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे डॉ. मिलींद नवलाखे यांना यापुर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीस अनुसरुन दि.०१/०२/२०१० पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५७ श्री निवृत्ती माधव कांगोणे, मदतनीस वर्ग-४ यांना मुदतवाढ देणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री निवृत्ती माधव कांगोणे, यांची जा.नं.एसएसएस वशी ०१/४६८/२००७ दि.०९/०१/२००७ अन्वये मदतनिस (वर्ग ४) या पदावर प्रथम सहा महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.३०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.११/०१/२००७ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

श्री कांगोणे यांना जा.नं.एसएसएस वशी ०१/३०२/२००९ दि. २७/०१/२००९ अन्वये देण्यात आलेल्या एक वर्ष मुदतवाढीचा कालावधी दि.१०/०१/२०१० अखेर संपुष्ठात येत आहे.

श्री कांगोणे यांनी यांनी दि.३०/१२/२००९ रोजी अर्ज सादर करुन त्यात "मी आपल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मध्ये प्रकाशने विभागात मदतनीस (वर्ग-४) प्रत्यक्ष काम (मा.अध्यक्ष साहेब यांचे स्वीय सहाय्यक) म्हणून काम करीत आहे. माझी मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली असून त्याची मुदत दि. १० जानेवारी २०१० रोजी संपुष्ठात येत आहे. तरी आपणास विनंती कि माझी पुन्हा मुदतवाढ करण्यात यावी . " अशी विनंती केलेली आहे.

श्री निवृत्ती कांगोणे, मदतनीस वर्ग ४ (प्रत्यक्ष काम मा.अध्यक्ष साो यांचे स्वीय सहाय्यक) यांची मुदतवाढ दि.१०/०१/२०१० रोजी संपत असल्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री निवृत्ती कांगोणे, मदतनीस वर्ग ४ (प्रत्यक्ष काम मा.अध्यक्ष साो यांचे स्वीय सहाय्यक) यांना दिनांक १०.०१.२०१० पासून पूढे सहा महिन्याचे कालावधीसाठी पूर्वीचे अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५८ डॉ.विशाल एकनाथ गडवीर, मानद स्पीच ॲण्ड ऑडिओमीस्ट यांचे मुदतवाढीबाबत**

**प्रस्ताव-** डॉ. विशाल एकनाथ गडवीर, औरंगाबाद यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे मानद स्पीच ॲन्ड ऑडिओमीस्ट या पदावर माहे एप्रिल २००९ पासून पुढे एक वर्ष (माहे मार्च २०१०) कालावधीसाठी प्रति व्हीजीट प्रवास खर्चासह रु.२५००/- (रु.दोन हजार पाचशे) मात्र मानधनावर नेमणूक करण्यात आली आहे.

डॉ.विशाल गडवीर यांनी दि.१६/०१/२०१० रोजी अर्ज सादर करुन मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

वैद्यकीय संचालक, रुग्णालये यांनी दि.२६/०१/२०१० रोजी प्रस्ताव सादर करुन त्यात " डॉ. विशाल गडवीर यांनी साईनाथ रुग्णालयात दि.०६/०६/२००९ ते १५/०१/२०१० अखेर १६ व्हिजीट दिल्या असून आतापर्यंत माहे ऑगस्ट २००९ ते जानेवारी २०१० अखेर १५७ रुग्णांनी लाभ घेतला आहे.

डॉ.विशाल गडवीर यांना मुदतवाढ मिळणेबाबत तसेच दर महिन्यातून दोन ऐवजी तीन व्हीजीट त्यात दोन सोमवार व एक शनिवार देणेबाबत डॉ.विशाल गडवीर यांचे दि.१६/०१/२०१० चे अर्जावर डॉ.आर.के.कुलकर्णी वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केली आहे. तरी डॉ.गडवीर यांची सेवा पुढे चालू ठेवून एक वर्षासाठी मुदतवाढ मिळावी व महिन्यातून दोन ऐवजी तीन व्हीजीट देणेस मान्यता मिळावी. " असे नमूद केले आहे.

वैद्यकीय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता डॉ. विशाल गडवीर यांना यापुर्वी देण्यात आलेल्या नेमणूक ओदशातील अटी-शर्तीस अनुसरुन माहे एप्रिल २०१० पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ व महिन्यातून दोन व्हीजीट ऐवजी तीन व्हीजीट देणे बाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३१ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे डॉ. विशाल गडवीर यांना यापुर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीस अनुसरुन माहे एप्रिल २०१० पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ व महिन्यातून दोन व्हीजीट ऐवजी तीन व्हीजीट देणेत यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५९ श्री.एस.जयपाल राज, कंत्राटी वाहन चालक, मुंबई कार्यालय यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. एस.जयपाल राज, वाहनचालक मुंबई कार्यालय यांचे विहीत वयोमान पूर्ण झालेने त्यांना दि.३१/१२/२००८ चे माध्यान्होत्तर सेवानिवृत्त करण्यात आले होते. त्यानंतर श्री जयपाल राज यांचे विनंती अर्जानुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार दि.०३/०१/२००९ पासून एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने वाहन चालक या पदावर रु.७०००/- या एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आली होती. सदर नेमणूकीची मुदत दि.०२/०१/२०१० रोजी संपुष्ठात येत आहे.

श्री. एस.जयपाल राज यांनी दि.२३/११/२००९ रोजी अर्ज सादर करुन त्यात " संस्थान कामानिमित्त मंत्रालय, विधानभवन अशा विविध महत्वाच्या ठिकाणी मला मा.अध्यक्ष साो यांना घेऊन जावे लागते. व सदर वाहन मी नियमित सुस्थितीत ठेवत असतो. तसेच मुंबई येथे अनेक वर्षे कामे केली असल्याने मला तेथील रस्त्यांची, सिग्नल व्यवस्थेची मला सखोल माहिती आहे व माझी प्रकृती अजून उत्तम आहे. तरी मला एक वर्षाची मुदतवाढ मिळावी. " अशी विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर मा.अध्यक्ष महोदय यांनी "मदुतवाढ द्यावी व मुदतवाढीस सभेपुढे मान्यता घ्यावी." असे अभिप्राय दिले आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी करीता आवश्यक असणारा कर्मचारी आकृतीबंध मा. सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडून शासन निर्णय क्र. सांसवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मंत्रालय मुं. दि.०७/०८/२००९ मंजूर होऊन आलेला असल्याने त्यातील अटी-शर्ती क्र.३ मध्ये "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी" अशी आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी कडे काम करत असतांना सेवानिवृत्तीचे विहीत वयोमान पूण झाल्यानंतर संस्थान सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी / कर्मचारी पून्हा संस्थान सेवेत मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज करीत आहेत. तसेच मान्य आकृतीबंधाचे अटी-शर्ती विचारात घेता येथूनपुढे मान्य कायम पदावर सेवानिवृत्तीनंतर तात्पुरत्या कंत्राटी नेमणूका देणे अडचणीचे आहे त्यामुळे श्री जयपाल राज वाहनचालक मुबई यांना मुदतवाढ देणे अडचणीचे होत आहे.

तथापी मा.अध्यक्ष महोदय यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन श्री. एस.जयपाल वाहनचालक मुंबई यांना मुदतवाढ देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री एस.जयपाल राज, कंत्राटी वाहनचालक, मुंबई कार्यालय यांना पूर्वीचे अटी शर्तीवर दिनांक ०३.०१.२०१० पासून एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी/अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.६० संस्थान सेवेत असलेल्या कंत्राटी कामगारांना दिपावली सानुग्रह अनुदान अग्रीम (ॲडव्हान्स)रक्कम वसुलीबाबत.**

**प्रस्ताव-** उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना,शिर्डी यांनी दि.०३/११/२००९ चे निवेदनाव्दारे "संस्थान सेवेत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान रक्कम देण्यात आलेली असून सदर रक्कमेच समान ५ हप्त्यात पगारातून वसूल करणेत यावे असा आदेश पारित करण्यात आलेला आहे. संस्थानचे कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे कंत्राटी कामगारांना दिपावलीची रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून मंजूर करण्यात यावी व ती पगारातून वसूल करण्यात येवू नये " अशी विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.११/०९/२००९ चे सभेत " दिपावली निमीत्त संस्थानमधील ठेकेदारामार्फत नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सन २००८-२००९ या कालावधीत

मिळालेल्या वेतनाच्या १/१२ इतकी रक्कम अग्रीम म्हणून देण्यात यावी. सदर रकमेची १२ महिन्यात समान हप्त्यात वसूली करण्यात यावी." असा निर्णय क्र.७९८ झालेला आहे. सदर निर्णयानुसार कंत्राटी कामगारांना कंत्राटदारामार्फत दिपावलीनिमीत्त एकूण रक्कम रु. ५५,४८,३६४/- (अक्षरी रु.पंचावन्नलाख अठ्ठेचाळीस हजार तीनशे चौसष्ठ) चा अग्रीम देण्यात आला आहे. निर्णयानुसार संबंधीत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून माहे आक्टोबर पासून नियमाप्रमाणे दरमहा कपात करण्यात येत आहे.

उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना,शिर्डी यांची उपरोक्त निवेदनातील सानुग्रह अग्रीम (ॲडव्हान्स) वसूल न करणेबाबतची विनंतीबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना,शिर्डी यांची निवेदनातील संस्थान सेवेत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अग्रीम (ॲडव्हान्स) म्हणून देण्यात आलेली रक्कम वसूल न करणेबाबतची विनंती वसूली पुर्ण झालेली असल्याने, अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.६१ संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी चे कोपरगांव,अहमदनगर, औरंगाबाद,खंडपीठ येथे वेगवेगळया प्रकारची दिवाणी, फौजदारी, तसेच कामगार विषयक न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत. सदरचे कामी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने खालील प्रमाणे ॲडव्होकेट्सच्या ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

**०१) कोपरगांव/राहाता कोर्ट :-**सर्वश्री. ०१)ॲड.पी.डी.गुजराथी, ०२)डी.डी.कुलकर्णी, ०३) डी. व्ही. वझे ०४) जे.के.गोंदकर ०५) रमेशचंद्र ठोळे, ०६)एस.एम.वाघ, ०७) राजेश नाईक, ०८) बाळासाहेब कोते (विनामोबदला) , ०९) एस.डी.कुलकर्णी, १०) प्रशांत बावके, ११) मच्छिंद्र खिलारी, १२) अनिल गमे, १३) आर.के.वाघ, १४) श्रीमती नंदा लहाडे, १५) नितीन विखे.

**०२) अहमदनगर कोर्ट :-** सर्वश्री. ०१) अशोक पाटील,०२) एन.जी.तांबोळी, ०३)ए.आर. गाढेकर, ०४) प्रसन्ना बिंगी, ०५) संजय सलालकर, ०६) अविनाश बोठे

**०३) मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद)** :- सर्वश्री. ०१) आर.एन.धोर्डे, ०२) अनिल बजाज, ०३) विनायक होन, ०४) राजेंद्र रघुवंशी, ०५) नितीन भवर, ०६) बाबासाहेब वाघ, ०७) संदीप गोंदकर

**०४) मुंबई हायकोर्ट :-** सर्वश्री. ०१) कुलदीप एस.पाटील, ०२) ॲड.विनोद शहा, (करिया) मुंबई ०३) श्रीमती मिनाक्षी जैस्वाल ठाणे, ०४) सचिन शानभाग मुंबई

वरीलप्रमाणे एकूण -३२ ॲडव्होकेटस्च्या नेमणूका संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर करण्यात आलेल्या आहेत.

पैकी कोपरगांव येथील ॲड.पी.डी.गुजराथी, डी.डी.कुलकर्णी व अहमदनगर येथील ॲड.एम.जी.तांबोळी हे वयोवृध्द झाल्याने आजारी असतात त्यामुळे ते कोर्टात येत नाहीत. तसेच कोपरगांव येथील ॲड.डि.व्ही.वझे, यांचे वृध्दापकाळाने निधन झालेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०१/२००८ रोजीच्या सभेमध्ये "ॲड.सुनिल हरिश्चंद्रे, अहमदनगर, भाग्यश्री खेकाळे मुंबई हायकोर्ट (औरंगाबाद) दिपेश मेहता मुंबई मुंबई हायकोर्ट, तसेच ॲड.श्रध्दा जवाद, व ॲड. जगले यांची राहाता, कोपरगांव, अहमदनगर या ठिकाणी संस्थानविषयक न्यायालयीन दाव्याचे काम चालविणेकामी संस्थान ॲडव्हाकेट पॅनेलवर नेमणूकीबाबत निर्णय झालेला आहे.तथापी त्यांना नेमणूक आदेश देणे बाकी आहे.

आता,ॲड.प्रदिप विक्रमराव तपसे-पाटील औरंगाबाद यांनी मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद) येथे काम करणेकामी ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक होणेस विनंती केली आहे. तसेच ॲड.अनुराधा दि. येवले (आठरे पा.) यांनी अहमदनगर कोर्टात तसेच ॲड.अमोल बी.रोहोम साकुरी राहाता यांनीही राहाता, कोपरगांव कोर्टात संस्थान विषयक न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक मिळणेबाबत विनंती केली आहे.

पैकी ॲडव्होकेट अनुराधा येवले,अहमदनगर यांना ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक करणेकामी मा.विश्वस्त श्री. सुरेशराव वाबळे सा॰ यांची शिफारस केलेली आहे. तसेच ॲडव्होकेट अमोल बी.रोहोम साकुरी यांना ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक करणेंकामी मा.विश्वस्त ना.राधाकृष्ण विखे पाटील सा॰ यांनी शिफारस पत्र दिले आहे

उपरोक्त प्रमाणे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूका करण्यात आलेल्या ॲडव्होकेटस्पैकी कोपरगांव येथील ॲड.पी.डी.गुजराथी, डी.डी.कुलकर्णी व अहमदनगर येथील ॲड.एम.जी.तांबोळी हे वयोवृध्द झाल्याने आजारी असतात त्यामुळे ते कोर्टात येत नाहीत. तसेच कोपरगांव येथील ॲड.डि.व्ही.वझे, यांचे वृध्दापकाळाने निधन झालेले असल्याने त्यांची नांवे संस्थान ॲडव्होकेट पॅनलवरुन कमी करुन

ॲड.अनुराधा येवले, अहमदनगर व ॲड.अमोल रोहोम, राहाता यांची संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूंक करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

सदरच्या ॲडव्होकेट पॅनलवरील नेमणूका ०३ वर्ष कालावधी करीता करणे सोईस्कर होईल.

**निर्णय क्र.३३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन,ॲड.प्रदिप विक्रमराव तपसे-पाटील औरंगाबाद यांना मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद), ॲड.अनुराधा दि. येवले (आठरे पा.) यांना अहमदनगर कोर्ट व ॲड.अमोल बी.रोहोम साकुरी यांना राहाता, कोपरगांव कोर्टात संस्थान विषयक न्यायालयीन दावे चालविणेकामी तीन वर्ष कालावधीसाठी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक देण्यात यावी असे ठरले.**

**तसेच यापूर्वी संस्थान ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक करण्यात आलेल्या ॲडव्होकेटना संस्थानमार्फत किती काम देण्यात आलेले आहे व किती काम पूर्ण झालेले आहेत याबाबत सविस्तर माहिती व्यवस्थापन समितीस सादर करावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/ विधी विभाग/ कामगार विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१** **मंदिर व जुने प्रसादालय परिसराचे पुनर्नियोजनाकरीता प्रकल्पाची संकल्पना चित्रे सादर करणेकामी आर्किटेक्ट सराहा कन्सल्टन्सी आणि काबरे कन्सल्टन्टस्, नाशिक (JV) यांची नियुक्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर व जुने प्रसादालय परिसर विकसीत करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०९/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७३२ (३९) अन्वये सदरहू प्रकल्पासाठी प्राथमिक संकल्पनात्मक आराखडे मागविणेसाठी खालील तिन आर्किटेक्टस्‌ची नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली आहे.

०१. आर्किटेक्ट संजय मोहे, बेंगलुरु

०२. माथुर ॲण्ड काप्रे, असो. प्रा.लि., नवी दिल्ली

०३. आर्किटेक्ट शक्ती परमार ॲण्ड असो. मुंबई

त्यानुसार मंदिर व जुने प्रसादालय परिसर विकसीत करणेसाठी उपरोक्त तिन आर्किटेक्टकडून जा.क्र. एसएसएसटी/ बांधकाम/ १२९१९/२००९ दि. २१/१०/२००९ रोजीचे पत्राने प्रकल्पाची संकल्पना चित्रे सादर करणेस कळविले आहे. आर्किटेक्ट शक्ती परमार यांच्या विनंतीनुसार तिनही आर्किटेक्टस् यांना दि. २७/०२/२०१० अखेर संकल्पाना चित्र सादर करणेसाठी वाढीव मूदत देणेत आलेली होती. सदर मूदतीत आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांनी सिलबंद स्वरुपात संकल्पना चित्र सादर केलेले आहेत. आर्किटेक्ट शक्ती परमार यांनी त्यांच्या इतर आर्किटेक्ट समवेत दि. १८/०२/२०१० रोजी मंदिर परिसर पहाणी केली व एप्रिल महिन्याचे पहिल्या आठवड्यात आपले संकल्पनात्मक चित्रे, आराखडे इ. सादर करणार असल्याचे कळविले आहे. आर्किटेक्ट संजय मोहे, बेंगलुरु यांचेकडून सदर प्रकल्पाबाबत अद्याप कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही.

मा. अध्यक्ष सो. यांचे सूचनेनुसार आर्किटेक्ट अमृता पवार, नाशिक यांना दि. १८.०२.२०१० रोजी वरील प्रकल्पा संदर्भात Existing Drawing व सदर प्रकल्पाचे Objectives & Requirements देण्यात आलेल्या आहेत. सदर आर्कीटेक्ट हे सराहा कन्सल्टन्सी आणि काबरे कन्सल्टंटस्, नाशिक या फर्मतर्फे संयुक्तरित्या (JV) उपरोक्त प्रकल्पासाठीचे संकल्पना चित्र सादर करणार आहेत.

तरी सराहा कन्सल्टन्सी आणि काबरे कन्सल्टन्टस्, नाशिक यांची मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर नूतनीकरण प्रकल्पासाठी संकल्पना चित्रे व आराखडे सादर करणेसाठी नेमणूक करणेस मान्यतेस्तव सादर तसेच आर्किटेक्ट शक्ती परमार, मुंबई व सराहा कन्सल्टन्सी आणि काबरे कन्सल्टन्टस्, नाशिक (JV) यांना दि. १५ एप्रिल २०१० पर्यंत वाढीव मूदत देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३३५** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सराहा कन्सल्टन्सी आणि काबरे कन्सल्टन्टस्, नाशिक यांची मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर नूतनीकरण प्रकल्पासाठी संकल्पना चित्रे व आराखडे सादर करणेसाठी नेमणूक करणेस तसेच आर्किटेक्ट शक्ती परमार, मुंबई व सराहा कन्सल्टन्सी आणि काबरे कन्सल्टन्टस्, नाशिक (JV) यांना संकल्पना चित्रे सादर करण्यासाठी दि. १५ एप्रिल २०१० पर्यंत वाढीव मूदत देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०२** **दर्शन रांगेत थंड व आल्हाददायक वातावरण निर्मितीसाठी शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमध्ये कृत्रिम धुके निर्माण करणारी यंत्रणा (Fogging System) बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री ंचे दर्शनरांगेची व्यवस्था शांती निवास व भक्त निवास या दोन इमारतींचे तळमजला व पहिल्या मजल्यावर करण्यात आली आहे.या दोन इमारतीमधून जाणाऱ्या दर्शनरांगेतील वातावरण आल्हाददायक

असण्याचे दृष्टीने या इमारतीत वायुविजन व्यवस्थित होण्यासाठी मोठया आकाराच्या खिडक्या व मोकळया जागा ठेवण्यात आलेल्या आहेत. उन्हाळयाचे दिवसात सदर ठिकाणी शीतकरण यंत्रणा वापरण्यास मर्यादा येतात तसेच त्यासाठी विजेचा खर्चही मोठया प्रमाणात करावा लागतो. यावर वेगवेगळया पर्यायांची चाचपणी करण्यात आली.

दरम्यान दिनांक १३ फेब्रुवारी, २०१० रोजी नी.डी.ली.एंटरप्राईजेस, मुंबई यांच्या प्रतिनिधींनी शिर्डी येथे बगीचामध्ये धुके निर्माण करणारी यंत्रणा बसविणेबाबत समक्ष पहाणी करुन चर्चा केली. त्यावेळेस साईभक्तांच्या गर्दीच्या वेळेस दर्शन रांगेत निर्माण होणाऱ्या उष्णतेवर, घुसमटीवर काही पर्याय उपलब्ध आहे काय याबाबत चर्चा करणेत आली. त्यावेळेस कंपनीच्या प्रतिनिधींनी, फॉगिंग सिस्टिमव्दारे गर्दीच्या ठिकाणचे उष्णतेचे प्रमाणात काहीशी घट होऊ शकते, अशा प्रकारच्या फॉगिंग सिस्टिम्स उपाहारगृह, सार्वजनिक ठिकाणी अनेक ठिकाणी वापरत आहेत, असे सांगितले. याबाबत मा. अध्यक्षसाो. यांनी कंपनीचे प्रतिनिधींना सदर यंत्रणेची प्रायोगिक तत्वावर प्रात्यक्षिक देणेस सांगितले. त्यानुसार कंपनीने दि.२५/०२/२०१० रोजी भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यावर प्रायोगिक तत्वावर कृत्रिम धुके निर्माण करणारी यंत्रणा (Fogging System) बसविली आहे. सध्या प्रायोगिक तत्वावरील यंत्रणा व्यवस्थितरित्या कार्यान्वीत आहे.

**(ब)** मे. नी डी ली एंटरप्राईजेस, मुंबई यांनी दिनांक ०२ मार्च, २०१० रोजीचे ई-मेल पत्राव्दारे दर्शन रांगेमध्ये फॉगिंग सिस्टिम्स उभारणेबाबत अंदाजित खर्चाचा प्रस्ताव सादर केला आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

सदर यंत्रणेमध्ये उच्चदाबाचा पंप वापरून अतिसुक्ष्म नोझलद्वारे पाण्याचे कृत्रीम धुक्यात रुपांतर केले जाते. त्यासाठी ५०० लिटर प्रति तास शुध्द पाण्याची आवश्यकता भासते. यासाठी यंत्रणेत खालील बाबींचा समावेश असणार आहे.

- उच्चदाबाचे ट्रिपल प्लंजर पंप -

| **कृत्रीम धुके निर्माण करणारी यंत्रणा** | **मोटर / पंप** |
|---|---|
| २०० नोझलची यंत्रणा | २ अश्वशक्ती /४.५ जी पी एम |
| १५० नोझलची यंत्रणा | १.५ अश्वशक्ती /३.२५ जी पी एम |
| १०० नोझलची यंत्रणा | १.५अश्वशक्ती /२.२ जी पी एम |

- मोटर ४४०व्होल्ट ए.सी., ५० सायकल्स, थ्री फेज , ब्रास -नोझल्स,टी, उच्चदाबाचे टयुबिंग

**संस्थानने करावयाच्या बाबी -** प्लंबिंगसह १/२"पाण्याची लाईन ,मोटर स्टार्टरसह विद्यूत कनेक्शन, नोझल मॅनिफोल्डसाठी सपोर्टलाईन इत्यादि. सदर यंत्रणेसाठी खालीलप्रमाणे तपशीलवार खर्च अपेक्षित आहे.

**शांती निवास इमारत -**

| **अ.नं.** | **कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या लाईनची निश्चित जागा** | **कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या यंत्रणेचा तपशील** | **एकूण किंमत *** |
|---|---|---|---|
| ०१ | तळमजल्यावर छताचे बाजूस | २०० नोझलची यंत्रणा | रु.९,००,०००/- |
| ०२ | पहिल्या मजल्यावर खिडकीचे बाजूस | २०० नोझलची यंत्रणा | रु.९,००,०००/- |
| ०३ | तिसऱ्या मजल्यावर छतावर | २०० नोझलची यंत्रणा | रु.९,००,०००/- |
| **एकूण शांती निवास इमारत -** | | **६०० नोझलची यंत्रणा** | **रु.२७,००,०००/-** |

**भक्तनिवास इमारत -**

| **अ.नं.** | **कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या लाईनची निश्चित जागा** | **कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या यंत्रणेचा तपशील** | **एकूण किंमत *** |
|---|---|---|---|
| ०१ | तळमजल्यावर खिडकीचे बाजूस | १५० नोझलची यंत्रणा | रु.७,५०,०००/- |
| ०२ | पहिल्या मजल्यावर खिडकीचे बाजूस | १५० नोझलची यंत्रणा | रु.७,५०,०००/- |
| **एकूण भक्तनिवास इमारत -** | | **३०० नोझलची यंत्रणा** | **रु.१५,००,०००/-** |

याव्यतिरिक्त १०० नोझलची यंत्रणा दोन्ही इमारतींसाठी केली जाणार आहे.

| **अ.नं.** | **कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या लाईनची निश्चित जागा** | **कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या यंत्रणेचा तपशील** | **एकूण किंमत *** |
|---|---|---|---|
| ०१ | दोन्ही इमारतींचे तळमजल्यावर खिडकीचे बाजूस | १०० नोझलची यंत्रणा | रु.६,००,०००/- |
| **एकूण दोन्ही इमारत -** | | **१०० नोझलची यंत्रणा** | **रु.६,००,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे दोन्ही इमारतींसाठी एकूण **रु.४८,००,०००/-** (अधिक इंस्टॉलेशन चार्जेस+लागू असणारे कर + वाहतुक भाडे+संस्थानने करावयाच्या बाबी इत्यादि) खर्च अपेक्षित आहे.

**(क)** तरी उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे, तुर्त दर्शन रांगेतील एका हॉलसाठी उपरोक्तप्रमाणे कृत्रीम धुके निर्माण करणारी यंत्रणा (Fogging System) बसविणेसाठी अशा प्रकारची यंत्रणा उभारणाऱ्या कंपन्यांकडून दरपत्रके मागवून यंत्रणा कार्यान्वीत करता येईल. याकामी येणारे योग्य त्या खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, तुर्त दर्शन रांगेतील एका हॉलसाठी प्रायोगीक तत्वावर कृत्रीम धुके निर्माण करणारी यंत्रणा (Fogging System) बसविणेसाठी अशा प्रकारची यंत्रणा उभारणाऱ्या एजन्सीज्कडून दरपत्रके मागवून यंत्रणा कार्यान्वीत करणेकामी येणारे योग्य त्या खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने करुन घेणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०३ श्री द्वारकामाई मंदिरात पवित्र धुनीचे बाजुने उष्णतारोधक काच (हिटप्रुफ ग्लास) बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांनी प्रज्वलित केलेली पवित्र धुनी श्री व्दारकामाई मंदिरात अहोरात्र सुरु आहे. सदर धुनीचे सुरक्षिततेसाठी उष्णतारोधक बायसन पॅनल्स व वरिल बाजुस स्टेनलेस स्टिल जाळी बसविणेत आलेली आहे. सदर बायसन पॅनल व जाळीमुळे पवित्र धुनीची ज्योत / अग्नी साईभक्तांना बाहेरुन नजरेस येत नाही व त्यामुळे भक्तांना धुनीचे दर्शन सुलभरितीने घेता येत नाही.

या अनुषंगाने, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २०१० रोजीचे सभेत श्री व्दारकामाई मंदिरात देणगीदाखल मकराना मार्बल बसविणेचे चर्चेचेवेळेस पवित्र धुनीचे बाजूने बसविणेत आलेल्या लोखंडी जाळीचे ऐवजी हिटप्रुफ ग्लास बसवून, त्यामध्ये व्हेंटीलेशनची सोय करता येईल काय याबाबत माहिती घेऊन प्रस्ताव सादर करावा, असा निर्णय घेणेत आलेला आहे.

त्यास अनुसरुन, साईभक्त नेहा डंग यांनी दिनांक ११ फेब्रुवारी, २०१० रोजीचे ई-मेल पत्राव्दारे, देणगीदाखल पवित्र धुनीस हिटप्रुफ ग्लास बसवून देण्याची इच्छा व्यक्त केली आहे. याबाबत संस्थान आर्किटेक्ट यांचेकडून आवश्यक अशी ड्रॉईग्ज व मोजमापे प्राप्त झालेनंतर त्यानुसार कार्यवाही करणेस तयार आहे.

याबाबत, आर्किटेक्ट शक्ती परमार, मुंबई यांनी त्यांचे शिर्डी भेटीत श्री व्दारकामाई मंदिरात समक्ष पहाणी करुन धुनीचे बाजूने हिटप्रुफ ग्लास कशा पध्दतीने बसविता येईल याची पहाणी केली. आर्किटेक्ट शक्ती परमार हे धुनीचे बाजूने हिटप्रुफ ग्लास बसविणेबाबत सविस्तर ड्रॉईग्ज व मोजमापे देणेस तयार आहेत.

तरी याकामी आर्किटेक्ट शक्ती परमार यांचेकडून ड्रॉईग्ज प्राप्त करवून घेऊन, त्यानुसार साईभक्त नेहा डंग, नवी दिल्ली यांचेकडून पवित्र धुनीस उष्णतारोधक काच (हिटप्रुफ ग्लास) देणगी दाखल बसवून घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३३७ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे आर्किटेक्ट शक्ती परमार यांचेकडून ड्रॉईग्ज प्राप्त करवून घेऊन, त्यानुसार साईभक्त नेहा डंग, नवी दिल्ली यांचेकडून पवित्र धुनीस उष्णतारोधक काच (हिटप्रुफ ग्लास) देणगी दाखल बसवून घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०४ श्री साई प्रसादालयातील स्वामीनारायण चपाती/पूरी, मोतीचूर लाडू/बर्फी व अन्नपाकिटे आऊट सोर्सिंग पध्दतीने तयार करुन घेणेकरीता आलेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयामधील स्वामी नारायण चपाती / पुरी, मोतीचूर लाडु / बर्फी व अन्नपाकीटे बनविणेचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेण्यात येत आहेत. सन २००९ ते २०१० करीता देण्यात आलेल्या टेंडर्सची मुदत दि.३१/०३/२०१० रोजी संपणार आहे. सन २०१०-२०११ या वर्षाकरीता सदर कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी मा.व्यवस्थापन समिती दि.१०/०१/२०१० चे सभेमध्ये वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन जाहिर निवीदा मागविणेत याव्यात असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार प्रसादालयाकडील दि.०१/०२/२०१० चे मंजूर टिपणी अन्वये दि.०८/०२/२०१० रोजी वृत्तपत्रात जाहिर निवीदा मागविणेबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१०/०१/२०१० चे सभेतील निर्णय व श्री साई प्रसादालयाकडील दि.०१/०२/२०१० चे टिपणी अन्वये वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार दि.०९/०२/२०१० ते १५/०२/२०१० अखेर खालीलप्रमाणे निवीदांची विक्री झालेली आहे.

**अ) स्वामी नारायण चपाती / पुरी :-**

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | पी.एच.जोशी, चपाती ठेकेदार मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि. अहमदनगर. |
| ०२ | शिवसाई केटरर्स, शिर्डी साईबाबा नगर, निमगांव, शिर्डी.मु.पो.शिर्डी, ता. राहाता, जि.अहमदनगर. |
| ०३ | चव्हाण योगिता संतोष मु.पो.शिर्डी (विठ्ठलवाडी) ता.राहाता, जि. अहमदनगर |

**ब) मोतीचूर लाडू बर्फी :-**

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | स्वामीप्रसाद विजय डाके ,मु.पो.ता.संगमनेर, जि. अहमदनगर |
| ०२ | भगवान काशिनाथ मिसाळ, मु.पो. अंदरसुल, ता. येवला, जि. नाशिक |

| | |
|---|---|
| ०३ | माधव गंगाराम नाईकवाडी (मोतीचूर लाडू / बर्फी ठेकेदार) मु.पो.साकुरी (गोदावरी वसाहत) ता. राहाता, जि.अहमदनगर |
| ०४ | दिपक माधव नाईकवाडी, मु.पो. साकुरी (गोदावरी वसाहत) ता.राहाता, जि. अहमदनगर |
| ०५ | श्री साई निर्माण प्रतिष्ठाण, रुई मु.पो.रुई, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| ०६ | बद्रीनाथ भाऊसाहेब भागवत मु.पो. गवंडगाव, ता.येवला, जि. नाशिक |
| ०७ | शिवसाई केटरर्स, निमगाव-शिर्डी मु.पो.शिर्डी,(साईबाबा नगर)निमगांव-शिर्डी |
| ०८ | बालाजी केटरर्स, नाशिक पंचवटी, उत्तमनगर, सिडको, नाशिक |
| ०९ | सदगुरु केटरर्स, नाशिक पंचवटी, उत्तमनगर, सिडको, नाशिक |
| १० | काशिनाथ नागुजी मिसाळ मु.पो.अंदरसुल, ता.येवला, जि.नाशिक. |
| ११ | सच्चिदानंद केटरर्स, अहमदनगर श्री नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी, अहमदनगर |
| १२ | सदगुरु हरीहर महाराज स्वयंरोजगार सह संस्था, आनंदनिवास, भवानी नगर, अ.नगर. |
| १३ | चव्हाण योगिता संतोष मु.पो.शिर्डी, (विठ्ठलवाडी) |

**क) अन्नपाकीटे :-**

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | शकुंतला रामदेव शिंदे साई केटरर्स, कुंभार गल्ली, वार्ड नं.०३ श्रीरामपुर |
| ०२ | श्री गणपत काशिनाथ मिसाळ मु.पो.अंदरसुल, ता. येवला जि. नाशिक |
| ०३ | श्री साईबाबा समाज विकास संस्था मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| ०४ | शिवसाई केटरर्स, निमगाव-शिर्डी साईबाबा नगर, शिर्डी ता.राहाता, जि. अहमदनगर |
| ०५ | सदगुरु केटरर्स, नाशिक पंचवटी, उत्तमनगर, सिडको नाशिक |
| ०६ | बालाजी केटरर्स, नाशिक पंचवटी, उत्तमनगर, सिडको , नाशिक |
| ०७ | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह संस्था, अ.नगर , आनंद निवास, भवानीनगर, अहमदनगर |
| ०८ | चव्हाण योगिता संतोष मु.पो.शिर्डी (विठ्ठलवाडी) ता. राहाता, जि.अहमदनगर |
| ०९ | अष्टविनायक सेवा सहाय्यता महिला बचत गट, कोपरगाव सुदेश टॉकीजचे मागे, कोपरगाव |

दि.१८/०२/२०१० या निर्धारीत मुदतीत उपरोक्त पैकी खालील निवीदाधारकांनी निवीदा भरुन (दरपत्रक) सादर केलेल्या आहेत.

**अ) स्वामी नारायण चपाती / पुरी :-**

| | |
|---|---|
| ०१. | पी.एच.जोशी, चपाती ठेकेदार मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि. अहमदनगर. |
| ०२. | श्री चंद्रकांत सोन्याबापू शेळके, शिवसाई केटरर्स, शिर्डी, साईबाबा नगर, निमगांव, शिर्डी. मु.पो.शिर्डी, ता. राहाता, जि.अहमदनगर. |

**ब) मोतीचूर लाडू बर्फी :-**

| | |
|---|---|
| ०१. | माधव गंगाराम नाईकवाडी मु.पो.साकुरी (गोदावरी वसाहत) ता. राहाता, जि.अहमदनगर |
| ०२. | दिपक माधव नाईकवाडी मु.पो. साकुरी (गोदावरी वसाहत) ता.राहाता, जि. अहमदनगर |
| ०३. | श्री साई निर्माण प्रतिष्टाण, रुई मु.पो.रुई, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| ०४. | बद्रीनाथ भाऊसाहेब भागवत मु.पो. गवंडगाव, ता.येवला, जि. नाशिक |
| ०५. | प्रभाकर प्रकाश देशमुख नरपतसिंह राजपुरोहित, मु.शहाजापूर पो.कोळपेवाडी ता. कोपरगांव |
| ०६. | तारासिंग राजपुरोहित,उत्तमनगर बसस्टॉप , सिडको , नाशिक |
| ०७. | काशिनाथ नागुजी मिसाळ मु.पो.अंदरसुल, ता.येवला, जि.नाशिक |
| ०८. | सच्चिदानंद केटरर्स, श्री नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी ,अहमदनगर |
| ०९. | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह संस्था, अ.नगर. |

**क) अन्नपाकीटे :-**

| | |
|---|---|
| ०१. | श्री साईबाबा समाज विकास संस्था मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| ०२. | सौ.सुनंदा चंद्रकांत शेळके द्वारकामाई महिला औद्योगिक सह संस्था मर्या, शिर्डी |
| ०३. | १) प्रभाकर प्रकाश देशमुख२) नरपतसिंह राजपुरोहित मु.शहापुर, पो.कोळपेवाडी ता. कोपरगाव, जि.अ.नगर |
| ०४. | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह संस्था, अ.नगर आनंद निवास, भवानीनगर, अहमदनगर |
| ०५. | अष्टविनायक सेवा सहाय्यता महिला बचत गट, कोपरगाव सुदेश टॉकीजचे मागे, कोपरगाव |

**निर्णय क्र.३३८ उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.**

**अ) स्वामी नारायण चपाती / पुरी :-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर रुपये | | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | |
|---|---|---|---|---|---|
| | | चपाती दर प्र.क्विं आटा+मैदा (रुपये) | पुरी दर प्र.क्विं आटा +मैदा (रुपये) | चपाती दर प्र.क्विं आटा+मैदा (रुपये) | पुरी दर प्र.क्विं आटा +मैदा (रुपये) |
| ०१. | पी.एच.जोशी, चपाती ठेकेदार मु.पो.शिर्डी, | ६५०/- | ६५०/- | ६२५/- | ६२५/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ता.राहाता, जि. अहमदनगर. | | | | |
| ०२. | श्री चंद्रकांत सोन्याबापू शेळके, शिवसाई केटरर्स, शिर्डी, साईबाबा नगर, निमगांव, शिर्डी. मु.पो.शिर्डी, ता. राहाता, जि.अहमदनगर. | ४४९/- | ३८०/- | ४४९/- | ३८०/- |

**ब) मोतीचूर लाडू बर्फी :-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर रुपये | | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाडू दर प्रति हजारी रुपये | बर्फी दर प्र.क्वि. साखर रुपये | लाडू दर प्रति हजारी रुपये | बर्फी दर प्र.क्वि. साखर रुपये |
| ०१. | माधव गंगाराम नाईकवाडी मु.पो.साकुरी (गोदावरी वसाहत) ता. राहाता, जि.अहमदनगर | १४६.७० | १५९.९३ | १४६.७० | १५९.९३ |
| ०२. | दिपक माधव नाईकवाडी मु.पो. साकुरी (गोदावरी वसाहत) ता.राहाता, जि. अहमदनगर | १४८.९० | १५८.८३ | १४८.९० | १५८.८३ |
| ०३. | श्री साई निर्माण प्रतिष्टाण, रुई मु.पो.रुई, ता.राहाता, जि.अहमदनगर | १४५.०० | २५०.०० | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०४. | बद्रीनाथ भाऊसाहेब भागवत मु.पो. गवंडगाव, ता.येवला, जि. नाशिक | १४०.०० | २४०.०० | १३०.०० | २००.०० |
| ०५. | प्रभाकर प्रकाश देशमुख नरपतसिंह राजपुरोहित, मु.शहाजापूर पो.कोळपेवाडी ता. कोपरगांव | १२१.०० | १३०.०० | ११५.०० | १०५.०० |
| ०६. | तारासिंग राजपुरोहित,उत्तमनगर बसस्टॉप , सिडको , नाशिक | १२६.०० | १००.०० | १२१.०० | १००.०० |
| ०७. | काशिनाथ नागुजी मिसाळ मु.पो.अंदरसुल, ता.येवला, जि.नाशिक | १३५.०० | २००.०० | १३५.०० | २००.०० |
| ०८. | सच्चिदानंद केटरर्स, श्री नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी , अहमदनगर | २२५.०० | २२५.०० | २००.०० | २००.०० |
| ०९. | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह संस्था, अ.नगर. | १३५.०० | २००.०० | १३५.०० | २०००.०० |

**क) अन्नपाकीटे :-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर रुपये (प्र.पाकिट) | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये (प्र.पाकिट) |
|---|---|---|---|
| ०१. | श्री साईबाबा समाज विकास संस्था मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर | ०.९० | ०.९० |
| ०२. | सौ.सुनंदा चंद्रकांत शेळके द्वारकामाई महिला औद्योगिक सह संस्था मर्या, शिर्डी | ०.५० | ०.५० |
| ०३. | १) प्रभाकर प्रकाश देशमुख २) नरपतसिंह राजपुरोहित मु.शहापुर, पो.कोळपेवाडी ता. कोपरगाव, जि.अ.नगर | ०.७० | ०.७० |
| ०४. | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह संस्था, अ.नगर आनंद निवास, भवानीनगर, अहमदनगर | ०.८१ | ०.८१ |
| ०५. | अष्टविनायक सेवा सहाय्यता महिला बचत गट, कोपरगाव सुदेश टॉकीजचे मागे, कोपरगाव | ०.८४ + व्यवसाय कर ०.०९ = ०.९३ | ०.८४ + व्यवसाय कर ०.०९ = ०.९३ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन,**

**(अ) स्वामीनारायण चपाती/ पुरी-**

**अ.नं. १ पी.एच.जोशी, चपाती ठेकेदार, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि. अहमदनगर हे गेल्या ११ वर्षापासून संस्थानचे गरजेनुसार आवश्यक तेवढया चपाती/ पुरी तयार करुन देत आलेले आहेत. त्यांचे काम समाधानकारक असून त्यांचे कामाचे कालावधीत कधीही चपाती/ पुऱ्या कमी पडलेल्या नाहीत. याऊलट अ.नं. २ श्री चंद्रकांत सोन्याबापू शेळके, शिवसाई केटरर्स, शिर्डी, साईबाबा नगर, निमगांव, यांचेशी निविदेतील कामाबाबत केलेल्या चर्चेतून दिसून आले आहे की, त्यांना स्वामीनारायण चपाती/ पुरीचे कामाबाबत ज्ञान अथवा कामाचा अनुभव नाही. त्यांचेकडे प्रा.फंड कोडनंबर नाही. तसेच या कामासाठी किती कामगार कामास लागतील व या कामगारांना किती वेतन द्यावे लागेल याबाबत त्यांना अजिबात ज्ञान व माहिती नसल्याचे दिसून आले, त्यांनी मोघम स्वरुपात निविदा व दर भरल्याचे आढळून आले आहे. त्यांचे दर अ.नं. १ पेक्षा कमी असूनही केवळ कमी दराचा विचार न करता सन २०१०-२०११ साठी श्री.पी.एच. जोशी यांचे प्रति क्विंटल आटा व मैदयासाठी रु.६२५/- (सर्व्हिस टॅक्ससह ) दर मान्य करण्यात यावे, असे ठरले.**

**<u>ब) मोतीचूर लाडू बर्फी :-</u>**

**अ.नं.१- श्री. माधव गंगाराम नाईकवाडी मु.पो.साकुरी (गोदावरी वसाहत) ता. राहाता, जि.अहमदनगर हे सतत ११ वर्षापासून मोतीचूर लाडू /बर्फी संस्थानचे गरजेनुसार विनातक्रार काम करीत आहेत व त्यांचे काम समाधानकारक आहे.**

**अ.नं.२- दिपक माधव नाईकवाडी मु.पो. साकुरी (गोदावरी वसाहत) ता.राहाता, जि. अहमदनगर यांचे अ.नं. १ पेक्षा मोतीचूर लाडूसाठी दर जास्त आहेत. त्यांना स्वतंत्र मोठया प्रमाणात कामाचा अनुभव नाही. तसेच, त्यांचेकडे प्रा.फंड कोड नंबर नाही.**

**अ.नं.३- यांचे अ.नं.१ पेक्षा दर जास्त आहेत, ते चर्चा/ वाटाघाटीसाठी गैरहजर राहीले. तसेच, त्यांचेकडे प्रा.फंड कोड नंबर नाही.**

**अ.नं.४- यांचे अ.नं.१ पेक्षा दर कमी आहेत मात्र त्यांना मोठया प्रमाणात लाडू/ बर्फी बनविणेचा अनुभव नाही. ते सध्या अन्न पाकिट बनविणेकामी आचारी म्हणून काम करत आहेत. तसेच, त्यांचेकडे प्रा.फंड कोड नंबर नाही.**

**अ.नं.५/६-यांचे अ.नं.१ पेक्षा दर कमी आहेत मात्र समक्ष चर्चेअंती त्यांना मोठया प्रमाणात लाडू/ बर्फी बनविणेसाठी क्षमता व ज्ञान नसल्याचे आढळून आलेले आहे. तसेच, त्यांचेकडे प्रा.फंड कोड नंबर नाही.**

**अ.नं.७ यांचे अ.नं.१ पेक्षा दर कमी आहेत, मात्र त्यांनी ज्यावेळी पूर्वी संस्थानचे काम केलेले आहे त्यावेळी गर्दी कमी असायची सध्या गर्दीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढलेले असल्याने वाढीव गर्दीचे प्रमाणात काम करण्याची क्षमता त्यांचेकडे दिसून आली नाही. तसेच, त्यांचेकडे प्रा.फंड कोड नंबर नाही.**

**अ.नं.८- यांचे अ.नं.१ पेक्षा दर जास्त आहेत. तसेच, त्यांचेकडे प्रा.फंड कोड नंबर नाही.**

**अ.नं.९- यांचे अ.नं.१ पेक्षा दर कमी आहेत मात्र ते सध्या संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलची कॅन्टीन चालवीत आहेत. मात्र ४ महिण्याची परवाना फी भरणेबाबत वेळोवेळी सांगूनही ४ महिन्याची परवाना फी त्यांचेकडून थकविलेली असल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. तसेच, त्यांचेकडे प्रा.फंड कोड नंबर नाही.**

**उपरोक्त सर्व बाबींचा विचार होऊन, अ.नं.१ श्री.माधव गंगाराम नाईकवाडी यांना मोठया प्रमाणात लाडू/ बर्फी बनविण्याचे कामाचा अनुभव असल्याने त्यांना प्रति १००० लाडू तयार करणेसाठी रु.१४६.७० (सर्व्हिस टॅक्ससह) तसेच बर्फी तयार करणेसाठी प्रति क्विंटल साखरेस रु.१५९.९३ (सर्व्हिस टॅक्ससह) याप्रमाणे काम देणेत यावे, असे ठरले.**

**<u>क) अन्नपाकीटे :-</u>**

**अ.नं.१- सन- २००५ पासून अन्नपाकीटे बनविण्याचे काम समाधानकारक असून स्थानिक बचत गट असल्याने यांना प्राधान्य देण्यात यावे.**

**अ.नं.२- यांचे अ.नं.१ यांचेपेक्षा दर कमी आहेत मात्र त्यांना या क्षेत्रातील कामाचा अजिबात अनुभव नाही.**

**अ.नं.३- यांचे अ.नं.१ यांचेपेक्षा दर कमी आहेत मात्र खाजगी व्यक्तीस काम देण्याऐवजी स्थानिक महीला बचत गटास रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणेस प्राधान्य देणेत यावे.**

**अ.नं.४- यांचे अ.नं.१ यांचेपेक्षा दर कमी आहेत, बचतगट आहे, मात्र स्थानिक नसल्यामुळे या बचत गटातील महिलांची अन्नपाकिटे बनविणेसाठी दररोज पहाटे ३.०० वाजता उपस्थित रहाणेची शक्यता कमी आहे. तसेच या सह संस्थेने हॉस्पिटल कॅन्टीनचा ४ महिने कालावधीचा सेवाआकार थकविलेला आहे. त्यामुळे या कामासाठी स्थानिक बचतगटास प्राधान्य देणे योग्य ठरेल.**

**अ.नं.५- यांचे अ.नं.१ पेक्षा दर जास्त आहेत.**

**उपरोक्त सर्व बाबींचा विचार होऊन, अ.नं.१ श्री साईबाबा समाज विकास संस्था मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर हा स्थानिक बचत गट असल्याने इतरांचा निव्वळ कमी दराचा विचार न करता श्री साईबाबा समाज विकास संस्था मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर यांना अन्नपाकिटे बनविणेचे काम व्यवसाय करांसह एकत्रित रु.०.९० मात्र प्रति अन्नपाकिट या दराने देणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५ धनादेश व धनाकर्ष पत्रांवर सह्या करण्याचे अधिकाराबाबत**

**प्रस्ताव-** शिरडी येथे श्रींच्या दर्शनासाठी दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे संस्थानच्या सर्वच कामकाजाची विविधता आणि व्याप्ती शीघ्रगतीने सतत वाढत आहे. अलीकडील ३-४ वर्षांमध्ये संस्थानच्या एकूण आर्थिक उलाढालीचा (उत्पन्न तथा खर्च) आकार, तपशील व व्याप देखील

झपाटयाने वाढलेला आहे आणि आज मितीस तो वार्षिक रुपये २०० कोटींच्यावर गेला आहे. साईभक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे त्यांचे सोई सुविधेसाठी दिवसेंदिवस खर्चही वाढत आहे. या दैनंदिन खर्चाचे व्यवहारांचे प्रमाणही मोठे असून दररोज सरासरी ९० ते १०० धनादेश (चेक्स्) तयार होतात तसेच बँकेमधून सरासरी ७५ ते ८० धनाकर्ष (डी.डी.) काढले जातात. याव्यतिरिक्त श्री साईबाबा हॉस्पीटलचे आर्थिक कामकाज स्वतंत्रपणे केले जाते. श्री साईबाबा हॉस्पीटलकडूनही दररोज सरासरी ४० ते ५० धनादेश व धनाकर्ष काढले जातात. या व्यतिरिक्त काही किरकोळ स्वरुपाची बीलेही रोखीने अदा केली जातात.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.३/५/२००५ चे सभेतील निर्णय क्रं.१७९(A) नुसार संस्थानचे आर्थिक कामकाजाची पध्दत सध्या खालीलप्रमाणे आहे:-

(१) रक्कम रु.२५,०००/- रकमेपर्यंतचे धनादेश व धनाकर्ष पत्रांवर स्वाक्ष-या करण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

(२) रक्कम रु.२५,०००/- चे पुढील धनादेश व धनाकर्ष पत्रांवर स्वाक्ष-या करण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी व मा.अध्यक्ष महोदय/ मा.उपाध्यक्ष महोदय यांना संयुक्तपणे आहेत.

वरील नमूद परिस्थिती तसेच दिवसेंदिवस संस्थानच्या आर्थिक कामकाजात झपाटयाने होत असलेली लक्षणीय वाढ तसेच आर्थिक व्यवहार वेळेवर व विनाविलंब सुरळीत पार पडावेत, त्यास खीळ बसू नये या दृष्टीने संस्थानच्या सध्याचे आर्थिक कामकाजाचे पध्दतीत कालपरत्वे बदल करणे अपरिहार्य आहे.

संस्थानच्या आर्थिक कामकाजात अधिक सुसूत्रता येणेसाठी तसेच कामे अधिक जलद गतीने होणेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडील अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे आहे. याकामी संस्थानच्या व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या अधिनियम क्रमांक १४/२००४ मध्ये खालीलप्रमाणे तरतुदी आहेत :-

**समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये**

१४ (३) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी समितीकडून किंवा कार्यकारी अधिका-याकडून किंवा विनियमान्वये त्यांना वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कर्तव्ये व कामे पार पाडतील.

**समितीची कर्तव्ये व अधिकार**

१७ (२) (झ) सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील;

**विश्वस्तव्यवस्था निधी**

२० (४)समितीने प्राधिकृत केलेल्या सदस्यांकडून किंवा अधिका-यांकडून, विश्वस्तव्यवस्था निधीचा व्यवहार, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून, करण्यात येईल.

वरील तरतुदींना अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीने एखाद्या बाबीसाठी मूळ प्रस्ताव सादर करुन त्याचे खर्चास मा.कार्यकारी अधिकारी/मा.उप कार्यकारी अधिकारी यांची मान्यता प्राप्त झालेनंतर खालीलप्रमाणे अधिकार प्रदान केल्यास मा.कार्यकारी अधिकारी/मा.उप कार्यकारी अधिकारी महोदय यांना संस्थानचे इतर महत्वाच्या व धोरणात्मक बाबींवर कामकाजासाठी अधिक वेळ उपलब्ध होईल व संस्थानचे कामकाजात गतिमानता येईल.

**(अ)** संस्थानचे लेखाशाखेकडून काढण्यात येणा-या रुपये २५,०००/- (रु.पंचवीस हजार) मात्रपर्यंतचे धनादेश व धनाकर्ष पत्रांवर स्वाक्ष-या करण्याचे अधिकार तसेच रोखीची बीले पास फॉर पेमेंट करण्याचे अधिकार **मुख्य लेखा अधिकारी** यांना देण्यात यावेत.

**(ब)** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलचे वित्त विभागाकडून काढण्यात येणारे रुपये २५,०००/- (रु.पंचवीस हजार) मात्रपर्यंतचे धनादेश व धनाकर्ष पत्रांवर स्वाक्ष-या करण्याचे अधिकार तसेच रोखीची बीले पास फॉर पेमेंट करण्याचे अधिकार **वैद्यकीय संचालक, रुग्णालये** यांना देण्यात यावेत.

**(क)** वरील **अ** व **ब** मध्ये नमूद असलेले अधिकार जरी प्राधिकृत करण्यात आले असले, तरी मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार अबाधित राहतील.

धनादेश व धनाकर्षांची पत्रे व रोख बीलांवर स्वाक्ष-यांसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांना इतर सर्व दैनंदिन व महत्वाचे कामकाज सोडून प्राधान्याने या कामासाठी साधारण २-३ तास वेळ दयावा लागतो. सर्व बीलांची सखोल तपासणी व पडताळणी करणेसाठी संस्थानकडे स्वतंत्र यंत्रणा आहे. तसेच संस्थानच्या वाढत्या आर्थिक कामकाजावर प्रभावी नियंत्रण राहावे म्हणून लेखाशाखा व श्री साईबाबा हॉस्पीटलकडे पूर्व व अंतर्गत लेखापरीक्षकांचीही संस्थानने नेमणूक केलेली आहे.

संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक श्री.अभय शास्त्री, चार्टर्ड अकौंटट, पुणे व श्री.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटट, कोपरगांव यांनीही सदर प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नसल्याबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

महाराष्ट्र शासनाकडे धनादेश व धनाकर्ष पत्रांवर सहया करण्याचे अधिकार कोषागार अधिका-यांस व महानगरपालिकांकडे हे अधिकार मुख्य लेखाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

वरील नमूद परिस्थिती व तपशील विचारात घेता संस्थानचे मोठया प्रमाणावरील दैनंदिन आर्थिक व्यवहार वेळचेवेळी, अचूक व कार्यक्षमतेने होण्याचे दृष्टीकोनातून वरीलप्रमाणे **अ** व **ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिकार प्रदान करावेत व उर्वरित कामकाज पूर्वीचेच निर्णयाप्रमाणे राहील असे नम्र मत आहे.

**निर्णय क्र.३३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

(कार्यवाही-मुख्य वैद्यकीय अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०६ बँक ऑफ इंडिया,शिर्डी यांच्याकडून संस्थानला सेवा घेणे बाबत**

**प्रस्ताव-** बँक ऑफ इंडीया यांनी त्यांचे जा.नं.PZO:MKT:BMG:२१३ दिनांक १७/०२/२०१० रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, दि.०८/०३/२०१० पासुन श्री क्षेत्र शिर्डी येथे बँक ऑफ इंडीया या बँकेची शाखा सुरू होत आहे. तसेच, याच पत्रात त्यांनी श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्थेचे बचत खाते बँक ऑफ इंडीया मध्ये उघडणे, देणगी दाखल आलेल्या चेक/डी.डी. कलेक्शन, कर्मचारी वेतन तसेच, दक्षिणापेटी मोजणीकामी त्यांना पाचारण करणेसाठी विनंती केलेली आहे. आणि संस्थानच्या मुदतठेवी त्यांच्याकडे नियमानुसार गुंतविण्यासाठी सुध्दा विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम २० अन्वये संस्थानची रक्कम फक्त राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवण्याचे बंधन आहे. सदर बँक ही राष्ट्रीयकृत आहे. यापुर्वी बँक ऑफ इंडीया, शाखा कोपरगांव यांचे दिनांक २३ जुलै २००९ रोजीचे पत्राअन्वये दक्षिणापेटी मोजणीकामी त्यांना पाचारण करणेसाठी विनंती केलेली होती परंतु ती विनंती दि. १९/०९/२००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रं. ७५९ नुसार उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला होता आता मात्र बँक ऑफ इंडीया, यांची शाखा शिर्डी येथेच सुरू होत आहे.

दक्षिणा पेटीतून उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या स्थानिक बँकेकडे उच्चत्तम दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळवीता येतील. तसेच संस्थानचे वैधानिक लेखापरीक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्टीयकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी, असे लेखापरीक्षक यांनी सुचविलेले आहे.

तरी बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना संस्थानच्या नियम/अटी व शर्तीनुसार दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीकामी पाचारण करणेबाबत तसेच त्यांचेकडे संस्थानच्या मुदतठेवी करणेबाबत निर्णय होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३४० प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना संस्थानच्या नियम/अटी व शर्तीनुसार दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीकामी पाचारण करणेस तसेच त्यांचेकडे संस्थानच्या मुदतठेवी करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०७ श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागासाठी किरकोळ साहित्य व इन्स्टुमेंट खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाने दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी लागणारे काही किरकोळ साहित्य व काही इन्स्टुमेंटची मागणी केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per | App.Total Amt. in Rs. | मागणीचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Micro Drill for Neuro Surgery | 2 | 15000.00 | 30000.00 | नविन मागणी |
| 2 | Manual Hand (Orthopedic) Drill | 2 | 5000.00 | 10000.00 | For Emergency Surgery |
| 3 | Sodem Craniotome Drill Bits Cutters | 12 | 6000.00 | 72000.00 | नविन मागणी |
| 4 | Micro Motor Hand Piece (Straight) for Neuro Surgery | 1 | 15000.00 | 15000.00 | नविन मागणी |
| | **Total Amt. in Rs.** | | | **127000.00** | |

वरीलप्रमाणे किरकोळ साहित्य व इन्स्टुमेंट खरेदीकामी अंदाजे रु.१,२७,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचे किरकोळ साहित्य व इन्स्टुमेंट खरेदीकामी येणाऱ्या रु.१,२७,०००/- चे खर्चास व विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३४१ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे किरकोळ साहित्य व इन्स्टुमेंट खरेदीकामी येणाऱ्या रु.१,२७,०००/- चे खर्चास व विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०८ सोडेम हाय स्पीड न्युमॅटीक ड्रील मशिनचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलच्या न्युरो सर्जरी ऑपरेशन थिएटर विभागात मेंदु व मणक्याच्या शस्त्रक्रिया करताना वापरण्यासाठी एक सोडेम हाय स्पीड न्युमॅटीक ड्रील मशीन मा.व्य.समितीच्या दि.२५/११/२००६च्या सभेतील निर्णय क्र.८७८(०३)अन्वये मे.नितीष डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि.,मुंबई यांचेकडून एकुण १४,१९,०५८.७८ इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर सोडेम हाय स्पीड न्युमॅटीक ड्रील मशीन दि.०७/१०/२००६ रोजी कंपनी इंजिनीअर यांनी तत्कालीन वैद्यकीय संचालक तथा न्युरो सर्जन यांचे समक्ष कार्यान्वीत केलेले आहे.

न्युरो सर्जरी विभागातील सदर सोडेम हाय स्पीड ड्रील मशिनने आजपावेतो व्यवस्थित काम दिले आहे. परंतु सध्या सदर मशिनची मोटर व्यवस्थित काम करीत नसल्यामुळे कंपनीचे सध्याचे सर्व्हिस डिलर मे. मेडटेक, मुंबई यांचे इंजिनीअर यांना तातडीचे दुरूस्तीसाठी बोलविणेत आले होते. त्यांनी दि. ०३/१२/०९ रोजी सदर मोटरची तपासणी करून सदर मोटर ही उत्पादक कंपनीकडून दुरूस्त करून घेणे गरजेचे आहे असे त्यांचे सर्व्हिस रिपोर्ट अन्वये कळविले आहे. कंपनीने ड्रील मशिनच्या मोटर दुरूस्तीसाठी सर्व करांसहीत एकुण रु.१,१०,५००/- (अक्षरी रु.एक लाख दहा हजार पाचशे मात्र) इतका खर्च कळविला आहे आणि सदर रक्कमेची मे.मेडटेक,मुंबई यांनी आगाउ मागणी केलेली आहे.

तरी मे. मेडटेक,मुंबई यांचेकडुन सोडेम हाय स्पीड ड्रील मशिनची मोटर दुरूस्त करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. १,१०,५००/-चे खर्चास आणि सदर रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३४२ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे. मेडटेक,मुंबई यांचेकडुन सोडेम हाय स्पीड ड्रील मशिनची मोटर दुरूस्त करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. १,१०,५००/-चे खर्चास आणि सदर रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०९ श्री रमेश चांगदेव पूजारी यांना वैद्यकीय उपचारासाठी आगाऊ रक्कम देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री रमेश चांगदेव पुजारी, तांत्रिक सहाय्यक ( माहिती व तंत्रज्ञान विभाग) यांना दि.१८/०२/२०१० रोजी अचानक पोटात दुखु लागले त्यासाठी त्यांना प्रथम श्री साईबाबा रुग्णालयात डॉ. कृष्णा गिरी यांना दाखविले होते डॉ. गिरी यांचे सल्ल्यानुसार त्यांनी अंतर्रुग्ण म्हणून उपचार घेतले होते. परंतु त्यानंतर त्यांना जास्त त्रास होऊ लागल्यामुळे त्यांना डॉ. गिरी यांनी पुढील उपचारासाठी रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे पाठविण्याची शिफारस केली होती त्यानुसार ते दि.२०/०२/२०१० पासून त्यांना अंतर्रुग्ण म्हणून उपचार घेत आहे व तेथील डॉक्टरांनी त्यांचे Fever with chills, Rash Joint Pain for Dialysis या आजाराचे निदान केलेले आहे व तेथील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांचे औषधोपचार चालू आहेत व अजून त्यांना बरे होण्यासाठी कमीत कमी आणखी दहा ते पंधरा दिवस अंतर्रुग्ण म्हणून उपचार घ्यावे लागणार आहे. सदरचे उपचाराकरीता त्यांना अंदाजे रु. १,०१,९५०/- इतका खर्च येईल असे रुबी हॉल क्लिनिक, पुणे यांनी दि.२२/०२/२०१० चे अंदाजपत्रकानुसार कळविले आहे.

त्यासाठी श्री रमेश चांगदेव पुजारी यांच्या पत्नी सौ. शिल्पा रमेश पुजारी यांनी दि.२४/०२/२०१० चे अर्जान्वये त्यांनी सदर उपचारासाठी काही रक्कम आगाऊ मिळावी म्हणून विनंती अर्ज केलेला आहे. रुबी हॉल क्लिनिक, पुणे हॉस्पिटल हे संस्थानचे मान्य यादीत आहे. वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये सदर आजार/ उपचारासाठी आगाऊ रक्कम देण्याची तरतुद नाही, परंतु तातडीची गरज असल्याने व त्यांचे उपचार थांबु नये म्हणून त्यांना रक्कम रु.५०,०००/- रुबी हॉल क्लिनिक, पुणे यांचे नावाने आगाऊ देण्यात आलेली आहे.

तरी श्री. पुजारी यांना एकुण रक्कम रु.१,००,०००/- (रु.एक लाख मात्र) आगाऊ देण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त विषय अमान्य करण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १० दिनांक १५.०२.२०१० रोजी तज्ञ वैद्यकीय अधिकारी व निवासी वैद्यकीय अधिकारी भरती करणेकामी घेण्यात आलेल्या मूलाखतीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता तज्ञ वैद्यकीय अधिकारी / निवासी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय प्रशासक यांची आवश्यकता असल्याने सदरचे पदे भरणेकामी दि. ०९/०२/२०१० रोजीचे सकाळ जॉब्स या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेत आलेली आहे. त्यानुसार दि. १५/०२/२०१० रोजी सकाळी १०.३० वा साईनिवास अतिथीगृह येथे वॉक इन इंटरव्युव्ह घेणेत आले.

सदरहू इंटरव्युव्ह करीता मा. विश्वस्त डॉ.ए बी गोंदकर साो., मा.श्री अशोकराव खांबेकर साो, मा. श्री अभंग साो, मा. कार्यकारी अधिकारी साो, डॉ. सी एस बोबडे, वैद्यकीय संचालक, डॉ. एन एस म्हस्के, उपवैद्यकीय संचालक व डॉ. सौ आशा पेंडसे, वैद्यकीय अधिक्षीका, श्री साईनाथ रूग्णालय इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सर्व मायवरांच्या उपस्थितीत आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. मुलाखतीमधील आरएमओ या पदाकरीता निवड करणेत आलेल्या उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ नं | उमेदवाराचे नाव | पदनाम | रूग्णालय |
|---|---|---|---|
| १ | डॉ. रचना सुनिल साबळे | वैद्यकीय अधिकारी (बालरोगतज्ञ) | साईनाथ |
| २ | डॉ. नलावडे विकास बापुराव | निवासी वैद्यकीय अधिकारी | साईनाथ |
| ३ | डॉ. मेंडके अशोक विठ्ठलराव | ---- " ---- | साईनाथ |
| ४ | डॉ. साबळे सुनिल भाऊसाहेब | ---- " ---- | साईनाथ |
| ५ | डॉ. बारहाते बाळासाहेब पंडीतराव | ---- " ---- | साईनाथ |
| ६ | डॉ. मोरे जयश्री नाना | ---- " ---- | साईनाथ |
| ७ | डॉ गोंदकर कश्मिरा दत्तात्रय | ---- " ---- | साईबाबा |
| ८ | डॉ. कर्डीले विजयकुमार दादाराव | ---- " ---- | साईबाबा |
| ९ | डॉ. वाकळे सचिन सदुराम | ---- " ---- | साईबाबा |
| १० | डॉ. काळे गौरव अरूण | ---- " ---- | साईबाबा |
| ११ | डॉ. आभाने महेश विलास | ---- " ---- | साईबाबा |
| १२ | डॉ. सिंग मनोरंजा रामजी | ---- " ---- | साईबाबा |
| १३ | डॉ. उत्तरवार अनंत विजयकुमार | ---- " ---- | साईबाबा |
| १४ | डॉ. विखे गणेश वसंतराव | ---- " ---- | साईबाबा |
| १५ | डॉ. वंजारे हर्षद अरविंद | ---- " ---- | साईबाबा |
| १६ | डॉ. भांगरे नानासाहेब खंडु | ---- " ---- | साईबाबा |
| १७ | डॉ. पाटोळे शक्ती अजीत | ---- " ---- | साईबाबा |
| १८ | डॉ. मारडे उमाकांत मोतीराम | ---- " ---- | साईबाबा |
| १९ | डॉ. आंचवले प्राची अरविंद | ---- " ---- | साईबाबा |

वरील उमेदवारनां बालरोग तज्ञ व आरएमओ या पदावर नियुक्ती आदेश देत आहोत त्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३४४ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ११ संस्थानचे वेबसाईटसाठी स्वतंत्र वेब सर्व्हरवर भाडेतत्वावर घेणेत आलेल्या जागेचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईभक्तांना संस्थान विषयी माहिती-सेवा उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानने स्वत:ची अधिकृत वेबसाईट (website) url www.shrisaibabasansthan.org या नावाने दिनांक २१ नोव्हेंबर, १९९८ पासून सुरु केलेली आहे. या वेबसाईटसाठी आवश्यक असणाऱ्या वेबसर्व्हर होस्टींगचे काम Institute of Advanced Studies, Nagpur ही संस्था पाहत असून, संकेतस्थळ सुरळीत सुरु ठेवणेसाठी ०१ एप्रिल, २००९ ते दिनांक ३१ मार्च, २०१० या कालावधीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेचे दिनांक ०५ एप्रिल, २००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५२ नुसार People Connect Managed Servers या कंपनीकडे असलेल्या खालील स्वतंत्र वेबसर्व्हरवर संस्थानच्या संकेतस्थळासाठी जागा (Space) भाडेतत्वावर खरेदी करण्यात आलेली आहे. याकामी People Connect Managed Servers यांना संस्थानमार्फत रुपये ९५,०००/- मात्र दोन टप्यांत अदा करण्यात आलेली आहे.

Intel / AMD P४ २.४ GHZ of Higher,
१ GB RAM,
Windows २००३ WEB SERVER OS,
HDD Capacity ८०GB
Monthly Bandwidth allocation-१५०० GB

संस्थानने विविध बॅन्कांमार्फत पेमेंट गेटवेव्दारे देणगी स्विकारणेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, सदर सर्व्हरव्दारे त्यांना लिंक देण्यात आलेली आहे. या सर्व्हरव्दारे पेमेंट गेटवे सुविधा अतिशय सुरळीत चालू आहे. सदर सर्व्हरवरील जागेची मुदत दिनांक ३१ मार्च, २०१० अखेर संपुष्टात येत आहे.

**(ब)** Ms. Weikfield Mnemonix Infonetworks, Pune यांना संस्थान वेबसाईटचे नूतनिकरण करणेबाबत जा. नं. एसएसएसटी/आयटी/१५८१३/२००७, दिनांक ०६ ऑक्टोबर, २००७ नुसार कार्यादेश पारित करण्यात आलेला आहे. कार्यादेशाप्रमाणे त्यांनी काही अंशी संस्थानचे वेबसाईटचे

तीन भाषेत नूतनिकरण केलेले आहे. नूतनिकृत वेबसाईट सुरु करणेसाठी अद्ययावत वेबसर्व्हरची आवश्यकता असलेने Ms. Weikfield Mnemonix Infonetworks, Pune यांचेमार्फत Houston Headquarters Houston, Texas USA चे वेबसर्व्हरवर एक वर्षाचे कालावधीसाठी (दिनांक ०१/०७/२००९ ते दिनांक ३०/०६/२०१० अखेर) जागा भाडेतत्वावर घेणेत आलेली असून, त्याबदल्यात त्यांना रक्कम रुपये ४४,२५०/- मात्र अदा करण्यात आलेले आहे. तथापि, सदर सर्व्हरला व्हायरस असल्यामुळे वेबसाईट सुरळीत चालत नाही. त्यामुळे पुढील काळात संस्थानची नूतनिकृत वेबसाईट साईभक्तांसाठी प्रत्यक्षपणे सुरळीत उपलब्ध करुन देणेसाठी Ms. Weikfield Mnemonix Infonetworks, Pune यांचेमार्फत घेण्यात आलेल्या सर्व्हरबाबत साशंकता वाटते.

Ms. Weikfield Mnemonix Infonetworks, Pune यांनी नूतनिकृत केलेली वेबसाईट People Connect Managed Server वर चालू करणेबाबत Institute of Advanced Studies, Nagpur यांचे प्रतिनिधी श्री गणात्रा सर यांचेशी चर्चा केली असता, सदर नूतनिकृत वेबसाईट या सर्व्हरवर अद्ययावत तंत्रज्ञानानुसार चालू करता येईल, असे Institute of Advanced Studies, Nagpur यांचेकडील दिनांक १८/०२/२०१० रोजीचा ई-मेल. चे ई-मेलव्दारे कळविले आहे.

त्यास अनुसरुन, संस्थानची सध्याची वेबसाईट साईभक्तांसाठी सुरळीत सुरु ठेवणेसाठी Institute of Advanced Studies, Nagpur या संस्थेमार्फत People Connect Managed Servers या कंपनीकडून वेबसर्व्हरवर घेण्यात आलेल्या जागेचे पुढील कालावधीसाठी दिनांक ०१ एप्रिल, २०१० ते दिनांक ३१ मार्च, २०११ या एक वर्षाचे कालावधीसाठी नूतनिकरण करणे आवश्यक आहे. याकामी एक वर्षासाठी रुपये ९५,०००/- मात्रचा खर्च Institute of Advanced Studies, Nagpur यांनी त्यांचे दिनांक १८/०२/२०१० रोजीचे ईमेलाव्दारे कळविलेला आहे. सदर रक्कम त्यांना मागील प्रमाणेच दोन टप्यात अदा करता येईल, असे नम्र मत आहे.

**निर्णय क्र.३४५** **प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, Institute of Advanced Studies, Nagpur यांचेमार्फत People Connect Managed Services Mumbai या कंपनीकडून संस्थान वेबसाईटसाठी घेण्यात आलेल्या स्वतंत्र वेबसर्व्हरवरील जागेचे (Space) चे दिनांक ०१ एप्रिल, २०१० ते दिनांक ३१ मार्च, २०११ या एक वर्षाचे कालावधीसाठी नूतनीकरण करणेस व त्यासाठी येणारे रुपये ९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १२** **डॉ.ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, निवासी वैद्यकिय अधिकारी (सध्या निलंबीत) श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे विरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, निवासी वैद्यकिय अधिकारी (सध्या निलंबीत), श्री साईबाबा हॉस्पीटल हे दि.०३-०२-२००७ पासून संस्थान सेवेत हजर झालेले आहेत. डॉ.बोराडे यांचेकडून खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन घडलेले आहे.

दि.१८-०६-२००९ रोजी सायंकाळी ५.३० वा.सर्पदंश झाल्याने चि.आकाश सखाराम डांगे वय-११ वर्षे यांना श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये अपघात विभागात औषधोपचार करण्यासाठी आणले होते. त्यावेळी डॉ.बोराडे हे अपघात विभागात वैद्यकिय अधिकारी म्हणून कामावर हजर होते. डॉ.बोराडे यांचेसोबत त्यावेळी अपघात कक्षात डॉ.शेख हे देखील हजर होते.परंतू सदर रूग्णाचा केसपेपर देखील काढला नाही. डॉ.बोराडे यांनी सदर रूग्णास कोणत्याही प्रकारचा औषधोपचार न करता, श्री साईनाथ रूग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर रूग्णाच्या नातेवाईकांनी सदर रूग्णास सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास औषधोपचार करण्यासाठी श्री साईनाथ रूग्णालयात नेले होते. त्यावेळी रूग्णाची वैद्यकिय परिस्थिती गंभीर असल्याचे दिसून आले. डॉ.धस यांनी सदर रूग्णास औषधोपचार श्री साईनाथ रूग्णालयात करणे शक्य नाही असे सांगून, श्री साईबाबा हॉस्पीटल येथे नेण्यास सांगितले. त्यानुसार सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास सदर रूग्णास पुन्हा श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये आणण्यात आले. त्यावेळी देखील डॉ.बोराडे यांनी सदर रूग्णावर कुठलाही औषधोपचार न करता, रूग्णास लोणी येथे दवाखान्यात दाखल करण्याचा सल्ला दिला. रूग्ण बेशुध्द अवस्थेत होता. वास्तविक अशा परिस्थितीत सदर रूग्णावर डॉ.बोराडे यांना श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचार करणे सहज शक्य होते. परंतु डॉ.बोराडे यांनी सदर रुग्णावर औषोधोपचार न करता स्वतः:च्या कामामध्ये निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केलेला आहे. सदर रुग्णास लोणी येथे औषोधोपचारासाठी जाण्यासाठी रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्ण वाहीकेची मागणी केली होती. परंतु या बाबतही डॉ.बोराडे यांनी कोणतीही तजवीज अथवा प्रयत्न केलेले नाही. रुग्णास योग्य वेळी आवश्यक ते औषोधोपचार न मिळालेमुळे सदर रुग्णाचे रस्त्यात निधन झाले. या घटनेबाबत विविध वर्तमान पत्रामध्ये प्रशासना बाबत बातम्या प्रसिध्द होवून, श्री साईबाबा संस्थान व रुग्णालयाच्या नावलौकीकास बाधा पोहचली

म्हणून उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत डॉ.बोराडे यांना दि.०३-०७-२००९ रोजीचे आरोपपत्र देवून, त्यांचे खातेचौकशीचे कामकाज ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे,कोपरगांव, खातेचौकशी अधिकारी यांचे समोर चालू आहे. सदर खातेचौकशी कामी डॉ.ज्ञानेश्वर बोराडे यांना दि.२२-०६-२००९ पासून सेवानिलंबीत करणेत आलेले आहे.

उपरोक्त घटनेबाबत रुग्णाचे नातेवाईक श्री.सखाराम डांगे राहणार डो-हाळे यांनी डॉ.ज्ञानेश्वर बोराडे यांचे विरुध्द शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी येथे गुन्हा नोंदविलेला आहे. सदर गुन्हयातील आरोपी डॉ.ज्ञानेश्वर बोराडे, निवासी वैद्यकीय अधिकारी यांचेविरुध्द भा.दं.वि.संहीता कलम ३०४ प्रमाणे मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी सो.,राहाता यांचे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करणे व आरोपी डॉ.बोराडे यांना सदर गुन्हयात नाममात्र अटक करणेची मंजुरी मा.प्रभारी पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये संस्थानकडे मागीतलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिरडी) अधिनियम-२००४ चे कलम १३ (४) अन्वये डॉ.ज्ञानेश्वर बोराडे यांची नेमणूक मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयास अनुसरून निवासी वैद्यकिय अधिकारी या पदावर करणेत आलेली आहे. त्यामुळे डॉ.बोराडे हे सदर अधिनियमातील कलम क्र ३१ अन्वये लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल अशी तरतूद आहे.

सबब, डॉ.ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, निवासी वैद्यकीय अधिकारी (सध्या निलंबीत), श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे विरुध्द शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी येथे दाखल झालेल्या गुन्हया संदर्भात मे.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी सो.,राहाता यांचे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करणेस व डॉ. ज्ञानेश्वर बोराडे यांना सदर गुन्हयात नाममात्र अटक करणेस मा.प्रभारी पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना संस्थानचे वतीने लेखी पत्रान्वये मंजुरी द्यावयाची किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, निवासी वैद्यकीय अधिकारी (सध्या निलंबीत), श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे विरुध्द शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी येथे दाखल झालेल्या गुन्हया संदर्भात मे.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी सो.,राहाता यांचे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करणेस व डॉ. ज्ञानेश्वर बोराडे यांना सदर गुन्हयात नाममात्र अटक करणेस मा.प्रभारी पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना संस्थानचे वतीने लेखी पत्रान्वये मंजुरी देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १३ श्री रामनवमी उत्सव २०१० कलाकार निश्चीतीबाबत**

श्री रामनवमी उत्सव -२०१० हा मंगळवार दि.२३/०३/२०१० ते गुरुवार, दि.२५/०३/२०१० अखेर तीन दिवस साजरा होणार आहे. उत्सवात भाग घेऊ इच्छिणाऱ्या कलाकारांची नावे खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कलाकाराचे नांव व पत्ता | संख्या | बिदागी रुपये | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री विश्वनाथ रमेश ओझा, साई मिलनकी आंस, के.व्ही.रोड, वार्ड नं.५, श्रीरामपूर फो.नं.२२३५६१/२२५२६३ | ०८ | १/- व नारळ | भजन संध्या कार्यक्रम |
| ०२. | श्री रमेश रावेतकर, १, अपूर्वा अपार्टमेंट, प्लॉट नं.१६, सर्व्हे नं.८२/१ बी, सहकारनगर-नं.१, पर्वती, पूणे-४११ ००९, मो.नं.९३७३२८४०७६ | ०३ | रु. ५,०००/- | साईगीते कार्यक्रम. |
| ०३. | सौ.शितल विनित खंडकर, ए-२२, रत्नसमुह हौसींग सोसा. डी.एन.नगर पोष्ट ऑफीस समोर, डी.एन.नगर, अंधेरी(प.) मुंबई-५३, मो.नं.९३२५२९५२५३ | १० | ०७,०००/- | तन्मय- एक अनुभव स्वरलहरींवर झुलण्याचा हा गायन कार्यक्रम. |
| ०४. | श्रीमती मंजूषा पाटील, बी-२५, स्नेह हौसींग सोसा. स्पेनर्स डेलीचे समोर, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२, मो.नं.९८२२७६१४७३ | ३ | १०,०००/- | गायन कार्यक्रम |
| ०५. | श्री रमेश तगारे/संजय तराणेकर, काळा मारुती चौक, सी.टी.पोष्टाशेजारी, मु.पो.येवला, जि.नाशिक-४२३४०१, मो.नं.९४२५६४४६९ | १५ | ११,०००/- | रामायण संगितीका " राम उसिने पाया " हा कार्यक्रम. |
| ०६. | श्रीमती वनिता बजाज, न्यु दिल्ली मो.नं.०९२१०४०४४९०/०९३५०७८०१३३ | १२ | १५,०००/ | साई भजन संध्या कार्यक्रम |
| ०७. | श्रीमती शितल कोलवालकर, शिवदिप, पुष्कराज अपार्टमेंट, ८८/१/१, कोहीनुर कॉलनी, सहकार नगर-२, पुणे-४११ ००९, मो.नं.९९७०२८८५३८ | ७-८ | १५,०००/- | कथ्थक नृत्य |
| ०८. | श्री दिलीप मंत्री, उपाध्यक्ष, श्री सालासार बालाजी सत्संग मंडळ, पावन हनुमान मंदिर, हातमपूरा, अहमदनगर, श्री लोकमत होजिअरी, मुथ्था चेंबर्स, | ३०-४० | १५,०००/- | संगीतमय सुंदरकांण्ड पाठ **मा.अध्यक्षमहोदय यांनी कार्यक्रम ठेवणेस सांगितले** |

| अ.नं. | कलाकाराचे नांव व पत्ता | संख्या | बिदागी रुपये | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | जुनी वसंत टॉकीज, अहमदनगर-४१४००१, मो.नं.९२२६४७१७५७ | | | **आहे.** |
| ०९. | कैलास हरेकृष्णदास, ७९, प्रशांत नगर, हनुमान मंदिराजवळ, कातोल रोड, नागपूर-४४००१३, मो.नं.०९८२३७२१५६३ | ७ | २१,०००/- | भजन संध्या कार्यक्रम |
| १०. | श्री आर.के.सक्सेना, ९०३, टाईप-४, लक्ष्मी बाई नगर, आय.एन.ए.मार्केट समोर, दिल्ली हटचे जवळ, न्यु दिल्ली-११० ०२३ मो.नं.०९८११९२६४३९/०९८११३१३४५१ | ९ | २१,६००/- | साई भजन कार्यक्रम |
| ११. | कीर्ती अनुराग, ३-बी / ३०३, आशा नगर, दत्तनी पार्कचे समोर, कांदीवली (पु), मुंबई-४०० ०६६, मो.नं.९९२०४४३०९५ | ८ | २५,०००/- | भजन कार्यक्रम |
| १२. | डॉ.उध्दव अस्तुरकर, २, पोष्टल क्लब, कन्हेरेवाडी, नासिक-४२२००१, मो.नं.९४२२२४८३०९, | ७ | २५,०००/- | सतार वादनाचा कार्यक्रम. **मा.श्री.अशोक खांबेकर, विश्वस्त, यांची शिफारस.** |
| १३. | श्री कुमारसेन गुप्ते, आरती थिएटर्स, बि.नं.१४, पितांबर लेन, छोटाणी रोड , क्रॉस लेन नं.२, माहिम रेल्वे स्टेशन, माहिम(प.), मुंबई-४०० ०१६, मो.नं.९८३३७७९२५२ | ४० | ३५,०००/- | " श्री शिरडीचे साईबाबा " ३ अंकी नाटक. |
| १४. | श्री श्रीपाद सोवनी, ८०७/२, गांवभाग सांगली, राजाजी पथ, डोंबीवली मो.नं.९४२३०१७९१५ | ०८ | ४०,०००/- | अभंग, भावगीते, भक्तीगीते इ. |
| १५. | श्री लक्ष्मीकांत सहकारी, द्वारा श्रीमती उषा पंडीत, प्लॉट नं.१८, जिव्हेश्वर हौसींग सोसा. साखरे मंगलकार्यालयामागे, एन-८ जवळ, सिडको, औरंगाबाद, फो.नं.०२४०-२३११५०६ मो.नं.९८२३४७६८९२/९८२२४१६४८३ | ८ | ४०,०००/- | संगीत कार्यक्रम. |
| १६. | श्री सुधीर बावकर, साई सुमिरन संध्या, ११-ए/१२, साईबाबा नगर, मुंबई-पुणे रोड, कळवा(प.)ठाणे-४०० ६०५ मो.नं.९८२०३६३६०८ | ४० | ५०,००० + प्रवासखर्च | हिदी मराठी, बहुश्रुत व लोकप्रिय गाणी. |
| १७. | डॉ.पी.एस.आर. अप्पा राव, अध्यक्ष, श्री कुचिपुडी नृत्य निलायम, २-२-११२३/९/जे, न्यु नल्लाकुंटा, हैद्राबाद, (आं.प्र.) मो.नं.९८४८४६६३५१ | | ५०,०००/- | कुचिपुडी डान्स बॅलेट. **मा.श्री.अशोक खांबेकर, विश्वस्त, यांची शिफारस.** |
| १८. | संध्या देशमुख, स्कॉलर म्युझीक अॅकडमी, गंगासागर वॉटर टँक समोर, खेर हॉस्पीटलचे मागे, रामनगर, वर्धा-४४२००१ मो.नं.९८५०४२०२९९/९३७३११४२१२ | ९ | ५१,०००/- | साईभजन कार्यक्रम |
| १९. | रविराज नासेरी, साई ग्रेस म्युझीक, डी/७०२, सिव्हर टॉवर, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदीवली(पु.)मुंबई-४०० १०१, मो.नं.९८९२३०६१७३/९८२०९८८२२६ | १० | ८०,०००/- | साई भजन संध्या कार्यक्रम. |
| २०. | कु.कार्तिकी गायकवाड, आळंदी - सारेगमपची नं.१ | १० | १,७५,०००/- | भजन कार्यक्रम-सारेगम फेम. |
| २१. | श्री रंगनाथ वेद्य, अध्यक्ष, कलासंपदा, शिर्डी | | संस्थान देईल ते मानधन. | " तुका म्हणे आता " - सामाजिक नाट्यप्रयोग. |
| २२. | राम कोठेकर-संगीत शिक्षक, विवेकानंद आश्रम, विद्यामंदिर, मु.पो.हिवरा आश्रम, ता.मेहकर, जि.बुलढाणा, मो.नं.९६५७२३७०९७ | ०४ | संस्थान देईल ते मानधन. | भक्ती संगीत कार्यक्रम |
| २३. | श्री. के.व्ही.सत्यनारायणा, के.व्ही.एस. ब्रिंदावनम्, गांधीनगर, एलुरु, मो.नं.९८४८१२२४१३ | २० | संस्थान देईल ते मानधन. | कुचिपुडी डान्स बॅलेट. |
| २४. | शैला गुलशन अरोरा, ई-३११, मिल्टन अपार्टमेंट, जुहु-कोलीवाडा, जुहू, मुंबई-४९, | ०५ | | कथक नृत्य कार्यक्रम. **मा.डॉ.गोंदकर, विश्वस्त, यांची शिफारस.** |

वरीलपैकी अ.नं.०८ मधील श्री दिलीप गांधी, उपाध्यक्ष, श्री सालासार बालाजी सत्संग मंडळ, पावन हनुमान मंदिर, हातमपूरा, अहमदनगर, यांचा संगीतमय "सुंदरकाण्ड" पाठाचा कार्यक्रम श्री हनुमान मुर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या दिवशी म्हणजे दि.२१-२२/०३/२०१० रोजी आयोजीत करता येईल.

वरील १ ते २४ कलाकारांनी श्री रामनवमी उत्सवात कार्यक्रम करणेस संधी मिळावी म्हणुन विनंती केलेली आहे.

उपरोक्तपैकी तीन दिवसासाठी म्हणून तीन कलाकार निश्चित होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सवात खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चीत करण्यात आले.**

| अ.न | कलाकाराचे नांव व पत्ता | कार्यक्रम व वेळ | कार्यक्रम तारीख व वार | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री दिलीप मंत्री, उपाध्यक्ष, श्री सालासार बालाजी सत्संग मंडळ, पावन हनुमान मंदिर, हातमपूरा, अहमदनगर, | **संगीतमय सुंदरकाण्ड पाठ रात्रौ ८.०० ते ९.००** | **दि.२२.०३.२०१० सोमवार** | **रुपये ११,०००/-** |
| ०२ | श्री विश्वनाथ रमेश ओझा, साई मिलनकी आंस, के.व्ही.रोड, वार्ड नं.५, श्रीरामपूर | **भजन संध्या कार्यक्रम रात्रौ ७.३० ते ९.००** | **दिनांक २३.०३.२०१० मंगळवार** | **रु.१/-व नारळ** |
| ०३ | श्री कुमारसेन गुप्ते, आरती थिएटर्स, बि.नं.१४, पितांबर लेन, छोटाणी रोड , क्रॉस लेन नं.२, माहिम रेल्वे स्टेशन, माहिम(प.), मुंबई-४०० ०१६, मो.नं.९८३३७७९२५२ | " श्री शिरडीचे साईबाबा " ३ अंकी नाटक. रात्रौ ९.३० ते पूढे | **दिनांक २३.०३.२०१० मंगळवार** | **रु.२१,०००/-** |
| ०४ | डॉ.उध्दव अस्तुरकर, २, पोष्टल क्लब, कन्हेरेवाडी, नासिक-४२२००१, मो.नं.९४२२२४८३०९, | सतार वादनाचा कार्यक्रम. रात्रौ ७.३० ते ९.०० | **दिनांक २४.०३.२०१० बुधवार** | **रुपये ११,०००/-** |
| ०५ | शैला गुलशन अरोरा, ई-३११, मिल्टन अपार्टमेंट, जुहु-कोलीवाडा, जुहू, मुंबई-४९, | कथक नृत्य कार्यक्रम. रातो ९.३० ते पूढे | **दिनांक २४.०३.२०१० बुधवार** | **रुपये ११,०००/-** |
| ०६ | श्री रंगनाथ वेद्य, अध्यक्ष, कलासंपदा, शिर्डी | " तुका म्हणे आता " - सामाजिक नाट्यप्रयोग. | **दिनांक २५.०३.२०१० गुरुवार** | **रुपये ११,०००/-** |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १४** **श्री.प्रल्हाद गो.कर्डीले, कंत्राटी सहाय्यक आचारी यांना वेतन बँडनुसार वेतन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले, कंत्राटी पध्दतीने सहाय्यक आचारी प्रसादालय विभाग यांनी अर्ज सादर करुन "मला सध्या ५५००/- मानधन मिळत असून डिसेंबर २००९ मध्ये माझे नियुक्तीस ०३ वर्षे पूर्ण होत आहे. माझे शिक्षण १२ वी सायन्स असून मी डिप्लोमा इन केटरिंग कुकरी (०२ वर्षे ) हा कोर्स झालेला आहे. तरी मला सदर कायम करुन वेतनश्रेणी मिळावी, " अशी विनंती केली आहे.

श्री कर्डीले यांची संस्थानने प्रसिध्द केलेल्या जाहीरातीनुसार प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे जा.नं.एसएसएस/ वशी-०१/१८१४८/२००६ दि.२१/१२/२००६ अन्वये कंत्राटी पध्दतीने सहा.आचारी या पदावर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली असून मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार त्यांना वेळोवेळी मुदतवाढ व मानधनात वाढ देण्यात आलेली असून जा.नं.एसएसएस/वशी-०१/१९५/२००९ दि.१३/०१/२००९ अन्वये देण्यात आलेली ०१ वर्षाची मुदतवाढ दि.२८/१२/२००९ अखेर संपुष्ठात आलेली असून त्यांना दि.२८/१२/२००९ पासून ०१ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ व रु.५५००/- ऐवजी रु.६५००/- मानधनात वाढ देणेत आलेली आहे.

शासन निर्णयानुसार संस्थानचे आकृतीबंधास दि.०७/०८/२००९ रोजी मंजूरी मिळालेली आहे. सदर शासन निर्णयातील अटी-शर्ती क्र.०३ मध्ये "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी. " अशी आहे.

प्रसादालयाकडील आवश्यकतेनुसार वर्तमान पत्रात ०४ पदांसाठी जाहिरात देऊन दि १९/०८/२००६ रोजीच्या मुलाखतीव्दारे कंत्राटी पध्दतीने सहाय्यक आचारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली असून दि. २८/१२/२००६ पासून ते सेवेत आहेत.

शासनाच्या आकृतीबंधातील मान्यतेनुसार वेतनश्रेणीवरील १४ पैकी १३ पदे रिक्त आहेत. श्री कर्डीले यांचेकडें आवश्यक शैक्षणिक पात्रता असल्याने त्यांना आचारी हे पद व त्या पदाचा वेतन बॅन्ड रु. ४४४० - ७४४० मधील सुरुवातीचे मुळवेतन रु.४८४० + ग्रेड वेतन तसेच नियमानुसार देण्यात येणारे अनुज्ञेय भत्ते देऊन दि.०७/०८/२००९ पासून संस्थान आस्थापनेवर घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.प्रल्हाद गो.कर्डीले, कंत्राटी सहाय्यक आचारी यांचेकडें आवश्यक शैक्षणिक पात्रता असल्याने त्यांना आचारी हे पद व त्या पदाचा वेतन बॅन्ड रु. ४४४० - ७४४० मधील सुरुवातीचे मुळवेतन रु.४८४० + ग्रेड वेतन तसेच नियमानुसार देण्यात येणारे अनुज्ञेय भत्ते देऊन दि.०७/०८/२००९ पासून संस्थान आस्थापनेवर घेणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १५** **श्री साईबाबा हॉस्पिटल वैद्यकिय अधिकारी मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी च्या श्री साईबाबा हॉस्पीटलकडे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने ऑप्थॅालमॉलॉजीस्ट, फिजीशियन, आर्थो सर्जन, कार्डीओलॉजीस्ट, जनरल सर्जन अशा तज्ञ वैद्यकिय अधिका-यांच्या एकत्रित मानधनावर प्रथम एक वर्षासाठी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

सदर एक वर्षाच्या नेमणूकीचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर त्यांना वेळोवेळी मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. सदर देण्यात आलेल्या मुदतवाढी खाली त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे संपुष्ठात आलेल्या आहेत.

| अ.नं. | वैद्यकिय अधिकारी नांव | नेमणूक दिनांक | वाढविण्यात आलेली मुदतवाढ संपुष्ठात येत असलेची/आलेची तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| ०१. | डॉ. हेतल नविनचंद्र शहा , ऑप्थालमॉलॉजिस्ट | २५/१२/२००६ | २४/१२/२००९ |
| ०२. | डॉ. कृष्णा मधुकर गिरी, फिजीशियन | ०१/०३/२००८ | २८/०२/२०१० |
| ०३. | डॉ. शुभा अनिलकुमार मेहरोत्रा ( वर्मा )फिजीशियन | ०२/०३/२००९ | ०१/०३/२०१० |
| ०४. | डॉ. प्रितम बाळासाहेब जपे, आर्थो सर्जन | २८/०५/२००७ | २७/०५/२००९ |
| ०५. | डॉ.बजाज हरिष हुकूमचंद कार्डीओलॉजिस्ट | ०९/०४/२००७ | ०८/०४/२००९ |
| ०६. | डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा , कार्डीओ(इंटरव्हेन्शनल) | ०२/०२/२००९ | ०१/०२/२०१० |
| ०७ | डॉ. मकरंद सिताराम फुलझेले (जनरल सर्जन ) | १४/०१/२००९ | १३/०१/२०१० |

उपरोक्त अ.नं. "०१ ते ०५ यांचे मुदतवाढीचे कालावधी मध्ये काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचेबाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत. त्यांना वेतनश्रेणी देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात यावी.

तसेच अ.नं. ०६ व ०७ यांचे एक वर्षाचे कालावधी मध्ये काम व वर्तणूक साधारण आहे. त्यांचेबाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत. परंतु त्यांचे कामाचे परिवेक्षण करण्याचे आवश्यक असल्यांने त्यांना सहा महिने परिवीक्षाधीन कालावधी करीता मुदतवाढ द्यावी " असे अभिप्राय वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दिले आहेत.

वैद्यकिय संचालक यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन उपरोक्त अ.नं. ०१ ते ०५ वरील वैद्यकिय अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासूच्या (कॉलम नं.०४) लगतच्या तारखेपासून पुढील आदेश होईपावेतो त्यांची सेवा पुढे चालू ठेवणे तसेच अ.नं. ०६ व ०७ वरील वैद्यकिय अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासूनच्या (कॉलम नं.०४) लगतच्या तारखेपासून पुढे सहा महिने कालावधीकरीता वाढविणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १६ दिनांक १६.०९.२००९ ते दिनांक १५.०९.२०११ या कालावधीसाठी विभागीय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीवर सदस्य म्हणून नेमणूकीकरीता संस्थानमार्फत एका व्यक्तीच्या नावाची शिफारस करणे बाबत**

**प्रस्ताव-** वरिष्ठ मंडल वाणिज्य प्रबंधक, भुसावळ यांनी दि.११/०१/२०१० रोजीचे पत्रान्वये दि. १६/०९/२००९ ते दि.१५/०९/२०११ या कालावधीसाठी विभागीय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीवर सदस्य म्हणून नेमणूकीकरीता संस्थानमार्फत एका व्यक्तीच्या नावाची शिफारस करणेबाबत कळविलेले असून सोबत नॉमिनेशन फॉर्म जोडला असून तो भरुन तसेच ०२ स्टॅम्प साईज फोटोग्राफ सेंन्ट्रल रेल्वे, भुसावळ विभागाकडे पाठविणेबाबत कळविलेले आहे.

**सदर पदावर नेमणूक करणेकामी त्यांनी खालीलप्रमाणे निकष ठरविलेले आहेत.**

१) सदर व्यक्ती राज्य शासन / केंद्र शासनाचे व्यवस्थापनामध्ये नोकरीस नसावा.

२) सदर व्यक्ती रेल्वेकडे कॅटरिंग कॉन्ट्रॅक्टर, आऊट एजन्सी कॉन्ट्रॅक्टर, रेल्वे ट्रॅव्हलर सर्व्हिस एजन्ट, हॅन्डलींग कॉन्ट्रॅक्टर, इंजिनिअरींग कामाचा कॉन्ट्रॅक्टर नसावा.

३) सदर व्यक्तीने दुसऱ्या विभागीय रेल्वे प्रवासी समितीवर नेमणूक स्वीकारु नये.

४) वरिल माहिती चुकीची आढळल्यास त्यांना सदरच्या समितीवरुन काढून टाकण्यात येईल अशा स्वरुपाचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०१/२००९ निर्णय क्र.६५ अन्वये मा.विश्वस्त श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांची नेमणूक दि.०१.१०.२००८ ते दि.३०.०९.२०१० या कालावधीसाठी केलेली होती.

आता दि.१६/०९/२००९ ते दि.१५/०९/२०११ या कालावधीसाठी कोणत्या मा.विश्वस्त यांचे नावाची शिफारस करावी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५० यावर सविस्तर चर्चा होऊन दि. १६.०९.२००९ ते दिनांक १५.०९.२०११ या कालावधीसाठी विभागीय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीवर सदस्य म्हणून नेमणूकीकरीता संस्थानमार्फत मा.विश्वस्त श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांचे नावाची शिफारस करणेत यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७ श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात वेगवेगळया सेंट्रल ऑक्सीजन व नायट्रस सिस्टिम असून सदर सिस्टमचा ऑक्सीजन व नायट्रस गॅस हा सर्व वार्ड / विभागामध्ये रुग्णांच्या आवश्यकतेनुसार वापरण्यात येत असतो. सदरचे दोन्ही सिस्टिम करीता लागणारा ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदी हि मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८.०७.२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१४ (१४) अन्वये निम्नतम दराने मे.बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांचेकडून सदरचा गॅस दोन्ही रुग्णालयाकरीता सन २००७ पासुन खरेदी करण्यात येतो, परंतु सन सन २००८-०९ च्या वार्षिक लेखापरिक्षणात शासनाचे लेखापरिक्षक यांनी सदरचे गॅस करीता असलेले खरेदी दर हे सन २००७ पासुनचे असल्यामुळे पुन्हा कोटेशन मागवून खरेदीबाबत सुचना केल्या आहेत.

त्यानुसार दि. १०.०१.२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात वेगवेगळया सेंट्रल ऑक्सीजन व नायट्रस सिस्टिम कार्यान्वीत असून सदर सिस्टीम करीता ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. २४३८ ते २४७७ दि. ०६.०२.२०१० अन्वये एकुण ११ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून दि. २६.०२.२०१० अखेर कोटेशन मागविण्यात आले आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे नऊ कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

०१. M/S. Ahmednagar Industrial Gases Pvt.Ltd., Ahmednagar. (बंद कोटेशन प्राप्त दि. २६.०२.१०)
०२. M/S.Balaji Trading Co., Samgamner ( बंद कोटेशन प्राप्त दि. २६.०२.२०१०)
०३. M/S. Nikhil Medico Gases, Nashik ( बंद कोटेशन प्राप्त दि. २६.०२.२०१०)
०४. M/S. Nitroxy Medichem, Loni ( बंद कोटेशन प्राप्त दि. २६.०२.२०१०)
०५. M/S. P. Pahade Agencies, Yeola ( बंद कोटेशन प्राप्त दि. २६.०२.२०१०)
०६. M/S. Pankaj Gases, Shrirampur ( बंद कोटेशन प्राप्त दि. २६.०२.२०१०)
०७. M/S. Rahul Gases, Shrirampur ( बंद कोटेशन प्राप्त दि. २६.०२.२०१०)
०८. M/S. Shradha Agencies, Ahmednagar ( २ बंद कोटेशन प्राप्त दि.६.०२.२०१०)
०९. M/S. Laxmi Gases, Sinner ( बंद कोटेशन प्राप्त दि. २६.०२.२०१०)

वरीलप्रमाणे प्राप्त कोटेशनपैकी अ.नं. ४ व ९ यांनी कोटेशन मागणी पत्र नसतांनी देखील कोटेशन पाठविलेले आहे ते देखील विचारात घ्यावे असे मत आहे.

तरी सदरचे प्राप्त नऊ बंद कोटेशन समक्ष उघडून मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५१ उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७ केंद्र व राज्य शासनाकडून तीर्थक्षेत्र विकास व इतर विकास योजना प्रकल्पांतर्गत आर्थिक अनुदान / सहाय्य उपलब्ध करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव** केंद्र व राज्य शासनाकडून तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत तसेच शासनाच्या विविध योजनाच्या अंतर्गत विकास प्रकल्पांसाठी तसेच परिसर विकास प्रकल्पांसाठी आर्थिक अनुदान / आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणेत येत असते. अशा विविध सरकारी योजनांची माहिती संस्थान व्यवस्थापनाला वेळोवेळी प्राप्त होत नाही तसेच याबाबत सादर करावयाचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव व त्यासोबतची सहपत्रे तयार करणे अत्यंत किचकट व जिकिरीचे, वेळकाढूपणाचे असते, तसेच या प्रस्तावांना मंजुरी मिळणेसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करणे अत्यंत आवश्यक व गरजेचे असते. यासर्व बाबींमुळे व्यवस्थापनामार्फत अशा प्रस्तांवाचा पाठपुरावा योग्य रितीने होईलच याची शाश्वती देता येत नाही. त्यामुळे अशा प्रकारचे आर्थिक अनुदान प्राप्त करणेचे प्रस्ताव तयार करणे, त्यासाठी लागणारी आवश्यक ती माहिती संकलीत करुन ती विहीत नमुन्यांमध्ये सादर करणे, शासनस्तरावर प्रस्ताव मान्यतेसाठी पाठपुरावा करणे आदि अनुषंगिक कामासाठी अशा प्रकारची कामे करणारी सल्लागार संस्था नेमून पूर्ण करुन घेता येईल. तसेच अशा प्रकारची सल्लागार संस्था नेमून त्यांचेकडून आर्थिक अनुदान प्राप्तीचे प्रस्ताव तयार करुन शासनाच्या संबंधित विभागांकडे सादर करणेबाबत आजचे सभेत चर्चा झाली.

**निर्णय क्र. ३५२ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, केंद्र व राज्य शासनाकडून तीर्थक्षेत्र विकास व इतर विकास योजना प्रकल्पांतर्गत शासकीय आर्थिक अनुदान / आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन घेणेबाबत प्रस्ताव सादर करणेत यावेत. यासाठी या क्षेत्रातील अनुभव असलेल्या पुणे येथील अभय शास्त्री असोसिएटस् (चार्टर्ड अकौन्टटस्) यांची नियुक्ती करण्यात यावी. याकामी मे. अभय शास्त्री**

**असोसिएटस् (चार्टर्ड अकौन्टटस्), पुणे यांना प्रस्तावित प्रस्ताव किंमतीच्या ०१ (एक) टक्का (अधिक सेवाकर) रक्कम सर्वसमावेशक खर्चासह सल्लागार शुल्क म्हणून आदा करणेत यावी. केंद्र अथवा राज्य शासनाकडून अशा प्रकारचे आर्थिक अनुदानाचे प्रस्ताव मंजूर होऊन, त्याप्रमाणे मंजूर रक्कम संस्थान व्यवस्थापनाला प्राप्त झाल्यास, त्या मंजूर रक्कमेच्या ०५(पाच) टक्के रक्कम (अधिक सेवाकर) (पूर्वीची आदा करण्यात आलेली ०१ (एक) टक्का रक्कम वजा जाता ०४ टक्के रक्कम) सल्लागार शुल्क म्हणून संबंधीत संस्थेस आदा करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १८ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचेकडील रक्कम रु. ८ कोटींच्या गुंतवणूकीबाबत**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी नागरी पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजनांसाठी दिनांक ०६ जानेवारी, २००५ ते दिनांक २१ फेब्रुवारी २००५ या कालावधीत रोखे विक्रीसाठी खूले केलेले होते. केंद्र शासन पुरस्कृत वर्धीत वेग नागरी पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत शिर्डी शहरासाठी पाणीपुरवठा योजना मंजूर करणेकामी संस्थानने या योजनेत रक्कम रुपये ०८ कोटींची, ०७ वर्षाकरीता द.सा.द.शे. ७.५०% या व्याजदराने गुंतवणूक केलेली होती. या गुंतवणूकीवर संस्थानला सन २००५-०६ पासून प्रत्येक वर्षी रुपये ६० लाख एवढे व्याज मिळालेले आहे. या गुंतवणूकीची मुदत दिनांक २० एप्रिल, २०१२ रोजी संपत आहे. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी Interest cum Early Redemption (Call Option) payable on २०.०४.२०१० अंतर्गत सदर गुंतवणूकीची व्याजासह होणारी रक्कम मुदतीपूर्वीच स्वीकारणेबाबत सुचीत केलेले आहे.

उपरोक्त नमुद केलेला Call Option स्वीकारणे बंधनकारक आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मुदतपूर्ण होण्यापूर्वीच रक्कम रु. ०८ कोटी व त्यावर दिनांक २० एप्रिल, २०१० अखेर होणारे व्याज स्वीकारणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५३ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई यांचेकडील गुंतवणूकीची रक्कम रु. ०८ कोटी व त्यावर दिनांक २० एप्रिल, २०१० अखेर होणारे व्याज मुदतपूर्ण होण्यापूर्वीच स्वीकारणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १९ माजी विश्वस्त श्री.प्रभाकर तुकाराम बोरावके यांचे तक्रारीबाबत.**

**प्रस्ताव-** आजचे सभेत समक्ष माजी विश्वस्त श्री.प्रभाकर तुकाराम बोरावके यांनी असे सांगितले की, माझे कुटूंबीय गेली ६५ वर्षापासुन स्वतःच्या जमिनीत पिकविलेली फुले श्री साईबाबांच्या समाधीस सकाळी ९.४५ वाजता वाहण्याचे काम अविरतपणे करत आहेत. माझे बरोबर श्री साईभक्त अब्दुलबाबां यांचे वंशातील काही लोक फुले वाहण्यासाठी असतात. परंतु सध्या फुले वाहण्यासाठी शिर्डी गावातील बरेच लोक येत आहेत व सदरचे लोक मला व माझे कुटूंबियांना फुले वाहण्यासाठी मज्जाव करत आहेत. याबाबत व्यवस्थापन समितीने योग्य तो निर्णय घ्यावा अथवा मला संस्थान परिसरात उपोषणास बसावे लागेल.

**निर्णय क्र. ३५४ यावर सविस्तर चर्चा होऊन श्री.प्रभाकर तुकाराम बोरावके व त्यांचे कुटूंबिय हे गेली ६५ वर्षापासून श्री साईबाबांच्या समाधीस फुले वाहण्याचे काम पुर्वापार अविरतपणे करत आहेत. त्यांना त्यांचे कुटूंबातील दोन व्यक्ती व साईभक्त अब्दुलबाबा यांच्या वंशातील दोन व्यक्तींनाच समाधी मंदिरात प्रवेश देऊन त्यांना श्री साईबाबांचे समाधीस फुले वाहू देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २० मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र. ३५५** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

(०१) व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त तयार झालेनंतर सर्व सदस्यांना पाठविण्यात यावे.

(०२) संस्थानकरिता मा.स्थानिक विश्वस्तांनी जमिन खरेदीबाबत पहाणी करुन निर्णय घ्यावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(०३) श्रीसाई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप.सोसायटीस भक्तनिवास इमारतीचे आतील बाजूस देण्यात आलेल्या ०४ गाळ्यांची माहे मे,२०१० मध्ये जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

(०४) श्री.जगदीश स्वरुप, औरंगाबाद यांनी तयार केलेल्या साईबाबांचे जीवनावरील पुस्तकाच्या प्रती मा.विश्वस्तांना पहाणेसाठी पाठवून छपाईबाबत उचित निर्णय घ्यावा. (कार्यवाही- अधिक्षक,प्रकाशने)

(०५) महाराष्ट्र मुद्रणालय, पुणे यांचे प्रतिनीधी समक्ष हजर होते, त्यांचेकडे तयार असलेल्या संस्थान दैनंदिनी (डायऱ्या) त्यांना साईमंदीरे अथवा इतरत्र थेट विक्रीस करणेस मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- अधिक्षक,प्रकाशने)

(०६) मा.विश्वस्त सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर हे दिनांक १०.०२.२०१० रोजी समक्ष मे.सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा येथे ताशी २००० नग चपात्या तयार करणारे मशिनचे प्रात्यक्षिक पहाणी करीता गेले होते त्यावेळी त्यांनी या मशिनमध्ये काही सूधारणा सूचविल्या होत्या. त्यानुसार मे.सनशाईन इंडस्ट्रीज यांनी मा.विश्वस्तांचे सूचनेनुसार चपाती मशिनमध्ये सुधारणा करुन सदर मशिनची इमेलव्दारे पाठविलेली चित्रफित आजचे सभेत दाखविली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांनी ताशी २००० नग चपाती करणेचे मशिन चांगले असल्याची विश्वस्तांची खात्री झाल्याने मे.सनशाईन इंडस्ट्रीज,नोएडा यांचेकडून चपाती मशिनची किंमत मागवून घेऊन उपसमितीचे पुढील सभेपूढे त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे असे ठरले.

त्याचप्रमाणे व्यवस्थापन समितीचे दिनांक ७.११.२००९ चे सभेतील निर्णय क्र.८९५ व निर्णय क्र.८९६ अन्वये चौकशी व निवासस्थान विभागासाठी आवश्यक असणारे बेडशिट मा.स्थानिक विश्वस्तांनी सोलापूर येथून खरेदी करण्याचे ठरले होते. तथापि सोलापूर येथील बेडशिटचे नमुने मा.विश्वस्तांना पसंत न पडल्याने स्थानिक विश्वस्त संस्थानचे कामाकरीता पाणिपत येथे गेले असता बजाज हॅण्डलूम इंडस्ट्रीज लि.पाणिपत या मिलचे बेडशिटचे नमूने पसंत केलेले आहेत. त्यानुसार चौकशी व निवासस्थान विभागासाठी व रुग्णालये विभागासाठी आवश्यक असणारे ६०x९० या साईजचे बेडशिट प्रति नग रुपये १४१/-+ वाहतूक खर्च या दराने खरेदी करण्यास व याकामी येणारे योग्य त्या प्रवास खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग/अधिक्षक,खरेदी विभाग/वैद्यकीय संचालक)

वरील निर्णय क्र २७४ ते ३५५ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरित/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)